# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 24/2010

श्री दामोधर बाजीराव भावे
भाास्त्री वार्ड पंचायत समिती गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रदिप डांगे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.जिल्हाधिकारी
नागपूर ता. जि. नागपूर
2) श्री संजय धिवरे
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (राजस्व विभाग)
उमरेड ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेशपारित दिनांक 3.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी (राजस्व विभाग) उमरेड यांचेकडे अर्जदाराने एसडीओ कोर्ट उमरेडला प्रस्तूत करण्यात आलेल्या कोर्ट केस बाबतची प्रकरणाचा अंतीम निर्णय अहवालाची प्रत मिळण्याबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जदाराच्या वडीलोपार्जीत मालकी हक्काच्या व अनादि वर्शापासून रेव्हेन्यूच्या भूमी अभिलेखाच्या मुळ रेव्हेन्यू रेकार्डवर पूर्ववत असलेल्या नावाची नोंद असलेलया उपरोक्त भोतजमिनीवर गैरअर्जदार श्री भाामसुंदर तवलेनी संबंधित तलाठया ाी संगनमत करुन गैरकानूनी अवैधरित्या फर्जी 7/12 8 अ घेवून फेरफार करुन धोखाधडी निरीक्षण करुन माझी भोतजमीन विक्रीपत्र केलेली आहे. गैरअर्जदाराचा फेरफार व विक्रीपत्र रद्य करण्याची याचिका एसडीओ कोर्ट कार्यालयात नोव्हेंबर 2008 मध्ये सादर करण्यात आलेली आहे. आपल्याकडून घेण्यात आलेल्या कोर्ट निर्णयाची प्रत हवी आहे. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 11.9.2009 रोजी (प्राप्त दि.20.10.2009) माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 23.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक निरंक असून माहिती उपलब्ध करुन

दिलेली असल्यामुळे अपील फेटाळून लावण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही योग्य आहे परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना सदरची माहिती ही विलंबाने प्राप्त झालेली आहे. अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 25/2010**

श्री अविनाश नत्थु टांगले
मु. पो. गोंडाणे हाऊस दर्ग्या जवळ
सिव्हील लाईन भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डॉ. व्ही. पी. ढोमणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य
जे. एम. पटेल महाविद्यालय भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्री डॉ. इ वर एन. दुधाट
जन माहिती अधिकारी तथा
जे. एम. पटेल महाविद्यालय भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.9.2009 रोजी जे. एम. पटेल महाविद्यालयाच्या प्राचार्यानी घेतलेल्या वर्गनिहाय तासिकेसंबंधी माहिती. भौक्षणिक सत्र 2005–2006 2006–2007 2007–2008 2008–2009 आणि 2009–2010 या भौक्षणिक सत्रातील ऑगश्ट 2009पर्यंत जे. एम. पटेल महाविद्यालयाच्या प्राचार्यानी वर नमुद कालावधीत एकुण पाच भौक्षणिक सत्रातील कोणत्या वर्गाचे कोणकोणत्या तारखेला किती तासिका घेतल्या त्या तासिंकांना कोणकोणते विद्यार्थी उपस्थित होते. त्या सर्व उपस्थित विद्यार्थ्याचे हजेरी पत्रक व विद्याथ्याच्या पत्रव्यवहाराचे व मुळ निवासाच्या पत्त्यासह माहिती प्रमाणित करुन हवी आहे. सदरची माहिती ि घ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19.12.2009 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता सुनावणीचे दिव ी हजर न राहिल्यामुळे व अर्जावरुन त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा बोध त्यांचे अर्जावरुन होत नसल्यामुळे व माहिती अधिकारी यांना योग्य खुलासा विचारलेला असल्यामुळे खुलासा प्राप्त झाल्यानंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश

दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी कोणताही खुलासा दाखल केला नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. वास्तविक अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 3.9.2009 च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती स्वयंस्पश्ट आहे. त्यात अर्थबोध होत नाही असा प्र नच उदभवत नाही. अधिनियमाच्या तरतुदीचा अभ्यास करुनच 30 दिवसात ही माहिती उपलब्ध करुन देता आली असती. परंतु माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करण्याचाच प्रयत्न झालेला दिसून येतो. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की प्रार्चायानी घेतलेल्या तासिकेच्या संदर्भातील माहिती ही त्या त्या वर्शी नश्ट करण्यात येते. तसेच विद्यार्थ्याच्या निवासाचे पत्ते ही वैयक्तीक माहिती असल्यामुळे देता येणार नाही. परंतु जो खुलासा आज आयोगापुढे करण्यात आलेला आहे त्या खुला ाप्रमाणे तीन मुद्यात उत्तर दिले असते तर माहिती उपलब्ध करुन देण्यासारखे झाले असते. ज्या वर्शाची माहिती उपलब्ध आहे ती माहिती उपलब्ध करुन देणे आव यक होते. परंतु तीही देण्यात आलेली नाही. अतिउच्च विद्याविभूशित अशा माहिती अधिकारी तथा प्राचार्यानी यापुढे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे गंभीर असणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 3.9.2009 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध असल्यास ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 3.9.2009 च्या अर्जाप्रमाणे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी भाास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 23/2010**

श्री ब्रिजमोहन श्रीरामप्र ााद त्रिपाठी
जलालखेडा ता. नरखेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री डॉ. सुर्यभान इंगळे
जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी पोलीस अधिक्षक कार्यालय (ग्रामीण) नागपूर यांचेकडे दि.21.3.2009 रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 22.9.2009 रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.12.2009 रोजी देण्यात आला असून दि. 21.3.2009 रोजी पो.स्टे.जलालखेडा येथे दिलेल्या तकार अर्जानुसार चौक ाी करुन चौक ाीअंती अप. क्र. 97/09 क. 379,34 भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचे प्रथम खबर ची छायांकित प्रत आपणास याद्वारे पुरविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही दि ााभूल करणारी दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांना ठाणेदार जलालखेडा यांच्याकडून जी माहिती प्राप्त झाली ती त्यांनी कळविलेले दिसून येते. व यावरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्याकरीता ठाणेदार जलालखेडा यांचे सहाय घेतले. व त्यामुळे अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे ठाणेदार

जलालखेडा यांना माहिती अधिकारी समजण्यात येवून ते त्यांचे विरुध्द दि ाभूल करणारी माहिती जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे ि ास्तभंगाची कार्यवाही करणे आव यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून ठाणेदार जलालखेडा यांनी दि ाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे ि ास्तभंगाची कार्यवाहीची ि ाफारस करण्यात येते.

2) सदरची ि ास्तभंगाची कार्यवाही ही **<u>जिल्हा पोलीस अधिक्षक नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर</u>** यांनी करावयाची असून त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>जिल्हा पोलीस अधिक्षक नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर</u>** यांचेकडे पुढिल कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 21/2010**

श्री मिलिन्द शिवाजी भगत
40 शिवाजी नगर रोड क्र. 6
वि वकर्मानगर नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य. विभाग)
जिल्हा परिशद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री राऊत
जन माहिती अधिकारी तथा
माध्य. ि ाक्षण विभाग जिल्हा परिशद नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे आपले कार्यालयातील पत्र क्र. जा.क्र.ग्रामीण/45/96 ि ा.वे. व भ.नि.नि. दि.3.1.96 च्या प्र नाच्या संदर्भात करण्यात आलेल्या प्रकिये संबंधात निर्णयाची प्रत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 7.10.2009 रोजी मागितलेली माहिती या कार्यालयाशी संबंधित नसून अधिक्षक वेतन भविश्य निर्वाह निधी रविनगर नागपूर या कार्यालयाशी संबंधित आहे. त्या कार्यालयात अधिक्षक हे जन माहिती अधिकारी आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी दि. 30.10.2009 रोजी प्रथम अपील केले. परंतु प्रथम अपीलाच्या सुनावणीची अपीलकर्ता यांना नोटिस काढण्यात आलेली असून सुध्दा ते हजर न झाल्यामुळे निर्णय देण्यात आलेला नाही. तरी सुध्दा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता हे राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा अनेक अपीले दाखल करतात व कोणत्याही अपीलाच्या संदर्भात सुनावणीस हजर राहात नाहीत व तसाच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा खुलासा दाखल केलेला आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्या कार्यालयाशी संबंधित नाही असे कळवून सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील व राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असल्यामुळे व त्याबाबत कोणताही खुलासा आयोगाकडे केलेला नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 36/2010

श्री अरविंद दशरथजी वाटकर
वार्ड क्र.1 मु. पो. ता. नागभिड
जि. चंद्रपूर 441205 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती कार्यालय नागभिड
ता. नागभिड जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय नागभिड
ता. नागभिड जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत यांचेकडे दि.26.6.2007 दारिद्रय रेशेखालील मुळ यादी व पुरवणी यादी मिळण्याबाबत दि.16.9.2009 ला दिलेल्या अर्जावर काय झाले त्याचा तपि ाल व फाईल नोटिंग देण्यात यावे. असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 28.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु अपीलकर्ता यांना दि. 27.11.2009 रोजी रु. 68/— भरुन माहिती घेवून जावे असे माहिती अधिकारी पंचायत समिती नागभिड यांनी कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना यादी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या दि.16.9.2009 च्या अर्जाप्रमाणे माहिती दिली आहे. अर्जावर काय कार्यवाही झाली याबद्यलची त्यांना अपेक्षा होती पण तशी त्यांना माहिती दिली नाही. पण दि.17.9.2009 च्या अर्जाचा उल्लेख हा माहितीच्या अर्जात त्यांनी कळविला नव्हता व त्यांनी ते आता आयोगापुढे सादर केले.
त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी यादी उपलब्ध करुन दिलेली असली तरी अपीलकर्ता यांचे नाव कमी का करण्यात आले याबद्यलची माहिती त्यांना उपलब्ध करुन

दिलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे नाव दारिद्रय रेशेखालील यादीत व त्यानंतर पुरवणी यादीत घेण्यात आले याबद्यलची जी टिपणी किंवा फाईल नोटिंग असेल किंवा त्या संदर्भामध्ये जे निरीक्षण असेल त्याबद्यलची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांचे स्वतःचे नाव दारिद्रय रेशेखालील यादीतून वगळून पुरवणी यादीत का घालण्यात आले याबद्यलच्या टिपणीच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 31/2010**

श्री ओमप्रकाश नंदकिशोर जैस्वाल
नबीरा कॉलेज कॉर्नर धंतोली काटोल
ता. काटोल जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. एन. पांडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृशी अधिकारी कार्यालय काटोल
ता. काटोल जि. नागपूर
2) श्री बी. टी. काळे
जन माहिती अधिकारी तथा कृशी अधिकारी
तालुका कृशी अधिकारी कार्यालय काटोल
ता. काटोल जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता सुरुवातील गैरहजर होते. नंतर हजर झाले व त्यांचे म्हणणे एकुन घेतले. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी कृशी अधिकारी कार्यालय काटोल यांचेकडे पाणलोट क्षेत्रातील काटोल तालुक्यांतील सर्व पाणलोट क्षेत्रातील सन 2007—08 व 2008—09 मध्ये लाभार्थीची संख्या व लाभार्थीची नावे ही माहिती व्यक्तीशः झालेल्या खर्चासहीत मिळण्याबाबत अशाी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 8.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता हे सुनावणीच्या वेळेस हजर नव्हते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु सदरची माहिती ही संपूर्ण तालुक्यातून संकलित करावयाची असल्यामुळे दि. 3.8.2009 रोजी अर्जदारास त्याप्रमाणे कळविण्यात आलेले होते. दि. 24.7.2009 रोजी पथक प्रमुख तथा मंडळ कृशी अधिकारी काटोल यांना पत्र दिले. अपीलकर्ता यांना विलंब होणार याबाबतचे पत्र दिनांक 3.8.2009 रोजी देण्यात आले. पुन्हा पथक प्रमुखांना दि. 10.8.2009 रोजी, मंडळ कृशी अधिका—यांना दि. 8.9.2009 रोजी, सर्व सचिवांना दि. 16.10.2009 रोजी पत्र देण्यात आले. पुन्हा अपीलकर्ता यांना दि. 10.7.2009 रोजी 19 पाणलोटची माहिती उपलब्ध करुन दिली. पुन्हा अपीलकर्ता यांनी अर्धवट माहिती उपलब्ध झाली म्हणून पत्र दिले. त्या पत्राच्या अनुशंगाने लाभार्थी निहाय माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून दिनांक 14.12.2009 रोजी पत्र दिले. पुन्हा पथक प्रमुख दि. 23.12.2009 रोजी पत्र दिले. पथक प्रमुखांनी पुन्हा सचिवाकडून माहिती मागण्याचे पत्र दि. 24.12.2009 ला दिले. पथक प्रमुखाकडून भोतकरी निहाय सविस्तर माहिती दि. 15.1.2010 ला प्राप्त झाले. दि.28.1.10 रोजी अपीलकर्ता यांना माहिती देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी माहिती परत केली व त्यानंतर सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविली असे आयोगापुढे

सांगितले. यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती अति  ाय व्यापक प्रमाणात आहे व ती एकत्रित संकलित नसल्यामुळे जो विलंब झालेला आहे त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती संकलित करण्याकरीता जो वारंवार पत्रव्यवहार केला आहे त्यावरुन माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निश्कर्श काढता येत नाही. अपीलकर्ता हे नंतर उपस्थित झाले व त्यांना झालेल्या पत्रव्यवहाराची मात्र त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती आयोगास दिली नाही. व जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही एवढेच त्यांनी आयोगापुढे सांगितले. यावरुन अपीलकर्ता हे माहितीच्या संदर्भामध्ये गंभीर आहेत असे दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी पावती लिहून दिलेली आहे. त्याप्रमाणे माहिती त्यांना मिळाली पण माहिती परत केली असे दिसून येते. सही त्यांची तंतोंतंत दिसून येते परंतु ती त्यांची सही नाही असे आयोगापुढे सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी हे भाास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1254/2009

श्री जयप्रकाश सुंदरलाल फाफट
सावकार पेठ अडगाव बु.
ता. तेल्हारा जि. अकोला 444126 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. जी. कुरई
प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती तेल्हारा
ता. तेल्हारा जि. अकोला
2) श्री अरुण सि. वानखेडे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत चितलवाडी
ता. तेल्हारा जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत चितलवाडी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. मौजा चितलवाडी येथील घर क्र. 289 मालक सौ. भिक्तीबाई ज. मोहनलाल भटड यांचे जागेला सन 1991 ते 2007पर्यंतच्या दरवर्शी झालेल्या बदलासह प्रत्येक वर्शाच्या नमूना 8 अ च्या सत्यप्रती देणे.
2. सदर जागेमध्ये दिनकर सेवकराम राजगुरु यांचे नमूना 8 अ मध्ये भोगवटदार म्हणून कोणत्या वर्शी वा कोणत्या कागदपत्राच्या आधारे समाविश्ट करण्यात आले.
3. घर नं. 289 मध्ये मालक सौ. भिक्तीबाई ज. मोहनलाल भटड यांनी भोगवटदार दिनकर सेवकराम राजगुरु यांचे नमूना 8 अ म्हणून कमी करण्याबाबत दिलेल्या अर्जावार काय कार्यवाही करण्यात आली.
4. यापूर्वी दि. 8.9.08 ला सौ. भिक्तीबाई ज. मोहनलाल भटड यांनी नमूना 8 अ नकल मिळण्याबाबत अर्ज केला त्याप्रमाणे नकल दिल्या काय? न दिल्यास त्याचे कारण. सदरची माहिती पोश्टने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने दि. 12.11.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या संदर्भामध्ये सविस्तर कळविलेले आहे. व जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे

समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 19.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 14.1.2009 रोजी देण्यात आलेला असून गट विकास अधिकारी यांनी सचिव ग्रामपंचायत यांना माहिती दि. 31.1.2009पर्यंत पुरविण्यात यावी याबद्यलचे आदेश दिलेले दिसून येतात. व त्या आदे ााची प्रत ही अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी प्रतिज्ञालेख दाखल केलेला आहे. व त्यामध्ये त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे नमूद केले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती दयावी असा निर्णय दिलेला आहे. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही व उपलब्ध झालेल्या माहितीत सुध्दा खोडतोड आहे असे त्यांनी कारण दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की ग्रामपंचायत सचिव म्हणून त्यांचेकडे कार्यालयामध्ये सन 2004 पासून जी माहिती उपलब्ध होती ती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. परंतु सन 1991 ते 2007पर्यंतचे अभिलेखे त्या कार्यालयामध्ये उपलब्ध नाही व त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देता आलेली नाही व ते उपलब्ध नसल्यामुळे पुढील मुद्यांची माहिती सुध्दा देता येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस याबाबत कोणत्याही प्रकारची चौक ाी केलेली दिसून येत नाही. माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा कोणताही विचार न करता आदेश दिलेला दिसून येतो. जर सन 1991 ते 2007पर्यंतचे अभिलेखे त्या कार्यालयामध्ये उपलब्ध नसतील व ही बाब प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस निद ानास आल्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात पुर्वीच्या ग्राम सचिवाच्या संदर्भात चौकशी करणे आवश्यक होते परंतु ती तशी चौकशी त्यांनी केलेली दिसून येत नाही व आपली जबाबदारी टाळलेली आहे असा निश्कर्श काढावयास हरकत नाही. ग्रामपंचायत सचिवावर जर गट विकास अधिकारी यांचे प्रशासकीय नियंत्रण असते त्यामुळे ग्रामपंचायत मध्ये अभिलेखे उपलब्ध नाहीत याबाबतची जबाबदारी सुध्दा गट विकास अधिकारी यांची असते. परंतु वर्शानुवर्शे कोणतेही गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत सचिवाच्या संदर्भामध्ये ग्रामपंचायतीतील अभिलेखे यांच्या संदर्भामध्ये कार्यवाही केलेली आहे असे आढळुन येत नाही व त्यामुळेच प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये अभिलेखे उपलब्ध नाहीत असे उत्तर विद्यमान ग्रामसचिव देत असतात व याबाबत सुध्दा अंतिम जबाबदार मुख्य कार्यपालन अधिकारी यांची आहे असा निश्कर्श काढावयास हरकत नाही. व ही बाब भाासनाचे ग्राम विकास विभागाने गंभीरपणे घेणे आव यक आहे. सदरच्या प्रकरणामध्ये जर 1991 पासून अभिलेखे उपलब्ध नसतील तर त्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील जे नागरीक आहेत त्यांचे मालमत्तेचे त्या अधिका–याच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध होवू भाकणार नाही. व ही सुध्दा अतिशय गंभीर बाब आहे. व त्याकरीता विद्यमान गट विकास अधिकारी यांनी सदरच्या ग्रामपंचायतीच्या अभिलेख्याच्या संदर्भामध्ये चौकशी करुन अभिलेखे उपलब्ध होतील असे आदेश करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अशातः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्यांच्या करीता अभिलेख्याचा भाोध घेणेसाठी चौकशी अधिकारी नेमून त्यांचे पुर्वीचे सचिवाचे बयाण घेवून जबाबदारी निश्चित करुन अभिलेखे उपलब्ध होतील असे आदेश करावे व जबाबदारी निश्चित झाल्यावर ज्या सचिवाने अभिलेखे गहाळ केले असतील त्यांचेविरुध्द फौजदारी कार्यवाही करावी व अभिलेखे उपलब्ध झाल्यास अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **सचिव ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई** यांचेकडे स्वतंत्रपणे पोश्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1252 अम/2009**

श्री रविंद्र बाबाराव मानकर
रेणुका नगरी घर नं. 36 उद्योगभवनचे मागे
यवतमाळ ता. जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अनिल अढागळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिशद यवतमाळ ता. जि. यवतमाळ
2) श्री एस. जी. देवडा
जन माहिती अधिकारी तथा नगर परिशद कार्यालय
यवतमाळ ता. जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. परंतु पुढील तारीख मिळावी म्हणून पत्र दिलेले आहे. व त्याप्रमाणे आज त्यांना पुढिल तारीख देण्यात आली व तरीही ते आज गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी का. आ. सा.प्र.वि. नगर परिशद यांचेकडे आकृतीबंध मंजूर पदाचा प्रस्तावीत भाासनास आकृतीबंधानुसार द ाविलेल्या पदाची व नावासहीत यादी वगैरे एकुण सहा मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीगतरित्या घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 15.10.2008 रोजी माहिती घेवून जाण्याकरीता पत्र दिलेले होते. तसेच काही प्रमाणात माहिती पण उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्ता यांना दि. 20.10.2008 रोजी प्राप्त झालेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 17.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 30.12.2008 रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये अपीलार्थी चे काही प्रमाणात समाधान झालेली दिसून येते. परंतु आदे ााप्रमाणे यांनी मागणी केल्यानुसार पुरविलेल्या माहिती व्यतीरिक्त वरीलप्रमाणे माहिती तातडीने पुरवावी व तसा अहवाल सात दिवसात सादर करावा असा आदे ा दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा केला. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी वरील प्रकरणाचे अवलोकन केले असता

आकृती बंधानुसार लिडिंग फायरमनचे दोन पदे असून एक पद रिक्त असल्याचे व एक पद भरती केले असल्याचे अपीलार्थी यांचे निद र्शनास आणून दिले. तसेच मुद्या क्र. 4 नुसार मा. सहा.संचालक, नगर परिशद प्र ाासन संचालनालय मुंबई यांचे पत्र क्र. नपप्रस/24/प्रक्र32 या कार्यालयास दि. 26.10.2006 रोजी आवक क्र. 1348 अन्वये प्राप्त झाल्याचे तपासणी अंती दिसून आले व सदरचे पत्र श्री सुरेश ढोणे सहा. माहिती अधिकारी यांनी दि. 30.10.2006 रोजी स्विकृत केल्याची डाकबुकामध्ये स्वाक्षरी असल्याचे निदर्शानास आणून दिले व सदर पत्राची तपासणी करुन अपीलार्थी यांना सदर पत्र उपलब्ध करुन द्यावेत असे आदेशित केले.
यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1251 अम/2009**

श्री अनिल नारायणराव प्रांजळे
1/2 वास्तुवैभव अपार्टमेंट आशियाड
अमरावती ता. जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य. विभाग)
जिल्हा परिशद अमरावती ता. जि. अमरावती
2) श्री उमाकांत भोयर
जन माहिती अधिकारी तथा संचालक
नवजीवन सोसायटी अमरावती
जोग बंगला कॅम्प अमरावती ता. जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.11.2008 रोजी संचालक नवजीवन सोसायटी यांचेकडे जन माहिती अधिकारी म्हणून भााळेच्या परवानगीची प्रत त्यानंतर त्यांचा एक दिवसाचा किरकोळ रजेचा अर्जाची प्रत. दि. 14 ऑगश्ट 1996 पासून मुख्याध्यापकांनी घेतलेल्या सुटयांबाबतची संपूर्ण माहिती एकुण 77 मुद्यांवर मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 31.12.2008 रोजी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे दाखल केले. परंतु संस्थेच्या जन माहिती अधिकारी यांचे निर्णया विरुध्द प्रथम अपीलीय अधिकारी हे शिक्षणाधिकारी नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आले होते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. द्वितीय अपील मेमोमध्ये संचालक नवजीवन सोसायटी यांचे पत्र क्र. एनएस/आरटीआय/ऐएनपी/210/2008–09 दि. 31.12.2008 चे पत्र बेकायदे ीर आहे. मागितलेली संपूर्ण माहिती जनहितार्थ आहे व चौकशी संपायच्या खूप आधीच मागीतली आहे. शिक्षणाधिका–याचे पत्रही बेकायदेशिर आहे. दीपशिखा गु.सै.भााळेसाठी नवजीवन संस्थेला भाासनाचे अनुदान मिळत असलेले व ते शि.अ.यांच्या सहीने मिळत असलेले शिक्षणाधिकारी (माध्य.) जबाबदारी झटकू भाकत नाहीत. शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनीही अपीलीय अधिका–याचे नाव कळविलेले नाही अशी अपीलाची कारणे दिलेली आहेत.

परंतु त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा खुलासा हा आयोगाकडे केलेला नाही व आज उपस्थित नाहीत. सोसायटी तर्फे माहिती अधिकारी सचिव नवजीवन सोसायटी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना श्री प्रांजळे यांनी भााळा न्यायाधिकरणामध्ये केलेल्या अपीलाचा निकाल त्यांचे बाजुने दि. 17.8.2009 रोजी लागला. त्यांचे विरुध्द रिट पिटिशन नागपूर हायकोर्टात करण्यात आले होते. ते दि. 20.11.2009 रोजी नामंजुर करण्यात आले. अशा रितीने त्यांचे विरुध्द सुरु असलेली विभागीय चौकशी संपुश्टात आली. भााळा न्यायाधिकरणाने दिलेल्या आदशाची संपूर्ण कारवाई करण्यात आली होती. श्री प्रांजळे यांनी कंटेम्ट ऑफ कोर्ट ची केस कोर्टात दाखल केली होती. ते प्रकरण सुध्दा श्री प्रांजळे हयांचे अर्जानुसार खारीज करण्यात आले आहे. व तसेच तोंडी युक्तीवाद करतांना श्री प्रांजळे यांना सोसायटीने पुन्हा कामावर घेतलेले आहे. व ते कार्यरत आहेत. असे असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे त्या त्या वेळेस कारवाई केलेली आहे किंवा नाही व त्या संदर्भात अपीलकर्ता यांनी सुध्दा खुलासा करणे आव यक होते. अपीलकर्ता नंतर उपस्थित झाले व अपीलकर्ता यांनी ज्या कारणाकरीता माहिती मागितली होती त्याबाबतचे निराकरण झालेले असल्यामुळे त्यांना अपीलाचे कामकाज पुढे चालवावयाचे नाही अशी आयोगाकडे विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1255 अम/2009**

श्री अनिल जनार्दन पोतदार
साबणे प्लॉट घाटपुरी रोड खामगाव
ता. खामगाव जि. बुलढाणा 444303 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक
भूमी अभिलेख अमरावती प्रदे श अमरावती
2) श्री आर. ए. परकर
जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक
उपसंचालक भूमी अभिलेख अमरावती प्रदेश
अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.2.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी संचालक भूमी अभिलेख अमरावती यांचेकडे बुलढाणा शिपाई पदाकरीता भूमी अभिलेख विभागा मार्फत दि. 28.9.08 ला घेण्यात आलेल्या माझ्या उत्तरपत्रिकेची साक्षांकित प्रत मिळावी. बैठक क्रमांक 53013. सदरची माहिती साध्या टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 18.11.2009 रोजी माहिती ही सद्यस्थितीत इकडे उपलब्ध नसून सदरची भरती प्रक्रिया अद्याप अपूर्ण अवस्थेत असलेने परिक्षेच्या या टप्प्यावर सदरची माहिती प्रकट केल्यामुळे त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहचत असल्यामुळे व्यापक लोकहीताच्या दृश्टीने सदरची माहिती प्रकट करणे योग्य नसलेने व सदरची माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नसलेने पूरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 23.12.2008 रोजी देण्यात आला असून अपीलार्थीचे अपील अं ातः मंजूर करण्यात आले असून वर्ग 4 ि ापाई पदाची निवड यादी उपलब्ध करुन देवून माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आज अपीलकर्ता हजर नाहीत जन माहिती अधिकारी यांचे तर्फे खुलासा दाखल करतांना अपीलकर्ता यांना पत्र क्र. आस्था1/ममाअ/अपील क्र.9/08/2009 दिनांक 20.3.2009 ने माहिती पुरविण्यात आलेली आहे असे लेखी दिलेले आहे. परंतु उपलब्ध

झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले आहे किंवा नाही त्या संदर्भात अपीलकर्ता हे हजर झालेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झालेले आहे असा निश्कर्श काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1194 नाग/2009 अपील क्रमांक 1195 नाग/2009 व अपील क्रमांक 1196 नाग/2009**

श्री मोहन वासुदेव केळकर
प्लॉट नं. 90 उशःकाल बिल्डींग गांधीनगर
नगपूर 10 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक 1194 नाग/2009 व 1195 नाग/2009</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त (प्र ाासन)
आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास कार्यालय
प्र ाासकीय इमारत अब्दुल गफारखान मार्ग
वरळी सीफेस मुंबई 400018
2) श्री के. बी. चव्हाण उपायुक्त
जन माहिती अधिकारी तथा
आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास कार्यालय
प्र ाासकीय इमारत अब्दुल गफारखान मार्ग
वरळी सीफेस मुंबई 400018 ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 1196 नाग/2009</u>**

3) श्री नरेश रामटेके दुग्ध शाळा अभियंता
जन माहिती अधिकारी तथा
प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी
तेलंगखेडी रोड सिव्हिल लाईन्स नागपूर 01 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे कागदपत्रे दाखल झालेली आहेत.

2. अपील क्र. 1194 नाग/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 4.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी मा. आयुक्त यांचे कार्यालय दुग्ध व्यवसाय विकास यांचेकडे गोंदिया योंजना 08–09 मध्ये झालेले नुकसान सोबत जोडलेल्या विवरणपत्र क व ड नुसार माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना माहिती

उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 1.10.2009 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांच्या अर्जासोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे त्यांना आजपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही व प्रथम अपीलाच्या आदे ानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने कार्यासन अधिकारी 8 यांनी अपीलकर्ता यांना दि. 16.7.2009 रोजी माहितीच्या अधिकारा अंतर्गत आपल्या अर्जातील प्रस्तावनेप्रमाणे कोणी काय करायला पाहिजे व कोण काय करतो याबाबतचे आपले मत व प्र नाचे उत्तर देणे अभिप्रत नाही. टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुशंगाने प्रादे िक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी नागपूर यांच्या स्पशटीकरणाच्या संदर्भात मा. आयुक्त दुग्ध व्यवसाय यांनी प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी नागपूर यांना नुकसानाबाबत चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्या अनुशंगाने महाव्यवस्थापक भाासकीय दुध योजना नागपूर यांनी प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी नागपूर यांना पाठविलेल्या पत्राची मूळ प्रत विरहीत प्रत दि. 2.6.2009 या कार्यालयास अग्रेशित केली आहे. अद्याप प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी नागपूर यांचेकडून या कार्यासनास अहवाल अप्राप्त आहे. मुद्या क. 3,4,5,6 व 9 या कार्यासनाशाी संबंधित नाही. मुद्या क.8 माहिती अधिकार अधिसूचनेतील अनुभाग 1 मधील कलम 8 उपकलम (ग) प्रमाणे छायांकित प्रत देता येत नाही. महाराश्ट्र भाासन परिपत्रक क. केमाअ–2008/प्र क 93/08/सहा (मा.अ.) सामान्य प्र ाासन विभाग दि. 6 सप्टेंबर 2008 अन्वये या अधिनियमा अंतर्गत माहिती पुरविताना सार्वजनिक प्राधिकरणाकडे कलम 2 (च) मध्ये व्याख्या केलेली आहे व उपलब्ध असलेलीच माहिती पुरविणे अभिप्रत असून जेथे वेगळयाने माहितीचे संकलन, सं ाोधन, पृथःकरण करणे आव यक आहे अशाा स्वरुपातील माहिती पुरविणे अभिप्रेत नाही. असे असल्याने याबाबत सं.क. आदुवि–8/गुणनियंत्रण/ म.मा.अ./2009/भाग–2/708 दि. 26.6.2009 पत्रान्वये आपणास कळविलेले आहे. दिनांक 10.7.2009 रोजी सुध्दा 865 प्रमाणे तीच माहिती त्यांना पुरविलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निद ार्नास आणले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शानास असेही आणले की 10 जुलै 2009 पत्र क. 1640 प्रमाणे अपीलकर्ता यांनी जे आयोगाचे निद ार्नास आणले ते पत्र हे त्यांच्या दि. 20.6.2009 च्या अर्जाच्या अनुशंगाने आहे व त्यामुळे सदरच्या अपीलाच्या संदर्भात त्या पत्राचा संदर्भ घेता येणार नाही. अपीलकर्ता यांनी जी कागदपत्रे दाखल केलेली आहेत त्यामध्ये त्यांच्या दिनांक 20.6.2009 च्या अर्जाच्या संदर्भातील कागदपत्रे आहे. परंतु त्या कागदपत्राचा संदर्भ दि. 4.7.2009 च्या अर्जास जोडता येणार नाही व ती अनाव यक कागदपत्रे दाखल केलेली दिसून येतात. मात्र पत्र क. 865 दिनांक 10 जुलै 2009 व 877 दि. 16 जुलै 2009 या नंतर अपीलकर्ता यांनी दि. 1.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 2.1.2009 रोजी देण्यात आला असून त्यामध्ये अपीलकर्त्याचे दि. 4.7.2009 च्या अर्जातील विवरणपत्र क व ड बाबतची माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी निगडीत मुद्याबाबतची माहिती

अपीलकारास 15 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदे ा दिलेले दिसून येतात. परंतु त्यामध्ये विवरणपत्र ड मधील मुद्या क्र. 3 वगळता माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे अपीलकर्ता यांनी त्यांच्या खुला ाात म्हटलेले आहे. आजही कार्यासन अधिकारी 1,6 व 8 हे आयोगापुढे उपस्थित नाहीत व त्यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे कोणत्याही प्रकारे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबाबतचा खुलासा आयोगाकडे केलेला नाही. मात्र कार्यासन 20 चे अधिकारी जन माहिती अधिकारी म्हणून आज आयोगापुढे उपस्थित आहेत. परंतु त्यांचा या अपीलाच्या संदर्भात संबंध दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना सुध्दा दि. 20.6.2009 च्या अर्जाच्या संदर्भातच वेगवेगळे परंतु तो अर्ज मुळातच आयोगा पुढील नस्तीमध्ये नाही व त्या संदर्भात प्रथम अपील व द्वितीय अपील सुध्दा नाही. अपीलकर्ता यांना दि. 10.7. 2009 व 16.7.2009 रोजी पत्र क्र. 865, 887 जे पाठविण्यात आलेले आहे त्याबद्यलचा उल्लेख त्यांनी द्वितीय अपील मेमोच्या सोबतच्या पत्रामध्ये केलेला आहे. मुख्य दक्षता अधिकारी यांनी दि. 17.7.2009 रोजी विवरणपत्र ड मधील मुद्या क्र. 11 च्या संबंधाने चौक ाी करण्याच्या दृश्टीने आव यक ती उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधिताकडे या विभागामार्फत पत्रव्यवहाराद्वारे पाठपुरावा करण्यात येत आहे असे कळविलेले आहे. संपूर्ण सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी वरील दोन्ही पत्राच्या संदर्भात कोणताही संदर्भ न देता त्यांच्या दि. 20.6.2009 च्या अर्जाच्या संदर्भातच आयोगापुढे युक्तीवाद केला. निर्णय देतांना सर्व कागदपत्राची तपासणी केली असता ही बाब आयोगाच्या निद ानास आली. अपीलकर्ता यांनी सुध्दा प्रथम अपील हे दि. 16 जुलै 2009 रोजी जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्या नंतर 30 दिवसाच्या आंत करणे आव यक होते. परंतु सदरचे अपील त्यांनी दि. 1.10.2009 रोजी म्हणजे मुदतीनंतर दाखल केलेले आहे. तरी सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला आहे. त्याप्रमाणे दि. 29.1.2010 रोजी कार्यासन अधिकारी 1 यांनी सुध्दा प्रस्तुत प्रकरणी दक्षता विभागा मार्फत चौकशी करण्याच्या दृश्टीने दि.8.1.10 ते 10.1.2010 या कालावधीत नागपूर, गोंदिया व चंद्रपूर योजनेस समक्ष भेट देवून या संबंधी आव यक ती कागदपत्रे व दस्तऐवज प्राप्त करुन घेण्यात आलेले असून सदर कागदपत्राची सविस्तर छाननी करुन वस्तुनिश्ठ अहवाल मा. आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास विभाग मुंबई यांना लवकरात लवकर सादर करण्यात येत आहे. सदर अहवाल मा. आयुक्त यांना सादर केल्यानंतर त्यांच्या मान्यतेनुसार पुढील आव यक त्या कार्यवाहीसाठी प्र ाासन विभागास सादर करण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी 6, जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी 8 व जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (प्र ाासन) यांनी अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही व आयोगापुढे सुनावणीस सुध्दा हजर झालेले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या निर्णया प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे वरील सर्व जन माहिती अधिकारी हे दोशी आढळुन येतात. व त्यांचे विरुध्द

अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आव यक झाले आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 1196 नाग/200 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 9.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी नागपूर यांचेकडे विभागीय चौकी/न्यायालयीन निर्णय 2002 ते आजतागायत सोबत जोडलेल्या विवरणपत्र य प्रमाणे तीन मुद्दे व सहा उपमुद्दोमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने दि. 9.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा दुग्ध भााळा अभियंता यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 9.11. 2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 2.1. 2010 रोजी देण्यात आला असून विवरणपत्र य मधील मसुदा क्र. 1 व 2 बाबतची माहिती कार्यालयीन आदेश 125/दि. 6.10.2009, मसुदा क्र. 2,3,4 व 5 ची माहिती जन माहिती अधिकारी तथा दुग्ध भााळा अभियंता प्रादे िाक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी यांनी अपीलकारास 15 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या आदेशा प्रमाणे दि. 22.1.2010 रोजी माहिती मुद्येनिहाय उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाचा निर्णय मुदतीत झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

5. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना त्यांच्या दि. 9.10.2009 च्या अर्जाच्या विवरणपत्र य मधील मुद्या क्र. 3 व उपमुद्या मधील उपमुद्या क्र. 2 मधील तसेच उपमुद्या क्र. 5 मधील माहिती उपलब्ध झाली नाही असे सांगितले. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व उपलबध नसल्यास तसे स्पश्टपणे कळविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

6. अपील क्र. 1195 नाग/200 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 21.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी मा. आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास कार्यालय मुंबई यांचेकडे विवरणपत्र अ प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 14.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 2.1.2010 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांच्या दि. 21.8.2009 च्या अर्जातील मुद्या क्र. अ मधील 1 व 2 बाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (प्र ाासन) तसेच 3 बाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा मातृदुग्ध ाळा कुर्ला यांनी अपीलकारास 15 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी तसेच 4 बाबतची माहिती मोघम स्वरुपाची असल्यामुळे माहिती देता येणे भाक्य नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. व आदे ाानुसार दि. 28.1.2010 जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (प्र ाासन) यांनी वरील संदर्भांकित संदर्भित निवेदनान्वये मागितलेली संबंधित माहिती आपले स्तरावरुन श्री केळकर यांना परस्पर देण्यात यावी असे त्यांच्या दि. 15.1.2010 च्या

निवेदनावर आदेश दिलेले दिसून येतात. अपीलकर्ता यांना दि. 29.10.2009 रोजी सुध्दा जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (प्र ाासन) यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. दि. 3.11.2009 रोजी सुध्दा जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (प्र ाासन) कार्यासन 20 यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. दि. 16.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांनी मातृदुग्धशाळा कुर्ला यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबद्यल आदेश दिलेले दिसून येतात. सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात माहिती सन 1993 ची असल्याने अभिलेखे भाोधण्यास विलंब झालेला असल्यामुळे विहित मुदतीत पुरविता आलेली नाही असे श्री के.बी.चव्हाण सहा. आयुक्त (प्रशासन) यांनी खुलासा करतांना कळविलेले आहे.

7. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांच्या विवरणपत्र अ मधील उपक्रमांक 1 ते 4 ची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. त्याबद्यलच्या आदेशाच्या प्रती उपलब्ध असल्यास अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशातः मंजुर करण्यास पात्र आहे.

8. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे ज्याप्रमाणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना लागू आहे त्याचप्रमाणे त्या अर्जदार अपीलकर्ता यांना सुध्दा लागू आहेत. अपीलकर्ता हे माहितीचा अर्ज एका तारखेस दाखल करतात व त्यासोबत इतर अर्जदाराच्या संदर्भातील पत्रव्यवहार दाखल करतात व त्यामुळे आयोगाची सुध्दा दिशाभूल होण्याची भाक्यता असते. व पुन्हा आयोगाचा निर्णय देतांना सुध्दा वेळ खर्ची पडतो. युक्तीवादात सुध्दा निश्चित तारखा न सांगता मोघम युक्तीवाद करतात व सर्व पत्रव्यवहाराची सरमिसळ करतात. अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कलम 6 प्रमाणे माहितीचा अर्ज त्यास 30 दिवसात दिलेली माहिती किंवा पत्रव्यवहार त्यानंतर 30 दिवसाचे मुदतीत दाखल केलेले प्रथम अपील व प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भात दाखल केलेले द्वितीय अपील एवढेच कागदपत्र दाखल करतात. सुनावणीस सुध्दा वेळ जाणार नाही व निर्णयास सुध्दा वेळ लागणार नाही व याची जाणीव अपीलकर्ता यांनी ठेवणे जरुरीचे आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 1194 नाग/2009 हे अं ातः मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी 6, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी 8 यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही योग्य त्या सक्षम अधिका—यांनी करावयाची आहे.

2) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 4.7.2009 च्या अर्जा सोबत दिलेल्या क व ड विवरणपत्रातील जी माहिती जन माहिती अधिकारी व कार्यासन अधिकारी 1,6 व 8 यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही ती माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे

आंत विनामुल्य रजिस्टर पोश्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे. अन्यथा सर्व जन माहिती अधिकारी भाास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

3) अपील क. 1196 नाग/2009 हे अं ातः मंजुर करण्यात येत असून त्यांच्या दि. 9.10.2009 च्या अर्जातील जोडपत्र य प्रमाणे मुख्य मुद्या क. 3 उप मुद्या क. 3 व 5 मधील माहिती उपलब्ध असल्यास विनामुल्य रजिस्टर पोश्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

4) अपील क. 1195 नाग/2009 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 21.8.2009 च्या अर्जात सोबत असलेल्या विवरणपत्र अ मधील 1 ते 4 मुद्यांची माहिती उपलब्ध असल्यास विनामुल्य रजिस्टर पोश्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 44 नाग/2010**

श्री गोपाल बालाजी झाडे
8 पुरोहित लेआऊट अंबाझरी
नागपूर 440033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक
संचालनालय लेखा व कोशागारे
नवीन प्र ाासकीय कुटीर क. 15 व 16
प्लॉट क.176 फि प्रेस जर्नल मार्ग मुंबई 400021
2) श्री से. भा. सोळके
जन माहिती अधिकारी तथा संचालनालय लेखा व कोशागारे
नवीन प्र ाासकीय कुटीर क. 15 व 16
प्लॉट क.176 फि प्रेस जर्नल मार्ग मुंबई 400021 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक लेखा व कोशागारे मुंबई यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. भाासकीय कर्मचा–यांना देण्यात येणारी महागाई भत्ता वाढ व महागाई वेतन इत्यादी सेवानिवृत्तांना सुध्दा देण्यात येते. तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन घेणा–यांना देण्याबाबतचा नियम, अधिनियम, भाासन निर्णय तथा परीपत्रक असल्यास कृपया त्याची प्रमाणीत छायाप्रत उपलब्ध करावी हि विनंती. नसल्यास सेवानिवृत्तांना लागू असलेल्या भाासन निर्णयाप्रमाणेच आर्थिक लाभ अदा करित असल्यास कृपया तसे कळवावे.

2. ज्या भाासकीय सेवानिवृत्त कर्मचा–यांना तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन देण्यात येते त्यांना सहाव्या वेतन आयोगाचे ि ाफार ाीप्रमाणे देण्यात येणारे सुधारीत सेवानिवृत्ती वेतन, इतर फरक इत्यादी क ाप्रकारे अदा केले जाते त्या बाबतचा नियम, अधिनियम, भाासन निर्णय तथा परीपत्रक असल्यास कृपया त्याची प्रमाणीत छायाप्रत उपलब्ध करावी हि विनंती. नसल्यास सेवानिवृत्तांना लागू असलेल्या भाासन निर्णयाप्रमाणेच आर्थिक लाभ अदा करित असल्यास कृपया तसे कळवावे.

सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 16.11.2009 रोजी अतिरिक्त माहितीचा खर्च रु.56 चा भरणा करावा किंवा भाासन निर्णयाच्या प्रती महाराश्ट्र भाासनाच्या वेबसाईट WWW.Maharashtra.gov.in यावर उपलब्ध असून त्या वेबसाईट वरुन Download करुन घेण्याची सोय इंटरनेटवर उपलब्ध केली आहे. त्याचे अवलोकन केल्यास रक्कम भरणा करावी लागणार नाही असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा केल्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 25.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी दि. 3.12.2009 रोजी श्री के.एम.विधाते सहसंचालक (प्र ाा.) यांना भाासन निर्णय दि. 30.10.2009 रोजी प्राप्त झाला त्यात तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन घेण्याबाबत सर्व सुधारीत

निर्णयाप्रमाणे सुधारीत वेतन देण्याबाबतचा उल्लेख असल्याने उपरोक्त अपील सुनावणीस घेण्याची आव यकता नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु तोच भाासन निर्णय त्यांनी मुंबई येथील आयुक्त दुग्ध विकास कार्यालयात दाखविला. त्यावर त्यांनी लगेच सांगितले की भाासन निर्णय त्यांनी अधीदान व लेखा कार्यालयास दाखविला. तरीही त्यांनी यावर आक्षेप कायम ठेवला आहे. हयाने त्यांचे समाधान झाले नाही त्यांनी घेतलेल्या निवृत्तीवेतनाच्या देयकावरील आक्षेपांच्या प्रती मला दिल्या त्याच प्रती माहिती अधिका–याने दिल्या त्याची पूर्तता करण्यास सांगितले व त्यामुळे दि. 12.12.2009 रोजी अपील अर्जावर कारवाई करुन माहिती देण्याची विनंती केली. व त्यातून माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे दि. 11.1.2010 रोजी द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना मुद्या क्र. 1 ची माहिती अद्यापही उपलबध झालेली नाही. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 2.2.2010 रोजीचा सुध्दा जी.आर.ची प्रत त्यांना आज उपलब्ध करुन दिली. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्या जी.आर. वरुन त्यांच्या मुद्या क्र. 1 चे निराकरण होत नाही व त्यामुळे मुद्या क्र. 1 च्या संदर्भामध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आव यक आहे. असे असल्यास अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 31.10.2009 च्या अर्जातील मुद्या क्र. 1 च्या संदर्भामध्ये हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोश्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 45 नाग/2010 व**
**अपील क्रमांक 46 नाग/2010**

श्री रमेश सुखदेवजी बांगरे
मु. पो. अडयाळ
ता. पवनी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री के. के. भोंडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक(रोहयो)
उपवन संरक्षक कार्यालय भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्री डब्लू. बी. गोंधोळे
जन माहिती अधिकारी तथा
वनक्षेत्राधिकारी कार्यालय अडयाळ
ता. पवनी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.2.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 8.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 45 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 2.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्राधिकारी कार्यालय अडयाळ यांचेकडे त्यांनी दिलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली तसेच अपील क्र. 46 नाग/2010 मध्ये दि. 9.12.2009 रोजी 25 ते 30 वर्शापासून श्रीमती विमल सुखदेव बांगरे यांच्या जमिनीवर तफज्जुखॉ चॉदखॉ पठान यांचा कब्जा आहे असे कळविल्याप्रमाणे पुरावा व त्या संदर्भातील जोडलेल्या कागदपत्राची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. अ ाी माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जदार दारिद्रय रेशेखालील आहे असे नमूद केलेले आहे. दोन्ही अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना दि. 1. 10.2009 रोजी व दि. 29.12.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. दोन्ही अर्जाच्या संदर्भात उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 30.11.2009 व दि. 15.12.2009 रोजी प्रथम अपीले दाखल केली. दोन्ही अपीलांचा निर्णय अनुक्रमे दि. 31.12.2009 व दि. 5.1.2010 रोजी देण्यात आलेला असून श्री नरेश डहारे यांचे दि. 3.7.2009 चे अर्जान्वये श्रीमती विमल सुखदेव बांगरे यांचे नावे जमीन मोजणी करण्यात यावे असे वनपरीक्षेत्र अधिकारी यांना कळविले आहे. परंतू सदर जागेवर मागील 20 वर्शापासून तफज्जुखॉ चॉदखॉ पठान यांचा कब्जा असल्याने यांचे नावाने मोजणी करण्याची शिफारस वनहक्क समितीने केल्यामुळे वनपरीक्षेत्र अधिकारी अडयाळ यांचे अधिनस्त कर्मचा—याने जी.पी.एस.मशिन द्वारे मोजणी केलेली आहे. त्यामुळे श्री नरेश डहारे यांचे दि. 3.7.2009 चे अर्जावर वनपरीक्षेत्र अधिकारी यांनी कार्यवाही केलेली आहे व त्याबाबतची माहिती अपीलकर्त्यास दि. 1.10.09 चे पत्रान्वये दिलेली असल्यामुळे खारीज करण्यात

आले तसेच श्रीमती विमल सुखदेव बांगरे यांच्या जमीनीची माहिती तसेच कोणत्याही खाजगी व्यक्तीच्या जमिनीची माहिती वन विभागाच्या कार्यालयात ठेवली जात नाही ही माहिती तलाठी कार्यालयात असते. वन विभागाच्या कार्यालयाचे भाासकीय वनाबाबतची माहिती ठेवण्यात येते त्यामुळे श्रीमती विमल सुखदेव बांगरे यांच्या जमीनीची माहिती वन विभागाच्या कार्यालयात उपलब्ध नाही म्हणून अर्जदारानी मागितलेली माहिती त्यांना पुरविता येत नाही त्यामुळे सदरची अपीले खारीज करण्यात आलेली दिसून येतात. दोन्ही अपीलांच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की 7/12 वर श्रीमती विमल सुखदेव बांगरे यांचे नाव आहे व अशा परिस्थितीत मोजणी मात्र तफज्जुखॉ चॉदखॉ पठान यांचे नावानी करण्यात आलेली आहे व तफज्जुखॉ चॉदखॉ पठान यांचा कब्जा असल्याबाबतची माहिती मागितली त्या बद्यलचा पुरावा सुध्दा त्यांनी दिलेला नाही. वनपरीक्षेत्र अधिकारी यांचेकडे फक्त मोजणी करण्याचे अधिकार असतात व ती मोजणी करतांना कब्जा कोणाचा आहे याबद्यलची माहिती वनहक्क समिती यांचे निर्णयाप्रमाणे करुन देण्यात येते. मोजणीच्या वेळेस वनहक्क समितीचे अध्यक्ष व सभासद हे उपस्थित असतात व त्यामुळे वनहक्क समितीने लेखी कळविल्याप्रमाणे अपीलकर्ता यांना त्या पत्राच्या प्रती सुध्दा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दोन्ही अपीलांच्या संदर्भामये माहिती प्राप्त झालेली आहे असा निश्कर्श काढावा लागतो. अपीलकर्ता यांना तफज्जुखॉ चॉदखॉ पठान यांच्या कब्जाबद्यलची तक्रार करावयाची असल्यास ती वनहक्क समिती किंवा तहसिलदार यांचेकडे करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले खारीज करण्यात येतात.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 42/नाग 2010**

श्री मारोती भाऊरावजी चंदनखेडे
प्लॉट नं. 1 अशोक कॉलनी
पो. खामला नागपूर ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रबंधक (प्र ाा.)
उच्च न्यायालय मुंबई
नागपूर बेंच नागपूर
2) श्री खापरे
जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक
उच्च न्यायालय मुंबई
नागपूर बेंच नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 8.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.10.2009 रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1) Please supply to me the information that on 16.1.2004 as to haow many persons were called for interview for promotion to the post of Chief Transoator and Interpreter. 2) In case only I myself was called for the said interview please supply to me the reasons for calling me alone for the said interview."

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 14.10.2009 रोजी अधिनियमच्या कलम 8 (1) (e) (j) प्रमाणे प्रकट करता येत नाही या कारणास्तव नाकारण्यात आलेली आहे. तसेच कारणमिमांसा कळविण्याची तरतुद नसल्यामुळे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाच्या निर्णयाचा आधार घेवून कळविण्यात आलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 26.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती गोपनिय असल्यामुळे ती अपीलकर्ता यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असल्यामुळे Bombay High Court Right to Information (Revised) Rules-2009 Rule 10 (3) प्रमाणे तसेच अधिनियमच्या कलम 8 (1) (e) (j) प्रमाणे प्रकट करता येणार नाही असे कारण देवून नाकारलेली आहे. व प्रथम अपील हे खारीज केलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी लेखी खुलासा दाखल केलेला आहे. तसेच तोंडी युक्तीवाद करतांना अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की मा. मुंबई उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचेकडून याचिका क्र.129/2007 मध्ये सुधारणा करावयाची असल्यामुळे मागितलेल्या माहितीची आव यकता आहे. मात्र संपूर्ण खुला ामध्ये अधिनियमच्या कलम 8 (1) (e) (j) प्रमाणे माहिती क ाप्रकारे उपलब्ध करुन देणे आव यक होते याबाबतचा कोणताही खुलासा नाही व तोंडी युक्तीवादात सुध्दा कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही.

4. जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा जो आदेश दिलेला आहे त्या आदे ामध्ये अधिनियमच्या कलम 8 (1) (e) (j) प्रमाणे माहिती नाकारलेली आहे. तसेच मुद्या क्र. 2 च्या संदर्भामध्ये गोवा खंडपीठाच्या निर्णयाचा आधार घेतलेला असून कोणत्याही प्रकरणातील कारणमिमांसा माहिती अधिकारी यांना देता येणार नाही या कारणास्तव माहिती नाकारलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये सदरची माहिती सदरची माहिती अपीलकर्ता यांची मा. उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असल्याने माहिती मुंबई उच्च न्यायालयात माहितीचा अधिकार नियम (सुधारित) 2009 च्या नियम 10 (3) प्रमाणे देता येणार नाही व गोपनिय आहे व वि वासाश्रीत संबंधामुळे उपलब्ध करुन देता येत नाही असे विवेचन केलेले आहे व प्रथम अपील हे फेटाळलेले आहे.

5. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी लेखी खुलासा आयोगाकडे सादर केलेला आहे. त्यामध्ये अपीलकर्ता यांनी याचिका दाखल केलेली असल्यामुळे व ती प्रलंबित असल्यामुळे न्यायालयातूनच माहिती मिळू भाकेल या करीता Bombay High Court Right to Information (Revised) Rules-2009 Rule 13 चा आधार घेवून माहिती नाकारलेली आहे. तसेच अधिनियमच्या कलम 8 (1) (e) & (j) चा आधार घेवून माहिती नाकारलेली आहे. असा खुलासा करुन

At the outset apart from the grounds, on which the respondents have rejected the applications of the appellant, it is to be noted that the information sought by the appellant, is affecting the confidentiality of the examination, conducted by our High Court and therefore, the question of confidentiality is required to be decided by the Competent Authority i.e. Hon'ble Chief Justice.

Needless to say that the decision of the Competent Authority shall be final and conclusive. At this stage, I would like to bring to the notice that the Appellate Authority has already decided RTI F.A.No.53/2009 in which Appellate Authority held that the Competent Authority has come to the conclusion that confidentiality is in respect of the examination, conducted, namely for promotion to the post of Chief Translator, the same is reuired to be kept confidential.

Over and above, both the information, sought by the Appellant in his original application, pertains to examination conducted by the Bombay High Court and examination will include interview for promotion to the post of Chief Translator. Therefore the information sought by the applicant is exempted from disclosure in view of Rule-13 (e) of the Bombay High Court Right to Information (Revised) Rules-2009.Moreover, the information, sought by the appellant, pertains to pending Writ Petition No.129/2009

which case is pending before the Hon'ble High Court for adjudication and therefore these informations are exempted from disclosure in view of Rule-13 (f) of the Bombay High Court Right to Information (Revised) Rules-2009.

In view of aforesaid reasons, the appeal of the appellant is liable to be rejected together with costs.

6. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांच्या पदोन्नतीच्या मुलाखतीच्या वेळी आणखी कोण्या अधिका–यांना बोलाविण्यात आले होते अ ी त्यांनी माहिती मागितली. तसेच एकटयालाच बोलाविले असेल तर त्यांना एकटयालाच का बोलाविले याबद्यलचे कारण विचारलेले आहे. परंतु सदरची माहिती ही गोपनिय आहे वि वासाश्रीत संबंधामुळे ती दिलेली आहे व व्यक्तीच्या खाजगी बाबतीत विनाकरण हस्तक्षेप करेल व सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही या कारणास्तव ती नाकारलेली आहे. तसेच अपीलकर्ता यांची न्यायालयात याचिका प्रलंबित आहे असेही कारण प्रथम अपीलाच्या निर्णयात तसेच आयोगापुढे केलेल्या खुलाशात दिलेले आहे. अंतिमतः आयोगापुढे खुलासा करणारा ती Bombay High Court Right to Information (Revised) Rules-2009 Rule-13 (e) प्रमाणे मागितलेली माहिती ही मुंबई उच्च न्यायालयाच्या तसेच Maharashtra Judicial Service यांच्या परीक्षेच्या संदर्भातील असल्यामुळे त्याबाबत ती गोपनिय आहे हा सक्षम अधिका–याचा निर्णय अंतिम राहिल या नियमाचा आधार घेवून देता येणार नाही असे प्रतिपादन केलेले आहे. या सर्वांचा एकत्रितपणे विचार केल्यास अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही मा. न्यायालयाने प्रकट करण्यास मनाई केली असेल तर ती अधिनियमचे कलम 8 (1) (b) प्रमाणे उपलब्ध करुन देता येणार नाही अशी तरतुद आहे. परंतु मा. उच्च न्यायालयाने सदरची माहिती प्रकट करण्यात मनाई केलेली आहे असे निश्कर्शामध्ये किंवा आयोगाचे निद ानास आणलेले नाही. मुलाखतीला किती उमेदवार आले ही माहिती उपलब्ध करुन देणे यात कोणत्याही प्रकारे त्या उमेदवारानी ती माहिती वि वासाने सार्वजनिक प्राधिकरणाकडे दिलेली आहे तसेच ती व्यक्तीच्या खाजगी जीवनात हस्तक्षेप करणे व सार्वजनिक कामकाजाशी संबंधित नाही असेही म्हणता येणार नाही व त्यामुळे ती उपलब्ध करुन देता येणार नाही असे म्हणता येत नाही. इतर सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये सार्वजनिक पदावर भरती करतांना मुलाखतीस बोलाविलेल्या उमेदवाराची यादी ही त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या सुचना फलकावर दिलेली असते. व त्यामुळे सदरची माहिती ही परीक्षा संबंधी आहे व ती गोपनिय असून उपलब्ध करुन देता येत नाही असा निश्कर्श काढता येणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा निर्णय देतांना Bombay High Court Right to Information (Revised) Rules-2009 चा Rule-13 मधील पोटनियम (e) प्रमाणे माहिती सक्षम अधिका–याने गोपनिय कारणास्तव देता येणार नाही असा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र तो आयोगाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर लेखी युक्तीवादात तसे म्हटलेले आहे.

7. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 6 (1) नुसार अर्जदाराने माहिती मागणेचा अर्ज दाखल केल्यावर मागितलेली माहिती ही देता येईल किंवा नाही ही बाब अधिनियमाच्या कलम 7 (9), 8(1), 9,10,11 प्रमाणे तपासून पहाणे आव यक असते. त्याप्रमाणे कार्यवाही करुनच माहिती देणे योग्य किंवा अयोग्य हे माहिती अधिकारी यांनीच ठरवावयाचे असते. अशा अधिका–यास कलम 5 चे पोट कलम (5) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात येते पण माहिती अधिकारी यांनी संबंधित नियम 13 (9) चा उल्लेख त्यांच्या निर्णयात केला नाही. माहिती प्रकट करण्यास कलम 8 (1) मध्ये एकूण 9 बाबी दिलेल्या आहेत त्यांत ''गोपनियता'' हा माहिती प्रकट करण्यास अपवाद असा निकश

नाही व ज्या प्राधिकरणांना हा अधिनियम लागू नाही त्यांना कलम 24 प्रमाणे दुस–या अनुसूचित समाविश्ट केलेले असते व मा. न्यायालय हे दुसरी अनुसूची मध्ये समाविश्ट नाही. त्यामुळे ''गोपनियतेच्या'' कारणास्तव माहिती नाकारणे म्हणजे अधिनियमाचे कलम 8 (1)ची व्याप्ती वाढवून तो अधिकार सार्वजनिक प्राधिकरणाकडे देणे असा होतो व अधिनियमाचा हेतु लक्षात घेता गोपनियतेच्या निकशाप्रमाणे कोणत्याही प्राधिकरणास माहिती नाकारण्याचा अधिकार घेता येणार नाही.

8. अधिनियमाचे कलम 28 (1) प्रमाणे सक्षम प्राधिका–यांना नियम करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. परंतु वि ोशतः कलम 4 (1), 6 (1), 7 (1) प्रमाणे खर्चाएवढी किंवा फी ठरविण्याबाबत नियम करता येईल व सर्वसाधारण नियम करण्याच्या अधिकाराखाली विहित करण्यात येईल अ ी कोणत्याही बाबीकरीता नियम करता येईल. परंतु अधिनियमाखाली जे नियम केले जातात ते कार्यपध्दतीचे नियम असतात.

Interpretation of statues, by N.S.Bindra (Tenth Edition) च्या पृश्ठ 1209 व 1231 वर

"Rules cannot override the Act –

It must be borne in mind that rules made under any Act could never be intended to override the specific provisions of the Act itself. The purpose of the rules is to provide for procedural matter or matters which are subsidiary to the provisions of the Act. In enacting the latter, no rules can evern be construed to override the specific provisions of the Act itself. (2004) 3 SCC 185 (2004) 6 SCC 626, (2005) 11 SCC 416. Although rules made under the Act cannot overfide the Act, they may be used as contemporarea exposition of an ambiguous provisions in the Act, specially when they are to have effect as if enacted in the Act (AIR 1960 SC 12)." 'In Alliance Bank, Simla v Feroz Shah, Peshawar Court observed ……. We are unable to recognize rules under an Act made by a High Court as giving an antrorative indication of the meaning of the Act.' High Court are empowered under S 12 of the CPC to make rules for regulating their own procedure and the procedure of the Civil Courts subject to their suprintendence. Such rules shall (by S 128) be not consistent with the provisions in the body of the code but –

Subject there to may provide for any matters to the procedure of Civil Courts (AIR 1936 57) असे भाश्य केलेले आहे.

9. यावरुन ''गोपनियतेच्या कारणास्तव सक्षम प्राधिकारी यांचा निर्णय हा अंतिम असेल याचा अर्थ अधिनियमाचे कलम 8 (1)ची व्याप्ती वाढविणे असा होतो. माहिती द्यावयाची किंवा नाही हा निर्णयाचा अधिकार जन माहिती अधिकारी यांचा आहे. कलम 5 (4) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे करीता कोणत्याही अधिका–याचे सहाय्य घेता येते व अ ा अधिका–यांस कलम 5 (5) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात येते. व जन माहिती अधिकारी यांनी निर्णय हा अधिनियमातील तरतदीच्या अनुशंगाने घेतला आहे किंवा नाही हया बाबतचा निर्णय देणेचा अधिकार द्वितीय अपील प्राधिकरण म्हणून आयोगाला दिलेला आहे. त्यातही अधिनियमाचे कलम 22 प्रमाणे हया अधिनियमाचे तरतुदींना इतर अधिनियमाचे तरतुदींवर व नियमांवर अधिभावी परिणाम दिलेला आहे.

तसेच अधिनियमाच्या कलम 8 (1)(j) मध्ये जी तरतुद आहे ती तरतुद कोणतीही माहिती सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी

बाबतीत विनाकारण हस्तक्षेप करेल अशाी माहिती प्रकट करण्यास अपवाद करता येतो. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही कोणत्याही व्यक्तीच्या खाजगी बाबतीत विनाकारण हस्तक्षेप करेल असेही म्हणता येणार नाही व त्यातही सार्वजनिक कामकाजा ी किंवा हितसंबंधा ी काहीही संबंध नाही असेही म्हणता येणार नाही कारण सार्वजनिक प्राधिकरणामध्ये कोणत्याही सार्वजनिक पदावर नियुक्ती ही सार्वजनिक कामकाजाशी व हितसंबंधाशी संबंध आहे असे म्हणता येईल. व त्यामुळे व्यापक लोकहिताच्या दृश्टीने अशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक असते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 5.10.2009 च्या अर्जावरील मुद्दा 1 ची मागितलेली माहिती ही त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

10. मुद्दा क्र.2 मध्ये अपीलकर्ता यांनी मुलाखतीस त्यांना एकटयास बोलाविले असेल तर एकटयास का बोलाविले असे कारण त्यांनी विचारलेले आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (1) (F) (च) मध्ये ''माहिती'' या संज्ञेचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई–मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्विपत्रके, परिपत्रके, आदे ा, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल) कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अ ी, कोणत्याही खाजगी निकाया ी संबंधित माहिती, यांचा समावे ा होतो. व तसेच ''कलम 2 (1) (J) (ज) ''माहितीचा अधिकार'' याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यात –

(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे,

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे,

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे,

(चार) डिस्केट्स, फ्लॉपी, टेप, व्हीडीओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिंट आऊट) मार्फत माहिती मिळविणे, याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो.''

यावरुन कोणत्याही साहित्याच्या स्वरुपातील म्हणजे उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे असा होतो. यात कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांचे मत अपेक्षित नाही. तसेच जन माहिती अधिकारी हा फक्त अभिलेखाचा अभिरक्षक आहे. तो प्रकरणातील निर्णय प्रक्रियेमध्ये असेलच असे नाही व त्याही कारणास्तव जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या बाबत अभिमत अपेक्षित नाही. व त्यामुळे या मुद्याच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ गोवा यांच्या पुढील याचिका Dr. Celsa Pinto, Ex-Officio Joint Secretary(School Education), Goa ..vs.. The Goa State Information Commission, reported in 2004 vol. 110(4) Bombay L.R. 1238 चा घेतलेला आधार हा योग्य आहे. व मुद्दा नं.2 च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी मत व्यक्त करता येणार नाही हा निर्णय योग्य आहे पण अपीलकर्ता यांना मुद्दा क्र. 1 ची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सदरचे अपील हे अं ातः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 5.10.2009 च्या अर्जातील मुद्दा क्र. 1 ची माहिती विनामुल्य रजिस्टर पोश्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1271 अम/2010**

श्री संतोश रामभाऊजी गोलाईत
गुलजारपूरा अंजनगाव सुर्जी
मु. पो. ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती 444705 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय अंजनगाव सुर्जी
ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती
2) श्री जी. एस. कोल्हे
जन माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी
तहसिल कार्यालय अंजनगाव सुर्जी
ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.1.2010 रोजी नोटीस काढून दि. **9.2.2010** रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय अंजनगाव सुर्जी यांचेकडे दे ामुख गॅस एजन्सीच्या नवीन गॅस कनेक्शन नोंदणी रजिस्टरमध्ये 65 नंबरची स्थिती काय आहे? अ ी एकुण सहा मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर मागितलेली सर्व माहिती आपल्या संबंधात (पुरवठा विभाग) असल्यामुळे मला 3 दिवसात उपलब्ध करुन द्याल.

सदरची माहिती स्वतः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 6.11. 2008 रोजी सहा. जन माहिती अधिकारी (पुरवठा विभाग) यांना उद्ये ून दिलेल्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना अग्रेशित केलेली दिसून येते. व त्यात 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 6.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे ॲड. आर.आर.पांडे यांनी युक्तीवाद केला. त्यात त्यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली ती माहिती जन माहिती अधिकारी म्हणून त्यांचेकडे उपलब्ध नव्हती व त्यामुळे सहा. माहिती अधिकारी (पुरवठा विभाग) माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता दिनांक 6.11.2008 रोजी पत्र देण्यात आले होते व त्या पत्राची प्रत ही अपीलकर्ता यांना देण्यात आली होती. परंतु सहा. माहिती अधिकारी (पुरवठा विभाग) यांनी पुढील कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भात त्यांनी असे सांगितले की प्रथम अपील दाखल झाले परंतु प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा त्यांचेकडे प्रथम अपील सादर झाले नाही. व त्यामुळे प्रथम अपीलात निर्णय देता आलेला नाही व त्यास श्री बी. पी. हजारे तहसिल कार्यालय अमरावती हे जबाबदार असल्यामुळे त्यांना दि.4.2.2010 रोजी कारणे दाखवा नोटिस दिलेली आहे व दे ामुख गॅस एजन्सीस सुध्दा पत्र पाठविलेले आहे.

4. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी माहिती जर पुरवठा विभागाकडे असेल तर त्यांचे अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे सहाय्य घेणे हे योग्य होते व त्याप्रमाणे त्यांनी पत्र दिलेले दिसून येते. परंतु पुरवठा विभागातील अधिकारी यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ती पुरविता आलेली नाही असे दिसून येते. याचा अर्थ अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे बी. पी. हजारे अ.का.तहसिल कार्यालय यांना माहिती अधिकारी समजणे आव यक आहे व त्यामुळे ते दोशी आढळुन येतात. व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आव यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून जन माहिती अधिकारी किंवा पुरवठा विभागातील अधिकारी यांनी दे ामुख एजन्सीकडून मागितलेली माहिती घेवून विनामुल्य पुरविण्यात यावी.
2) जन माहिती अधिकारी यांनी सहा. माहिती अधिकारी (पुरवठा विभाग) यांची माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता सहाय्य अधिनियमाच्या कलम 5 (4) प्रमाणे घेतले परंतु माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यामुळे कलम 5 (5) प्रमाणे पुरवठा विभागातील अधिकारी हे जन माहिती अधिकारी समजून त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.
3) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही तहसिलदार अंजनगाव सुर्जी यांनी करावयाची असून त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत **तहसिलदार तहसिल कार्यालय अंजनगाव सुर्जी जिल्हा अमरावती** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**

खंडपीठ नागपूर.

नागपूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1273 अम/2010**
**व अपील क्रमांक 1274 अम/2010**

श्री विश्वजीत प्रल्हाद लांडगे
सरनाईक लेआऊट धनके वर जवळ
पो. पार्डी ता. पुसद जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. के. पटवारी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक वनपरिक्षेत्र अधिकारी
वन विभाग उमरखेड
ता. उमरखेड जि. यवतमाळ
2) श्री पी. एफ. पांडे
जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी
प्रादेशिक वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो) कार्यालय बिटरगाव
ता. उमरखेड जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**
3) जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी
प्रादेशिक वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो) कार्यालय उमरखेड
ता. उमरखेड जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 9.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय प्रादेशिक वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो) बिटरगाव व उमरखेड यांचेकडे 2005 ते 2008 मध्ये बिटरगाव व उमरखेड वनपरिक्षेत्रा अंतर्गत रोहया अंतर्गत करण्यात आलेल्या कामाचे मोक्यांची ठिकाणे, कामाचे स्वरुप, मजुरांचे हजेरी पत्रके, रोकडवहिच्या नकला, आलेला निधी, पूर्ण अपूर्ण कामाची माहिती, भोधनाच्या पावत्या, देयके, प्रमाणके अशी माहिती मागितलेली दिसून येते. दोन्ही वनपरिक्षेत्र अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 11.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना उमरखेड कार्यालयातील दि. 4.12.2008 रोजी रोहयो अंतर्गत कोणतिही कामे मंजुर झालेली नसल्याने वनपरिक्षेत्रा अंतर्गत कामे देण्यात आलेली नाहीत. आपणाकडून मागविण्यात आलेली माहिती जसे मजुरांचे हजेरी पत्रके, रोकडवहिच्या नकला, आलेला निधी, पूर्ण अपूर्ण कामाची माहिती इत्यादी मुद्यांचे अनुशंगाने सविस्तर माहिती निरंक आहे असे कळविलेले दिसून येते. व

त्यानंतर सुध्दा दि. 28.1.2010 रोजी तशीच माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी माहिती मागितली परंतु त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केलेला नसल्यामुळे त्यांना प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करावे लागले. व त्यामुळे माहिती निरंक जरी असली तरी त्यांना कळविणे आव यक होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करणे आव यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांची अपीले ही अं ातः मंजुर करण्यास पात्र आहेत.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांची अपीले ही अं ातः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 26.9.2008 च्या अर्जाप्रमाणे दोन्ही वनपरिक्षेत्र अधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द ि ास्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.
2) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही प्रादे ाक वनपरिक्षेत्र अधिकारी किंवा सक्षम अधिकारी यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत **प्रादेशिक वनसंरक्षक अधिकारी यवतमाळ** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1312 अम/2010**

श्री रुपेश एल. लाडे
अध्यक्ष गायत्री ग्राम विकास संस्था
रा. व्हि अपार्टमेंट राऊतवाडी अकोला
ता. जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अकोला
ता. जि. अकोला
2) श्री डी. एम. हेडाऊ
जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अकोला
ता. जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.1.2009 रोजी नोटीस काढून दि. 17.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे एकुण 9 मुद्यांवर आदिवासी बांधवांना घरकूल बांधून देण्याचे योजनेबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्ति ाः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु अपीलकर्ता यांना दि. 2.2.2009, दि. दि. 5.2.2009 व 20.3.2009 रोजी एकुण 1909 पृश्ठांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निश्कर्श काढावा लागतो. व आज अपीलकर्ता ज्याअर्थी गैरहजर आहे त्याअर्थी त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यांचे समाधान झालेले आहे असा निश्कर्श काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1307 अम/2010**

श्री महेन्द्र पुनाजी कांबळे
मु. जोडगव्हाळा पो. तोरनाळा
ता. मालेगाव जि. वाशिम ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ. विभाग)
जिल्हा परिशद वाशिम
ता. जि. वाशिम
2) श्री सी. एन. पस्तापुरे
जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथ. विभाग)
जिल्हा परिशद वाशिम
ता. जि. वाशिम ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. 16.2.2010 व दि. 12.2.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. व उत्तरवादी हे अमरावती कार्यालयात हजर झाले होते परंतु सुनावणी नागपूर येथे असल्यामुळे आज दि. 12.2.2010 रोजी हजर झालेले आहेत. व त्यांचे म्हणणे एकुन घेतले.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिशद वाशिम यांचेकडे वाशिम जिल्हयातील पती पत्नी एकत्रिकरणाची संपूर्ण माहिती तसेच पती व पत्नी एकाच भाळेवर कार्यरत असल्याची संपूर्ण माहिती तालुकाप्रमाणे देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 28.1.2009 रोजी प्रथम अपील व त्यानंतरही अपुर्ण माहिती प्राप्त झाली म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवादात सांगितले की अपीलकर्ता यांना काही माहिती उपलब्ध झाली आहे परंतु संपूर्ण माहिती त्यांना अद्यापपर्यंत उपलब्ध झाली नाही. जन माहिती अधिकारी आज हजर झाले. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संपूर्ण जिल्हयातील तालुकानिहाय असल्यामुळे व अशा प्रकारची माहिती एकत्रितरित्या संकलीत केलेली नसते व त्यामुळे प्रत्येक तालुक्यातून सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता प्रत्येक तालुक्यातील गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती यांचेकडून विवरणपत्रात माहिती मागितली होती व त्याप्रमाणे ज्या ज्या तालुक्याकडून माहिती आलेली आहे ती ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी मंगरुळपीर तालुक्यातील चुकीची माहिती असे सांगितले होते व त्याबाबत मंगरुळपीर तालुक्यातील गट शिक्षणाधिकारी यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता

आदेशा करणे योग्य होते. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृश्टीने योग्य ती कार्यवाही करणे आव  यक होते. प्रथम अपीलीय अधिकारी हे केव्हाही कोणत्याही प्रथम अपीलाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध करुन देत नाही तर माहिती उपलब्ध करुन द्यावी असे फक्त आदेशा देतात त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपीले सादर होतात. आज जन माहिती अधिकारी हजर झाले. व त्यांनी असे सांगितले की 8 दिवसात संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देतो व त्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत संपूर्ण जिल्हयातील तालुकानिहाय माहिती व मंगरुळपीर तालुक्यातील चुकीची माहिती दुरुस्त करुन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने  उपलब्ध करुन देण्यात यावे. व तसे न केल्यास जन माहिती अधिकारी भाास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1272 अम/2009**

श्री विश्वजीत प्रल्हाद लांडगे
सरनाईक लेआऊट धनके वर जवळ
पो. पार्डी ता. पुसद जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
जिल्हा परिशद बांधकाम विभाग क्र.2 यवतमाळ
ता. जि. यवतमाळ
2) श्री पी. एम. लाहोरे
जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता
जिल्हा परिशद बांधकाम उपविभाग उमरखेड
ता. उमरखेड जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.1.2009 रोजी नोटीस काढून दि. 9.2.2009 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपअभियंता यांचेकडे सन 2006 ते 2008 या कालावधीतील 1. अमडापूर ते शिरमाळ रस्त्याचे कामाचे अंदाजपत्रक तांत्रिक मंजुरात प्रदान करण्यात आलेली देयके, मापपुस्तिका, हजेरीपत्रक करारनामा इ. 2. सन 2006 ते 2008 चे काळात एस. आर/सिआर व रोहयो अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची संपूर्ण माहिती व रेकॉर्ड व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुशंगाने उपअभियंता जिल्हा परिशद बांधकाम उपविभाग यांनी दि. 25.8.2008 रोजी सदरची माहिती संकलित करण्याकरीता सहा महिन्याचा कालावधी लागणार असल्यामुळे एवढी माहिती देणे भाक्य होणार नाही तसेच आपण दारिद्रय रेशेखाली आहात. एवढया कामाच्या देयकाच्या प्रती कार्यालयामधील निधी उपलब्ध नाही निधी उपलब्ध होताच आपणास कामाच्या झेरॉक्स प्रती देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 1.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 17.11.2008 रोजी देण्यात आलेला असून सदर

सुनावणीस आपण हजर राहिले नसल्यामुळे आपणास माहिती मिळाली असावी अशाीधारणा आहे. तरी यापुढे याप्रकरणी आपण जन माहिती अधिकारी यांचशी संपर्क साधूनमाहिती प्राप्त करुन घ्यावी तसेच त्यांना याच पत्रान्वये आदेशित करण्यात येत आहेअसाआदेश दिलेला दिसून येतो. परंतु तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्तायांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता यांनी सहा महिन्याचा कालावधी लागेल असे उत्तर दिलेले असल्यामुळे ते योग्य नाही व त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्तभंगाची कार्यवाही करणे आव  यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दाजन माहिती अधिकारी यांना न विचारता कागदी आदेशा पाठविलेला आहे व अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मागितलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1327 अम/2009 व अपील कमांक 1328 अम/2009.**

श्री अर्जुन हंसाजी कांबळे
रा. खामगाव वार्ड क.3(हरिफैल) बुध्द पुतळयाजवळ खामगाव
ता. खामगाव जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील कमांक 1327 अम/2009</u>**
1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिशद ता. जि. बुलढाणा
2) जन माहिती अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिशद ता. जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**<u>अपील कमांक 1328 अम/2009</u>**
1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिशद बुलढाणा
ता. जि. बुलढाणा
2) श्री वानखेडे
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिशद बुलढाणा
ता. जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 18.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील कमांक 1327 अम/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 28.8.2006 रोजी जन माहिती अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्र ाासन विभाग जिल्हा परिशद बुलढाणा यांचेकडे सन 1975 या कालावधीतील श्री राजहंस जेश्ठ लिपीक यांचे अपहार प्रकरणाच्या संदर्भातील माहिती सन 1973–74 व 74–75 या कालावधीतील मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत पोस्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 22.1.2007 रोजी मागितलेली माहिती महाराश्ट्र जिल्हा परिशदा व पंचायत समित्या (अभिलेखाचे वर्गीकरण, परिक्षण व ना ान) नियम 1964 मधील नियम 2 पोटनियम 1 नुसार अनुकमांक 1 ते 3 हे 'क' वर्गीय अभिलेखांमध्ये वर्गीकृत होत असुन अनुकमांक 4 हे 'अ' वर्गीय अभिलेखांमध्ये वर्गीकृत होते. त्यानुसार 'क' वर्गीय अभिलेखे केवळ 10 वर्शापर्यंत जतन करुन ठेवल्या जातात तथापी 'अ' वर्गीय अभिलेखे कायम

स्वरुपी जतन केले जातात. त्यास अनुसरुन अनुक्रमांक 1 ते 3 बद्यल मागितलेली माहिती 33 वर्शापूर्वीची असल्याने त्याचे ना ान केले आहे म्हणून सदरचे अभिलेखे जिल्हा परिशद बुलढाणाकडे उपलब्ध नसल्याने माहिती पुरविता येणार नाही व त्याचप्रमाणे 73, 74 व 75 मध्ये रोख पुस्तिकेमध्ये श्री राजहंस यांनी अपहारीत केलेल्या रकमेचा भरणा केल्याचे स्पश्ट आढळुन आले नाही. त्यामुळे सदरची माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 2.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा करतांना प्रथम अपीलाचा अर्जच त्यांच्या कडे प्राप्त नाही असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील मेमोवर कोणत्याही प्रकारची स्वीकृती आढळुन येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे पुन्हा असे सांगितले की सदरची माहिती ही आता उपलब्ध होवू भाकत नाही. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्रमांक 1328 अम/2009 मधील दि. 28.8.2006 च्या अर्जाच्या संदर्भात अमरावती खंडपीठाकडे अपील क्रमांक 1683 ची सुनावणी झालेली असून निर्णय दिनांक 6.11.2009 रोजी देण्यात आलेला असल्यामुळे पुन्हा त्याच अर्जाच्या संदर्भामध्ये असलेल्या अपीलावर निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. सदरच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसेल तर अपीलकर्ता यांनी अमरावती येथील खंडपीठामध्ये अधिनियमाच्या कलम 18 प्रमाणे तक्रार करणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

1) अपील क्रमांक 1327 अम/2009 **व** अपील क्रमांक 1328 अम/2009 ही दोन्ही अपीले खारीज करण्यात येतात.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1323 अम/2009**

श्री जब्बारशाह हुसेन शाह
मु. पो. निमगाव
ता. नांदुरा जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिशद बुलढाणा
ता. जि. बुलढाणा

2) श्री पी. आर. वानखेडे
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिशद बुलढाणा
ता. जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदे श पारित दिनांक 18.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.6.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 18.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. वरील अर्ज दि. 18.6.2008 रोजीच्या संदर्भात अमरावती खंडपीठामध्ये अपील क. 1581/2008 मध्ये सुनावणी झालेली असून दि. 10.12.2009 रोजी ''अर्जदाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आज अर्जदाराला आयोगा समोर दिली. अर्जदारास दिलेली माहिती तपासावी व माहिती राहिलेली असेल तर जन माहिती अधिकारी यांचेकडून पुन्हा प्राप्त करुन घ्यावी'', असे आदेश दिलेले दिसून येतात. व त्यावरुन अपील खारीज करण्यात आलेले असल्यामुळे पुन्हा त्याच अर्जाच्या संदर्भामध्ये नागपूर खंडपीठाने निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांना अमरावती खंडपीठातील निर्णया प्रमाणे उर्वरीत माहिती उपलब्ध झालेली नसेल तर अमरावती खंडपीठामध्ये अधिनियमाच्या कलम 18 (1) प्रमाणे तकार करणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
राज्य माहिती आयोग,<br>
खंडपीठ नागपूर.

नागपूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे किरकोळ अर्ज कमांक 2/2009, 3/2009 व 4/2009.**

**किरकोळ अर्ज कमांक 2/2009**

श्री प्रकाश मुकुंदराव पंत
डी 1 संजय अपार्टमेंट
274 धरमपेठ विस्तार शिवाजी नगर
नागपूर 440 010 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(नि)
मुख्य महाव्यवस्थापक(नि) कार्यालय औशिणक विज केंद्र
महा. राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री रॉय
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता(नि)
मुख्य महाव्यवस्थापक(नि) कार्यालय औशिणक विज केंद्र
महा. राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**किरकोळ अर्ज कमांक 3/2009**

श्री महेन्द्र रामकृशणराव भोंडे
दयाल नगर चंदन एस.टी.डी जवळ
मेन देवळी रोड पो.वर्धा गंज ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डि. एस. चिलमुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.) नगर पालिका प्र ाासन
आयुक्त कार्यालय नागपूर
2) श्री विद्यासागर भि. चव्हाण
नायब तहसिलदार वर्धा ता. जि. वर्धा
(तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी न.प.पुलगाव)
3) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी न.प.पुलगाव
ता. देवळी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**किरकोळ अर्ज क्रमांक 4/2009**

श्री हंसराज प्रल्हाद रामटेके
क्वार्टर नं. 57 एम्प्रेस मिल न्यु क्वार्टर बेझनबाग
नागपूर 440 004 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. उपायुक्त – 1
महानगर पालिका नागपूर
2) श्री राजु पा. भिवगडे
जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.2.2010 )**

**नि र्ण य**

1. किरकोळ अर्ज क्रमांक 2/2009 मध्ये अपील क्र. 2276/2007 च्या दि. 4.12.2008 च्या निर्णयातील आदशो प्रमाणे दाखल झालेल्या तक्रार क्र. 48/2009 च्या दि. 11.5.2009 च्या निर्णयातील आदे ाच्या पुर्नविलोकनाचा अर्ज सादर केलेला आहे.

2. किरकोळ अर्ज क्रमांक 3/2009 मध्ये अपील क्र. 2276/2007 च्या दि. 6.11.2008 च्या निर्णयातील आदेश ा क्र. 1 च्या संदर्भामध्ये पुर्नविलोकनाचा अर्ज सादर केलेला आहे.

3. किरकोळ अर्ज क्रमांक 4/2009 मध्ये अर्जदार यांनी दि. 15.9.2009 रोजी अपील क्र. 920/2009 च्या दि. 20.6.2009 रोजीच्या निर्णयातील आदेश क्र. 2 च्या संदर्भात पुर्नविलोकन करण्यासाठी आयोगाकडे अर्ज सादर केलेला आहे.

4. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 23 प्रमाणे या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या संबंधातील कोणताही दावा, अर्ज किंवा इतर कार्यवाही कोणतेही न्यायालय दाखल करुन घेणार नाही. आणि या अधिनियमान्वये केलेल्या अपीलाद्वारे दिलेल्या निर्णयाशिवाय असा आदेशा प्र नास्पद करता येणार नाही अशी तरतुद आहे. यावरुन आयोगाच्या निर्णयास अंतिम स्वरुप दिलेला आहे. परंतु सदरच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये पुर्नविलोकनाच्या संदर्भात कोणतीही तरतुद अधिनियमात नाही. व मा. सर्वोच्च न्यायालय यांनी केवल विरुध्द एस.के.सेन, (2001) 6 एस.सी.सी. 512 या निर्णयामध्ये "Power to review is not an inheritant power and must be conferred by law either expressly or by necessary implicationThe gereral rule is that a quasi judicial tribubnal becomes functus officio as soon as it makes a

decision relating to a particular matter it cannot, therefore, review its decision, unless so empowered by the relevant statutes (1987) 4 S C C 525 Kuntesh Gupta v Management of Hindu Kanya Mahavidayalaya.
त्यामुळे वरील सर्व पुर्नविलोकनाचे तीनही अर्ज खारीज करण्यात येतात.

1) अर्जदार व गैरअर्जदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2 नाग/2010

श्री रमेश रामाजी राठोड
20 विज्ञान नगर मानेवाडा
नागपूर 440034 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.2.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 12.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 1.1.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तसेच सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येवून आज दिनांक 22.2.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे दि.10.10.2008 रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.11.2008 रोजी अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी यांनी मा. पोलीस आयुक्त नागपूर यांचेकडे सदरचा तक्रार अर्ज चौकशी करुन अहवाल या कार्यालयास सत्वर सादर करण्यासंबंधाने आपल्या स्तरावरुन निर्देश देण्यास विनंती आहे असे कळविले होते व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना देण्यात आलेली होती. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 15.4.2009 रोजी (सहा महिन्यानी) प्रथम अपील दाखल केले. तत्पूर्वी दि. 19.1.2009 रोजी पुन्हा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी यांनी पोलीस आयुक्त यांना स्मरणपत्र पाठविलेले होते. प्रथम अपीलाच्या संदर्भात मात्र कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या संदर्भामध्ये मुदतीत कळविण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील व द्वितीय अपील हे मुदतबाहय असे दाखल केले आहे. परंतु वेळेत माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 4 नाग/2010

श्री रविंद्र तुकाराम हिवाळे
विमलाबाई तिडके महाविद्यालया जवळ
तुरकर बिल्डींग खडगाव रोड
कोहळे लेआऊट वाडी नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. एन. भाहारे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी
पंचायत समिती नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री जी. पी. गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी
ग्रामपंचायत वाडी ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदे श पारित दिनांक 22.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 12.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 1.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी पुन्हा आज दि. 22.2.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.11.2009 रोजी जोडपत्र क मध्ये सरपंच/ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत वाडी यांचेकडे अर्जदाराने दि. 30.1.2006 रोजी सरपंच ग्रामपंचायत वाडी यांचे कार्यालयात केलेल्या अर्जावरील कार्यवाही म्हणजे बीपीएल यादीत नाव समाविश्ट करण्याच्या विशयी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 13.11.2009 रोजी मागितलेली माहिती प्र नार्थक असल्यामुळे अधिनियमात प्र नार्थक माहिती देण्याची तरतुद नाही. कृपया आपण कार्यालयात येवून बीपीएल यादी पाहावयास उपलब्ध आहे. सदर यादीची (बीपीएल) खात्री करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 19.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 21.11.2009 रोजी माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती नागपूर यांनी प्रथम अपीलीय अधिकारी ग्रामपंचायत वाडी तथा विस्तार अधिकारी यांना पत्र दिलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलार्थी यांनी ग्रामपंचायत वाडी मागितलेली माहिती नमुना अ प्रमाणे कोणती माहिती मागितली आहे त्या नमुन्याची

सत्यप्रत सादर केलेली नाही त्याप्रमाणे त्यांनी 'अ' नमुन्यामध्ये माहिती मागावी व त्यामुळे तुर्त सदरचे अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता गैरहजर असला तरी अपीलकर्ता यांच्या सरपंच ग्रामपंचायत वाडी यांच्या कार्यालयात दि. 30.1.2006 रोजी दिलेल्या अर्जावरील झालेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 30.1.2006 च्या अर्जावरील झालेल्या कार्यवाहीची माहिती म्हणजे थोडक्यात टिपणी व त्यावरील निर्णय विनामुल्य कळविण्यात यावा.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 5 नाग/2010**

श्री सुधाकर नामदेवरावजी हुलके
सेनजॉन कॉनव्हेंट नांदगाव चौरस्ता
हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री रमेश धारकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी
भारत विद्यालय परिसर हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा
2) सौ. कल्पना मोरे
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
भारत विद्यालय हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.2.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 12.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 1.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येवून आज दि. 22.2.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी भारत विद्यालय हिंगणघाट यांचेकडे दि.17.8.2009 चे पत्र 1. बिनपगारी रजेचा हि ोब 2. निवडणूक कार्यालयाकडे पाठविलेल्या माहितीबाबत माहिती व्यक्ति ाः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 20.10.2009 रोजी आपण आमच्या आस्थापनेवरील कर्मचारी असल्यामुळे आपल्याला माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणी दि. 29.11.2009 रोजी घेण्यात येवून मुख्याध्यापिका भारत विद्यालय हिंगणघाट यांनी आपणास वेळोवेळी आपण उपस्थित केलेल्या मुद्याची माहिती यापुर्वीच दिलेली आहे. आपणास सदर पत्र प्राप्त झाल्याबद्यल त्या पत्रावर व दस्तऐवजावर आपली स्वाक्षरी

आहे. त्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहिती उपलब्ध झालेली नाही परंतु त्यांनी आयोगाकडे दाखल केलल्या लेखी युक्तीवादावरुन असे दिसून येते की त्यांना गुणवत्तेबाबत तपासणी करुन माहिती पाहिजे आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध होतें. कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्या बाबत तपासणी करता येत नाही. जे घडून गेलेले आहे त्याबाबतची माहिती उपलब्ध होते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 3.9.2009 व 23.10.2009 पूर्वीच सर्व माहिती ही कळविलेली आहे. व पुन्हा तीच माहिती ते मागत असल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही अर्जदाराने माहिती मागितली असल्यास ती त्यांना पुरविणे ही जन माहिती अधिकारी यांचेवर बंधनकारक आहे. आस्थापनेवर आहे म्हणून माहिती देता येत नाही हे आकसाने कळविलेली आहे किंवा अधिनियमाच्या तरतुदीचे अज्ञान तरी आहे. पूर्वी माहिती कळविलेले असल्यास तसे त्यांना कळविणे आव यक होते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते उत्तर हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. असे असले तरी प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1275/2009**

श्री राजेंद्र गुणवंतराव चौधरी
तिरुपती कॉलनी रंगोली मंगल कार्यालयामागे
अमरावती पो. व्ही.एम.व्ही. ता. जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
अमरावती ता. जि. अमरावती
2) श्री पी. आर. खवले
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग
अमरावती ता. जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदे श पारित दिनांक 9.2.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 9.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. सन 04–05 मध्ये स्थानिक विकास निधी अंतर्गत विद्यमान आमदार सौ.सुलभाताई खोडके यांच्या निधीतुन तिरुपती कॉलनी सर्व्हे नं.38/4 रंगोली कार्यालयामागे कठोरा रोड येथील लोआउट मध्ये श्री चौधरी ने श्री लंगडे अशाी लेआउट नकाशा नुसार नालीचा प्रवाह असतांना व तशी बांधण्यात आली असतांना ती ऑगश्ट 07 मध्ये श्री लंगडे ते श्री चौधरी असा नालीचा प्रवाह करण्यात आला सदर बदला बाबत कोणाचे आदेश झाले त्यांच्या प्रतीसह माहिती दयावी.

2. श्री मानकर यांचे बाजुला लेआउटला सव्हीस गल्ली नसतांना सव्हीस गल्ली सोडुन नाली कशी बांधण्यात आली व त्याकरीता निधी कोणी दिला सदर नाली अधिकृत आहे काय याबाबत सा.बा. विभागानी कोणत्या नियमाने बदल केला त्या नियमाची प्रत दयावी.

3. सरकार मान्य लेआउटमध्ये तसा बदल करण्याचा सा.बा.विभाग अमरावती यांना अधिकार आहे काय

4. श्री चौधरी ते श्री लंगडे अशी लेआउट नकाशानुसार पुर्वी बांधलेली नाली चुकीची होती काय? सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने दि. 3.4.2008 रोजी रु. 40/– चा भरणा करावा असे पत्र दिले त्यानंतर दि. 10.4.2008 रोजी पै ाचा भरणा केला व या कार्यालयातुन दि. 14.4.2008 रोजी माहिती प्राप्त करुन घेतली. माहिती मिळाल्याचे अर्जदाराने लिहुन दिले आहे. असे उत्तरवादी यांनी लिहुन दिलेल्या खुलाशात नमुद केले आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 17.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर

न राहिल्यामुळे प्रथम अपील हे नस्तीबध्द केले असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की सदरच्या नालीचा प्रवाह बदल करण्यात आला त्या संदर्भामध्ये कोणाचे आदेश आहे ही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की दि. 3.4.2008 रोजी अपीलकर्ता यांना पान क्र. 3 ते 41 पर्यंतची पाने देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांचा दि. 14.4.2008 तारीख असेल तर तो दि. 27.3.2008 रोजी प्राप्त झाला होता. प्रथम अपीलाच्या संदर्भात चौकशी झाली नाही व निर्णयपण झालेला नाही व माहितीही पण दिलेली नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. परंतु अपीलकर्ता गैरहजर आहे या कारणास्तव अपील खारीज केले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा केला. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की प्रवाह बदलाच्या आदे ाची प्रत उपलब्ध झाली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की प्रवाह बदलाच्या संदर्भामध्ये कोणताही लेखी आदेश झालेला नाही परंतु प्रत्यक्ष मोक्यावर सुचना देवून प्रवाह बदल झालेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती पुरविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत नाली प्रवाह बदल करण्या करीता लेखी आदे ा असल्यास त्याची प्रत उपलब्ध करुन द्यावी किंवा प्रवाह बदल कोणत्या आदे ा प्रमाणे झाला त्याबद्यलची माहिती अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोश्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 47/2010

श्री गोपीचंद रतिराम वर्मा
डिप्टी सिग्नल, बाजार चौक,
नागपूर 35 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा धर्मदाय उपआयुक्त
नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष
राणी अवंतीबाई लोधी समाज
डिप्टी सिग्नल नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी धर्मदाय उपआयुक्त कार्यालय यांचे तर्फे त्यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी अध्यक्ष राणी अवंतीबाई लोधी समाज डिप्टी सिग्नल नागपूर यांचेकडे दि. 8.2.2009 रोजी झालेल्या सभेत पत्र जप्त करण्यात आलेले आहे व दि. 15.3.2009 रोजी सभेत माझ्या पत्नीला दिलेल्या कागदपत्राची प्रमाणित प्रत पाहिजे आहे अ ी माहिती मागितलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 27.11.2009 रोजी प्रथम अपील हे धर्मदाय उपआयुक्त यांचेकडे दाखल केले. व त्या अपीलाचा निर्णय दि. 21.1.2010 रोजी देण्यात आला असून सदरची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही असे माहिती अधिकारी यांचे आदे ात नमुद केलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराचा अर्ज ज्यावेळेस सादर केला त्यावेळेस माहिती अधिका–याने संस्थेचे उद्दे । सामाजिक, सांस्कृतीक व भौक्षणिक स्वरुपाचे असून हे उद्दे । संस्था नोंदणी कायद्यात येत नाही तसेच संस्थेच्या उद्दे ात ते दिसून येत नाही तसेच संस्था/ट्रस्टला माहितीचा अधिकार हा कायदा लागू होत नाही असे मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचे रिट अर्ज क्र. 5294/08 मध्ये दि. 28.4.2009 रोजी आदे । पारीत केले आहे त्यामुळे माहिती उपलब्ध

करुन देता येत नाही असे निर्णयात म्हटलेले आहे. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयापूर्वीच द्वितीय अपील दाखल केलेले असल्यामुळे त्यात भास्कर कुलकर्णी विरुध्द राज्य माहिती आयुक्त नागपूर 2009 (4) एम.एल.जे.पेज 802, नागपूर युवक शिक्षण संस्था नागपूर विरुध्द महाराश्ट्र राज्य माहिती आयुक्त विदर्भ विभाग नागपूर 2009 (6) एम.एल.जे. पेज 85 हे निर्णय निदर्शनास आणलेले आहेत. व यावरुन अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 51/2010

श्री विठ्ठल गणपतराव नागपुरे
द्वारा श्री सुर्यकांत भांकरराव रणदिवे
भोंडे लेआऊट राम नगर चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(महसूल)
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर
2) श्री पी. व्ही. कापसे
जन माहिती अधिकारी तथा चिटणीस(महसूल भााखा)
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे नागपूर विभागात भाासन नियमानुसार महसुल अर्हता परीक्षा घेण्यात आल्या नाहीत. कनिश्ठ कर्मचा–यांना परीक्षेत बसण्याची संधी देवून जेश्ठ कर्मचा–यांच्या जेश्ठता डावलुन त्यांना नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देण्यापासुन वंचित ठेवल्याबत तसेच नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती दिलेल्या कनिश्ठ कर्मग्चा–याची मानीव तारीख देण्याबाबत. माहितीचा कालावधी सन 1998 पासून आतापर्यंत. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 7.10.2009 रोजी सदर विशयाबाबत या कार्यालयास यापूर्वी अर्ज प्राप्त झालेले असून याबाबत भाासनाकडे पत्रव्यवहार सुरु असून अंतिम निर्णय होताच या विशयाबाबत निर्णय घेण्यात येईल असे उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 3.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2009 रोजी माहिती अधिकार अर्जाच्या नमुन्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त(महसूल) यांना अर्ज करुन माहितीची आव यकता नाही असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे

माहिती अधिकारी तथा चिटणीस(महसूल) यांनी दि. 26.11.2009 रोजी माहितीची आव  यकता नसल्यास कार्यालयात प्रत्यक्ष भेटून अथवा लेखी निवेदन हे पत्र मिळताच 7 दिवसाचे आंत या कार्यालयास सादर करावे. आपले निवेदन विहित कालावधीत प्राप्त न झाल्यास माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत प्राप्त अर्ज नस्तीबध्द करुन निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 4.12.2009 रोजी उपआयुक्त(महसूल) यांनी विभागीय आयुक्त कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्याचा प्र  न निर्माण होत नाही अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. व त्यात पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करीत आहे अशा प्रकारचे आक्षेप घेण्यात आलेले दिसून येते. परंतु राज्य माहिती आयोगाकडे अपील मेमोवर जी सही देण्यात आलेली आहे ती सही व दिनांक 18.9.2009 व 3.11.2009 या वरील सहया हया सेपूर्ण वेगळया आहेत. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 50/2010

श्री दिलीप पुरुशोत्तम महाजन
प्लॉट नं. एन 52 रेशिमबाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय सिव्हील लाईन्स नागपूर यांचेकडे दि. 31.1.07 ते 21.7.2007 या कालावधीतील 1. माझा अर्ज दि. 31.1.07 स्पोर्टस डयुटी सवलत मिळण्याबाबत वर झालेल्या कार्यवाहीबाबत 2. अर्जित रजा दि. 7.4.07 व 8.5.07 वर झालेल्या कार्यवाहीबाबत 3. तहसिल कार्यालय नरखेड येथे बदली केल्याबाबत 4. तहसिल कार्यालय पारि ावनी येथे सेवा सलग्न केल्याबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने दि. 24.10.2008 रोजी अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले आहे. परंतु सदरच्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 7.11.2008 रोजी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदन दिलेले दिसून येते. सदरच्या निवेदनाच्या संदर्भामध्ये दि. 2.12.2008 रोजी मागितलेल्या कार्यालयीन टिप्पणीच्या प्रती ते गोपनीय दस्तऐवज असल्यामुळे आपणास देता येणार नाही. मात्र आदेशा व इतर कागदपत्राच्या प्रति पेज 2 रु. फी चालान द्वारे भरल्यास आपणास पुरविण्यात येईल. सबब आपण स्वतः कार्यालयात हजर राहुन आपणास आव यक कागदपत्राची संख्या कळविल्यास व त्याप्रमाणे चालान भरल्यास आपणास देता येईल असे कळविलेले दिसून येते. पुन्हा अपीलकर्ता यांनी दि. 16.12.2008 रोजी आक्षेप घेणारे पत्र दिलेले आहे. त्यावर दि. 26. 12.2008 रोजी प्रति पेज 2 रु. फी चालान द्वारे भरल्यास आपणास देता येईल. सबब

आपण स्वतः कार्यालयात हजर राहुन आपणास आव यक कागदपत्राची संख्या कळविल्यास व त्याप्रमाणे चालान भरल्यास आपणास देता येईल असे कळविलेले दिसून येते. त्या आधी दि. 5.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. पुन्हा दि. 15.1. 2009 रोजी अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन देण्या करीता अर्ज दिलेला दिसून येतो. पुन्हा दि. 4.3.2009 रोजी निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कार्यालयीन टिप्पणीच्या प्रति आपणास पुरविण्यात येणार नाही. मात्र आदे ा व इतर कागदपत्राच्या प्रति पेज 2 रु. फी चालान द्वारे खजीना दाखल केल्यास आपणास पुरविण्यात येईल. याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी 13 महिन्या नंतर दि. 5.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 21.12.2009 रोजी देण्यात आलेला असून सदरच्या निर्णया प्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 18.1.2010 रोजी चालान द्वारे 34 रु. भरण्यात यावे असे कळविलेले दिसून येते. व टिप्पणी उपलब्ध नाही ती पुरविता येणार नाही असेही त्यांना कळविलेले दिसून येते. व तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी दि. 13.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांच्याकडे आदे ाच्या प्रति आहेत परंतु त्यांना टिप्पणीच्या प्रतिची आव यकता आहे व टिप्पणीच्या प्रति हया गोपनियतेच्या कारणास्तव उपलब्ध करुन देता येणार नाही असे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरच्या नस्तीमध्ये टिप्पणीच्या प्रति उपलब्ध नसल्यामुळे ती त्यांना उपलब्ध करुन देता येणार नाही. परंतु सुरुवातीला त्यांनी टिप्पणीची प्रत ही गोपनिय असल्यामुळे देता येणार नाही असे का कळविले असे विचारले असता उपलब्ध नसल्यामुळे सांगता येणार नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की टिप्पणी असल्याि ावाय कोणत्याही बदलीचा आदेश होवू भाकत नाही. त्यामुळे टिप्पणी गहाळ केल्याची भाक्यता आहे व अपीलकर्ता यांचे म्हणणे त्याबाबत योग्य वाटते. कारण दि. 24.10.2008 रोजी अपीलकर्ता यांना जे उत्तर दिले आहे ते अवलोकन केले असता असे दिसून येते की सदरचे उत्तर हे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करण्याचे उत्तर आहे. व त्यानंतर जो पत्रव्यवहार दिसून येतो हा नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीच्या अंमलबजावणी बद्यल काही ज्ञान नाही असाच दिसून येतो. व त्यामुळे माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे असा निश्कर्श काढावयास हरकत नाही. टिप्पणीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी जे सांगितले ते मान्य होण्यासारखे नाही व त्यामुळे नस्तीमध्ये टिप्पणी आढळुन येत नाही अ ा प्रकारचे उत्तर त्यांना देणे आव यक होते व त्यामुळे सं ायास जागा निर्माण झाली आहे. अपीलकर्ता यांनी नस्तीची मागणी केली आहे परंतु अपीलकर्ता यांनी सुध्दा प्रथम अपील हे 13 महिन्यानी केलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणतीही कार्यपध्दती पाळलेली नसल्यामुळे त्यांची नस्तीची मागणी मान्य करता येणार नाही. परंतु तरी सुध्दा नागपूर सारख्या उपराजधानीच्या जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये एखाद्या अधिनियमाच्या अंमलबजावणीची अ ाप्रकारे वाताहात होत आहे याबाबतची जबाबदारी ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखाकडे येत असली तरी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. व ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी द्यावी जिल्हाधिकारी करीता सही करु नये. किंवा टिप्पणीच्या संदर्भामध्ये ती नस्तीमध्ये आढळुन येत नाही असे स्पश्टपणे कळवावे.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **जिल्हाधिकारी नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे माहितीकरीता पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 52/2010**

श्री गौतम भिकाजी वासनिक
मु. पो. बुधवारी पेठ वार्ड क्र.3 उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिशद उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर
2) श्री जगदीश पटोल
जन माहिती अधिकारी तथा कनिश्ठ अभियंता
नगर परिशद उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.8.2009 रोजी नगर परिशद उमरेडच्या माध्यमातुन दुकान गाळयांचा लिलाव व इतर माहिती मिळण्याबाबत. सहपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा कनिश्ठ अभियंता नगर परिशद उमरेड यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 15.9.2009 रोजी खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दि. 16.9.2009 रोजी खर्चाची आकारणी योग्य भुल्क आकारुन कळविण्यात यावे असे आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी दि. 23.9.2009 रोजी नगर परिशद उमरेड अंतर्गत उपलब्ध अभिलेखाची प्रमाणित प्रत करीता आकारलेले दर रु. 50/– हे प्रतिपृश्ठ नसून हे दर प्रती ठरावाचे प्रमाणीत प्रती करीता आहेत असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 6.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.11.2009 रोजी देण्यात आला असून प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्त्यांना जर निव्वळ माहितीची झेरॉक्स हवी असती तर ती त्यांना रु.2/– प्रती पृश्ठ याप्रमाणे भुल्क घेवून पुरविण्यात आली असती. तथापी त्यांनी माहितीच्या सत्यप्रती मागीतल्याने सभेने ठरवुन दिलेल्या दराने

भुल्क वसुल करुन माहिती अधिका–यानें माहिती दिली आहे. ि ावाय या आधीच्या प्रकरणात मा.राज्य माहिती आयोग नागपूर यांनी दिलेला आदे ा एकतर्फी आहे. त्यामुळे माहिती अधिकारी यांना आपला पक्ष ठेवता आला नाही. सबब माहिती अधिका–यानें केलेली कार्यवाही योग्य आहे अ ी अपीलीय अधिकारी म्हणून आमच्या दोघांमध्ये सुध्दा माझी देखील धारणा होत असल्याने तसेच माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी म्हणून आमच्या दोघांमध्ये सुध्दा मा.राज्य माहिती आयोग नागपूर यांच्या पूर्वीच्या आदे ाचे उल्लंघन न करण्याचा साधा हेतुही नसल्याने केवळ धारणा पक्की व्हावी या खातर माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे या निर्णयाप्रत हे प्राधिकरण आलेले आहे व माहिती अधिकारी यांनी उचीत कार्यवाही केलेली असल्यामुळे सदर प्रकरण खारीज करण्यात येते. असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की पुर्वीच्या अपीलामध्ये आयोगानी अशाच प्रकारे अवास्तव फीची आकारणी केलेली असल्यामुळे खर्च परत करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे त्यांना खर्च परत मिळाला. परंतु आता सुध्दा तशच प्रकारे अवास्तव खर्चाची आकारणी केलेली असल्यामुळे खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध केलेली असली तरी अवास्तव आकारणी करीता सदरचे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असा युक्तीवाद केला की ठरावाच्या प्रती देण्याकरीता सभेत ठराव करुन प्रत्येक ठरावाची प्रत 50 रु. फी आकारणी करावी असा निर्णय केलेला आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले होते. ठरावाची प्रत ही टाईप करुन व त्याची छायांकित प्रत काढुन असे अपीलकर्ता यांना खरी नक्कल देण्यात आलेली आहे. सदरची प्रत अपीलकर्ता यांनी आयोगाचे निद ानास आणले. त्यावरुन ती ठरावाची छायांकित प्रत नसुन टंकलिखीत करुन त्याची छायांकित प्रत खरी नक्कल म्हणून दिलेली आहे. परंतु प्रमाणित प्रत याचा अर्थ टंकलिखीत करुन तीच प्रत सक्षम अधिका–याने प्रमाणित करुन देणे असा होतो व त्यावर सार्वजनिक प्राधिकरणाचे सिल सुध्दा असणे आव यक आहे. तरच रु. 50/– ची आकारणी ही महाराश्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या नियम 4 (अ) प्रमाणे योग्य ठरते. परंतु जी माहिती तयार कागदपत्रामध्ये आहे त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती हा 2 रु. प्रती प्रमाणे उपलब्ध करुन देणे व त्यामुळे माहितीच्या अधिकारात उपलब्ध करुन दिली असे प्रमाणित करुन देणे असा त्याचा अर्थ आहे. जन माहिती अधिकारी यांनी टंकलिखीत करुन दिलेली प्रत दिली असती तर रु. 50/– ची आकारणी योग्य आहे परंतु ठराव उपलब्ध असतांना छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक असते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे 2 रु. प्रती प्रमाणे आकारणी करुन उर्वरीत रक्कम परत करणे संयुक्तिक राहिल. यापुढे वरील प्रमाणे वर्गवारी करुन फी आकारणी करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या प्रतींच्या 2 रु. प्रती प्रमाणे फी आकारुन उर्वरीत रक्कम परत करण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 49/2010**

श्री रामदास जैराम मेश्राम
इंदोरा झोपडपट्टी (मायानगर) ठवरेनगर कॉलनीजवळ
पो. जरीपटका नागपूर 440014 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कुही
ता. कुही जि. नागपूर
3) श्री पी. जी. धुमाड
जन माहिती अधिकारी तथा तलाठी सा.क्र.51
मौजा सिरोली/रुयाड ता. कुही जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.2.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कुही यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

नियमित दिवाणी दावा क. 64/89 चे अनुशंगाने आ.न्यायाधि ा दिवाणी न्यायालय कुही यांचे प.ह.नं. 3.8.91 चे आदे ाानुसार मौजा सिरोली (रुयाल) प.ह.नं.51 ता.कुही जि.नागपूर चे अंतर्गत भोत भूमापन क. 300 पैकी उप विभाग भूमापन क. 300/1, 300/2, 300/3 आणि 291 व 293 चे भोती संबंधात फेरफार पत्रक क. 90,100,101,172 व 284 चे नुसार मा. प्राधिकरण तथा तहसीलदार यांचे वतीने भोतीची वाटणी तथा फाळणी करुन देण्यात आली. यारि ावाय सदहू भूमापन भोत क्रमांकाच्या भोतीला तुकडे बंदी तथा थकबंदी आणि एकत्रीकरण 1947 चा कायदा लागू आहे. व त्या विशयाच्या संदर्भात पुन्हा 23 मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. अर्जाच्या अनुशंगाने दि. 9.8.2008 रोजी खर्चाचा भरणा करण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. व त्यावर ही पूर्व माहिती व कागदपत्र आपल्याला पहिलेही दिलेले आहे असे नमूद केलेले आहे. दि.11.8.2008 रोजी आपली सर्व माहिती तयार आहे व आपण स्वतः येवून घेवून जावी किंवा पोस्टेज खर्च पाठविण्यात यावा असे त्यांना कळविलेले दिसून येते. तसेच दि. 21.8.2008 रोजी ग्राम विस्तार अधिकारी श्री पी.जी.धुमाळ यांनी सुध्दा तहसिलदार यांचेकडे कागदपत्रे पाठविलेली आहेत व ती कागदपत्रे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहेत. त्याबाबत समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 5.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा अपीलार्थी यांना तहसिलदार कुही यांच्या स्तरावरुन माहिती मिळाल्यामुळे त्यांचा अर्ज नस्तीबध्द करण्यात आला असा खुलासा करण्यात

आलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे जे अपील दाखल केलेले आहे ते एक वर्षाच्या कालावधीनंतर दाखल केलेले आहे. व त्यामुळे सदरचे अपील हे मुळात मुदतीत नाही. अपीलकर्ता यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा आयोगाकडे केलेला नाही. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना पुर्वी जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्या माहिती मधूनच त्यांनी पुन्हा कागदपत्रे व अभिप्राय मागितलेली आहे. अपीलकर्ता यांचे पुर्वी अपील क्र. 1452/08 हे दि. 21.5. 2008 आयोगानी निर्णय देवून माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे खारीज केलेले आहे असे आयोगाचे निद नास आणले. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 17.7.2006 रोजी जो माहितीचा अर्ज केला होता त्यातील माहितीचे मुद्दे व या अर्जातील मुद्दे समान आहेत. उपलब्ध झालेल्या माहितीतूनच अभिप्राय मागितलेले आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्या बाबतचे अभिप्राय अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना कोणतेही मुद्दे या अभिप्रायात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक नाही. मात्र कागदपत्रे पुन्हा हवी असल्यास त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांच्या विशयाचे संदर्भात असलेल्या नस्तीचे निरीक्षण करुन आव यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिव ाीची तारीख व वेळ कळवून जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित होवून त्यांच्या विशयाच्या संदर्भातील नस्तीचे निरीक्षण स्वतः घेवून त्यातील आव यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती (पूर्वी मिळालेल्या वगळून) उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1288/2009**

सौ. नलीनी श्री आवळीनकर
श्रीकृश्ण कॉलनी फरशी स्टॉप
दस्तरनगर रोड अमरावती
ता. जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिशद अमरावती
ता. जि. अमरावती
2) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
पाटबंधारे विभाग, जिल्हा परिशद अमरावती
ता. जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदे श पारित दिनांक 11.2.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग यांना उत्तमसरा ता.भातुकली जि. अमरावती येथिल कोल्हापूरी बंधारा दुरुस्तीबाबत जोडपत्र 'अ' मध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने प्रथम अपील दि. 22. 7.2008 रोजी दाखल केले होते. व प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नव्हती म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 28.8.2009 रोजी तक्रार दाखल केली होती. सदरच्या तक्रार क्र. 112 चा निर्णय राज्य माहिती आयोग अमरावती खंडपीठ यांनी दि. 1.9.2009 रोजी दिलेला असून अपीलकर्ता यांना 15 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदे ा देण्यात आले होते. त्या आदे ाा प्रमाणे दि. 5.1.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा केलेला आहे. व त्याबाबत दि. 5.1.2010 रोजी प्राप्त झालेल्या माहिती बाबत माझी कोणतीही तक्रार नाही असे त्यांनी लेखी दिलेले आहे. परंतु आज सदरच्या अपीलामध्ये अपीलकर्ता हजर होवून त्यांनी असे सांगितले की तसे जरी लिहुन दिलेले असले तरी त्यांचे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान झालेले नाही व त्यांनी पुर्वी दि. 30.7.2008 रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिली होती तीच माहिती आता सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. वास्तविक दि. 4.8.2006 च्या विनंती अर्जा नुसार कोल्हापूरी बंधा–याची दुरुस्ती करण्याची विनंती

केलेली होती. व त्या संदर्भामध्ये उपविभागीय अधिकारी लघु पाटबंधारे उपविभाग अमरावती, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग, जिल्हा परिशद अमरावती यांची प्रत्यक्ष भेट घेतली तेव्हा पाणी वापर संस्था स्थापन करण्याविशयी सुचविले. पाणी वापर संस्था स्थापन केल्या नंतर सुध्दा या बंधा–याची दुरुस्ती सन 2007–08 या वर्शाचे नियोजनात घेतले नसल्याचे सांगितले. व त्यामुळे सदरची माहिती त्यांनी मागितली होती. परंतु उपलब्ध झालेली माहिती ही उडवाउडवीची उत्तरे दिल्यासारखी आहेत. मागितलेली माहिती व उपलब्ध करुन दिलेली माहिती याबद्यलचा खुलासा तपासला असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांना जी माहिती दिलेली आहे ती अति  ाय त्रोटक माहिती आहे. व त्यांच्या मुळ मागणीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे माहिती दिलेली नाही. त्यामुळे त्यांच्या दिनांक 4.8.2006 च्या अर्जावर काय कार्यवाही केली याबद्यलची टिप्पणीची माहिती तसेच संपूर्ण कोल्हापूरी बंधारे दुरुस्ती करण्याच्या संदर्भामध्ये जी जी कार्यालयीन कार्यवाही करण्यात आली त्या टिप्पणीच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 4.8.2006 च्या अर्जावर झालेली कार्यवाहीची माहिती तसेच सन 2007–2008 या वर्शात कोल्हापूरी बंधारे दुरुस्ती विशयीची कामे नियोजनात घेतली असतील त्याबद्यलच्या टिप्पणीच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द रु. 25000/– ची भाास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक अम 1287/2009

श्री राजेश रतन निधाने
शिवाजी नगर वाल्मीक चौक जुने भाहर अकोला
ता. जि. अकोला – 2 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिशद अकोला
ता. जि. अकोला
2) जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य. विभाग)
जिल्हा परिशद अकोला
ता. जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा ि ाक्षणाधिकारी (माध्य. विभाग) जिल्हा परिशद यांचेकडे आमची डाबकी येथील माध्यमिक भााळा महर्शी वाल्मीक महाराज एज्युके ान ॲन्ड वेलफेअर सोसायटी अकोला द्वारा संचालित भााळेचा रिन्यूवल प्रस्ताव दि. 22.6.07 रोजी आपल्या कार्यालयाकडे सादर केला होता. तरी हा प्रस्ताव मंजूर झाला असून त्याची रिन्यूवलची प्रत मिळणेबाबत. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 27.8.2008 रोजी सदर प्रत या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविण्यात आलेले होते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एक आठवडयाच्या आंत माहिती द्यावी अशा प्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. आज अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची रिन्यूवलची मान्यता ही दि. 14.4.2009 रोजी ि ाक्षण उपसंचालक कार्यालय अमरावती विभाग अमरावती यांनी दिलेली असल्यामुळे प्रथम अपीलाच्या वेळी ती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देता आलेली नाही. आता मात्र त्यांना ती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1286/2009**

श्री जगदीश विनायकराव देशपांडे
के.ऑफ भौलेश रा. देशपांडे
मु. पो. ब्राम्हणगाव ता. उमरखेड
जि. यवतमाळ 445206 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुर्यकांत पाठक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिशद उमरखेड
ता. उमरखेड जि. यवतमाळ
2) श्री रविंद्र गोविंदवार
जन माहिती अधिकारी कनिश्ठ अभियंता (बांधकाम)
नगर परिशद उमरखेड
ता. उमरखेड जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेशपारित दिनांक 11.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिशद उमरखेड यांचेकडे मी 27.7.2007 व 25.11.2007 रोजी प्लॉट समोरील अतिक्रमण हटविण्यासाठी अर्ज केला होता त्या अर्जावर काय कारवाई केली बाबतची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 19.3.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 29.5.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19.12.2008 रोजी देण्यात आला असून त्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी कारवाई पुर्ण कधी होईल असे विचारले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी ज्या अतिक्रमण हटविण्याच्या संदर्भात माहिती मागितलेली आहे तो लेआऊट हा बेकायदे ीर आहे. व त्यामुळे अतिक्रमण ठरविता येत नाही. त्या करीता संपूर्ण भाहराचे नियोजनाचे संदर्भात माहिती मागितलेली आहे. त्यामुळे उमरखेड भाहराचा सिटी सर्व्हे झालेला नसल्यामुळे भाहरातील खाजगी तसेच सरकारी मालकीच्या इमारती/खुल्या जागा, रस्ते याबद्यल कोणतेही रेकॉर्ड उपलब्ध नाही. उमरखेड भाहराचा सिटी सर्व्हे करण्याबाबत मा. आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांनी 11 नगरपरिशदांचे नगर भुमापन खाजगी संस्थेकडून करण्याकरीता जाहीर निविदा सुचना प्रसिध्द केलेली आहे. त्यानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर 4 महिन्याच्या कालावधीत भाहराचा सर्व्हे पूर्ण होवुन संपूर्ण भाहराचे अधिकृत रेकॉर्ड उपलब्ध होणार आहे. यामध्ये सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमणाची नि चती होणार आहे. वरील प्रमाणे भाहराचा सिटी सर्व्हे झाल्यानंतर किंवा न्यायालयाने दिवाणी मुकदमा 44/09 मध्ये आदे ा पारीत करुन श्री धनवट यांचे अतिक्रमण घोशित केल्यास नगरपरिशदेद्वारा अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात येईल असा खुलासा सादर केलेला असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 53/2010**

श्री विनेश चोपडा (संवाददाता दै.नई दुनिया भोपाल)
वार्ड नं.21 जमातपारा कालेज रोड
राजनांदगाव (छत्तीसगढ) ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी
नागपूर ग्रामीण नागपूर
लाला गोदाम क्र.1 इन्दौरा कामठी रोड नागपूर
2) श्री प्रका ा गुंडावार
जन माहिती अधिकारी तथा उप प्रादे िाक परिवहन अधिकारी
नागपूर ग्रामीण नागपूर
लाला गोदाम क्र.1 इन्दौरा कामठी रोड नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रादे िाक परिवहन अधिकारी नागपूर ग्रामीण नागपूर यांचेकडे सूचना के अधिकार कानून 2005 के तहत चाही गई परिवहन जॉच चौकीयों/नाकों से संबंधीत एवं विभागीय जानकारीयॉ एवं दस्ताऐवज आदि प्राप्त हेतु. विशयांतर्गत निवेदन है कि जनहित में उपयोग हेतु निम्नानुसार चाही गई समस्त जानकारीयॉ सिर्फ हिन्दी भाशा में ही अव य उपलब्ध करवाने की कृपा करियेगा याबाबत एकुण 24 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 16.10.2009 रोजी मागितलेली माहिती फार मोठया विस्तृत प्रमाणात असून ती वेगवेगळया विभागातून व कार्यालयातून मागवावी लागेल त्याकरीता बराच मनुश्यबळ लागेल करीता वरील माहिती मिळण्यास विलंब होण्याची भाक्यता आहे. माहिती प्राप्त होताच आपणास ताबडतोब देण्यात येईल. कार्यालयीन भाशेत माहिती देण्यात येईल. सबब आपले माहिती करीता असे कळविण्यात आलेले दिसून येते. पुन्हा दि. 12.11.2009, 13.11.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या संदर्भात मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 16.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल करुन माहिती सिर्फ हिंदी में ही उपलब्ध कराये असे प्रथम अपीलीय अधिकारी यांना अपील मेमोमध्ये कळविले. त्यानंतर दि. 25.11.2009 व 5.12.2009 रोजी अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या सुनावणीकरीता पत्र दिलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाच्या सुनावणीस अर्जदार गैरहजर असल्यामुळे सुनावणी घेता आली नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी गुरुवारलाच सुनावणी ठेवावी अ ी विनंती केली असल्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी गुरुवारी ठेवण्यात आली होती परंतु अपीलकर्ता गैरहजर होते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले असून सोबत 50 + 50 = 100 रु. ची पोस्टल ऑर्डर आयोगाचे नावानी पाठविलेली आहे.

द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी माहिती ही हिंदी भाशेमध्ये पुरवावी अ ी विनंती केलेली आहे. व गुरुवारी ठेवावी अ ी विनंती केलेली आहे. आज गुरुवार आहे परंतु अपीलकर्ता हजर झालेले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अति ाय विस्तृत प्रमाणात आहे व हिंदी भाशेत असल्यामुळे काही मुद्यांचे आकलन सुध्दा होत नाही. मागितलेली माहिती ही एका कार्यालयातील नसून संपूर्ण प्रादे िक परिवहन विभागातील आहे व त्यामुळे संपूर्ण माहिती ही संकलित करुन पुरविण्याकरीता वेळ लागेल असे अपीलकर्ता यांना मुदतीत कळविलेले होते. व त्यानंतरही अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय दोन वेळा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु प्रथम अपीलात सुध्दा अपीलकर्ता यांनी माहिती हिंदी भाशेत उपलब्ध व्हावी अ ी विनंती केली परंतु प्रथम अपीलाच्या सुनावणीस ते हजर राहिलेले नाहीत. Maharashtra Official Languages Act 1963 प्रमाणे महाराश्ट्र राज्याची राज्य कारभाराची भाशा ही मराठी आहे. त्यामुळे जी जी कागदपत्रे उपलब्ध होतील ती सर्व कागदपत्रे ही मराठी भाशेतच उपलब्ध आहे व त्या सर्व कागदपत्राची हिंदी भाशेमध्ये भाशांतर अपेक्षित नाही. भाशांतर करण्याची व्यवस्था सुध्दा त्यांचे कार्यालयात नाही. किंवा भाशांतराकरीता जो खर्च येईल त्याबाबतचा निधी कार्यालयात उपलब्ध नाही. व मुळात राज्य कारभाराची भाशा ही मराठी असल्यामुळे त्याच भाशेत माहिती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित असल्यामुळे त्यांना तसे कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांची द्वितीय अपील मेमोमधील मागणी सुध्दा मान्य करता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोसोबत 100 रु. ची पोस्टल ऑर्डर पाठविलेली आहे परंतु महाराश्ट्रामध्ये द्वितीय अपील सोबत 20 रु. चे कोर्ट फी स्टॅम्प लागत असल्यामुळे **अपीलकर्ता यांनी पाठविलेली जास्तीची रक्कम ही अनावश्यक असल्यामुळे त्यांचेकडे 50 रु. ची पोस्टल ऑर्डर ही निर्णया सोबत परत करण्यात येते. व 50 रु. ची पोस्टल ऑर्डर ही चालानाद्वारे लेखा ि ार्शामध्ये जमा करण्यात यावी.**

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1289/2009**

श्री हरीराम भिकमचंद कलंत्री
33 प्रभात कॉलनी ि ालांगन रोड अमरावती
ता. जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री महादेव तु. केदार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
अमरावती विभाग अमरावती
मांगीलाल प्लॉट्स अमरावती कॅम्प
अमरावती ता. जि. अमरावती
2) श्री विक्रम गो. रघुवं ाी
जन माहिती अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग 1/मुद्रांक जिल्हाधिकारी
मांगीलाल प्लॉट्स अमरावती कॅम्प
अमरावती ता. जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 15.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग 1/ मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे मुद्रांक विक्रेत्याचा परवाना मिळणेबाबत श्री नंदकि ाेर कलंत्री यांची नोटिस याप्रमाणे एकुण 27 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 7.1.2009 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व त्यात अपीलकर्ता यांना त्वरीत माहिती पुरवावी व कोणतेही भाुल्क आकारण्यात येवू नये असा आदे ा दिलेला दिसून येतो. व त्यानंतर माहिती उपलब्ध झाली परंतु विलंबाने पण अपुर्ण उपलब्ध झाली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना माहिती अपुर्ण व विलंबाने प्राप्त झाली व मुद्या क्र. 27 ची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही असे आयोगाकडे सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जुनी व विस्तृत प्रमाणात असल्यामुळे ती संकलित करुन माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब

होईल असे त्यांना दि.12.12.2008 रोजी विहित मुदतीत कळविले होते. सदरचे पत्र यु.पी.सी.ने पाठविलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना सदरचे पत्र मिळाले नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांना दि.19.12.2008 रोजी माहितीचा खर्च रु. 56/— चा भरणा करावा असे कळविण्यात आले होते. परंतु तेही पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यानंतर दि.16.1.2009 रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना दि.12.12.2008 व दि. 9.12.2008 च्या पत्राचा संदर्भ देवून स्मरणपत्र दिलेले दिसून येते. मुद्या क. 27 च्या संदर्भामध्ये आपण सन 2000 ते 2008 या कालावधीत कार्यरत असलेल्या अधिका—याचे सर्व्हिस बुक तसेच गत 9 वर्षाची सी.आर.ची प्रत मागणी केली आहे. सदरची मुद्या क. 27 बाबतची माहिती अधिका—याचे सेवा अभिलेखा ी संबंधित असल्यामुळे व सदरची माहिती व्यक्तीगत स्वरुपाची आहे ती क ाकरीता पाहिजे याचे कारण नमुद केले नाही. त्यामुळे सदरची माहिती नाकारण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. 11.2.2009 रोजी मुद्या क. 1 ते 26 बाबतची माहिती एकुण 34 पाने अपीलकर्ता यांना पाठविण्यात येत आहे असे पत्र दिलेले दिसून येते. या सर्व पत्रव्यवहाराच्या संदर्भामध्ये यु.पी.सी.ने हा पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. त्याबाबतचे पोस्टाचे पुरावे दाखल केलेले आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलाच्या निर्णयमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याच्या बाबत जी कार्यपध्दती अवलंबिण्यास पाहिजे होती ती अवलंबिली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे निद ानास आणले नाही. जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाच्या तरतुदीची माहिती करुन देणे आव यक आहे असे दिसून येते. परंतु माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निश्कर्श काढता येत नाही. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 13/2010

श्री लंकेश्वर बाबुराव चांदेकर
प्लॉट नं. 395 दादाजी धुनिवाले चौक
जुना बगडगंज नागपूर 440008 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त
परिमंडळ क. 1 सिताबर्डी विभाग
नागपूर
2) श्री ए. टी. उईके
जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त
सिताबर्डी विभाग
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 12.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 2.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त यांचेकडे दि. 12.8.2009 ला दाखल केलेल्या तकारी वरील कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने दि. 8.10.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 18.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 27.11.2009 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांनी केलेल्या तकारीची चौक ाी अजुनपर्यंत झालेली नाही व त्यांना अहवाल सुध्दा प्राप्त करुन दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की अपीलकर्ता यांना यांच्या तकारीच्या संदर्भामध्ये जी चौकशी सुरु आहे त्यांच्या संदर्भामध्ये दि. 8.10.2009 रोजीची

व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये दि. 27.11.2009 ची वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास आणलेली आहे व चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यावर ती उपलब्ध करुन देता येईल असे त्यांना कळविलेले आहे. आता चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे. तो अपीलकर्ता यांना देण्याचा प्रयत्न केला. परंतु अपीलकर्ता यांनी सदरचा चौकशी अहवाल स्वीकारलेला नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की आयोगाची नोटिस आल्यानंतर चौक ी अहवाल तयार करण्यात आलेला आहे म्हणून तो त्यांनी स्वीकारलेला नाही. परंतु वरील प्रमाणे अपीलकर्ता यांना चौकशी करुनच माहिती उपलब्ध करुन देता येईल असे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी चौकशी अहवाल स्वीकारणे आव यक होते. चौकशी अहवालाच्या संदर्भामध्ये गुणवत्तेबाबत कोणत्याही प्रकारची तपासणी आयोगाकडून केली जात नाही. माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या चौक ी अहवालाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. व अपीलकर्ता यांची पोच घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1292/2009**

श्री रमेश सोनाजी कहाळे
भाासकीय तंत्र माध्यमिक भााळा केंद्र हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा 442301 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ए. एन. डोंगरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय
मोर्शी रोड अमरावती ता. जि. अमरावती
2) श्री वा. जे. खोजरे
जन माहिती अधिकारी तथा सहा.प्रशिक्षणार्थी सल्लागार(तांत्रिक)
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय
मोर्शी रोड अमरावती ता. जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 15.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय यांचेकडे सोबत जोडलेल्या परिशिष्टा मधील अ.क्र. 1 ते 7 अशा एकुण 7 मुद्यांची माहिती, सुधारीत वेतन श्रेणीनुसार देण्यात आलेल्या, प्रलंबित थकबाकींची व इतर माहिती मिळण्याबाबत माहिती मागितलेली आहे. सांक्षांकित प्रती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 28.11.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 11.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.1.2009 रोजी देण्यात आलेला असून दि. 28.11.2008 अन्वये केलेली कार्यवाही उचित आहे तसेच संबंधितांना सुधारीत वेतन श्रेणीनुसार थकबाकींची रक्कम अदा करण्यासंबंधी काय कार्यवाही केली याबाबतचा खुलासा मागविण्यात येईल. त्यामुळे सदर्हु अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यात मुद्या क्र.1 ची माहिती उपलब्ध करुन दिली व मुद्या क्र.2 ते 7 मध्ये वस्तुनिष्ठ माहिती नाही अशा प्रकारे उत्तर देण्यात आलेले आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी आज आयोगाकडे हजर नाहीत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की अपीलकर्ता यांना दि. 11.11.2008 रोजी अतिरिक्त माहितीचा खर्च 14 रु. आणि टपाल खर्च रु. 40

हा मागविण्यात आला होता व दि. 28.11.2008 रोजी खर्चाचा भरणा केल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी लेखी युक्तीवाद सुध्दा दाखल केलेला आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदरची माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देता आली असती. परंतु वस्तुनिष्ठ या कारणास्तव ती मागविण्यात आलेली आहे. वस्तुनिष्ठ याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे असे दिसून येत नाही. आज ते आयोगा समोर हजर असते तर त्याबाबतचा खुलासा घेता आला असता. मागितलेली माहिती किंवा त्याबद्यलची झालेली कार्यवाहीची टिप्पणी किंवा कार्यवाही झालेली नसेल तर झालेली नाही अशा प्रकारे अपीलकर्ता यांना 30 दिवसाचे आंत कळविणे आवश्यक होते. कोणत्याही माहितीच्या अधिकाराची प्रक्रिया ही अतिरिक्त खर्चाचे भरणा करण्याचे पत्र मिळून 30 दिवसा मध्ये होणे आवश्यक असते. व तसे पत्र शेवटच्या दिवशी पाठविण्यात आलेले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असे दिसून येते. व त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 1.10.2008 च्या माहितीच्या अर्जातील मुद्या क्र.2 ते 7 ची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **प्रादेशिक सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय मोर्शी रोड अमरावती** यांनी किंवा सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1308/2009**

श्री कुलदिप देविचंद तोडरवाल
पुजा ड्रेसेस भोलुबाजार
ता. मंगरुळपीर जि. वाशिम ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक
वाशिम ता. जि. वाशिम
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम
ता. जि. वाशिम ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.2.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांचेकडे मंगरुळपीर पोलीस स्टेशन मध्ये सेवारत असलेले पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर रॉय हे पोलीस सेवेत असतांना त्यांचे विरुध्द कितीदा तक्रारी झाल्या त्यांचेवर कितीदा विभागीय चौकशी करण्यात आली, त्यांचेवर कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली त्याचे स्वरुप व त्यांना बडतर्फ करण्यात आले असल्यास कितीदा व कोणत्या कारणास्तव अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 16.12.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 6.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या प्रथम अपील मेमोमध्ये, विलंबाने व अपुर्ण माहिती दिली व दि. 16.12.2008 रोजी जी माहिती दिली ती माहिती को—या कागदावर फक्त तीन ओळीत असून त्यावर कार्यालयाचे नाव किंवा शिक्का व माहिती अधिका—याची सही वगैरे नाही असे नमुद केले आहे. त्यामुळे ती माहिती अधिकृत आहे किंवा नाही हे कळून येत नाही. सदरची माहिती ही कव्हरींग लेटरसोबत दिली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली ती स्वतंत्रपणे वाचण्यास घेतली तर ती अधिकृत आहे असे दिसून येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांचे सहीनिशी व कार्यालयाचे सिल असलेले तसेच माहिती अधिकारात माहिती दिली अशा प्रकारे प्रमाणित करुन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. वास्तविक जन माहिती अधिकारी यांना याबद्यलची जाणीव असणे आवश्यक असते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे

त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे व शासनाच्या नियमांचे उल्लंघन केलेले आहे. व त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती ही कार्यालयाकडून अधिकृतरित्या पुरविण्यात आलेली आहे या करीता कार्यालयाकडून माहिती अधिकारी यांची सही, कार्यालयाचा सिल व माहितीच्या अधिकारात माहिती दिली असे प्रमाणित करुन हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने देण्यात यावी.
2) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे तसेच शासनाच्या परीपत्रकाचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे.
3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **उप पोलीस महानिरीक्षक अमरावती** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1306/2009**

श्री भिमराव रामराव नारे
रा. चाकूर पो. भुली
ता. मानोरा जि. वाशिम ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एम. पेंडभाजे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी
मानोरा ता. मानोरा जि. वाशिम
2) जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी कार्यालय
मानोरा ता. मानोरा जि. वाशिम ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.2.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी मंडल कृषी अधिकारी तालुका कृषी अधिकारी मानोरा यांचेकडे सन 1976 मध्ये मौजे चाकुर येथील गट क्र./सर्व्हे क्र. 1, 11 मृदसंधारण विभागामार्फत नालाबंडींगचे कामाबाबत संपुर्ण तपशिलवार माहिती मिळणेबाबत खातेदार अन्नपुर्णा रामराव नारे यांचे वारस भिमराव रामराव नारे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 18.8.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 13.8.2008 रोजी झालेल्या मृदसंधारणाच्या कामाची माहिती 1976 मधील असल्यामुळे व संबंधित रेकॉर्ड या कार्यालयात उपलब्ध नसल्याने माहितीचा पुरवठा करता येत नाही. सन 1998 पासून तालुका अधिकारी कार्यालय अस्तित्वात आलेले आहे असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दि. 13.8.2008 रोजी आक्षेप घेतलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या अर्जाची दखल विहित मुदतीत घेतलेली नाही. प्रथम अपील दाखल केल्यावर मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 19.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दयावी असे पत्र दिले तसेच दि. 22.8.2008 रोजी भांडारपाल, प्रस्तुत कार्यालय यांना सुध्दा पत्र दिले. भांडारपाल यांनी दि. 24.8.2008 रोजी रेकॉर्डची पाहणी दोन मजुराद्वारे केली. सन 1976 चे (32 वर्षा पुर्वीचे) रेकॉर्ड असल्याने ते कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविल्यामुळे त्याप्रमाणे निर्णय अपीलकर्ता यांना देण्यात आले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र हा प्रयत्न प्रथम अपीलीय अधिकारी यांनी करावयाचा असतो व तो त्यांनी केलेला नसल्यामुळे ते शास्तीस पात्र आहेत. व त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. सदरचे अभिलेख हे कायमस्वरुपी अभिलेख आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले. व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध होणे क्रमप्राप्त आहे. त्याकरीता 1998 पूर्वीचे लेखे ज्या कार्यालयामध्ये जतन करण्यात आलेले असतील त्या कार्यालयातून उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत तालुका होण्याचे पुर्वीची अभिलेखे कोणत्या कार्यालयात आहे त्या कार्यालयातून शोध घेवून विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांना रु. 25000/– ची शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) जन माहिती अधिकारी तथा मंडल कृषी अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे माहितीच्या अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे व विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही जिल्हा कृषी अधिक्षक यांनी करावयाची आहे. त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत **जिल्हा कृषी अधिक्षक वाशिम** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
राज्य माहिती आयोग,<br>
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 14/2010**

श्री अविन रामभाऊ डोलकर
बामसेफ ऑफीस जवळ बायपास रोड बाबूपेठ
पो. बाबूपेठ ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्या
शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय तुकूम
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर
2) श्री इजाज शेख
जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य
शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय तुकूम
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.2.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 12.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 2.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येवून सुनावणी आज दि. 23.2.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता दि. 2.2.2010 रोजी उपस्थित होते परंतु आज गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे चार मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

1. VI th Sem. LL.B. (3 years) या अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्याचे उपस्थिती पत्रक
2. विद्यार्थ्यावर कमी उपस्थितीमुळे दंड आकारण्यात येतो तो दंड कोणत्या नियमावलीनुसार घेण्यात येतो त्या नियमावलीची प्रत व एकूण किती दंड रक्कम विद्यार्थ्याकडून घेण्यात आली त्यासंबंधी माहिती.
3. VI th Sem. LL.B. (3 years) या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना दिलेल्या सेक्शनल मार्क्सची प्रत
4. I st Sem. LL.B. (3 years) ते V th Sem. LL.B. (3 years) मध्ये दिलेल्या सेशनल मार्क्सच्या तुलनेत VI th Sem. LL.B. (3 years) या अभ्यासक्रमात सेशनल मार्क्स कमी देण्याविषयक माहिती. अर्जाच्या अनुषंगाने दि. 12.8.2009 रोजी उपलब्ध असलेल्या माहितीच्या करीता खर्चाचा भरणा रु. 1500/- व पोस्टेजचा खर्च रु. 75/- असे एकुण रु. 1575/- भरावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा न करता दि. 2.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.9.2009 रोजी देण्यात आलेला असून खर्चाचा भरणा न केल्यामुळे अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. पुन्हा अपीलकर्ता यांना दि. 29.10.2009 रोजी व दि. 30.9.2009 च्या पत्रानुसार माहिती पुरविलेली आहे व त्याच प्रमाणे मुद्या क्र. 5,7,8,9 ची माहिती शुल्क भरल्यास माहिती देता येईल असे कळविलेले आहे. परंतु पुन्हा

अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2009 रोजी आक्षेप घेतलेला दिसून येतो. व त्यानंतर मात्र अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये त्यांना माहिती पुरविलेली नाही व अर्जदाराची दिशाभूल करण्यााात येत आहे असे कारण दिलेले आहे. मागितलेली माहिती पुर्णपणे महाविद्यालयाच्या कर्मचा–याशी निगडीत आहे व विद्यार्थ्यावर होणा–या अन्यायाशी संबंधीत आहे असे कारण दिलेले आहे. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अपील मेमोमध्ये एकुण चार मुद्ये उपस्थित केलेले आहेत. परंतु सदरच्या माहितीच्या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे विचार करता येत नाही व कोणत्याही प्रकारचा निर्णय देता येत नाही. तसेच अपीलकर्ता यांना महाविद्यालयाने (Master of Labour Studies) या अभ्यासक्रमाकरीता प्रवेश नाकारलेला आहे असेही त्यांनी नमूद केलेले आहे. परंतु त्याबाबतचा निर्णय आयोगास करता येणार नाही. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे पी. सी. खजांची यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या करीता शुल्क भरण्यास कळविले होते परंतु शुल्क भरलेले नाही. परंतु शुल्क कळवितांना निश्चित किती पृष्ठाची माहिती आहे ती प्रती पृष्ठ 2 रु. प्रमाणे कळविणे आवश्यक होते. तसेच महाविद्यालयाची उपस्थिती ही त्रयस्थ पक्षाची नसुन सार्वजनिक प्राधिकरणाचा भाग असल्यामुळे त्रयस्थ पक्ष म्हणून विद्यालयाना विचारण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे जी माहिती उपलब्ध असेल त्या माहितीच्या करीता जी कागदपत्रे पुरविता येतील त्यांची निश्चित पृष्ठ संख्या 2 रु. प्रमाणे अपीलकर्ता यांना कळविणे आवश्यक राहिल त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत निश्चित पृष्ठ संख्या प्रति पृष्ठ 2 रु. प्रमाणे एकुण खर्च कळवावा व खर्चाचा भरणा केल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.486-487

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 57/2010

श्री जोगीराम इस्तारी गहाने
रा. अर्जुनी/मोर.
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अनंत वालस्कर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
गोंदिया
2) श्री नागपूरे शिरस्तेदार
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय
गोंदिया ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 25.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 24.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे उपविभागीय अधिकारी साकोली यांचे मा.क्र.4/एलएनए 22/76–77 अर्जुनी/मोर. येथील जमीन मधुकर सदाशिव खुने यांची कृषी केंद्रा करीता 1986 ते 1996 पर्यंत 10 वर्षाची लिज संपली असून ती जमीन सरकार जमा करण्यास मा. जिल्हाधिकारी साहेब गोंदिया यांचे लोकशाही दिन 6.7.09 ला केलेल्या तक्रार/अर्जा संबंधी टोकन नं. 42 अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 19.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिल कार्यालय अर्जुनी/मोर. यांचेकडे अर्ज हस्तांतर करुन परस्पर माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले आहे. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 27.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.11.2009 रोजी देण्यात आला असून त्याबद्यलची सविस्तर माहिती तपशिलात त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की लोकशाही दिनात केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती ही उपविभागीय अधिकारी यांनी द्यावयास पाहिजे होती परंतु तहसिलदाराकडे अर्ज हस्तांतरीत केल्यावर त्यांना अजुनपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. वास्तविक तहसिलदार अर्जुनी/मोर. यांचेकडे अर्ज हस्तांतर केल्यानंतर त्यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते किंवा जन माहिती अधिकारी यांनी तहसिलदार अर्जुनी/मोर. यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना देणे आवश्यक होते. परंतू या दोन्ही बाबतीत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असे दिसून येते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार अर्जुनी/मोर. यांचेकडून हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन घेवून ती अपीलकर्ता यांना विनामुल्य सर्वसाधारण टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 56/2010**

श्री प्रदीप फेन्दुजी राउत
वार्ड क्र. 3 रामधन चौक भिवापूर
ता. भिवापूर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती अंजली समर्थ
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
भिवापूर एज्यूकेशन सोसायटी गर्ल्स हायस्कूल भिवापूर
ता. भिवापूर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 25.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 24.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका भिवापूर एज्यूकेशन सोसायटी गर्ल्स हायस्कूल भिवापूर यांचेकडे एकुण पाच मुद्यांवर सन 1999–2000, 2000–2001 व 2001–02 या सत्रातील अनु.जाती सावित्री बाई शिष्यवृत्ती व गुणवत्ता शिष्यवृत्ती बद्यल माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 15.9.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 16.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 21.11.2009 रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी पाच मुद्यांमध्ये माहिती मागितली परंतु मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली नाही व त्याप्रमाणे त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही. मुद्या क्र. 5 च्या संदर्भामध्ये सन 2003 मध्ये अनु.जाती सावित्री बाई शिष्यवृत्ती ही देण्यात आली होती व त्यांच्या मुलीला ती मिळालेली असून सुध्दा त्याबद्यलची माहिती त्यांनी दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्या प्रभारी मुख्याध्यापिका 2006 पासून आहेत व

आतापर्यंत समाज कल्याण विभागाकडून शिष्यवृत्त्या आलेल्या नसल्यामुळे त्यांनी समाज कल्याण अधिकारी यांना पत्र दिलेले आहे. अपीलकर्ता यांच्या मुलीला सन 2003 मध्ये शिष्यवृत्ती दिलेली आहे. व त्यांची सही सुध्दा आहे. जी माहिती त्यांना स्वतः आहे ती पुन्हा मागितली म्हणून त्यांना त्याबाबत उत्तर देण्यात आलेले नाही. मात्र अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जामध्ये समाज कल्याण विभागाकडून सन 1999 पासून शिष्यवृत्ती आलेली नाही ही बाब उघडकीस आल्यामुळे त्याबाबत चालना मिळालेली आहे व त्याबाबतची माहिती त्यांना आजपर्यंत उपलब्ध झालेली नाही. उपलब्ध झाल्यावर ती पुरविण्यात येईल असे आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत समाज कल्याण विभागाकडून माहिती उपलब्ध करुन घेवून विनामुल्य पुरविण्यात यावी. समाज कल्याण विभागानी सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती 20 दिवसामध्ये जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास समाज कल्याण विभागाचे अधिकारी यांना जन माहिती अधिकारी समजून शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 70/2010 व अपील क्रमांक नाग 71/2010

श्री रमेश रामजी राठोड
20 विज्ञान नगर मानेवाडा
नागपूर 34 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक
पोलीस अधिक्षक कार्यालय जळगाव
ता. जि. जळगाव
2) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी
उपविभाग पाचोरा
ता. पाचोरा जि. जळगाव
3) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी
उपविभाग मुक्ताईनगर
ता. मुक्ताईनगर जि. जळगाव ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 25.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. नाग 70/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 26.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे सत्र न्यायालय जळगाव पो.स्टे.पिंपळगाव यांनी आमच्या कुटुंबाविरुध्द u/s 420, 323, 498, 504, 506, 34 अन्वये गुन्हा दाखल केला होता त्याविरुध्द Anticipatory Bail मिळण्यासाठी आम्ही मा. न्यायालय जळगावला अर्ज केला होता. आम्हास बेल मिळू नये म्हणून आय. ओ. नी सरकारी वकील मार्फत रिपोर्ट दिला होता. मला त्या आय.ओ.नी दिलेल्या रिपोर्टची प्रत हवी अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 11.11.2009 रोजी रिपोर्टची मुळ प्रत पोलीस स्टेशन पिंपळगाव हरे. ला उपलब्ध नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 24.11.2009 रोजी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार अपीलकर्ता यांना दि. 14.12.2009 रोजी गुन्हयातील आरोपींना अटक पुर्व जामीन न मिळणे कामी मे. सेशन कोर्ट जळगाव यांना जिल्हा सरकारी वकील जळगाव यांचे मार्फत दाखल होणे कामी जिल्हा सरकारी वकील जळगाव यांचेकडे सादर केलेल्या रिपोर्टची मुळ प्रत पिंपळगाव हरे. पो.स्टे.ला उपलब्ध नाही असा अहवाल दिल्याने अर्जदारास सदर रिपोर्टची छायांकित प्रत देता आली नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की अटक पुर्व जामीन घेण्या करीता पोलीसांनी जो विरोध केलेला होता त्या प्रतिची त्यांना आवश्यकता आहे परंतु जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की सदरचा रिपोर्ट हा मा. न्यायालयात दाखल केलेला आहे व त्याबाबतची प्रत पोलीस स्टेशनमध्ये उपलब्ध नाही. तसेच आरोपीच्या संदर्भात गुन्हयाचा तपासावर परिणाम होवू नये म्हणून त्याची प्रत उपलब्ध करुन देणे हे योग्य नाही व त्याप्रमाणे त्यांनी सदरची प्रत ही न्यायालयाकडून उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे अपीलाचा निर्णय हा योग्य आहे असे दिसून येते. व अपील खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. नाग 71/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 26.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग मुक्ताईनगर यांचेकडे खालीलप्रमाणे तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

1. आपणाकडे असलेली पो.स्टे. मुक्ताईनगरची स्टे.डायरीची मुळ प्रत वरुन दि.9.11.2008 ते 14.11.2008पर्यंतची संपूर्ण प्रत्येक तारखेची माहिती हवी आहे.

2. मला दि.12.11.2008 ते 14.11.2008पर्यंत अटकेत ठेवलेली प्रत्येक तासाची माहिती हवी तसेच प्राचार्य आय.टी.आय. नागपूर हयांना अटकेबाबत पाठविलेले पत्राची प्रत हवी.

3. पो.स्टे.मु.नगरचे पोलीसांनी मला दि.11.11.2008 रोजी नागपूर येथे आय.टी.आय. मध्ये येवून अटक केली. तर नेमके किती वाजता अटक केली ती वेळ, तसेच तेव्हा पासून पो. स्टे.मु.नगर येथे पोलीस कोठडी बंद करेपर्यंत प्रत्येक तासाची माहिती हवी. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 26.11.2006 रोजी अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 7.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे प्रथम अपील हे फेटाळण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी असे सांगितले की माहिती उपलब्ध झालेली आहे. व त्यामुळे त्यांना स्टेशन डायरीची प्रत हवी. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की स्टेशन डायरीची प्रत ही देता येत नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की दि.12.11.2008 च्या स्टेशन डायरीची प्रत मिळालेली आहे. त्यामुळे त्यांना दि.9.11.2008 ते 14.11.2008 या स्टेशन

डायरीची प्रत मिळणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना दि.12.11.2008 च्या स्टेशन डायरीची प्रत जर उपलब्ध करुन दिलेली असेल तर त्यांना इतर तारखेच्या स्टेशन डायरीची प्रत सुध्दा उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी तपासून दि.9.11.2008, 10.11.2008, 11.11.2008, 13.11.2008 व दि. 14. 11.2008 च्या स्टेशन डायरीची मुळ प्रतीची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपील क्र. नाग 70/2010 मध्ये अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे खारीज करण्यात येते.
2) अपील क्र. नाग 71/2010 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दि.9.11.2008, 10.11.2008, 11.11.2008, 13.11.2008 व दि. 14.11.2008 या तारखेच्या स्टेशन डायरीच्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 66/2010**

श्री गोपीनाथ कवडूजी भगत
53 जयभिम को.–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी
चंद्रमनी नगर नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
सार्वजनिक आरोग्य विभाग,
राज्य कामगार विमा योजना(राकावियो–1)
मंत्रालय मुंबई 32
2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
सार्वजनिक आरोग्य विभाग,
राज्य कामगार विमा योजना(राकावियो–1)
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.2.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.1.2010 रोजी नोटीस काढून दि. 25.2.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत. व गैरहजर राहण्याकरीता कोणत्याही प्रकारचे अर्जात विनंती केलेली नाही व कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाहीत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, राज्य कामगार विमा योजना(राकावियो–1) मंत्रालय मुंबई यांचेकडे शासनाने दि. 3.3.93 रोजी पुन्हा नव्याने नियुक्ती देवून शासन सेवेत सामावून घेतले त्यावेळी माझे वय 43 वर्ष 8 म. 2 दिवसाचे झाले असून मला कोणत्या आधारावर नियुक्ती करण्यात आली ही माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. अर्जाच्या अनुषंगाने दि. 19.9.2009 रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयुक्त राज्य कामगार विमा योजना यांना अपीलकर्ता यांच्या दि. 3.3.1993 च्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. त्या पत्राची प्रत ही अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 9.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा

दि. 3.11.2009 रोजी देण्यात आलेला असून अपील मंजुर करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी (राकावियो–1) हे आदेश प्राप्त झाल्यापासून दहा दिवसात अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 9.9.2009 च्या अर्जा संदर्भात माहिती उपलब्ध करुन दयावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी पुन्हा स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्यावर दि. 27.11.2009 रोजी उपसंचालक (प्रशा) तथा माहिती अधिकारी तथा राज्य कामगार विमा योजना मुंबई यांनी अपीलकर्ता यांना पत्राने काही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. ती गुणवत्तेच्या बाबत दिसून येते. मात्र पुन्हा अपीलकर्ता यांना दि. 3.3.1993 च्या शासन आदेशाची प्रत त्यांना सादर करण्यास कळविण्यात आलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी जी माहिती शासनाकडे मागितली ती माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी असे सांगितले की ते कनिष्ठ लिपीक असल्यामुळे त्यांची संपूर्ण माहिती ही नागपूर येथील कार्यालयात आहे ही माहिती अपीलकर्ता यांना सुध्दा माहिती आहे परंतु त्यांनी शासनाकडे माहिती मागितली. यावरुन अपीलकर्ता हे कनिष्ठ लिपीक असून सुध्दा त्यांना शासनाच्या कामकाजाची काही माहिती आहे असे दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी नागपूर येथील कार्यालया मध्ये त्यांच्या सेवेच्या बद्यलची माहिती मागणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६/नाग/२०१०.

श्री. सुधाकर मल्ला तोटपल्लीवार,
मु. पो. जैरामपूर, ता. चामोर्शी,
जि. गडचिरोली. **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. जी. मंतलवाड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.

श्री. जी. एम. धारगावे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक २.२.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता हे गैरहजर होते. उत्तरवादी हे हजर होते.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, चामोशी यांचेकडे मुधोली चक नं. १ मध्ये मजगीचे किती गट व किती लाखाचे काम झाले. जुन्या बांधावर मातीकाम करता येते काय ? आपल्या कार्यालयामार्फत जुन्या बांधावर माती टाकण्यात आली काय ? सदरची माहिती जानेवारी २००९ ते मार्च २००९ या कालावधीतील मागितली असून वेतन पत्रकाचे झेरॉक्स देण्यात यावे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, चामोर्शी यांचेकडे लेखी निवेदन सादर केले असून त्यात मी आपल्या कार्यालयात येऊन मुधोली, चक नं. १ येथील जानेवारी २००९ ते मार्च २००९ या कालावधीचे कामाचे हजेरी पत्रक, सविस्तर अंदाजपत्रक याची पाहणी केली असता माझे समाधान झाले. याबाबत माझी पुढे कोणतीही तक्रार नाही. तरी माहिती मागणीचा अर्ज दिनांक १०.६.२००९ निकाली काढण्यात यावे अशी विनंती केलेली दिसून येते. सदरचे पत्र जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३०/नाग/२०१०.

श्री. लक्ष्मीकांत धोंडूबाजी पाटोले,
मु. पो. कोदामेंदी, ता. मौदा,
जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव (ऊर्जा-२),
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२.

जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव (ऊर्जा-२),
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी विना अनुमती गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, ऊर्जा मंत्रालय, मुंबई यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. ऊर्जा मंत्रालयांतर्गत विज ऊर्जा मर्या. कं. मधील अप्रेंटीसी धारकाबाबत मंत्रीमंडळाचे धोरण व निर्णयाबाबत एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २४.९.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना दिनांक ३.८.२००९ च्या पत्रान्वये त्यांच्या अर्जाची प्रत संबंधित व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत सूत्रधार कंपनी मर्या., व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या., व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या. या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडे हस्तातर केले या कारणास्तव सदरचे अपील हे अमान्य केलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता आज हजर नसल्यामुळे त्यांना व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत सूत्रधार कंपनी मर्या., व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या., व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी

मर्या., व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या. या कंपन्यांनी माहिती पाठविली किंवा नाही हे कळावयास मार्ग नाही व अर्ज त्या कंपन्याकडे पाठविल्यावर सुध्दा अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांचेकडे प्रथम अपील करण्याची आवश्यता नव्हती व त्यातही प्रथम अपीलाचा निर्णयामध्ये सुध्दा स्पष्टपणे दिलेले असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करतांना कंपन्यांनी त्यांना माहिती दिली किंवा नाही याबाबतचा उल्लेख करणे आवश्यक होते व तसे त्यांनी केले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे विचारात घ्यावयाचे असले तरी आयोगापुढे कोणत्याही प्रकारची माहिती अपीलकर्ता यांनी दिली नाही व जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी हे सुध्दा उपस्थित राहिले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६/नाग/२०१०.

कु. सारिका रामदास मेश्राम,
प्लॉट नं. २३०, दर्शन कॉलोनी,
नंदनवन, नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. भिमराव राऊत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
हरीहर मंदीर वाचनालय,
धान्यगंज, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
हरीहर मंदीर वाचनालय,धान्यगंज, नागपूर. **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ५.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १७.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून हरीहर मंदीर वाचनालय, नागपूर यांचेकडे कार्यकारीणी मंडळाच्या ठरावाची संपूर्ण झेरॉक्स प्रत सन २००८-२००९ या कालावधीतील मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दिनांक २७.१०.२००९ रोजी प्रथम अपील हे अपील अधिकारी तथा अध्यक्ष, हरीहर मंदीर वाचनालय यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचे सोबत सहाय्यक ग्रंथालय संचालनाचे दिनांक २९.९.२००९ चे पत्र जोडण्यात आले असे नमुद करण्यात आलेले दिसून येते व त्यानंतरही विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता यांनी युक्तिवाद केला की, त्यांना जी माहिती मागितली ती संस्थेकडेच आहे व सहाय्यक ग्रंथालय संचालकांनी सुध्दा संस्थेकडूनच माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे पत्र दिले आहे. वाचनालयाचे अध्यक्ष यांनी असे सांगितले की, त्यांनी त्यांचेकडील कागदपत्रे ही सहाय्यक ग्रंथालय संचालक यांचेकडे जमा केलेली असतात व तसा त्यांनी आयोगापुढे खुलासा केलेला आहे व आयोगाची सुध्दा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु नंतर त्यांनी मान्य केले की, त्यांची अभिलेखे त्यांच्याच कार्यालयात आहेत व त्यामुळे त्यांनी सन २००८-२००९ या कालावधीतील वाचनालयाचे कार्यकारीणी मंडळाचे सर्व ठरावाच्या छायांकित प्रती विनामुल्य व्यक्तिशः अपीलकर्ती यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी, हरीहर मंदीर वाचनालय किंवा अध्यक्ष, हरीहर मंदीर वाचनालय यांनी अपीलकर्ती यांच्या दिनांक १७.७.२००९ च्या अर्जातील सन २००८-२००९ या कालावधीतील कार्यकारीणी मंडळाचे सर्व ठरावांच्या छायांकित प्रती व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात याव्यात. त्याकरिता हा निर्णय मिळाल्या पासून १० व्या दिवशी अपीलकर्ती यांनी अध्यक्ष, हरीहर मंदीर वाचनालय यांचेकडे प्रत्यक्ष संपर्क साधून सर्व ठरावांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घेण्यात याव्यात व पोच देण्यात यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २७/नाग/२०१०, अपील क्रमांक २८/नाग/२०१० व अपील क्रमांक २९/नाग/२०१०.

श्री. श्रावण राजीरामजी बेले,
लारोकर मोहल्ला, मु. पारडी,
पो. भांडेवाडी, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ, पवनी आगार,
ता. पवनी, जि. भंडारा.

श्री. एच. एच. ढोके,
जनमाहिती अधिकारी तथा
आगार व्यवस्थापक,
राज्य परिवहन महामंडळ, पवनी आगार,
ता. पवनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ३.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक २७/नाग/२०१० मध्ये दिनांक २८.८.२००९ रोजी, अपील क्रमांक २८/नाग/२०१० मध्ये दिनांक ६.६.२००९ रोजी व अपील क्रमांक २९/नाग/२०१० मध्ये दिनांक ३१.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन मंडळ, पवनी आगार यांचे कार्यालयात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना अनुक्रमे दिनांक १४.९.२००९ रोजी, दिनांक १९.६.२००९ रोजी व दिनांक १९.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, भंडारा यांचेकडे अनुक्रमे दिनांक २१.१०.२००९ रोजी, दिनांक २१.७.२००९ रोजी व दिनांक २१.१०.२००९ रोजी तीन प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येते. परंतु तीनही प्रथम अपीले ही जनमाहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन पवनी यांनी समर्पक व मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे खारीज करण्यात आलेली आहेत. परंतु त्या निर्णयाचे विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

३.	अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे वरील तीनही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरची तीनही अपीले ही खारीज करण्यात येतात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२५०/अम/२००९.

श्री. रमेश शंकर मंडळकर,
वार्ड नं. १, मोताळा,
ता. मोताळा, जि. बुलढाणा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
ता. जि. बुलढाणा.

श्री. पी. जे. यादव,
जनमाहिती अधिकारी तथा
कृषि उपसंचालक,
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
ता. जि. बुलढाणा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक, बुलढाणा यांचेकडे दिनांक २१.५.२००७ रोजी केलेल्या लेखी तक्रारीच्या संदर्भामध्ये शासन योजनेत चुकीच्या (बोगस) लाभार्थींची निवड करुन शासनाची दिशाभूल करीत फसवणूक करणाऱ्या तालुका कृषी अधिकाऱ्यांवर भा.द.वि. कलम ४२० नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३ अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या दिनांक २१.५.२००७ च्या तक्रारीवर आता पर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नसल्यामुळे त्यांनी ही माहिती मागितलेली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा करतांना व युक्तिवाद करतांना सदरचा तक्रार अर्ज हा महासंचालक, वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशन, अमरावती यांचे मार्फत या कार्यालयास

दिनांक २४.८.२००७ रोजी प्राप्त झाला. मुळ तक्रार जात प्रमाणपत्राच्या सत्यतेविषयी असल्यामुळे सदर प्रमाणपत्राच्या सत्यतेबाबतच्या पडताळणीसाठी उपविभागीय कृषि अधिकारी, बुलढाणा यांनी त्यांचे पत्र क्र. जा.क्र.उविकृअ/तां/चौकशी अहवाल/३५१३/२००७, दिनांक २०.१०.२००७ अन्वये उपविभागीय कृषी अधिकारी, बुलढाणा यांचेकडून माहिती मागविण्यात आली. तसेच तहसीलदार, मोताळा यांनाही याबाबत उपविभागीय कृषी अधिकारी, बुलढाणा यांचे पत्र क्रमांक ५२९, दिनांक ३०.१.२००८, पत्र क्रमांक ३६०९, दिनांक २४.१०.२००८ व पत्र क्रमांक ४९२२, दिनांक ३१.१२.२००८ अन्वये माहिती मागविण्यात आली व तसे संबंधित अर्जदारास अवगत करण्यात आले. तसेच या कार्यालयाचे पत्र क्र. ३०७, दिनांक १८.१.२०१० अन्वये सुध्दा मागविण्यात आली आहे. मात्र संबंधिताकडून अद्याप माहिती या कार्यालयास प्राप्त न झाल्यामुळे अर्जदारास माहिती देण्यात येऊ शकली नाही. जात प्रमाणपत्राच्या सत्यतेविषयी माहिती प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. या संपूर्ण कागदपत्रांच्या छायांकित प्रती या आयोगास सादर करण्यात आलेल्या आहेत. त्यावरुन संबंधित अर्जदाराच्या संदर्भात चौकशी ही सुरु करण्यात आलेली आहे. परंतु चौकशीच्या संदर्भातील माहिती ही इतर कार्यालयातून घ्यावयाची असल्यामुळे व ती उपलब्ध झाली नसल्यामुळे तक्रारीच्या संदर्भात अंतीम कार्यवाही झालेली दिसून येत नाही. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपीलकर्ता यांना या सर्व कागदपत्रांच्या किंवा झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु माहिती उपलब्ध करुन देण्यापेक्षा दिनांक २७.१०.२००८ रोजी माहितीच्या अर्जासोबत तक्रारीचा अर्ज जोडलेला नाही अशा प्रकारे त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. वास्तविक तक्रार अर्ज कार्यालयात उपलब्ध असतांना व त्याबाबत कार्यवाही सुरु असतांना अपीलकर्ता यांना तसे कळविण्याची आवश्यकता नव्हती. परंतु त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये तक्रार अर्जाची तारीख दिलेली नाही व त्यामुळेच त्या अर्जाची छायांकित प्रत मागविण्यात आली होती. अर्जात सुध्दा माहितीचे वर्णन हे निश्चित केल्यास माहिती मिळू शकते. परंतु नको तो विषय लिहून व संदर्भ सोडायचा अशा प्रवृत्तीमुळे माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. असे मात्र अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.५.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने संबंधित माहिती अर्जाखाली माहिती मागितली असल्यामुळे पत्र पाठवून ३० दिवसांचे आंत माहिती संकलीत करुन अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.५.२००७ च्या अर्जातील कार्यवाहीची माहिती संबंधितांकडून संकलीत करुन अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास संबंधित अधिकारी सुध्दा अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२४८/अम/२००९.

सौ. लता विनायक कात्रे,
१६, खेमका कॉम्प्लेक्स,
रतनलाल प्लॉट, ता. जि. अकोला. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. बी. के. इंगळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. बाळापूर, जि. अकोला.

श्री. आर. एफ. राठोड,
जनमाहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी,
ता. बाळापूर, जि. अकोला. **....उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ३.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ७.१२.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, बाळापूर यांचेकडे अकोला जिल्हा परिषद निवडणूक, २००८ व्याळा गट ३९ च्या मतमोजणी यंत्राच्या कॉम्प्युटर सॉफ्टकॉपी इलेक्ट्रॉनिक डाटा कॉपी मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १७.१२.२००८ रोजी मतदानाची आकडेवारी ही मतदान यंत्राच्या डिटेचेबल (डी.एम.एम.) मेमरीमध्ये साठविली जाते. सदर डाटा हा सॉप्टकॉपीमध्ये रुपांतरीत करण्याची तरतुद नाही व प्रत्यक्ष मतदान यंत्रावर पाहण्याची तरतुद नाही. आपणास हवी असलेली माहिती मतदान केंद्र निहाय प्रिंटेड स्वरुपात या कार्यालयात उपलब्ध आहे. करिता आपल्या मागणी प्रमाणे व्याळा गट ३९ च्या सर्व मतदान यंत्राच्या कॉम्प्युटर सॉप्टकॉपी/इलेक्ट्रॉनीक डाटा कॉपीस आपणास पुरविणे शक्य नसल्याने प्रिंटेड उपलब्ध असलेली माहिती आपण व्यक्तिशः या कार्यालयातून घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक ३१.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. तत्पुर्वी सुध्दा अपीलकर्ती यांना दिनांक ३०.१२.२००८ रोजी त्याबद्यलची वस्तुस्थिती कळविण्यात आलेली आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.१.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार यांनी केलेला पत्र व्यवहार नियमानुसार असून अर्जदार यांनी कार्यालयात ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात माहिती प्राप्त करुन घ्यावी. अर्जदार यांनी ज्या स्वरुपात माहिती मागितली आहे त्या स्वरुपात माहिती सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय उपलब्ध करुन देता येत

नसल्यामुळे त्यांचे अपील हे खारीज करण्यात येते असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३ अपीलकर्ती यांनी प्रतिज्ञालेख दाखल केलेला आहे. त्या प्रतिज्ञालेखामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही व नियमाचा आधार घेऊन न्यायालयाचे परवानगी शिवाय माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असा निर्णय अन्यायकारक आहे व ही माहिती अधिनियमाचे कार्यकक्षेत येत असल्याने मागितलेल्या स्वरुपात पुरविणे मुळात बंधनकारक आहे असा युक्तिवाद त्यांनी केलेला आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६२ मधील तरतुदी आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदान विभाग आणि निवडणूक घेणे) नियम १९६२ मधील नियम ७० व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या क्षेत्रात भारत निवडणूक आयोगाकडील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेश २००६, दिनांक ३०.९.२००६ आदेश क्रमांक ३० मधील तरतुदीनुसार सिलबंद केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा नियंत्रण विभाग सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीस उघडता येणार नाही याचे निरिक्षण करता येणार नाही अथवा कोणासमोर सादर करता येणार नाही, अशी तरतुद आयोगाचे निदर्शनास आणली. अर्जाचे अवलोकन केले असता स्पष्ट दिसून येते की, निवडणूकीच्या संदर्भातील मतपत्रिका किंवा मत मोजणीच्या संदर्भामध्ये जी माहिती संकलीत केली असते ती अत्यंत गोपनीय आहे. ती अत्यंत गोपनीय असून ज्या मा. न्यायालयाकडे याचिका दाखल होऊ शकते त्याच मा. सक्षम न्यायालयाचे परवानगी शिवाय त्याबाबतची माहिती कोणासही प्रकट करता येणार नाही. वास्तविक अपीलकर्ती यांना निर्वाचन अधिकाऱ्यांच्या निर्णय मान्य नसेल तर निवडणूकीस आव्हान देण्याची याचिका मा. न्यायालयाकडे दाखल करणे आवश्यक होते व तसे न करता माहितीच्या अधिकाराच्या माध्यमातून माहिती उपलब्ध करुन घेण्याच्या प्रयत्न करीत आहेत. अधिनियमाचे कलम ८(१)(ख) प्रमाणे कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी माहिती प्रकाशित करण्यांस स्पष्टपणे मनाई केली आहे किंवा जी प्रकट केल्याने न्यायालयाचा अवमान होऊ शकेल अशी तरतुद असल्याने ती जिल्हा परिषद निवडणूक नियमांशी व निवडणूक आयोगाचे आदेशाप्रमाणे सुसंगत आहे. तसेच त्रयस्थ पक्षासंबंधी असल्याने अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे प्रक्रिया करुन विरुध्द पक्षास विचारणा करणे आवश्यक होते. तशी प्रक्रिया त्यांनी सुरु करणे संयुक्तिक राहिल. निवडणूक प्रक्रिया हे संवेदनाक्षम असल्यामुळे अपीलकर्ती यांनी माहिती मागितली असली तरी जनमाहिती अधिकारी यांनी नियमांचे तरतुदीनुसार सक्षम न्यायालयाकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता परवानगी घेण्याकरिता अर्ज करणे आवश्यक होते व सक्षम न्यायालयाने परवानगी दिल्यास सदरची माहिती ही प्रकट करणे हे अधिनियमाचे कलम ८(१) च्या अपवादामध्ये येऊ शकणार नाही. अन्यथा सदरची माहिती सक्षम न्यायालयाचे परवानगी शिवाय प्रकट करता येणार नाही किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकेल अशी बाब असल्यामुळे माहिती अधिकारी यांनी न्यायालयाची परवानगी घेण्याची प्रक्रिया करणे आवश्यक होते. परंतु तशी ती केलेली नसल्यामुळे प्रथम अपील सुध्दा खारीज करण्यात आलेली आहे. तेंव्हा त्याबाबतची प्रक्रिया सुरु करुन अपीलकर्ती यांना मा.न्यायालयाचा निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या क्षेत्रात भारत निवडणूक आयोगाकडील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करणेबाबतचे आदेश, २००६, दिनांक ३०.९.२००६ आदेश क्रमांक ३० मधील तरतुदी प्रमाणे सक्षम न्यायालयाकडे अपीलकर्ती यांनी माहिती मागितल्याचे कारणास्तव अर्ज सादर करावा. मा.सक्षम न्यायालयाचा त्याबाबतचा जो निर्णय दिलेला असेल त्यानुसार पुढील कार्यवाही करावी. माहिती अधिनियमाचे तरतुदीनुसार ३० दिवसाचे आंत द्यावयाची असते ही तरतुद मा. न्यायालयाचे निदर्शनास आणावी. तसेच विरुध्द पक्षाशी संबंधित माहिती असल्याने अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे प्रक्रिया पुर्ण करावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२४९/अम/२००९.

श्री. दिलीप शंकरराव खटी,
बांगरनगर, वाघापूर रोड,
ता. जि. यवतमाळ. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अनिलकुमार अढागळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, यवतमाळ.

श्री. राजूरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर रचनाकार,
नगरपरिषद, यवतमाळ.

श्री. के. राम,
जनमाहिती अधिकारी
कर अधिक्षक,
नगरपरिषद, यवतमाळ. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, यवतमाळ यांचेकडे मदन चौक परिसरातील नगरपरिषद भाजीमार्केट (नवीन) इमारती लगत सिटी सेंटर नावाने बांधण्यात आलेल्या भुखंडावर अतिरिक्त एफ.एस.आय. देऊन बांधकाम परवानगी देतांना त्या बांधकाम परवानगीत यवतमाळ नगरपरिषदला विनामुल्य बांधकाम करुन मिळण्याची अट घातली होती. त्यानुसार ते बांधकाम नगरपरिषदेस हस्तांतरीत करुन घेण्यात येत असलेल्या वा होत असलेल्या विलंबाबाबत माहिती. जबाबदारी कोणाची हयाबाबत माहिती व हस्तांतरण करणाऱ्या संबंधित कर्मचारी वर हयगय करणे, कर्तव्यात कसूर करण्यासाठी करणार असलेला वा केलेली माहिती. तसेच आजचे बाजारभावाने सदर वास्तुची (हस्तांतरीत होणाऱ्या) किंमत बाबत माहिती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपेक्षिलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने ती देणे अपेक्षित नाही असे दिनांक २४.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १८.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.१.२००९ रोजी देण्यात आलेला असून

दिलेल्या मुदतीत अपीलार्थी यांचे प्रकरण निकाली काढावे असा आदेश दिलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जी माहिती मागितली आहे त्या संदर्भामध्ये आरक्षित भूखंडावर अतिक्रमण एफ.एस.आय. देऊन नगरपरिषदेने बांधकाम परवानगी देण्यात आली होती व त्यातून नगरपरिषदेस काही बांधकाम हस्तांतर करुन देण्याचा करार केला होता. परंतु सदरच्या बाबतचे बांधकाम होऊन सुध्दा ६-७ वर्ष कोणत्याही प्रकारचे हस्तांतर झाले नाही व त्याबाबत पुढील कार्यवाही कोणती होत आहे असे दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी ही सदरची माहिती मागितलेली दिसून येते. वास्तविक अपीलकर्ता यांनी माहितीचे वर्णन हे योग्य रितीने केले नसल्यामुळे त्यांना तशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. परंतु प्रश्नार्थक माहिती विचारलेली आहे म्हणून त्यास उत्तर द्यावयाचे नाही ही धारणा अतिशय चुकीची आहे. ज्या प्रश्नाचे संदर्भातील कार्यवाही माहिती विचारली आहे त्या कार्यवाहीची कागदपत्रे, टिप्पणी, नोटशिट जी उपलब्ध असले ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. जनमाहिती अधिकारी यांचे मत विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे देणे आवश्यक नाही. परंतु अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे मत विचारले नाही तर कार्यवाहीची माहिती विचारली आहे व त्यामुळे ते उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १७.११.२००८ च्या अर्जात उल्लेख केलेल्या बांधकामाचे संदर्भामध्ये जी नस्ती जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध आहे त्या नस्तीतील सर्व पृष्ठांच्या छायांकित प्रती इतरत्र केलेला पत्र व्यवहारासहीतची माहिती विनामूल्य १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२४७/अम/२००९.

श्री. एस. एस. मेश्राम,
परिगणित कॉलनी, मालटेकडी रोड,
ता. जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. वसंत इंगोले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, पुसद,
जि. यवतमाळ.

श्री. डुकरे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्य लिपिक,
नगरपरिषद, पुसद,
जि. यवतमाळ. .....**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पुसद यांचेकडे मागील १५ वर्षात आपल्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या किती कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहेत त्या विषयाची माहिती दर्शविलेल्या रकान्यात भरुन द्यावी व त्यातही त्यांनी एकूण १२ रकाने सुचविलेले दिसून येते. सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झ ाली नाही म्हणून दिनांक १०.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये माहिती अपूर्ण उपलब्ध झाली आहे असे कोणत्याही प्रकारचा मुद्या उपस्थित झाला नसल्यामुळे सदरचे अपील हे दिनांक ९.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे खारीज करण्यात आलेली आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले व त्यात त्यांनी मागितलेल्या मुद्यांच्या संदर्भात कोणत्या त्रुटया आहेत त्या त्रुटयांचा उल्लेख केलेला आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी खोटी माहिती दिली. त्या संदर्भातील त्यांना त्रुटी त्यांनी दाखल केलेली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही मागितलेल्या नमुन्यामध्ये उपलब्ध नसते व त्याकरिता कोणत्याही प्रकारचा कालावधी दिलेला नसल्यामुळे त्या कालावधीची

माहिती त्यांचेकडे मागणी केली. त्यातही त्यांना सदरची माहिती १९९२ पासून मागितली त्यामुळे सदर माहिती ही प्रत्येक प्रकरणात तपासून संकलीत करुन उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंत काही प्रश्नाचे बाबत जनमाहिती अधिकारी यांचे मत विचारले आहे व काही प्रश्नाचे संदर्भामध्ये प्रत्येक नस्तीमधून माहिती घेऊन त्यातील खर्च वगैरे माहिती काढणे जिकरीचे काम आहे व त्याकरिता नगरपरिषद यंत्रणा वळवावी लागली असती व त्याकरिता अपीलकर्ता यांना त्यांच्या त्रुटीच्या संदर्भामध्ये विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांच्या स्वतःच्या दिनांक १.८.१९९२ ते ६.८.१९९७ या कालावधीचे करिता औद्योगिक न्यायालयाचा निर्णय असून सुध्दा नगरपालिकेने पेमेंट केले नाही. याबाबतची माहिती त्यांना अपेक्षित होती. परंतु अशा प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी हीच माहिती नेमकी त्यांनी मागितली नाही. जर त्यांनी हीच माहिती मागितली असती तर त्या प्रकरणाचा शोध घेऊन त्याबद्यलची माहिती उपलब्ध करुन दिली असती व प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा कोणत्याही प्रकारची त्रुटी आहे हे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सांगितले नव्हते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी आता आयोगापुढे सांगितले की, माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ४.८.१९९२ ते दिनांक ६.८.१९९७ या कालावधीचे पेमेंट औद्योगिक न्यायालयाच्या निर्णय असतांना सुध्दा नगरपालिकेने कां केले नाही या बद्यलच्या निर्णयाची छायांकित प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२४६/अम/२००९.

श्री. संजय विनायकराव कोल्हे,
रा. दिघी कोल्हे, पो. कवठा कडू,
ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, चांदूर रेल्वे,
जि. अमरावती.

श्री. ए. एम. राजूरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्रामपंचायत दिघी कोल्हे,
ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत दिघी कोल्हे, ता. चांदूर रेल्वे यांचेकडे ग्रामपंचायत सदस्य यांनी आतापर्यंत कार्यालयाने दिलेल्या कर भरणाबाबत. सन २००७ ते २००८ या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२०१० रोजी राज्य माहिती आयुक्तास निवेदन दिले आहे. त्यात जनमाहिती अधिकारी हयांचेकडून दिनांक १५.२.२००९ रोजी विस्तृत तपशीलवार माहिती मिळाल्यामुळे माझे परिपूर्ण

समाधान झालेले आहे. आता माझी कोणत्याही प्रकारची हरकत राहिलेली नाही. करिता द्वितीय अपील कृपया खारीज करण्यात यावे अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२५६/अम/२००९.

श्री. प्रदीप अंबादास इंगोले,
२०, तळमजला, पाडिया कॉम्प्लेक्स,
टॉवर चौक, ता. जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. वैभव आवारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त, (विकास)
महानगरपालिका, अकोला.

श्री. मु. र. तट्टे,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर रचनाकार,
महानगरपालिका, अकोला. .....**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अकोला महानगरपालिका, अकोला यांचेकडे नझूल सिट क्र. आणि सर्वे क्र. ची माहिती तक्त्यामध्ये मागितली आहे. तक्त्यामध्ये विभागाचे नाव, सर्वे सीट क्र., मालमत्ता धारकांचे नांवे वगैरे माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.१०.२००८ रोजी तक्ता क्रमांक १ ची माहिती या कार्यालयामध्ये तक्त्यानुसार उपलब्ध नाही व तक्ता क्रमांक २ ची माहिती देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे दिनांक १०.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी ज्या तक्त्यामध्ये माहिती मागितलेली आहे त्या तक्त्यामध्ये माहिती महानगरपालिकेकडे नसते. नझुल क्रमांक व सर्वे क्रमांक ही तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे उपलब्ध असते व सदरचे क्रमांक, मालमत्ता धारकांची नावे दिल्याशिवाय देता येत नाही. मालमत्ता धारकांची नांवे हे कर विभागात असतात व अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्यात कोणते व्यापक जनहित आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे दिनांक ४.१०.२००८ रोजी त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही व त्यामुळे

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.
२) सदरची प्रशासकीय कार्यवाही ही आयुक्त, महानगरपालिका, अकोला यांनी करावयाची आहे. त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने आयुक्त, महानगरपालिका, अकोला यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.
३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२५९/अम/२००९.

श्री. रमेश मोहनजी सारवान,
हॉटेल स्कॉयलार्क समोर, चवरे प्लॉट,
ता. जि. अकोला. **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. वैभव आवारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त, (विकास)
जलप्रदाय विभाग, महानगरपालिका, अकोला.

श्री. नंदलाल मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
जलप्रदाय विभाग,
महानगरपालिका, अकोला. **.....उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून जलप्रदाय विभाग, महानगरपालिका, अकोला यांचेकडे वार्ड क्रमांक २२ मध्ये सन २००७-२००८ ते २००८-२००९ या कालावधीमध्ये नविन सार्वजनिक पाईप लाईन कोठे व केंव्हा टाकण्यात आलेली आहे याबाबत माहिती विचारली आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.३.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना ७ दिवसात माहिती विनामुल्य व स्वखर्चाने उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्याप्रमाणेही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी व्यक्तिशः माहिती मागितली व व्यक्तिशः माहिती घेण्यासाठी ते वारंवार कार्यालयात गेले. परंतु कार्यालयात जनमाहिती अधिकारी हे उपलब्ध असत नसतात. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश करुन सुध्दा माहिती दिली नाही. यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व ते अधिनियमाचे कलम २० प्रमाणे दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र आहेत. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी हे सुध्दा हजर नसून त्यांनी त्यांचे प्रतिनिधी पाठविले आहेत व त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादावयाची असल्याची त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावयाचे असते. परंतु ते उपस्थित नसल्यामुळे त्यांना खुलासा विचारणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.१०.२००८ च्या अर्जाप्रमाणे विनामुल्य व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता हा निर्णय मिळाल्यापासून १० व्या दिवशी अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून विनामुल्य माहिती उपलब्ध करुन घ्यावी. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यास ते शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी म्हणजे दिनांक ६.१०.२००८ पासून ते ३० दिवसा पर्यंत जे जनमाहिती अधिकारी असतील त्यांनी विहित मुदतीमध्ये तसेच प्रथम अपीलाचा निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा त्यांनी आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसात द्यावा अन्यथा शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२६०/अम/२००९.

श्री. वसंतराव बापुराव गावंडे,
मु. पो. काळी (दौ),
ता. महागांव, जि. यवतमाळ. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. पुसद, जि. यवतमाळ.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
महागांव, जि. यवतमाळ. **....उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. सी. के. कळणे, माहिती लिपीक हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यावतीने श्री. मस्के, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.६.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तहसीलदार, महागांव यांचेकडे दिनांक ३०.१.२००८ चे अर्जानुसार काळी (दौ.) येथील किरकोळ रॉकेल विक्रेत्यांची चौकशी करण्यात आली असल्यास चौकशी अहवालाची प्रत पाठविण्यात यावी. चौकशी झाली नसल्यास कां करण्यात आली नाही. खुलासा करण्यात यावा. तक्रार अर्जानुसार चौकशी करण्याची आपले प्रशासनाचे कर्तव्य आणि जबाबदारी नाही काय ? चौकशी न करण्यामागे आपले प्रशासनाचा हेतु काय ? आपले प्रशासन किरकोळ रॉकेल विक्रेत्यांची पाठराखन कां करीत आहे ? दिनांक ३०.१.२००८ वे तक्रार अर्जावर ४ महिने कालावधी लोटून सुध्दा चौकशी करण्यात आली नसून अर्जातील मुद्यांवर अमलबजावणी कां करण्यात आली नाही. खुलासा पाठविण्यात यावा. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.६.२००८ रोजी मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २(फ) नुसार "माहिती" या सदरात मोडत नसल्यामुळे आपला अर्ज खारीज करण्यात येत आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ४.१०.२००८ रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला आहे व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती नसून त्यांनी प्रश्न विचारले असून "माहिती" या सदरात मोडत नाही असे उत्तर दिलेले आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आपल्या बुध्दीचा वापर न करता हे उत्तर दिलेले आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक १ "दिनांक ३०.१.२००८ चे अर्जानुसार काळी (दौ.) येथील किरकोळ रॉकेल विक्रेत्याची चौकशी करण्यात आली असल्यास चौकशी अहवालाची प्रत पाठविण्यात यावी". यामध्ये कोणत्याही प्रकारचा प्रश्न किंवा जनमाहिती अधिकारी यांचे मत विचारले आहे असे आढळून येत नाही. चौकशी अहवालाची प्रत याचा अर्थ कागदपत्रे किंवा अभिलेख होतात व ही बाब तहसीलदार सारख्या जनमाहिती अधिकारी यांना कोणतीही माहिती नसल्यामुळे या पदावर राहण्याचे लायक नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची कोणत्याही प्रकारची चौकशी केलेली दिसून येत नाही किंवा त्यांना अर्ज वाचता येतो असे दिसून येत नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिले ते योग्य आहे याकारणास्तव अपील खारीज केलेले दिसून येते व त्यामुळे त्यांनी सुध्दा आपल्या बुध्दीचा कोणताही वापर केलेला दिसून येत नाही व त्यामुळे त्यांचे विरुध्द सुध्दा प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ३०.१.२००८ च्या तक्रार अर्जावरील चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १००००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत करावा अन्यथा शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय हा कोणत्याही प्रकारे विचार करुन दिलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२५३/अम/२००९.

श्री. के. एस. नागदिवे,
अनंत विहार कॉलनी, शेगांव,
ता. जि. अमरावती - ४४४ ६०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
कॅम्प, अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
कॅम्प, अमरावती. **.....उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यावतीने डॉ. श्री. डी. बी. घुडे, विभागीय वन अधिकारी, अमरावती हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून मुख्यवनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती यांचेकडे माहे ऑगस्ट २००८ पर्यंत नियमित १२ वर्ष सेवा झालेल्या वनपाल, वनरक्षक, लिपिक, लेखापाल व इतर तृतीय व चतुर्थ श्रेणी मधील कर्मचाऱ्यांना दिनांक १.१०.१९९४ पासून लागू करण्यांत आलेल्या शासन निर्णयानुसार कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात आला त्या कर्मचारी यांची नांवासह व हुद्यासह माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे निवेदन दिलेले आहे. त्यात माहिती अधिकारी तथा विभागीय सन अधिकारी, अमरावती वनवृत्त, अमरावती यांनी दिनांक २४.३.२००९ ला मला आवश्यक असलेली सर्व माहिती पुरविल्यामुळे आता माझी काहीही तक्रार राहिलेली नाही. म्हणून मी दिनांक ७.२.२००९ मध्ये राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती यांचेकडे सादर केलेला अपील अर्ज या पत्राद्वारे मी मागे घेत आहो. तेंव्हा सदरचे प्रकरण आपल्यास्तरावरुन खारीज करण्यांबाबत याद्वारे विनंती करण्यात येत आहे असे लेखी कळविले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११९१/२००९, अपील क्रमांक ११९२/२००९ व अपील क्रमांक ११९३/२००९.

श्री. गोपाल बालाजी झाडे,
८, पुरोहीत ले आऊट, अंबाझरी,
नागपूर - ४४० ०३३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त (प्रशासन)
आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास कार्यालय,
प्रशासकीय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग,
वरळी सीफेस, मुंबई - ४०० ०१८.

श्री. आर. पी. खेरनार,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त (लेखा),
आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास कार्यालय,
प्रशासकीय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग,
वरळी सीफेस, मुंबई - ४०० ०१८.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

श्री. सोईतकर,
जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव, (पदुम - ६)
पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ६.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. अपील क्रमांक ११९१/२००९ मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. के. बी. चव्हाण, सहआयुक्त हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. अपील क्रमांक ११९२/२००९ व अपील क्रमांक ११९३/२००९ मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ११९१/२००९ मध्ये दिनांक ६.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (लेखा), दुग्ध व्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) माझे निलंबनानंतर पद स्थापित झाल्यावर वेतनवाढी मंजूर करण्याकरिता शासनाचे पत्र दिनांक ७.१२.१९९६ चे संबंधित नस्तीचे अवलोकन करण्यात आले. त्यात सहाय्यक आयुक्त (लेखा) यांनी मा. आयुक्त यांना नियमावली दाखवून विभागीय चौकशीचा निर्णय प्रलंबित असल्याने वसूली वगैरे निघाल्यास अतिप्रदानाचा प्रश्न उद्‌भवू नये म्हणून वेतनवाढी दिल्या नाहीत. सहाय्यक आयुक्त (लेखा) यांनी जी नियमावली मा. आयुक्त यांना दाखविली त्या नियमावलीची प्रमाणित छायाप्रत कृपया उपलब्ध करावी ही विनंती. २) अशाच विभागीय चौकशी प्रकरण क्रमांक ५२९१ व ५२९२ अशा दोन चौकशीबाबत अद्याप निर्णय झाला नाही. पण श्री. खराबे अधिक ७ निलंबित होते. त्यांना वेतनवाढ देण्यात आली आहे. येथे अतिप्रदान ही बाब निर्माण होत नसल्यास त्याबाबत वेगळी नियमावली असल्यास कृपया त्या नियमावलीची प्रमाणित छायाप्रत उपलब्ध करावी ही विनंती. ३) श्री. खराबे अधिक सात प्रकरणी विभागीय चौकशीवर तसेच श्री. खराबे अधिक ३३ प्रकरणी विभागीय चौकशीवर अद्याप शासन निर्णय झालेला नाही. श्री. खराबे अधिक सात हे ३ वर्षे व सहा महिने निलंबित होते. हा निलंबन कालावधी धरुन १२ वर्षे पूर्ण झाले त्या दिनांकापासून आश्वासित प्रगती योजना/तथा कालबध्द पदोन्नती देण्यात आली. त्यांची सलग १२ वर्षे सेवा झाली नसतांना तसे वरिष्ठ पदाचे वेतन देण्यात येत आहे. येथे अतिप्रदान ही बाब निर्माण होत नसल्यास त्याबाबतची नियमावलीची प्रमाणित छायाप्रत कृपया उपलब्ध करावी ही विनंती. ४) मला माहितीचे अधिकारात प्राप्त माहितीनुसार श्री. खापरे हे निलंबित असल्याने त्यांना आश्वासित प्रगती योजनेसाठी अपात्र ठरविले. श्री.खराबे हे निलंबित असूनही पात्र ठरविले गेले. पण आदेशात नमूद केले आहे की, चुकीची माहिती आढळल्यास त्यांचे बाबतीत आदेश रद्य केले जातील. त्याप्रमाणे मी दिनांक २५.२.२००८ रोजी आयुक्त कार्यालयास लेखी देऊन आश्वासीत प्रगती योजनेनुसार लाभ देणे चुकीचे असल्याने आश्वासित प्रगतीचा लाभ देणे बंद करण्याबाबत विनंती केली. त्याबाबतच्या कार्यवाहीचा तपशील कृपया उपलब्ध करावा ही विनंती. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २.१.२०१० रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (लेखा) यांनी अपीलकारांस १५ दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३.	अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना काही माहिती उपलब्ध झाली परंतु संपूर्ण माहिती उपलब्ध झ ाली नाही व जी माहिती उपलब्ध झाली ती विलंबाने उपलब्ध झालेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल करतांना खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. १) श्री. झाडे यांचे निलंबनानंतर पदस्थापित झाल्यावर वेतनवाढी मंजूर करण्याकरिता शासनाचे पत्र दिनांक ७.१२.१९९६ चे संबंधित नस्तीमध्ये सहाय्यक आयुक्त (लेखा) यांनी नियमावली दाखवून विभागीय चौकशीचा निर्णय प्रलंबित असल्याने वसूली वगैरे निघाल्यास अतिप्रदानाचा प्रश्न उद्‌भवू नये म्हणून वेतनवाढी दिल्या नाहीत. सहाय्यक आयुक्त (लेखा) यांनी जी नियमावली मा. आयुक्त यांना दाखविली त्या नियमावलीची प्रमाणित छायाप्रत कृपया उपलब्ध करणेबाबत. २) अशाच विभागीय चौकशी प्रकरण क्रमांक ५२९१ व ५२९२ अशा दोन चौकशी बाबत अद्याप निर्णय झाला नाही. पण श्री. खराबे अधिक ७ निलंबित होते. त्यांना वेतनवाढ देण्यात आली आहे. येथे अतिप्रदान हीबाब निर्माण होत नसल्यास त्याबाबत वेगळी नियमावली असल्यास कृपया त्या नियमावलीची प्रमाणित छायाप्रत उपलब्ध करुन देण्याबाबत. ३) श्री. खराबे अधिक ७ प्रकरणी विभागीय चौकशीवर तसेच श्री. खराबे अधिक ३३ प्रकरणे विभागीय चौकशीवर अद्याप शासन निर्णय झालेला नाही. श्री. खराबे अधिक ७ हे ३ वर्षे व ६ महिने निलंबित होते. हा निलंबन कालावधी धरुन १२ वर्षे पूर्ण झाले त्या दिनांकापासून आश्वासित प्रगती योजना/तथा कालबध्द पदोन्नती देण्यात आली. त्याची सलग १२ वर्षे सेवा झाली नसतांना तसे वरिष्ठ पदाचे वेतन देण्यात येत आहे. येथे अतिप्रदान

हीबाब निर्माण होत नसल्यास त्याबाबतची नियमावलीची प्रमाणित छायाप्रत उपलब्ध करुन देणेबाबत. ४) श्री. झाडे यांना माहितीचे अधिकारात प्राप्त माहितीनुसार श्री. खापरे हे निलंबित असल्याने त्यांना आश्वासित प्रगती योजनेसाठी अप्राप्त ठरविले. श्री. खराबे हे निलंबित असूनही हे पात्र ठरविले गेले. पण आदेशात नमूद केले आहे की, चुकीची माहिती आढळल्यास त्यांचे बाबतीत आदेश रद्द केले जातील. त्याप्रमाणे श्री. झाडे यांनी दिनांक २५.२.२००८ रोजी आयुक्त कार्यालयास लेखी देऊन आश्वासित प्रगती योजनेनुसार लाभ देणे चुकीचे असल्याने आश्वासित प्रगतीचा लाभ देणे बंद करण्याबाबत विनंती केली त्याबाबतच्या कार्यवाहीचा तपशील उपलब्ध करुन देणेबाबत. अर्जदार श्री. झाडे यांनी मागणी केलेल्या अर्जातील उपरोक्त ४ मुद्यांबाबतचे मुद्या निहाय सविस्तर स्पष्टीकरण खालीलप्रमाणे देण्यात येत आहे. १) अ) श्री. झाडे यांच्या वेतनवाढ देण्यासंदर्भात प्रथमतः दिनांक २७.१०.२००९ रोजी या कार्यालयातील प्रशासन विभागास (कार्यासन अधिकारी-२०) यांना सविस्तर पत्र देऊन विचारणा करण्यात आले. सं.क्र. आदुवि-१७(२)२००९-१०/२८२, दिनांक २७.१०.२००९ प्रशासनाकडून त्या अनुषंगाने केवळ शासनाचे दिनांक ७.१२.१९९६ रोजीचे श्री. झाडे यांचे वेतनवाढी संदर्भातील पत्राची छायाप्रत प्राप्त झाले. परंतु सदरील शासन आदेशात उल्लेख केलेल्या नियम क्रमांक ३६ व एकोणचाळीस बाबतची नियमावली प्रशासनाकडे उपलब्ध नसलेबाबत त्यांचे पत्र सं.क्र. आदुनि-२०/ममाअ-०५/श्री.जीबीझ ाडे/२००९/३५८०, दिनांक १३.११.२००९ अन्वये कळविलेले आहे. ब) दिनांक २६.११.२००९ रोजी लेखा शाखेमधील. क) वेतनवाढी संदर्भात कामकाज करणाऱ्या कर्मचारी सौ. कदम यांना सदरील वेतनवाढी संदर्भातील नियम क्रमांक ३६ व ३९ बाबतची नियमावली तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यालयीन टिप्पणी सं.क्र. आदुवि-१७(२)/माहिती अधिकार/श्री.गोपाल झाडे/०९, दिनांक २६.११.२००९ अन्वये कळविण्यात आलेले आहे. श्री. झाडे यांना यांचे वेतनवाढी संदर्भातील शासनाच्या दिनांक ७.१२.१९९६ च्या पत्राची छायांकित प्रत दिनांक २१.१२.२००९ रोजी सं.क्र. आदुवि-१७(२)/मा.अधिकार २००५/श्री.झाडे/ ४१४७/०९, दिनांक २१.१२.२००९ रोजी डाक नोंद पोचपावतीद्वारे निर्गमित करण्यात आलेली आहे.

ड) दिनांक १.२.२०१० रोजी श्री. झाडे यांच्या संदर्भातील शासनाच्या दिनांक ७.१२.१९९६ च्या वेतनवाढी बाबतच्या पत्रात उल्लेख केलेल्या नियम क्र. ३६ व ३९ बाबतच्या महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चे पुस्तकामधील उताऱ्यांच्या छायांकित प्रती सं.क्र. आदुवि-१७(६)/म.मा.अ.०५/श्री.झाडे वेतनवाढ/२००९/ ५६०, दिनांक १.२.२०१० रोजी डाक नोंद पोच पावतीद्वारे श्री.झाडे यांना निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे श्री. झाडे यांच्या दिनांक ६.१०.२००९ रोजीच्या माहिती अधिकारांतर्गत त्यांनी मागणी केलेल्या आयुक्त दुग्धव्यवसाय विकास कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (लेखा) तथा जनमाहिती अधिकारी, कार्यासन-१७ यांचे कार्यालसनाशी निगडीत मुद्या क्रमांक १ बाबतचे श्री. झाडे यांना अभिप्रेत असलेली संपूर्ण माहिती अनुक्रमे दिनांक २१.१२.२००९ आणि दिनांक १.२.२०१० रोजी डाक नोंद पोचपावतीद्वारे निर्गमित करण्यात आलेले आहेत. मुद्या क्रमांक २ याबाबतची कार्यवाही आयुक्त कार्यालयातील, सहाय्यक आयुक्त लेखा कार्यासन-१७ यांचेशी निगडीत नसून संबंधित माहिती संबंधित विभाग प्रमुखांकडून प्राप्त करुन घेणे बाबत या कार्यालयाच्या पत्र सं.क्र.आदुवि-१७(२)/मा.अ.२००५/श्री.झाडे/३२५/०९ दिनांक २१.१२.२००९ द्वारे अर्जदार श्री. झाडे यांना कळविण्यात आलेले आहे. मुद्या क्रमांक ३ व ४ याबाबतची माहिती आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (लेखा) कार्यासन-१७ यांचेशी निगडीत नसून ती आयुक्त कार्यालयातील कार्यासन-२० सहाय्यक आयुक्त (प्रशासन) यांचेशी संबंधित असले बाबत वरील दिनांक २१.१२.२००९ च्या पत्राद्वारे अर्जदार श्री. झाडे यांना यापूर्वीच कळविण्यात आले आहे. श्री. झाडे यांनी मागणी केलेल्या मुद्या क्रमांक १ बाबतची प्राथमिक स्वरुपातील माहिती (श्री. झाडे यांच्या वेतनवाढी बाबतीत शासनाच्या दिनांक ७.१२.१९९६ च्या पत्राची छायांकित प्रत) त्यांना दिनांक २१.१२.२००९ रोजी डाकनोंद पोचपावतीद्वारे आणि मुद्या क्रमांक १ मधील अंतिम स्वरुपाची माहिती (महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियम, १९८१) चे पुस्तकामधील नियम क्रमांक ३६ व ३९ च्या उताऱ्याच्या छायांकित प्रती) दिनांक १.२.२०१० रोजी श्री. झाडे यांना डाक नोंद पोचपावतीद्वारे निर्गमित करण्यात आलेले आहेत. मुद्या क्रमांक १ बाबतची माहिती पुर्णपणे सहाय्यक आयुक्त (लेखा) कार्यासन-१७ यांचेशी निगडीत असलेबाबत सकृतदर्शनी या कार्यासनाची धारणा झ ाालेली होती. त्या अनुषंगाने लेखा विभागातच प्रथमतः सर्वत्र श्री. झाडे यांच्या संबंधित नस्तींचा सर्वत्र शोध घेण्यात आला. त्यात यश

न आल्यामुळे सहाय्यक आयुक्त (प्रशासन) कार्यासन अधिकारी-२० यांना सविस्तर पत्रान्वये सं.क्र. आदुवि-१७(२)/म.मा.अ./०५/श्री.झाडे/२००९/२३, दिनांक २२.१.२०१० यांचे कार्यासनाकडून श्री. झाडे यांच्या ३ वैयक्तिक नस्ती उपलब्ध करुन घेण्यात आल्या व त्यानंतर अर्जदाराने (श्री.झाडे) त्यांच्या अर्जात मुद्दा क्रमांक १ अंतर्गत मागणी केलेली माहिती संकलीत करुन अनुक्रमे दिनांक ३१.१२.२००९ आणि दिनांक १.२.२०१० रोजी डाक नोंद पोचपावतीद्वारे निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. वरील कारणांमुळे अर्जदारास मुद्दा क्रमांक १ बाबतची संपूर्ण माहिती पुरविणेस अनुक्रमे २ड्ड व ३ड्ड महिन्यांचा विलंब झालेला आहे. हे माहितीकरिता सविनय सादर. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांनी आयोगाकडे युक्तिवाद केलेला आहे व दिनांक ५.२.२०१० रोजी खुलासापण दाखल केलेला आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा एकवेळ अपीलकर्ता यांच्या चारही मुद्यांची माहिती उपलब्ध असल्यास किंवा नियम उपलब्ध असल्यास तपासणी करुन एकत्रितपणे छायांकित प्रतीच्या स्वरुपात पुरविणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ११९२/२००९ मध्ये दिनांक २६.९.२००९ रोजी खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. दुग्धशाळा तंत्रज्ञ गटातील अधिकाऱ्यांना बढती, मानीव दिनांकाप्रमाणे फरक अदायगी इत्यादीबाबत. अ) शासनाचे पत्र क्र. बीएमई-११८३/३८५४-ब-पदूम-२(५७१), दिनांक ५.५.१९८४ नुसार श्री. इ. डी. ढोमणे, सहाय्यक दुग्धशाळा विकास अधिकारी (तांत्रीक), प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी कार्यालय, नागपूर यांना राजपत्रित कनिष्ठ वर्ग-१ संवर्गातील जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, नागपूर या पदावर पदोन्नती देऊन पदस्थापित करण्यात आले त्याबाबत मला खालील प्रमाणे माहिती कृपया उपलब्ध करावी ही विनंती. १) ज्या नियमान्वये श्री. ढोमणे यांना वर्ग-२ मधून कनिष्ठ वर्ग-१ संवर्गामध्ये भ.जा. व वि.ज. या गटात जातीच्या खात्री शिवाय बढती देण्यात आली त्या नियमाची प्रमाणित छायाप्रत कृपया उपलब्ध करावी ही विनंती. २) उपरोक्त बढती आदेशात प्रादेशिक प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी, नागपूर यांना विनंती करण्यात आली आहे की, श्री. इ. डी. ढोमणे यांचे विमुक्त जाती/भटक्या जमाती विषयक जातीचे प्रमाणपत्र तपासून पहाण्यात यावे. बढती देण्यात आल्यानंतर जातीचे प्रमाणपत्र तपासण्याबाबतच्या नियमाची प्रमाणित छायाप्रती कृपया उपलब्ध करावी. ३) प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी, नागपूर यांना जातीचे प्रमाणपत्र तपासून पाहण्याचे अधिकार असल्याच्या नियमाची/शासन निर्णयाची/परिपत्रकाची प्रमाणित छायाप्रत कृपया उपलब्ध करावी. ४) प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी, नागपूर यांनी जातीचे प्रमाणपत्र तपासून पाहिल्यावर आढळलेली वस्तुस्थितीबाबतच्या दस्तऐवजांच्या प्रमाणित छायाप्रती कृपया उपलब्ध कराव्यात. ब) दिनांक ११.१२.१९८७ रोजी दुग्धशाळा विकास विभागातील दुग्धशाळा विज्ञान गट वर्ग-१ संवर्गातील अधिकाऱ्यांची दिनांक १.४.१९८७ ची स्थिती दर्शविणारी प्रारुप जेष्ठता सुची निर्गमित केली त्यावर मी दिनांक २१.१२.१९८७ रोजी योग्य त्या मार्गाने आक्षेप नोदविले त्याच्या आगाऊ प्रती सुध्दा देण्यात आल्या आहेत. त्याबाबत कृपया खालील माहिती कृपया उपलब्ध करावी. ४) यादीमध्ये श्री. ढोमणे हे क्रमांक ४९ वर भटक्या जाती व विमुक्त जमाती दर्शविले आहे. श्री. ढोमणे यांनी कार्यालय प्रमुख हया नात्याने त्यांनीच त्यांची जात "सोनार" असल्याचे द्विमासिक कर्मचारी स्थितीदर्शक अहवालात सतत वरिष्ठांस कळविले आहे. असल्यास त्याप्रमाणे सुधारणा व्हावी असे कळविले आहे. त्याप्रमाणे तपासणी करुन आढळलेली वस्तुस्थितीदर्शक माहितीसह जेष्ठता सुचीमधील सुधारणेबाबत केलेल्या कारवाई बाबतची दस्तऐवज/कागदपत्राच्या प्रमाणित छायाप्रती कृपया उपलब्ध कराव्यात ही विनंती. ५) शासनाने दिनांक २३.१२.१९९४ रोजी श्री. इ. डी. ढोमणे यांना वर्ग-२ मधील बढतीचा मानिव दिनांक १.१०.१९७९ देण्यात आला व मानिव दिनांकापासून वेतन निश्चिती करुन वेतन व थकबाकी देण्यात आली. हा मानिव दिनांक भटक्या जाती व विमुक्त जमातीच्या आधारावर देण्यात आला किंवा कसे कृपया त्याबाबतचे सविस्तर असलेल्या दस्तऐवजाच्या प्रमाणित छायाप्रती उपलब्ध कराव्यात ही विनंती. ६) दुग्ध व्यवसाय विकास विभागातील दुग्धशाळा तंत्रज्ञ आणि व्यवस्थापन पदोन्नती गटातील वेतनश्रेणी (५००-९००) पदावरील वर्ग ३ कर्मचाऱ्यांची दिनांक १.४.१९७६ ची स्थिती दर्शविणारी प्रारुप जेष्ठता सुची दिनांक २९.६.१९७६ प्रथम निर्गमित केली. त्यानंतर सतत बदल करुन प्रारुप जेष्ठता सुचीत बदल केले व अंतिमतः दिनांक ७.२.१९९८ रोजी

अंतिम जेष्ठता सूची निर्गमित केली. त्यात श्री. ढोमणे यांना जेष्ठता क्रमांक ६७ वर सध्या धारण करीत असलेले पद कृषी अधिकारी, आर्वी दिनांक २९.३.१९७५ पासून धारण करीत असल्याचे नमूद आहे. अभिप्रायात दुग्ध प्रापण अधिकारी मानिव दिनांक ४.१०.१९७० नुसार पदोन्नती असे नमूद आहे. हा मानिव दिनांक सुध्दा इतर कशाचे आधारे देण्यात आला किंवा भटक्या जाती व विमुक्त जमातीच्या आधारे देण्यात आला त्याबाबतच्या दस्तऐवजाच्या प्रमाणित छायाप्रती कृपया उपलब्ध कराव्यात ही विनंती. ७) श्री. इ. डी. ढोमणे कनिष्ठ वर्ग-१ मधून वरिष्ठ वर्ग-१ हया संवर्गात शासनाच्या समक्रमांकाच्या दिनांक ६.१०.१९९७ च्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आली. ती सुध्दा भटक्या जाती व विमुक्त जमाती हया गटात देण्यात आली किंवा कसे याबाबतचे दस्तऐवजाच्या प्रमाणित छायाप्रती कृपया उपलब्ध कराव्यात ही विनंती. ८) श्री. इ. डी. ढोमणे, प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी, अमरावती म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी चुकीच्या जातीचा फायदा घेऊन शासनाची फसवणूक केली म्हणून पोलीसमध्ये प्रकरण दाखल करण्यात आले. त्याप्रकरणाचा क्रमांक, दिनांक व न्यायालयाचे सविस्तर व सध्यस्थिती कृपया उपलब्ध करावे ही विनंती. ९) पोलीसमध्ये प्रकरण दाखल करण्यासाठी श्री. इ. डी. ढोमणे हे भटक्या जाती व विमुक्त जातीचे नाहीत याबाबतचे अधिकृत प्रमाणपत्र मिळाले असेल, त्यानंतरच प्रकरण दाखल केले ते प्रमाणपत्र मिळाल्याची तारीख व त्या प्रमाणपत्राची प्रमाणित छायाप्रत कृपया उपलब्ध करावी ही विनंती. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.११.२००९ रोजी अपीलकर्ता यांना सदरची मागितलेली माहिती माहितीचा अधिकार नियम ८(१) (त्र) नुसार उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे तसेच तोंडी युक्तिवाद सुध्दा त्यांनी केला. आपण मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम ८(१) (त्र) नुसार उपलब्ध करुन देता येणार नाही हा नियम गैरलागू असल्याने द्वितीय अपील करण्यांत आले आहे. अद्याप प्रथम अपीलावर सुनावणी घेतलेली नाही. तसेच मला कोणतीही माहिती मिळाली नाही. मागणी केलेली माहिती कृपया उपलब्ध करणेबाबत आदेश देण्यात यावे असे आयोगाचे निदर्शनास आणले. तसेच माझी ५ द्वितीय अपीले नागपूर येथे दिली असतांना मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी मुंबई येथील माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी असल्याने ऑक्टोंबर २००८ मध्ये मुंबई येथे सुनावणीसाठी मागविलीत त्यावर व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी घेऊन काही बाबत आदेश काढूनही माहिती दिली नाही तर काही अपीले माहिती देणे रास्त असले तरी निकाली काढण्यात आलीत व त्यांचा बचाव करण्यात आला. त्यामुळे त्यांनी माहिती दिली नाही तरी अडचण नाही अशी त्यांची धारणा झाली असावी म्हणून माहिती मिळणेबाबत द्वितीय अपील करण्यात येत आहे. असे द्वितीय अपील मेमोमध्ये नमुद केलेले आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, व्यक्तिगत माहिती असल्याने व व्यक्तीच्या खाजगीमध्ये हस्तक्षेप करणारी असल्यामुळे ती नाकारण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता संपूर्ण माहिती ही त्यांच्या कार्यालयातील नियुक्ती किंवा पदोन्नती संबंधी आहे. सार्वजनिक प्राधिकरणामध्ये सार्वजनिक पदावर नियुक्ती करतांना जी कागदपत्रे असतात ती कोणत्याही प्रकारची खाजगी कागदपत्रे नसतात तर ती सर्व कागदपत्रे ही सार्वजनिक अभिलेखे असतात व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये केलेले आरोप हे सत्य आहेत असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक ११९३/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव (पदूम), दुग्ध व्यवसाय विकास विभाग, मुंबई यांचेकडे अपीलकर्ता यांनी खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. दुग्ध व्यवसाय

विभाग विभागांतील वर्ग-१ (कनिष्ठ) अधिकाऱ्यांना उत्कृष्ट कामाबद्यल आगाऊ वेतनवाढी देण्याचे प्रस्ताव आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास यांचेकडून प्राप्त झालेवर त्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही होऊन मंजूरीचे आदेश होतात त्याबाबत खालील माहिती कृपया उपलब्ध करावी ही विनंती. १) मा. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विभाग, कार्यालयाकडून १९९५ पासून आजपर्यंत ज्या-ज्या वेळी आगाऊ वेतनवाढी मंजूरीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावातील शिफारस केलेल्या नावांसह सविस्तर पत्र क्रमांक व दिनांक कृपया उपलब्ध करावे ही विनंती. २) सन १९९५ नंतर आजपर्यंत ज्या-ज्या वेळी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत केलेल्या कार्यवाही प्रमाणे मंजूर आदेशांची प्रमाणित छायाप्रत कृपया उपलब्ध करावी. नामंजूर केले असल्यास कृपया तसे कळवावे ही विनंती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.११.२००९ रोजी शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र. आवेवा-२००६/प्र.क्र.२०८/०६/आठ, दिनांक १४ डिसेंबर, २००६ मधील परि. ७(क) अन्वये सदर माहिती आपणास देता येणार नाही. याबाबत दिलगिरी व्यक्त करीत आहोत असे उत्तर दिलेले दिसून येते. माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल करावे लागले आहे असे त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये पुन्हा त्यांची द्वितीय ५ अपीलाचे संदर्भातील आरोप कायम ठेवून माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती केलेली आहे.

७. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे खुलासा दाखल करतांना माहिती अधिकारी यांनी दिनांक ५.११.२००९ रोजीचे पत्रात नमुद केलेल्या शासन परिपत्रक क्रमांक सा.प्र.वि.क्र. आवेवा-२००६/प्र.क्र.२०८/०६/आठ, दिनांक १४.१२.२००६ मधील परि. ७(क) अन्वये माहिती देता येत नाही असे दिलेले कारण मी मागणी केलेल्या माहितीसाठी गैरलागू आहे. द्वितीय अपील दाखल केल्यानंतर दिनांक २५.१.२०१० रोजीचे पत्राने कळविले की, दिनांक १४.१२.२००६ चे जे आदेश व प्रचलित नियम आहेत त्यानुसार एखादा शासकीय अधिकारी/कर्मचारी निवृत्त झाल्यानंतर ३ वर्षाचा कालावधी लोटल्यानंतर अत्युत्कृष्ट कामाबाबत आगाऊ वेतन वाढीसाठी तो पात्र ठरु शकत नाही आणि त्यामुळे आपणास माहिती देता आली नाही. हयावर शासनाने सुधारीत शासन परिपत्रक दिनांक १९.११.२००७ चे काढून सेवानिवृत्तांना सुध्दा आगाऊ वेतनवाढी देण्याबाबत कळविले असून विलंबाबाबतची जबाबदारी सदर प्रकरण हाताळणाऱ्या संबंधित विभागाच्या आस्थापना शाखेच्या अधिकाऱ्यांची राहील व सदर अधिकारी शिस्तभंगाचा कारवाईस पात्र ठरतील असे नमुद केलेले आहे. पत्रासोबत मागणी केलेल्या माहितीपैकी आयुक्त कार्यालयाने दिनांक ५.११.२००१ च्या पत्राद्वारे सादर केलेल्या प्रस्तावाची छायाप्रत दिलेली आहे. त्यासोबतची सहपत्रे नाहीत. अद्याप त्यावर अंतिम कार्यवाही झालेली नाही असेही कळविले आहे. मला प्राप्त माहिती अपूरी आहे. दिनांक ३०.६.१९९७ रोजी पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत दिलेली नाही. त्यावर झालेली कारवाई कळविली नाही. मी मागणी केलेल्या माहितीपैकी अपूरी माहिती दिली असल्यामुळे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

८. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास यांच्या कार्यालयाने ऑक्टोंबर २००० पासून आगाऊ वेतनवाढी मंजूरी करण्यासाठी शासनाकडे दिनांक ९ नोव्हेंबर, २००१ च्या पत्राद्वारे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत सोबत माहितीसाठी जोडली आहे. त्या प्रस्तावावर अद्याप अंतिम कार्यवाही झालेली नसल्याने आणि वरिष्ठांच्या सुचनेनुसार सुधारीत प्रस्ताव आयुक्त कार्यालयाकडून मागविलेला असून तो अद्याप प्राप्त व्हावयाचा आहे. त्यामुळे आगाऊ वेतनवाढी मंजूर केल्याबाबत कोणतेही आदेश निर्गमित झालेले नाहीत असे कळविलेले आहे. त्यावर अपीलकर्ता यांना दिनांक ३०.७.१९९७ ची प्रस्तावाची प्रत दिलेली नाही. यावरुन प्रस्तावाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपील क्रमांक ११९१/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संपूर्ण एकत्रित माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.
२) अपील क्रमांक ११९२/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.
३) अपील क्रमांक ११९३/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ३०.६.१९९७ चा प्रस्ताव व त्यावरील आदेशाच्या प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.
४) अपीलकर्ता यांना वरील आदेशांन्वये जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन न दिल्यास शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.
५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९३/अम/२००९.

श्री. अशोक विठ्ठल पांडव,
मु. पो. नेरी, ता. जामनेर,
जि. जळगांव. **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
नांदगांव (खंडेश्वर),
जि. अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसील कार्यालय
नांदगांव (खंडेश्वर),
जि. अमरावती. **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. एम. एस. व्यवहारे, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तहसीलदार, नांदगांव (खेड), जि. अमरावती यांचेकडे मौजे जळू येथील प्रकरण क्र. एम.आर.सी.-(१) जळू/२८/०५ चा आदेशाची झेरॉक्स प्रत व ८५/१ अ(मो. व.१) २ हे. १३ आर.चे वाटणीपत्राची झेरॉक्स प्रतीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा झालेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितली आहे त्यांना ती अद्याप पर्यत मिळाली नाही व त्यामुळे त्यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी साधा अर्ज व प्रथम अपील सुध्दा दाखल केलेले आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी सांगितले की, दिनांक २६.२.२००८ रोजी तहसीलदार, नांदगांव (खं.) यांनी तलाठी मौजा जळू यांना सदरच्या प्रकरणामध्ये ७/१२ ला नोंदी घेण्याबाबत आदेश दिले होते व ज्या आदेशाप्रमाणे नोंदी घेण्याचे आदेश दिले होते व वाटणीपत्राची

छायांकित प्रत मागितलेली दिसून येते. मात्र सदरची माहिती उपलब्ध असून सुध्दा तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचे संदर्भात कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला नाही. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले नाही असा खुलासा आयोगापुढे केलेला आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी अपील न करता पुन्हा माहितीचा अर्जच दाखल केलेला आहे. परंतु त्याहीबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ३.११.२००८ च्या व दिनांक ८.१२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.११.२००८ किंवा दिनांक ८.१२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

३) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही जिल्हाधिकारी, अमरावती यांनी करावयाची असून त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत **जिल्हाधिकारी, अमरावती** यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९१/अम/२००९.

श्री. बद्रीप्रसाद रामेश्वर अग्रवाल,
रा. निरुळ गंगामाई, ता. भातकुली,
जि. अमरावती. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
भातकुली, जि. अमरावती.

श्री. एम. पी. रायबोले,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी,
मौजा निरुळ गंगामाई,
ता. भातकुली, जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्रीमती वैशाली रा. पाथरे, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून तलाठी, मौजा निरुळ गंगामाई, ता. भातकुली यांचेकडे गट नं. १३२, शेत सर्वे नं. ५१/३ एकूण क्षेत्र २.४५ हे. या शेताचा फेरफार क्र. ६८८ देण्यात यावा व गाव नमुना ६/२ ची प्रत मिळण्याबाबत. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने देण्यात यावी असा अर्ज दिलेला दिसून येतो. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २२.१२.२००८ रोजी तहसीलदार, भातकुली यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. माहिती उपलब्ध झ ाली परंतु विलंबाने उपलब्ध झाली या कारणासाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दंड केलेला नसल्यामुळे असा खुलासा अपीलकर्ता यांनी आयोगाकडे केला. तसेच ज्या आदेशावरुन फेरफार घेण्यात आले आहे त्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती हवी होती. परंतु अर्जदार हे स्वतः निरुळ गंगामाई येथेच राहतात. ते ज्या दिवशी तलाठी कार्यालयात आले तो दिवस बाजाराचा असल्यामुळे व कार्यालयात जास्त गर्दी असल्यामुळे अर्ध्या तासानंतर माहिती घेऊन जाण्यास सांगितले. परंतु ते गावात असूनही कार्यालयामध्ये आले नाही. त्यामुळे त्यांना कोतवालाजवळ फेरफार नक्कल घेऊन जाण्याकरिता निरोप पाठविला. त्यांनी माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविण्याबाबत नमुद केले. परंतु रजिस्टर

पोस्टाचा खर्च सोबत दिला नाही. तसेच ते स्वतः नेरुळ गंगामाई येथे राहत असल्यामुळे त्यांनी कोतवालाजवळ निरोप पाठविला. परंतु ते माहिती घेण्यास आले नाही. मात्र प्रथम अपीलात उपस्थित होऊन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली. तसेच निवडणूकीचे कामामुळे त्यांना पाठपुरावा करता आला नाही. असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असली तरी अपीलकर्ता यांना फेरफार कशाचे आधारावर घेण्यात आले त्या आदेशाची नक्कल मागितली. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या आदेशाची प्रत त्यांना त्यांच्या दिनांक १५.११.२००८ च्या अर्जात मागितलेली नाही त्यामुळे दिली नाही. परंतु ती त्यांना देता येईल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत फेरफार कशाचे आधारावर घेण्यात आलेले आहे त्या आदेशाची प्रत विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९०/अम/२००९.

श्री. बळीरामजी बुध्दुजी लोखंडे,
रा. करजगांव वार्ड नं. ५, रामनगर,
ता. चांदूरबाजार, जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती वनमाला राहाटे,
जनमाहिती अधिकारी तथा
बालविकास प्रकल्प अधिकारी,
एकात्मीक बाल विकास सेवा योजना,
ता. चांदूरबाजार, जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, चांदूरबाजार यांचे कार्यालयात खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) करजगांव, ता. चांदूरबाजार येथे दिनांक ११.१०.२००६ व दिनांक ४.६.२००८ व दिनांक १३.१०.२००६ घेतलेल्या मुलाखतीमध्ये (२००६, २००८) मध्ये करजगांव मध्ये किती आंगणवाडी सेविका व मदतनीस यांची निवड झाली त्यांची आंगणवाडी सेविका व मतदनीसची यादी व त्यांनी दाखल केलेले अर्ज व त्यासोबत जोडलेले सर्व कागदपत्र, टी.सी. डिप्लोमा, स्टॅम्प व इतर सर्व कागदपत्रे. २) विधवा, परितत्का, घटस्फोटीत लागलेल्या असल्यास त्यांनी त्याबाबत दाखल केलेले त्यांचे स्टॅम्प व दिलेल्या पुराव्याचे दस्तऐवज सर्व छायांकित प्रत. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल न करता आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २२.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.१.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने परंतु या कार्यालयास आकस्मिक बाबी या शिर्षकाखाली अत्यल्प अनुदान येत असल्यामुळे एवढया माहितीच्या झेरॉक्स प्रती हे कार्यालय तुम्हाला देऊ शकत नाही. त्यामुळे आपण या कार्यालयामध्ये येऊन उपलब्ध असलेली माहिती पाहून घ्यावी व त्याचे अवलोकन करावे. उपलब्ध असलेल्या माहितीचे रेकॉर्ड ज्या दिवशी आपण पाहण्यासाठी येणार त्याची पुर्वसुचना या कार्यालयास दयावी. जेणेकरुन आम्हाला त्या दिवशी माहिती तयार ठेवता येईल व आपला अमूल्य वेळ वाया जाणार नाही. परंतु अपीलकर्ता यांनी सदरच्या उत्तराचे

अनुषंगाने कोणत्याही प्रकारे माहितीचे अवलोकन केलेले दिसत नाही किंवा कार्यवाही केलेली दिसून येत नाही. अर्जदार हे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक आहेत हे ग्रामपंचायत कार्यालय, करजगांव यांनी दाखल दिलेला आहे. परंतु सदरचा दाखला हा सन २००१-२००२ या वर्षाच्या सर्वेक्षणानुसार दिलेला आहे व अशा प्रकारची व्यापक प्रमाणात मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी जे पत्र अपीलकर्त्यास पाठविलेले आहे ते योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९८/अम/२००९.

श्री. श्रीकृष्ण मोतीराम बीजवे,
बुधवारा, निलकंठ मंदीर रोड,
ता. जि. अमरावती. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद,
अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,
अमरावती. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व त्यांनी प्रतिनिधी यांना अधिकार दिलेले आहेत. परंतु ते अधिकार नामंजूर करण्यात आलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. सचिन गुल्हाणे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर असे संबोधून निलकंठ माध्यमिक शाळा, बुधवारा, निलकंठ मंदीर रोड, अमरावतीचा २००७-०८ शाळा तपासणी अहवाल प्रत व शाळा प्रथम मान्यता प्रत दिलेल्या अटी व शर्ती शाळा मान्यतेबाबतच्या. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन ठिकाण अमरावती व आवक लिपिक, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे सादर केलेला दिसून येतो. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना पत्र क्रमांक जिप/माध्य./६११५/०८, कार्यालय शिक्षण विभाग (माध्य.) जिल्हा परिषद, अमरावती असे क्रमांक असलेले परंतु नोव्हेंबर महिन्यातील तारीख नसलेले उत्तर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अर्जदार अपीलकर्ता यांना पाठविलेले दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३.	द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच न मागितलेली माहितीचे करिता खर्चाचा भरणा त्यांनी केला व त्यांना विनाकारण भुर्दंड झाला असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांनी त्याकरिता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केली नाहीत. जनमाहिती अधिकारी यांनी अतिरिक्त खर्चाची मागणी केली असे पत्र दिसून येत नाही. तसेच अपीलकर्ता यांनी या अतिरिक्त खर्चा करिता जनमाहिती अधिकारी यांचेकडे खर्चाचा भरणा केला याचा पुरावा दिलेला नाही. उलट अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असून सुध्दा त्यांनी प्रथम अपील दाखल केले व द्वितीय अपील दाखल केले त्यामुळे अपीलकर्ता यांनीच शासकीय अधिकाऱ्यांचा वेळेचा अपव्यय केला असून प्रवास भत्ता खर्च करण्यास शासनास भाग पाडलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांनी अतिरिक्त खर्चाची मागणी केली नव्हती तसेच त्यांनी चालान फी भरली नाही त्यामुळे सदरचा खर्च परत करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सन २००७-०८ या वर्षातील तपासणी अहवाल मागितलेला असल्यामुळे व तशी तपासणी झाली नसल्यामुळे तसे अपीलकर्ता यांना मुदतीत कळविण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९४/अम/२००९.

श्रीमती अंतकला सुदाम आठवले,
ह. मु. खिरगव्हाण, ता. अंजनगांव सुर्जी,
जि. अमरावती. **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. दर्यापूर, जि. अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. दर्यापूर, जि. अमरावती. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक २५.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हया गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एम. आय. काझी, नायब तहसीलदार हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. संजय मुरक्कर, अव्वल कारकून हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), दर्यापूर, जि. अमरावती यांचेकडे त्यांचा दिनांक ३०.४.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने केलेली कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक १५.९.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदर माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक १६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.१०.२००८ रोजी देण्यात आला असून अपील अर्ज निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलामध्ये अपीलाचे कारण देतांना प्लॉट नं. २२ पैकी ९०० चौ.फु. जागेवरील घर उध्वस्त करुन कब्जा करणे बेकायदेशीरपणे गुंडागर्दी करुन दहशत निर्माण करुन जागा ताब्यात घेणे, बनावट, बोगस खरेदी दस्तावेज तयार करुन घर उध्वस्त करुन जागा ताब्यात घेणे प्रकरणी प्रकरण निकाली काढले नाही व कार्यवाही केली नाही व माहिती दिली नाही असे कारण दिलेले आहे. अपीलकर्ती यांनी मागितलेली माहिती व जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ती यांना विहित मुदतीत झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ती यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती उपलब्ध झाली आहे. परंतु अपीलकर्ती यांची अपेक्षा ही अतिक्रमण काढून

देण्याची दिसून येते व ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत कार्यवाही करण्याचे अधिकार अधिनियमात नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९७/अम/२००९.

श्री. बाबाराव शंकरराव यादगिरे,
संजिवनी कॉलनी, राठी नगर,
ता. जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,
अमरावती.

श्री. बाळकृष्ण वासुदेवराव दिवान,
जनमाहिती अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत विभाग),
जिल्हा परिषद,
अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे ग्रामसेवक भरती मुलाखतीबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२००९ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ अमरावती यांचेकडे दिनांक २५.२.२००९ ला सादर केलेले अपील काही अपरिहार्य कारणास्तव मागे घेत आहे. कृपया नोटीस पाठवू नये अशी विनंती केलेली आहे. तसेच दिनांक ८.२.२०१० रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचेकडे निवेदन सादर करुन सदर माहिती बाबत संबधित कार्यालयाने माझे समाधान केले आहे आणि माहिती बाबत माझे पुर्ण समाधान झाले असल्याने सदर प्रकरणे आपले स्तरावर कृपया नस्ती करावे अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३०३/अम/२००९.

श्री. दिनेश विठ्ठलराव जाधव,
मु. तपोवन, पो. तऱ्हाळा,
ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती प्रतिभा देशमुख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
क्रिडा व युवक सेवा,
अमरावती विभाग, अमरावती.

श्री. डी. एस. उजाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा क्रिडा अधिकारी,
ता. जि. वाशिम. **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१०.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रिडा विकास अधिकारी, वाशिम यांचेकडे, सन २००५ ते २००८ या कालावधीतील मंगरुळपीर तालुक्यातील ग्रॅन्ड असणाऱ्या व्यायाम शाळेंचे नावे, स्थापना, दिनांक, त्या संस्थांनी केलेल्या ऑडीडचा दिनांक (दर वर्षाचा) घटनेतील अध्यक्ष/सचिव व सदस्य यांचे नावे, आजपर्यंत त्या व्यायाम शाळेंना किती निधी दिला, कशासाठी दिला याबाबत माहिती. व्यायाम शाळेंनी घेतलेल्या साहित्याच्या बिलाच्या नकला. संस्थेनी दाखल केलेल्या ठरावाची नक्कल साक्षांकित करुन दयावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. निशुल्क दारिद्रय रेषेचे कार्ड आहे असे अपीलकर्ता यांनी नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.११.२००८ रोजी वाशिम जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाचे आस्थापनेवर कोणताही कर्मचारी वर्ग नियुक्त नसल्याने तसेच माहिती अधिकारात मागणी केलेली माहिती जुनी असल्याने ती मुदतीत सादर करता येणे शक्य नाही. करिता माहिती संकलीत करण्यासाठी अधिकचा/जादा कालावधी लागणार आहे. माहिती संकलीत करण्याचे काम या कार्यालयामार्फत सुरु असून संपूर्ण माहिती संकलीत होताच आपणांस तसे कळविण्यात येईल, अशा प्रकारे जिल्हा क्रिडा अधिकारी, अकोला/वाशिम कार्यालयातर्फे दिनांक ३.११.२००८ च्या पत्रान्वये

अर्जदाराला कळविण्यात यावे. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी मुदत संपल्याचे पत्र दिलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे सुनावणीस हजर न राहिल्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक १३.२.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकर्ता यांना दिनांक ३०.१.२००९ रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व उर्वरित व्यायाम शाळांची माहिती त्या त्या संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावी असे त्यांना कळविले. असे एकूण त्यांना १६५ पृष्ठांची व त्यापुर्वी सुध्दा त्यांना माहिती अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली आहे. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता हे आज गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना फसवणूकीचे कारणास्तव दिनांक ८.९.२०१० रोजी अटक करण्यात आले व ते आता जेलमध्ये आहेत. परंतु त्याबाबतची माहिती त्यांनी वर्तमानपत्राची बातमी आयोगाचे निदर्शनास आणली. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३००/अम/२००९.

श्री. केशव मारोतराव सवळकर,
मु. हातणी, पो. खोपडी (बु.),
ता. दारव्हा, जि. यवतमाळ. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. वसूरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (पाणी पुरवठा विभाग),
यवतमाळ.

श्री. एस. जे. दोडके,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
जिल्हा परिषद पाणी पुरवठा उपविभाग, दारव्हा,
ता. दारव्हा, जि. यवतमाळ. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद पाणी पुरवठा, उपविभाग, दारव्हा, जि. यवतमाळ यांचेकडे सन २००७-०८ ते २००८-०९ या वित्तीय वर्षामध्ये मंजूर प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजनेबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २४.९.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व उर्वरित माहिती भारत निर्माण कार्यक्रमांतर्गतच्या गावामध्ये पाणी पुरवठा योजना सुरु आहे त्या गावातील समितीचे काम सुरु असल्यामुळे त्यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ५.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे व माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले आहे. तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता हे प्रत्येक वेळेस वेगवेगळा पत्ता देतात असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. त्यांच्या दिनांक ८.९.२००८ चा माहितीचा अर्ज जोडपत्र अ मध्ये त्यांनी पत्रकार तथा कार्याध्यक्ष, जनहित नागरी संघर्ष समिती, दारव्हा, मु. रेल्वेस्टेशन नेर रस्त्यावर, दारव्हा, जि. यवतमाळ असा पत्ता दिलेला आहे. प्रथम अपीलामध्ये मु. हातनी, पो. खोपडी (बु.), ता. दारव्हा, जि. यवतमाळ असा पत्ता दिलेला आहे व राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीलामध्ये उपअध्यक्ष, यवतमाळ जिल्हा पत्रकार महासंघ, मु. हातणी, पो.खोपडी(बु.), ता. दारव्हा, जि. यवतमाळ असे नमुद केलेले आहे. तसेच त्यांचेकडे इतर अर्ज येतात त्या अर्जामध्ये सुध्दा अपीलकर्ता हे वेगवेगळा पत्ता देत असतात असे आयोगाचे निदर्शनास जनमाहिती अधिकारी यांनी आणले. यावरुन अपीलकर्ता हे जरी उपअध्यक्ष, यवतमाळ जिल्हा पत्रकार महासंघ जरी असले तरी त्यांना माहितीची काय आवश्यकता आहे. रेल्वेस्टेशन नेर रस्त्यावर असा पत्ता देणारा पत्रकार हा कोणत्याही व्यापक जनहिताकरिता माहिती मागत आहे असे दिसून येत नाही. तरीही त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९९/अम/२००९.

श्री. केशव मारोतराव सवळकर,
मु. हातणी, पो. खोपडी (बु.),
ता. दारव्हा, जि. यवतमाळ. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. एस. चांदूरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा कृषी अधिक्षक,
ता. जि. यवतमाळ.

श्री. एस. ए.. देशपांडे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय कृषी अधिकारी,
ता. दारव्हा, जि. यवतमाळ. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, दारव्हा, जि. यवतमाळ यांचेकडे कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, उपक्रम, प्रशिक्षण, स्वयंसेवी संस्था आदि मार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची तपशीलवार विवरणासह माहिती एकूण ५ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी माहिती आयुक्तास निवेदन दिनांक १२.२.२०१० रोजी सादर केले असून त्यात माहितीच्या अभिलेख्याचे अर्जदाराने अवलोकन केले असता अर्जदारास आवश्यक असलेली माहिती पुर्णतः आढळून आली. तसेच त्याबाबत अर्जदाराचे गैरसमज साफ दूर झाला. त्यावरुन दिनांक १६.२.२०१० रोजीच्या सुनावणीची गरज नसून माहितीबाबत समाधान झाल्याने उपविभागीय कृषी अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी यांच्यावरील सर्व आक्षेप दुर झाल्याने प्रकरण पंजीबध्द/नस्तीबध्द करण्यात यावे, अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३०१/अम/२००९.

श्री. अ. हमीद शेख चाँद,
मस्जीद वार्ड, ता. पुसद,
जि. यवतमाळ. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. वसंत इंगोले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, पुसद,
जि. यवतमाळ.

श्री. प्रशांत प. देशमुख,
जनमाहिती अधिकारी तथा
विभाग प्रमुख (विद्युत)
नगर परिषद, पुसद,
जि. यवतमाळ. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख (विद्युत विभाग) यांचेकडे विद्युत विभागाची माहिती मिळणेबाबत एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२०१० रोजी राज्य माहिती आयुक्त यांचेकडे निवेदन सादर केले आहे. त्यात माहिती अधिकारी यांनी माहिती दाखविली त्यामुळे माझे समाधान झाले आहे. सबब मला आता या प्रकरणात काहीही म्हणावयाचे नसल्याने मी दाखल केलेले द्वितीय अपील खारीज करण्यात यावे अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३०२/अम/२००९.

श्री. एम. व्हि. मानमोडे,
प्रेरणानगर, प्लॉट नं. ३४,
उमरसरा, जि. यवतमाळ. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्यवनसंरक्षक (प्रादेशिक),
स्टेट बँक चौक, यवतमाळ वनवृत्त,
जि. यवतमाळ.

जनमाहिती अधिकारी तथा
विभाग वन अधिकारी (योजना)
मुख्यवनसंरक्षक (प्रादेशिक),
स्टेट बँक चौक, यवतमाळ वनवृत्त,
जि. यवतमाळ. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. पी. एस. वघारे, सहाय्यक वनसंरक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी योजना, यवतमाळ यांचेकडे यवतमाळ वनवृत्तातील संवर्गनिहाय सन १९९६ ते सध्यस्थिती पर्यंत आरक्षण व त्या त्या संवर्गाचे बिंदुनामावलीनुसार निवड समितीने निश्‍चित केलेल्या पदोन्नतीस पात्र वन कर्मचाऱ्यांस जातपडताळणी प्रमाणपत्राबाबत एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांना निवेदन सादर केलेले आहे. त्यात माहितीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती मला प्राप्त झालेली असून सदर माहितीमुळे मी समाधानी आहे. त्यामुळे मी आपले कार्यालयास दिनांक १८.२.२००९ अन्वये सादर केलेले द्वितीय अपील नस्तीबध्द करण्यात यावे अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३०९/अम/२००९, अपील क्रमांक १३१०/अम/२००९ व अपील क्रमांक १३११/अम/२००९.

श्री. विनायक गणपतराव इंगळे,
अमोल, रेणुकानगर, राजेश्वर कॉन्व्हेंट जवळ,
वार्ड क्र. ३५, डाबकी रोड, जुने शहर,
ता. जि. अकोला - २. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. वैभव आवारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (विकास)
अकोला महानगरपालिका, अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
नगर रचना विभाग,
अकोला महानगरपालिका, अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी,
अकोला महानगरपालिका, अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
अतिक्रमण विभाग,
अकोला महानगरपालिका, अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १७.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा नगर रचना विभागा तर्फे श्री. राजेंद्र टापरे हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी यांचे तर्फे श्री. मोह. आरिफ, आरोग्य अधिक्षक हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा अतिक्रमण विभाग हे गैरहजर आहेत.

२. अपील क्रमांक १३०९/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, महानगरपालिका, अकोला यांचेकडे १) आयुक्त, महानगरपालिका, अकोला हयांना संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हयांनी त्यांचे पत्र क्र. जाक्र. विमो.अकोला/सन ५/२/टिपीव्ही-६/१२०९, दिनांक ७.३.२००८ नुसार माझा दिनांक २५.१.२००८ चा संचालनालयास असलेला अर्ज संलग्न पत्रासह पुढील कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित केलेला आहे. त्या पत्रासह माझे अर्जाच्या संलग्न प्रती आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल द्यावा. २) माझे दिनांक १७.५.२००६ आणि दिनांक ५.६.२००६ चे अर्जाच्या सत्यप्रती, अभियंत्यांचे नांव आणि त्यावर दिलेला अहवाल आणि केलेल्या कार्यवाहीचे अहवालासह सत्यप्रती द्याव्यात. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.७.२००८ रोजी माहिती दिली. परंतु सहपत्र दिले नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.९.२००८ रोजी देण्यात आला असून सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती ८ प्रतीमध्ये मिळाल्याचे मान्य केले. मुद्या क्रमांक २ नुसार अर्जदार यांनी कार्यालयास दिनांक १७.५.२००६ आणि दिनांक ५.६.२००६ च्या अर्जाच्या सत्यप्रती अभियंत्याचे नांव व संबंधित अभियंत्यानी दिलेला अहवाल व त्यावर केलेली कार्यवाही याबाबत माहिती मागितली होती. सदर अर्जाच्या स्थळ प्रतिलिपी अर्जदाराकडे उपलब्ध आहेत. मात्र त्यांनी महानगरपालिका कार्यालयाकडे सादर केलेल्या अर्जाच्या प्रती उपलब्ध नाहीत. माहिती अधिकारात उपलब्ध असलेले कार्यालयीन दस्ताऐवज उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. परंतु मागणी केलेले अर्जाच्या स्थळप्रती अर्जदाराकडे उपलब्ध आहेत. करिता प्रकरण निकाली काढण्यांत येत आहे. अपीलकर्ता यांचेशी झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्ता यांनी मांडलेली तक्रार ही माहिती अधिकार कक्षाबाहेरची बाब असल्यामुळे आपण या कार्यालयास वेगळी तक्रार दाखल करावी. अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो व या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जे अर्ज किंवा तक्रार केलेल्या आहेत त्याच्या स्थळप्रती त्यांचेकडे असणे हे साहजिक आहे. परंतु त्यावर कार्यवाही झालेली नसल्यामुळे त्यांनी कार्यवाही अहवाल व त्या अर्जाच्या प्रती मागितलेल्या आहेत. परंतु त्यापैकी एकही माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली नाही उलट प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निष्कर्ष काढला आहे तो अनाकलनीय आहे. त्यांचे जवळ मुळ तक्रारीची स्थळ प्रत उपलब्ध आहे व त्यांचे जर ही बाब आकलनाबाहेरची आहे. कोणताही व्यक्ती जो मुळात तक्रार करतो तो मुळात त्या तक्रारीची कार्यवाहीची अपेक्षा करतो व हे सामान्य ज्ञान अपीलीय अधिकारी यांना सुध्दा नाही याचे आश्चर्य वाटते. याचा अर्थ तक्रारीवर कार्यवाही काय झाली याची शहानिशा करण्याच्या ऐवजी तक्रारची मुळ प्रत अपीलकर्ता यांचेकडे उपलब्ध आहे या कारणासाठी अपील फेटाळून लावणे ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांची आकलन शक्ती दाखविते व तक्रारीवरील कार्यवाहीची मागणी मागणे ही माहितीच्या अधिकारात कक्षाबाहेरील बाब आहे हा निष्कर्ष सुध्दा अधिनियमाचे तरतुदींना धरुन नाही. थोडक्यात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न केलेला आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचे तत्कालीन कनिष्ठ अभियंता हे मानधनावर होते व ते महानगरपालिका सोडून गेले आहेत. असे असले तरी नगर रचना या विभागाचे प्रमुख अधिकारी जबाबदार असतात याची जाणीव दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी सर्व अर्ज दिले होते व महानगरपालिका यांनी त्याची नोंद नोंदवहीत केली आहे व संबंधित विभागास ते हस्तांतर केलेले आहे ही माहिती अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणली. यावरुन जनमाहिती अधिकारी किंवा संबंधित अधिकारी जे जबाबदार आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी तसेच अपीलकर्ता यांच्या दिलेल्या तक्रारीच्या संदर्भातील अर्ज सुध्दा जतन केला नसल्यामुळे त्याबाबत निश्चित अशी जबाबदारी ठरविणे आवश्यक आहे व जनमाहिती अधिकारी सुध्दा

याबाबत जबाबदार आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १३१०/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.७.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा अतिक्रमण विभाग, महानगरपालिका, अकोला यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) दिनांक २०.१०.१९९३ अंतीम बांधकाम प्रमाणपत्राची पावती क्रमांक १९०५ नुसार केलेल्या अर्जाची सत्यप्रत तसेच त्यावरील अभियंत्याचे अहवालाची प्रत देण्यात यावी. २) आपले पत्र क्र. अमनपा/अती/०९३/०८, दिनांक १.७.२००८ नुसार प्रभाकर त्रंबक आवदे हयांना दिलेल्या समज पत्राची प्रत देण्यात यावी. ३) लोकशाही दिन टोकन क्रमांक ३१, दिनांक ७.४.२००८ ची सत्यप्रत. ४) लोकशाही दिन टोकन क्रमांक ३८, दिनांक २.६.२००८ ची अहवालासह सत्यप्रत देण्यात यावी. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १०.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ८.१०.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १, २, ३ व ४ ची माहिती आदेश मिळाले पासून ८ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यातही कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक १३११/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.७.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, अकोला यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माझा अर्ज दिनांक २०.५.२००८ अर्ज विकास योजना, अकोला प्लॉट क्र. ११ ब सुकापूर. सं.नं. ५/२ मधील श्री. प्रभाकर त्रंबक आवदे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार, रेणुकानगर हयांचे परवानगी विपरीत केलेले संडास टाके, बाथरुम, संडास, त्यांचे समास अंतरामधून गेलेले माझे बेडरुम, किचन, देवघराजवळून गेलेल्या पाईपचे तसेच गॅस पाईपचे बांधकामाबाबत. माहितीचा कालावधी २२.४.२००६ ते २०.५.२००८ वरील विषयासंबंधीत माझे दिनांक २०.५.२००८ चे अर्जाची झेरॉक्स प्रत तसेच त्यावर आरोग्य अधिकारी हयांचा तपासणी अहवाल वरचे मजल्यावरील अर्धवट लावलेल्या संडास पाईप बाबत माझे कुटुंबियांचे आरोग्यावर होणारा परिणाम, दुषित हवा, सुर्यप्रकाश इत्यादी बाबत केलेल्या सखोल अहवालाची प्रत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १०.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ८.१०.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती आदेश मिळालेपासून ८ दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारे निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

६. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, आरोग्य विभागाकडे आरोग्याचे संदर्भामध्ये तपासणी करणे करिता अर्ज दिला होता. परंतु सदरच्या अर्जाचे संदर्भामध्ये सदरचा अर्ज हा नगर रचना विभागाशी संबंधित आहे असे कळवून नगर रचना विभागाकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले. याचा अर्थ त्यांचा अर्ज सुध्दा आकलन करण्याची शक्ती आरोग्य विभागास दिसून येत नाही. त्यानंतर दिनांक ४.११.२००९ रोजी सुध्दा तक्रार नगर नियोजन विभागाशी संबंधित असल्यामुळे आरोग्य विभागाकडे या प्रकरणी कोणताही अहवाल उपलब्ध नाही व आपली अडचण काय आहे व आपणास कशाबद्यल अहवाल पाहिजे याबाबतचा स्वयंमस्पष्ट अर्ज आरोग्य विभागाकडे द्यावा असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की, आरोग्य विभागाकडे जो अर्ज दिला होता त्याचे वाचन जर त्यांनी केले असते तर ते त्यांचेशी संबंधित आहे असे त्यांना आढळून आले असते. आलेला अर्ज

वाचन करावयाचा नाही तो समजून घ्यावयाचा नाही व नको त्या विभागाकडे हस्तांतर करावयाचा व पुन्हा स्वयंस्पष्ट अर्ज द्या असे म्हणणे हे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करणे आहे असे त्यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी केलेला अर्ज हा आरोग्य विभागाशी संबंधित नसल्यामुळे त्यांनी तो नगर रचना विभागाकडे पाठविला असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु पाठविला किंवा नाही याबद्यलचा कोणताही उल्लेख अपीलकर्ता यांना दिलेल्या उत्तरात नाही. यावरुन अकोला महानगरपालिकेतील सर्वच अधिकारी हे आपल्याकडे असलेल्या कामाची जबाबदारी टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करतात असे दिसून येते व अकोला महानगरपालिकेमध्ये कोणताही अधिकारी जनतेस जबाबदार आहे असे दिसून येत नाही व त्यांची स्वतःची जबाबदारी आहे किंवा नाही असे दिसून येते व त्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी हे शास्तीस पात्र असून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३०९/अम/२००९, अपील क्रमांक १३१०/अम/२००९ व अपील क्रमांक १३११/अम/२००९ ही मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी अनुक्रमे त्यांच्या दिनांक १२.६.२००८, दिनांक ११.७.२००८ व दिनांक २५.७.२००८ च्या माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत संपूर्ण माहिती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास प्रत्येक जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द रुपये २५०००/- शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) वरील सर्व अपीलामध्ये सर्व जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द तसेच कागदपत्रे जतन करण्याची ज्यांची जबाबदारी आहे असे अधिकारी किंवा कर्मचारी यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही आयुक्त, महानगरपालिका, अकोला यांनी ३० दिवसांत करावयाची आहे. त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत **आयुक्त, महानगरपालिका, अकोला** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३१३/अम/२००९.

श्री. पंजाब श्रीराम तेलगोटे,
मु. नवथळ, पो. आगर,
ता. जि. अकोला. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा क्रीडा अधिकारी,
वसंत देसाई स्टेटियम,
ता.जि. अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा क्रीडा अधिकारी,
वसंत देसाई स्टेटियम,
ता.जि. अकोला. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. बी. एन. तुरुकमाने, जिल्हा क्रीडा अधिकारी, अमरावती हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, अकोला यांचेकडे अकोला जिल्हयातील व्यायामशाळा साहित्य खरेदी आणि व्यायामशाळा बांधकाम, क्रीडांगण

.

.. २



विकास, युवक कल्याण आदी योजने अंतर्गत मागील ५ वर्षात प्राप्त प्रस्ताव व दिलेले अनुदान आदींची संपूर्ण माहिती एकूण ६ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगास

निवेदन सादर केले आहे.  त्यात शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा कार्यालय, अकोला यांनी दिलेल्या माहितीमुळे माझे समाधान झाले आहे.  मला आता माहितीची गरज नाही.  करिता अपील निकाली काढण्यात यावे अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३१९/अम/२००९.

श्री. प्रविण लक्ष्मणराव ठाकरे,
मु. पो. घारोड, ता. खामगांव,
जि. बुलढाणा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक,
वन विभाग, ता. जि. बुलढाणा.

श्री. अब्दुल रऊफ,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक वनसंरक्षक,
वन विभाग, ता. जि. बुलढाणा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.२.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. एम. राठोड, सहाय्यक वनसंरक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००८ रोजी माहिती अधिकारी म्हणून वनविभाग, खामगांव, जि. बुलढाणा यांचेकडे अर्ज दाखल केला होता. परंतु सदरच्या अर्जा ऐवजी नंतर त्यांनी दिनांक ३.१२.२००८ रोजी माहितीचा अर्ज दाखल केला. सदरच्या अर्जाप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन दारिद्रय रेषे खालील प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ९.२.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही प्रश्नोत्तराचे स्वरुपात असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेली दिसून येते. तसेच अपीलकार यांना जी माहिती आवश्यक आहे त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख करुन तसा अर्ज जनमाहिती अधिकारी, बुलढाणा यांचेकडे करावा व त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरवावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे दिनांक ३.१२.२००८ च्या अर्जाची प्रत सादर केलेली नसून दिनांक १७.११.२००८ ची प्रत सादर केलेली आहे. त्या अर्जातून मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी माहिती मागण्याचे ऐवजी प्रत्येक मुद्यांमध्ये विश्लेषणात्मक भाष्य केलेले आहे. परंतु त्यातून निश्चित अर्थबोध होत नाही व त्यामुळेच त्यांना माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा आयोगापुढे सांगितले की, मागितलेली माहिती ही जनमाहिती अधिकारी यांचे मत विचारणारी माहिती आहे व त्यात प्रत्येक मुद्यांमध्ये विश्लेषण करुन प्रश्न विचारले आहेत व त्यामुळे त्यांना दिनांक १६.१.२००९ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली होती. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे २ प्रथम अपीले दाखल केली व दोनही प्रथम अपीलाचे संदर्भात निश्चित माहिती मागावी असा निर्णय दिलेला असल्यामुळे अपील खारीज करण्यात आले होते. द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी जे मुद्ये उपस्थित केलेले आहेत त्या मुद्यांमध्ये माहितीचे निश्चित वर्णन केलेले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीच्या संदर्भातील अभिलेखाचे/कागदपत्राचे निश्चित वर्णन करुन माहिती मागितल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे सुलभ होईल. त्याकरिता अपीलकर्ता यांनी पुन्हा जनमाहिती अधिकारी यांचेकडे निश्चित माहितीचे वर्णन करुन अर्ज सादर करणे संयुक्तिक राहिल. मात्र अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीची कागदपत्रांची किंवा अभिलेखाचे निश्चित वर्णन करुन कोणत्याही प्रकारचे विश्लेषण न करता जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३२४/अम/२००९.

श्री. निलेश कचरुलाल भुतडा,
विदर्भ हाऊसिंग सोसायटी,
ता. जि. बुलढाणा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बुलढाणा.

श्री. एस. ए. सोनुने,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
माध्यमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद, बुलढाणा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक या कार्यालयात कार्यालयीन कामासाठी उपलब्ध करुन देणेबाबत क्रमांक बुजिप/शिमा/स्था/७५/२००६, दिनांक १०.१.२००६ मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा मुळ स्वाक्षरी शिक्षणाधिकारी (मा.) यांनी केलेली मुळ स्वाक्षरीची सत्यप्रत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.१.२००९ रोजी सदरहु पत्र हे जरी बुजिप/शिमा/स्था/७५/०६, दिनांक १०.१.२००६ असे असले तरी स्थापना टेबल वरुन तयार केलेले नाही व तशी टिपणी सुध्दा सादर केलेली नाही असे माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग (माध्य.) यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००९ रोजी माहितीच्या प्रथम अर्जानुसार दिनांक १७.१२.२००८ च्या अनुषंगाने माहिती कार्यालयात उपलब्ध असतांना माहिती मुदतीच्या आंत न दिल्याने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शास्ती व दंड

लादण्यात यावा व माहिती विनामुल्य देण्यात यावी. मुळ स्वाक्षरी केलेले शिक्षणाधिकारी (माध्य.) कार्यालयातील पत्र क्र. बुजिप/शिमा/स्था/७५/०६, दिनांक १०.१.२००६ च्या पत्राची छायांकित सत्यप्रत मिळणेबाबत. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक ९.२.२००९ रोजी घेण्यात आलेली असून शिक्षणाधिकारी यांचे पत्र कार्यालयामध्ये उपलब्ध नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागितलेले संदर्भीय पत्राचे छायांकित प्रतीवर o.c.signed by E.O. असे नमुद केलेले आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बुलढाणा करिता अशी सही करुन सदरचे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांना दिलेले दिसून येते व त्यांना o.c.signed by E.O. त्या मुळ पत्राची प्रत अपेक्षित आहे. परंतु सदरच्या पत्राची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही त्याकरिता त्यांनी आयोगाकडे लेखी खुलासा सुध्दा दाखल केलेला आहे. त्यामध्ये दिनांक १६.१.२००९ रोजी माहिती पाठवून सदर्हु मागणी केलेल्या प्रकरणातील माहिती मुद्येनिहाय माहिती न देता पत्र देऊन माहिती दडपण्याचा पुरेपुर प्रयत्न केलेला आहे. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये सुध्दा थातुरमातुर सुनावणी घेण्याचे नाटक करुन मुळ मुद्याला बगल देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदरर्हु माहिती ही कार्यालयाच्या आवक जावक रजिस्टरवर नोंद असून व उपशिक्षणाधिकारी यांनी करिता म्हणून केलेल्या पत्रावरती सही केलेली आहे. त्याअगोदर त्यांनी मुळ स्वाक्षरीची प्रत मा.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी केलेली असल्याचे नमुद केलेले आहे व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. तसेच माहिती मुदतीच्या आंत न पुरविल्यामुळे संबंधित जबाबदार जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्यावरती शास्तीलादून दंडात्मक कारवाई करण्यात यावी व मला झालेल्या मानसिक व आर्थिक आणि शारीरिक त्रासाबद्यल नुकसान भरपाई रुपये १०,०००/- मला देण्यात यावे व माहिती विनाविलंब व निशुल्क देण्यात यावी अशी विनंती केलेली दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे पत्र हे दिनांक १०.१.२००६ या तारखेचे आहे व अपीलकर्ता यांनी माहिती दिनांक १७.१२.२००८ रोजी मागितलेली आहे. दिनांक १७.१२.२००८ रोजीची माहिती संबंधित नस्तीमध्ये उपलब्ध असेल ती माहिती उपलब्ध करुन देणे हे माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे व तशी नस्ती, अभिलेख किंवा कागदपत्रे उपलब्ध नसतील तर त्याप्रमाणे मत कळविणे हे माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १६.१.२००९ रोजी कळविण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी जे पत्र आयोगापुढे निदर्शनास आणले त्या पत्रावर निश्चितच o.c.signed by E.O. असे दिसून येते. परंतु अशी o.c. संबंधित अभिलेखामध्ये उपलब्ध नाही व त्यामुळे त्या पत्राची छायांकित प्रत पुरविता येत नाही. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी हे त्या पत्राचे संबंधामध्ये ते पत्र आहे किंवा नाही या प्रकारास जबाबदार नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी विनंती केल्याप्रमाणे शास्तीस सुध्दा जबाबदार नाही व नुकसान भरपाईस सुध्दा पात्र नाही. प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नाही अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविण्याची जबाबदारी देण्यात आलेली आहे. कोणत्याही कार्यालयात प्रत्येक नस्तीच्या संदर्भामध्ये स्वतंत्र असे माहिती अधिकारी असू शकत नाही. तरी काही शाखा करिता एकच असा माहिती अधिकारी नियुक्त करता येतो व त्या शाखामधील सर्व नस्त्यांच्या संदर्भामध्ये संबंधित जनमाहिती अधिकारी हे संबंधित असेल असे नाही व माहिती जनमाहिती अधिकारी नियुक्त होण्यापूर्वीची असेल तर त्या माहितीच्या संदर्भामध्ये वैयक्तिकरित्या उपलब्ध नसल्यास जनमाहिती अधिकारी यांना जबाबदार धरता येणार नाही. माहिती उपलब्ध आहे परंतु पुरविण्यात आलेली नाही किंवा अपूर्ण माहिती पुरविण्यात आली तर जनमाहिती अधिकारी यांना जबाबदार धरले जावू शकते. त्यातही माहिती संकलीत करुन उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास ज्या शाखेकडून किंवा अधिकाऱ्यांकडून किंवा कर्मचाऱ्यांकडून माहिती पुरविण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात येते अशा प्रकरणात सुध्दा जनमाहिती अधिकारी यांना जबाबदार धरता येत नाही. तर अधिनियमाचे कलम ५(४) (५) प्रमाणे संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांना जनमाहिती अधिकारी समजण्यात येते व त्यांना जबाबदार धरावे लागते व त्यामुळे

सदरच्या पत्रात हे ज्या अधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकरिता सही केली असेल त्यांना त्या पत्राच्या मुळ प्रतीकरिता जबाबदार धरले जाऊ शकते. परंतु त्या पत्रावर केलेल्या सही वरुन कोणत्या अधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) करिता सही केली आहे हे कळून येत नाही व त्याबाबत चौकशी करुन मुळ पत्राच्या उपलब्धतेबाबत जबाबदारी निश्चित केल्याशिवाय शास्ती लादणे योग्य होणार नाही. नुकसान भरपाईच्या संदर्भामध्ये माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नाही व त्याकरिता प्रथम अपील करावे लागले किंवा द्वितीय अपील करावे लागले व त्यातून मानसिक व आर्थिक आणि शारीरिक त्रास झाला म्हणून नुकसान भरपाई अपेक्षित नाही. जी माहिती मागितलेली आहे ती माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून अर्जदाराचे नुकसान झालेले असल्यासच त्यास नुकसान भरपाई देणे अपेक्षित असते व तसे अर्जदाराने आयोगापुढे सिध्द करावयाचे असते व तसेही अपीलकर्ता यांनी सिध्द केलेले नाही. माहितीचा अर्ज, प्रथम अपील व द्वितीय अपील ही माहिती मिळविण्याची प्रक्रिया आहे व त्यामुळे सदरची प्रक्रिया करावी लागल्यामुळे नुकसान भरपाई देणे अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांची नुकसान भरपाईची विनंती मान्य करता येत नाही. मात्र अपीलकर्ता यांना अपेक्षित पत्राची मुळ प्रत उपलब्ध करुन देण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकरिता ज्या अधिकाऱ्यांनी सही केलेली आहे त्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन मुळ पत्राच्या प्रतीचा शोध घेऊन त्याबाबतचा निर्णय देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी अशा प्रकारची चौकशी करावी. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अधिनियमाचे कलम १८(२) प्रमाणे आयोग चौकशीचे आदेश देत आहे व त्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे संदर्भातील पत्र दिनांक १०.१.२००६ वर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बुलढाणा करिता ज्या अधिकाऱ्यांनी सही केली आहे त्या अधिकाऱ्याची चौकशी हा निर्णय मिळाल्या पासून ३० दिवसांचे आंत करुन मुळ पत्राची प्रत उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) वरील प्रमाणे चौकशीमध्ये जे अधिकारी दोषी आढळून येत आहेत त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करण्यात येते व त्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी शिस्तभंगाची कार्यवाही करावी. त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा</u>** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३२०/अम/२००९.

श्री. गजानन मोतीराम देऊळकार,
मु. कोलद, ता. संग्रामपूर,
जि. बुलढाणा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, संग्रामपूर,
जि. बुलढाणा.

श्री. गजानन मोतीराम ढोकणे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्रामपंचायत, कोलद,
ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. के. के. वाघमारे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००८ रोजी माहिती अधिकारी म्हणून ग्रामपंचायत, कोलद, पंचायत समिती, संग्रामपूर यांचेकडे समाधान लक्ष्मण सपकाळ यांनी इ क्लासमध्ये बांधलेले राहाते घर व घराचा संपूर्ण परिसर याची नमूना ८ ची नक्कल. नमुना ८ रजिस्टर १९९९-२००० तसेच २००१-२००२ या दोनही रजिस्टर मधील दोन नक्कल द्याव्या. (प्रत्येकी दोन) म्हणजे एकूण सर्व ४ नक्कल. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन दारिद्रय रेषेच्या कार्डाची झेरॉक्स सोबत जोडली आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.११.२००८ रोजी ई क्लास मध्ये बांधलेल्या राहाते घरांचा नं. ८ सन १९९९-२००० व २००१-२००२ मधील नं. ८ चे रजिस्टरमध्ये घराची व परिसराची कोणतीही नोंद नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये अपीलकर्त्यास सुनावणीचे दिनांकापासून व हे आदेश मिळाल्यापासून ५ दिवसांचे आंत विनामुल्य माहिती व्यक्तिशः पुरविण्यात यावी व माहिती पुरविल्याची एक प्रत प्रथम अपीलीय अधिकारी हयांचे कार्यालयास

देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो व त्यानंतरही दिनांक २०.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध झाली असून सुध्दा अपीलकर्ता यांनी त्यांना खोटी माहिती दिली व अपूर्ण माहिती दिली या कारणासाठी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध असून सुध्दा त्यांना माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे व २००१-२००२ च्या रजिस्टरमध्ये माहिती उपलब्ध नाही असे त्यांनी उत्तर दिलेले आहे. यावरुन त्यांचेकडे १९९९-२००० व २००१-२००२ असे रजिस्टर उपलब्ध आहे हे सिध्द होते. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक १४.११.२००८ रोजी प्रभार हस्तांतर नोंद आहे व त्यावेळेस पुर्वीच्या ग्रामसेवकांनी प्रभार घेतल्यानंतर रजिस्टर घेतल्यानंतर अपीलकर्ता यांच्या भावाला माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याकरिता प्रभार घेतल्याचा पुरावा त्यांनी दाखल केलेला आहे. तसेच खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. मौजे ग्रामपंचायत कोलद, ता.संग्रामपूर अंतर्गत गावातील खालील नागरिक १) श्री. शंकर मोतीराम देऊळकार, २) श्री. गजानन मोतीराम देऊळकार व ३) श्री. प्रल्हाद मोतीराम देऊळकार रा. कोलद हे सख्खे ३ भाऊ असून ग्रामपंचायत कार्यालयास माहिती अधिकारांतर्गत माहिती मागतात. काही काही माहिती झेरॉक्स खर्चाला परवडणार नाही त्यापेक्षा जास्त माहिती दयावी लागते. त्यामुळे संबंधित माहिती देतांना त्यांचा ग्रामपंचायतचे विकास कामावर विपरीत परिणाम होतो. तसेच काहीही कारण नसतांना हेतुपुरस्सर माहिती मागतात, मागितलेली माहिती जनहिताचे कामाची नसते. तसेच निधी उपलब्ध नसतांना मागितलेली माहिती मोठया प्रमाणात असल्याने अर्जदार बी.पी.एल. खालील असल्याने माहिती दयावी लागते. त्यामुळे त्यांच्या ग्रामपंचायतचे विकास कामावर विपरित परिणाम होतो. तसेच सदर व्यक्ती ही माजी ग्रामपंचायत सरपंच राहिलेली आहे. त्यामुळे त्यांनी माहिती कशी/कोणती मागावी हयाची माहिती असावी. यावरुन जनमाहिती अधिकारी यांचेकडे सदरची माहिती अर्जाचे वेळेस उपलब्ध नव्हती. याबाबत प्रथम अपीलाची सुनावणीत सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी सांगितलेले दिसून येते. तसेच रेकॉर्ड आपणास पाहण्यास उपलब्ध करुन देता येईल असे दिनांक १४.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते व अपीलकर्ता यांची त्यावर सही आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७/२०१०.

श्री. महादेव गणपतराव निळे,
वार्ड नं. ५, नागरी बँक जवळ,
ता. देवळी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रकाश राठोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, देवळी, जि. वर्धा.

श्री. वानखेडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, देवळी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२००९ रोजी तसेच दिनांक ९.३.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, नगर परिषद कार्यालय, देवळी यांचेकडे त्र्यंबक कोहाड कडून घेतलेले मकान व भोसले यांचा वाडा खाली दर्शविलेल्या चर्तुसिमे मधील जागा असून ज्या ज्या लोकांनी घेतलेली आहे त्या सर्वांचे जागेचा मेजरमेंटसहीत कम्बाईंड नकाशा, रोड व रस्त्यासहित पाहिजे आहे. पाहिजे असलेल्या नकाशाची चर्तुसिमा खालील प्रमाणे अशा प्रकारची माहिती मागितलेली आहे व त्र्यंबक बाळकृष्ण कोहाड यांचे जवळून दिनांक २६.२.१९५७ ला किंमत रुपये १५००/- पंधराशे मध्ये मौजा देवळी मौजा नंबर २२२ देवळी नगर परिषद हद्यीतील वार्ड सुभाषनगर मधील घर नं. ७५ व ७६ विकत घेतलेले असून या मकानामध्ये रहात असून नगरपालिका टॅक्स वगैरे भरते. दिनांक ४.३.२००९ ला माझे खाली जागेवर काही लोकांनी खोसे व ज्ञानेश्वर वैद्य यांनी जबरदस्ती अतिक्रमण केल्यामुळे मला वरील कागदपत्राची आवश्यकता आहे. सन १८९१-९२ व सन १९१३-१४ चे बंदोबस्त नक्कला. सन १९१३-१४ सालचा खसरा. सन १९१३-१४ चे खसऱ्याप्रमाणे असणारा वार्ड नं. १६ हद्यीचा व मागील जो वार्ड असेल त्याप्रमाणे नकाशा. चालू वर्षाचा वार्ड नं. १६ चा नकाशा वगैरे माहिती मागितलेली दिसून येते. पुन्हा दिनांक ५.३.२००९ रोजी अर्ज केलेला आहे अशा प्रकारे ३ अर्ज त्यांनी यासंदर्भात केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२००९ रोजी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये सुनावणी घेण्यात आलेली दिसून येते. त्यामध्ये आपला अर्ज क्र. ११७० दिनांक ९.३.२००९ अन्वये विषयांकित नकाशा व खचरा अतिशय जिर्ण झाला असल्याने व त्याचे तुकडे पडल्यामुळे तो आपणांस उपलब्ध करुन देऊ शकत नाही असे दिनांक २०.३.२००९ ला अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक २६.५.२००९ रोजी अपीलकर्ता यांचा अर्ज क्र. ८४, दिनांक ७.५.२००९ अन्वये सन १९४५ चा देवळी सिटी सर्व्हेचा नकाशा व खचरा अतिशय जिर्ण झाला असल्याने व त्याचे तुकडे पडल्यामुळे तो आपणांस उपलब्ध करुन देऊ शकत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी पत्र दाखविले नाही. माहितीच्या अधिकारांतर्गत कागदपत्रे मिळण्याकरिता अनेक चकरा मारुन राहिलो. कनिष्ठ अभियंता, श्री. वानखेडे यांचेकडून कोणतेही कागदपत्रे मिळाली नाही म्हणून आपलेकडे आलो आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा दाखल केलेला आहे. १) दिनांक १६.५.२००७ चा साधा अर्ज हा या विषयासंदर्भात नसून १९१३-१४ या वर्षाची असेसमेंटची नक्कल मिळण्याबाबत आहे. २) दिनांक ५.३.२००९ चा साधा अर्ज नगरपालिका रोडजवळ माझे स्वतःचे दुकानसमोर ऊन व पाण्याचे बचावाकरिता कच्चे टिनाचे शेड टाकण्यांबाबत व गावातील अतिक्रमण काढण्यांबाबत आहे. तो या विषयाशी संबंधित नाही. त्यांनी रोडवर अतिक्रमणासाठी स्वतःचा अर्ज देऊन दुसऱ्यांचे अतिक्रमण काढा असा तो अर्ज आहे. ३) दिनांक ९.३.२००९ ला माहितीच्या अधिकारात अर्ज देऊन सन १८९१-९२ व सन १९१३-१४ ची बंदोबस्त जागेचा खचरा व नकाशा मिळण्याबाबत अर्ज केला होता. त्याच दिवशी ते बांधकाम विभागात येऊन त्यांनी वरील कागदपत्राची तोंडी मागणी केली असता त्यांना अभियंता श्री. वानखेडे यांनी सन १९४५ चा देवळी सिटी सर्व्हेचा जिर्णावस्थेत असलेला नकाशा व खचरा दाखवून त्यांना तो जिर्णावस्थेत असल्यामुळे देऊ शकत नाही असे सांगितले होते. असे असतांना सुध्दा त्रास देण्याचे दृष्टिने त्यांनी हा अर्ज केला. सदर अर्जानुसार त्यांना न.प.पत्र क्र. ६५७, दिनांक २०.३.२००९ अन्वये नकाशा व खचरा अतिशय जिर्ण असल्याने व त्याचे तुकडे पडल्यामुळे तो उपलब्ध करुन देऊ शकत नाही असे कळविले. सदर अर्जावर त्यांचे परिवारातील श्री. सुमित निळे यांची पत्र मिळाल्याबाबत सही आहे. ४) दिनांक १९.३.२००९ चा अर्ज या विषयाशी संबंधित नसून अतिक्रमणाबाबत आहे. ५) दिनांक ७.५.२००९ चा अर्ज नकाशा मिळण्यांबाबत केला तेंव्हा पुन्हा त्यांना न.प.पत्र क्र. ७०, दिनांक २६.५.२००९ अन्वये सन १९४५ चा देवळी सिटी सर्व्हेचा नकाशा व खसरा अतिशय जिर्ण झाला असल्याने व त्याचे तुकडे पडल्याने देऊ शकत नाही असे पत्र घेऊन नगरपालिकेतील शिपाई श्री. अशोक पारीसे हा दिनांक २६.५.२००९ ला स्वतः घेऊन गेला असता त्यांनी पत्र घेण्यांस नकार दिला. त्यामुळे तो सदर पत्र घेऊन परत आला तसे या पत्रावर त्यांनी लेखी बयाण दिलेला आहे. ६) दिनांक १८.५.२००९ ला प्रथम अपील म्हणून दाखल केलेल्या अर्जावर रुपये २०/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावलेला नाही. तसेच नियमाप्रमाणे प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही. फक्त रुपये १०/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावला आहे त्यामुळे अर्जदाराचे प्रथम अपील विचारात घेतले नाही. वरील ६ अर्जापैकी अ.क्र. १, २ व ४ हे अर्ज या विषयाशी संबंधित नाही. सदर अर्ज त्यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद, देवळी या नावाने करायला पाहिजे होते ते सचिव, नगरपालिका या नावाने केलेले आहे. देवळी हे गाव १५८७८ लोकसंख्येचे छोटे गांव आहे. माहितीचा अधिकार कायदा २००५ लागू झाल्यापासून नगरपालिका कार्यालयात जेवढे अर्ज आले तेवढया अर्जदारांना मुदतीत माहिती पुरविण्यांत आलेली आहे. अपीलमध्ये एकही अर्जदार गेलेला नाही. अपीलकर्त्याला कार्यालयात प्रत्यक्ष दिनांक ९.३.२००९ ला जिर्ण अवस्थेत असलेला नकाशा व खचरा दाखविला असतांना सुध्दा माहितीच्या अधिकारात अर्ज करणे. दिनांक ७.५.२००९ च्या अर्जाचे उत्तरादाखलचे पत्र न घेणे त्यांना त्यांचे दुकानासमोर रस्त्यावर अतिक्रमण करुन शेडचे बांधकाम करण्यांकरिता रोक लावल्यामुळे ते जाणूनबुजून माहितीच्या अधिकारात अर्ज व अपील करुन त्रास देत आहे. दुसऱ्याच्या तक्रारी करणे हा अर्जदाराचा मुळ स्वभाव आहे. सन १९४५ चा देवळी सिटी सर्व्हेचा जिर्ण नकाशा व खसरा दिनांक २२.२.२०१० ला आपल्यासमोर पेश करण्यांत येत आहे. सदर अर्जदार माहितीच्या अधिकाराचा वापर करुन हेतुपुरस्सर त्रास देत आहे. करिता याबाबत सविस्तर अहवाल सविनय सादर करण्यांत येत आहे. तसेच सर्व

कागदपत्रे ही आयोगाचे निदर्शनास आणली ती कोणत्याही प्रकारे वाचता येणार नाही असे दिसून आले व त्या सर्व अभिलेखाचे तुकडे पडले आहे.  त्यातही काही कागद सरळ करता येत नाही ही वस्तुस्थिती असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अधिनियमाचे कलम ७(९) प्रमाणे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांचा खुलासा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९/२०१०.

श्री. एजाज उद्दिन अहेमद,
द्वारा- राजेंद्र वाडीभस्मे, गुरुजी वार्ड,
ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, गडचिरोली. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. साळवे, अधिक्षक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.७.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे अहेमद कुरेशी मेमोरिअल ऊर्दु हायस्कूल, कुरखेडा, जिल्हा गडचिरोली येथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती आदेशास मान्यता मिळण्याकरिता संस्था/शाळा समितीने सादर केलेल्या ठराव (प्रस्ताव) दस्तांची साक्षांकित छायाप्रत. ईसवी सन २००० ते २००१, २००४-२००५ दरम्यान. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.७.२००९ रोजी सदरची माहिती या कार्यालयास उपलब्ध नाही. तसेच सदर शाळा या जिल्हयातून स्थलांतरीत झालेली आहे. त्यामुळे सदरची माहिती दि.स्टुडंट वेलफेअर एज्युकेशन सोसायटी, देसाईगंज या संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय हा कायम ठेवण्यात आलेला आहे व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सांगितले की, सदरची शाळा ही सन २००४ पासून स्थलांतरीत झाली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी २००४ पूर्वीची माहिती मागितलेली असल्यामुळे ती माहिती संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असावयास पाहिजे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती तपासून पाहिली. परंतु त्यांचेकडे माहिती नाही. तरी पुन्हा शोध घेऊन माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत त्यांनी मागितलेल्या माहितीचा कसून शोध घेऊन माहिती उपलब्ध झाल्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०/२०१०.

श्री. राजन गोंडाणे,
रेशिमबाग ग्राऊंड चौक,
सिरसपेठ, नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. झेड. सिध्दीकी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

डॉ. श्री. मिलींद गणवीर,
जनमाहिती अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.२.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे नागपूर महानगरपालिकातील प्रत्येक झोन मधील काम करणारे ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांच्या ऐवजी कार्डची झेरॉक्स प्रत पुरावेशीर द्यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदर अर्जासोबत बी.पी.एल. प्रत जोडली आहे असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.९.२००९ रोजी आरोग्य विभागात कार्यरत ऐवजदारांना कार्ड देते वेळी फक्त एक प्रत ऐवजदारांसाठी बनविल्या जाते व त्याचवेळी त्यांना निर्गमित सुध्दा केली जाते. ऐवजदार कार्डाची प्रत कार्यालयात उपलब्ध राहात नाही. असे कळविले असल्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ८.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३१.१०.२००९ रोजी देण्यात आला असून वैयक्तिक सध्या कामावर असलेल्या ऐवजदारांच्या ऐवजी कार्डची झेरॉक्स प्रत संबंधित सफाई मजदुरांकडून उपलब्ध करुन घ्यावी व त्याची झेरॉक्स प्रत किंवा स्कॅनिंग करुन रेकॉर्ड डिसेंबर, २००९ पर्यंत अद्यावत करुन ठेवावा. परंतु त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु डिसेंबर, २००९ पर्यंत रेकॉर्ड अद्यावत करुन झालेला असल्यास अपीलकर्ता यांना त्यांच्या छायांकित प्रती

उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल किंवा ३० दिवसामध्ये रेकॉर्ड अद्यावत करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे डिसेंबर, २००९ पर्यंत रेकॉर्ड अद्यावत झालेला असला तर त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्यात व अद्यावत झालेला नसेल तर ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११/२०१० व अपील क्रमांक १२/२०१०.

श्री. सुरेश शालिकराम दुरुगकर,
श्रीनगर चंद्रशेखर वार्ड,
ता. जि. गोंदिया. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जयंत चौधरी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (पुरवठा विभाग),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. देवराव वानखेडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक विभागीय पुरवठा अधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग,
ता. जि. गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग,
ता.जि. गोंदिया. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२०१० व दिनांक ४.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ११/२०१० मध्ये दिनांक ८.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त, पुरवठा विभाग, नागपूर यांच्याकडे दिनांक १.१.२००९ पासून दिनांक ८.९.२००९ या कालावधीतील दिनांक ३.१.२००९ विनंती पत्र व दिनांक २१.३.२००९ ला अपील दाखल केले त्यावरील कार्यवाही. तसेच उपआयुक्त यांना असलेल्या अधिकाराची माहिती व श्री. नरेश राजारामजी वंजारी यांचे शिधापत्रिकाची छायांकित प्रती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक

२२.९.२००९ रोजी एकूण रुपये ६६/- चालानद्वारे लेखाशिर्षामध्ये भरणा करुन चालानची मुळप्रत या कार्यालयास सादर करावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती पुर्णपणे दिली नाही. खोटी व बनावट, अर्धवट माहिती दिली. श्री. एन. आर. वंजारी यांची कुटुंबाची शासनाने दिलेली शिधापत्रिकाची छायांकित प्रत दिली नाही या कारणासाठी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २१.१२.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना ४ मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचे स्वतःचे बी.पी.एल.कार्ड रद्द केले आहे व त्यामुळे त्यांनी ही माहिती मागितलेली आहे व ज्या एन. आर. वंजारी यांनी रद्द केलेले आहे त्यांच्या कौटुंबिक शिधापत्रिकेची माहिती मागितलेली आहे. ती देण्यात आलेली नाही यावरुन अपीलकर्ता यांनी ही माहिती मागितलेली दिसून येते. यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता ही जी माहिती मागतात त्यातून त्यांना काय अभिप्रेत असते हे कळून येत नाही. त्यांना माहितीकरिता रुपये ६६/- चा खर्चाचा भरणा करावा असे कळविले. त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना २६ पृष्ठ उपलब्ध करुन दिले त्यानुसार रुपये ५२/- घेणे आवश्यक होते. परंतु ३३ पृष्ठ उपलब्ध करुन देण्याकरिता रुपये ६६/- घेण्यात आलेले आहेत. यावरुन अपीलकर्ता यांना २६ पृष्ठ उपलब्ध करुन दिले असल्यामुळे त्यांचे रुपये ७/- परत करणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १२/२०१० मध्ये दिनांक २४.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा बाघ इटियाडोह सिंचन कार्यालय, गोंदिया यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) उपविभागीय अभियंता, बाघ इडियाडोह, वडसा शाखा वडसा, आरमोरी, कोरंबी, कोन्हाळया सन २००५ पासून २००९ पर्यंत शासनाकडून मिळणारे अनुदानाची छायांकिंत प्रत. २) सन २००५ ते २००९ पर्यंत कामाचे विवरण. ३) काम केले ठेकेदाराचे (लायसन्स) नोंदणी प्रमाणपत्राची झेरॉक्स. ४) एम.बी. o.c. दाखविण्यात यावी. आवश्यकता पडल्यास छायांकित देण्यात यावी. तसेच एम.बी. प्रमाणित प्रतची छायांकित प्रत. ५) देय केले बिलांची प्रमाणित छायांकित प्रत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.१२.२००९ रोजी अंदाजित रुपये ११३५०/- फक्त व टपालखर्च अंदाजित रुपये ३००/- फक्त असे एकूण रुपये ११६५०/- फक्त रोखीने भरणा करावा. आपणाकडून रक्कमेचा भरणा होताच मुद्या क्रमांक १, २ व ५ ची माहिती नियमान्वये उपलब्ध करुन देण्यात येईल व मुद्या क्रमांक ३ व ४ ची माहिती प्रत्यक्षपणे आपण आपल्या सोईचा दिनांक ८ दिवसापूर्वी या कार्यालयास कळवावा त्या दिनांकास ती माहिती दाखविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी रुपयांचा भरणा न करता दिनांक २२.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले व त्यामध्ये अंदाजे रुपये रक्कम भरण्याची तरतुद नाही. पाहणी करुन स्वतःचे पैशाने झेरॉक्स करण्यात येईल व प्रती तास रुपये ५ प्रमाणे निरिक्षण फी भरण्यास तयार आहे असे नमुद केलेले आहे. परंतु त्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी माहितीचे अवलोकन केल्यानंतरच फी भरुन माहिती उपलब्ध करुन घेईल असे अर्जात मागितले होते. परंतु तसे न करता जनमाहिती अधिकारी यांनी अंदाजित रुपये ११३५०/- ची मागणी केलेली आहे व अंदाजितची तरतुद नसल्यामुळे त्यांनी पैशाचा भरणा केलेला नाही. जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात असल्यामुळे निश्चित कागदपत्रे किती होतील हे सांगता येत नाही व कोणतीही मोजदाद करणे

व पैसे मागणे यामुळे कार्यालयाचा वेळ जातो. त्यामुळे अपीलकर्ता यांना अंदाजित पैशाचा भरणा करावा असे

कळविले होते.  परंतु अपीलकर्ता यांनी पुन्हा युक्तिवाद करतांना असे सांगितले की, ती कागदपत्राचे अवलोकन घेतले व त्यातून जी कागदपत्रे आवश्यक आहेत त्यांची छायांकित प्रती प्रत्यक्ष रुपये २/- प्रमाणे उपलब्ध करुन घेतील त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ११/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून श्री. एन. आर. वंजारी यांनी शिधापत्रिका उपलब्ध करुन देतांना जी कागदपत्रे कार्यालयात दाखल केली असतील त्या कागदपत्रांची छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच अपीलकर्ता यांना रुपये ७/- हे परत करण्यात यावे.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १२/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांना शासकीय कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ कळवून त्या दिवशी उपस्थित राहून मागितलेल्या माहितीच्या अभिलेखाचे अवलोकन विनामुल्य करुन ज्या कागदपत्राच्या छायांकिंत प्रती त्यांना हव्या असतील त्या प्रती पृष्ठ रुपये २/- प्रमाणे माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

३) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९/२०१०.

श्री. विनोद रामदासजी खोबे,
मु. पो. ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. जी. मंतलवाड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.

श्री. जी. एन. धारगांवे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, चामोर्शी यांचेकडे श्री. विश्वनाथ कु. सेडमाके व भाऊजी स. ढुरपे, रा. मुधोली चक नं. १ यांचे शेतात आपले कार्यालयामार्फत मातीकाम करुन देण्यात आले काय ? केले असल्यास अंदाजपत्रकाची सत्यप्रत देण्यात यावी. तसेच सदर कामावर किती खर्च झालेला आहे. त्या पगार पत्रकाची सत्यप्रत देण्यात यावी. माहितीचा कालावधी सन २००८-२००९ व सन २००९-२०१०. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालयात जाऊन माहिती बघितली व माझे समाधान झाले. आता याबाबत माझी काही तक्रार नाही व मी माहिती बघीतली असून आता मला माहितीचे झेरॉक्स प्रतीची आवश्यकता नाही असे निवेदन दिले असून सदर निवेदन जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे कार्यालयास सादर केले असून अर्जदारास संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तरीपण त्यांची काही तक्रार असल्यास मी जबाबदार राहीन असे जनमाहिती अधिकारी यांनी पत्र दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५५/२०१०.

श्री. देवाजी रामजी गुरुमुखी,
मकान नं. ३-६-१४/१२, टाईप -VI क्वार्टस,
आईलसिडस कॉलनी, हिमायतनगर,
हैद्राबाद - ५०० ०२९ (आंध्र प्रदेश) ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. कुंभारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. जि. भंडारा - ४४१ ९०४.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. जि. भंडारा. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, भंडारा यांचेकडे मौजा बेला, तलाठी साजा क्र. १० श्री. सदाशिव श्रावण कारेमोरे व श्री. मधुकर श्रावण कारेमोरे यांचे आपसी फेरफार क्रमांक ६६० दिनांक १९.१.१९८० नुसार श्री. सदाशिव श्रावण कारेमोरे यांचा गट/खसरा क्र. कोणता आणि श्री. मधुकर श्रावण कारेमोरे यांचा गट/खसरा क्र. कोणता याचे विवरण मागितलेले दिसून येते. तसेच दिनांक २१.११.१९८२ रोजी कोणत्या रेकॉर्डच्या आधारावर अकृषक आदेश पारित करण्यात आला त्याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १५.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु त्यानंतर दिनांक २२.७.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक १४.८.२००९ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी पुन्हा दिनांक २५.९.२००९ रोजी उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचेकडे पत्र दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १०.८.२००९ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. त्यामध्ये माहिती दिली

असल्यामुळे अपील खारीज करण्यात येते असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. तहसीलदार, भंडारा हजर नसलेतरी त्यांनी खुलासा दाखल केलेला आहे. तो खालील प्रमाणे आहे. उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, श्री. देवाजी रामजी गुरुमुखी, रा. मकान नं. ३-६-१४/१२ टाईप - ६ क्वाटर्स ऑइल सिड्स कॉलनी, हिमायत नगर, हैद्राबाद यांनी माहितीचा अधिकारांतर्गत माहिती मिळण्याकरिता दिनांक ६.५.२००८ ला हया कार्यालयास अर्ज सादर केला. त्याअनुषंगाने अर्जदारांनी विचारलेली माहिती ही तलाठी बेला, साजा क्र. १० यांचे कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अर्जदारांनी हया कार्यालयास सादर केलेला मुळ अर्ज हया कार्यालयाने पत्र क्र. प्रस्तु-१/तहभं/कावि/६८८/०८, दिनांक १५.५.२००८ ला पाठविण्यात आला असून सदर पत्राची प्रत अर्जदारास देण्यात आली. त्यानुसार तलाठी बेला, साजा क्र. १० यांनी अर्जदारांनी अर्जामध्ये मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे सदर माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे अर्जदार श्री. देवाजी रामजी गुरुमुखी यांनी दिनांक १५.७.२००९ ला मा. उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचेकडे अपील दाखल केली. सदर अपील अर्जाचे अनुषंगाने मा. उपविभागीय अधिकारी, भंडारा यांनी दिनांक ७.८.२००९ रोजी सकाळी ११:०० वाजता अर्जदारांनी मागणी केलेल्या रेकार्डच्या प्रतीसह माझे समक्ष उपस्थित राहण्याबाबत पत्र दिले. त्यानुसार दिलेल्या तारखेवर अर्जदारांनी मागणी केलेली माहिती तलाठी बेला यांचेकडून उपलब्ध करुन घेऊन (रेकार्डला जशी माहिती उपलब्ध आहे तशी) पेशी तारखेवर हजर झाले व त्याच वेळेस अर्जदार श्री. देवाजी रामजी गुरुमुखी यांना मौजा बेला येथील फेरफार क्र. ६७० दिनांक २९.६.१९८० अन्वये झालेल्या खातेफोडमध्ये ७/१२ च्या मुळ रेकॉर्डला उपलब्ध असलेले ५२/२, व ५२/२ असे दोन्ही ७/१२ व फेरफार पंजीच्या प्रती अर्जदारास तात्काळ पुरविण्यात आल्या. अर्जदारांनी मागितलेली माहिती त्याचवेळेस पुरविण्यात आल्यामुळे मा. उपविभागीय अधिकारी, भंडारा यांनी दिनांक १०.८.२००९ च्या आदेशानुसार अर्जदारांचे अपील अर्जानुसार माहिती मिळाल्यामुळे सदर अर्जावर पुढील कार्यवाहीची आवश्यकता नसल्यामुळे प्रकरण नस्तीबध्द करण्यांत आले. सदर अर्जानुसार माहिती पुरविण्यांत आली. परंतु अर्जदारास त्यांनी मौजा बेला येथील खसरा नं. ५२/१ चा नवीन गट नं. १७८/१ मधील प्लॉट क्र. ९५, ९६ चे फेरफार घेऊन वेगळा ७/१२ करुन मिळण्याबाबतची मागणी होती. परंतु रेकार्डला अर्जदाराचे नांवे वेगवेगळे ७/१२ नसल्यामुळे सदर ७/१२ देता आले नाही. त्यासंबंधात प्रकरण हया कार्यालयास न्यायप्रविष्ठ होते. सदर प्रकरणात अर्जदारांनी श्री. सदाशिव श्रावण कारेमोरे यांचेकडून मौजा बेला येथील गट नं. ५२/१ मधील प्लॉट नं. ९५ व ९६ असे दोन प्लॉट स्वतःचे व पत्नीच्या नावांने विकत घेतले. सदर प्लॉट विकत घेतल्यानंतर विक्रीपत्रानुसार फेरफार करुन घ्यावयास पाहिजे होते. परंतु अर्जदारांनी त्यावेळेस दोन्ही प्लॉटचे फेरफार घेऊन वेगवेगळे ७/१२ तयार करुन घेतलेले नाही. त्यानंतर श्री. सदाशिव श्रावण कारेमोरे हे मरण पावले असून त्यांचे वारसानांचे नांव व त्यांचा भाऊ मधुकर श्रावण कारेमोरे यांचे नांव दर्ज झाले. मौजा बेला येथील खसरा नं. ५२ चे गट नं. १७७/अ/१ व १७८/१ असे दोन गट नं. पडले. परंतु त्या अगोदर खसरा नं. ५२ चे बटे पडल्यानंतर ५२/१ व ५२/२ असे दोन गट नं. पडावयास पाहिजे होते. परंतु तलाठी यांचे नजरचुकीमुळे दोन्ही गट नं. ५२/२ व ५२/२ असे गट नं. पडले व सदर गट नं. चे पुर्नमोजणीमध्ये १७८/१ व १७७/अ/१ असे नविन गट नं. तयार करण्यात आले. दोन्ही गट नं. च्या रेकार्डची तपासणी केली असता गट नं. ५२/१ चे नवीन गट नं. १७८/१ च्या ७/१२ रेकार्डमध्ये सदाशिव श्रावणी कारेमोरे यांचे वारसानांचे नांव व मधुकर श्रावण कारेमोरे यांचे नांव दर्ज आहे. परंतु जुन्या ७/१२ मधुकर श्रावण कारेमोरे यांचे नावासमोर १९५७५ चौ.फुट जागा दर्शविलेली आहे. सदर ७/१२ मध्ये एकूण आराजी ०.७९२९.०५ चौ.मी. जागा असून मधुकर श्रावण कारेमोरे यांची १९५७५ चौ.फुट

जागा वगळून श्री. सदाशिव श्रावण कारेमोरे यांचे वारसानांचे नावाने शिल्लक असलेल्या जागेतून श्री. देवाजी रामजी गुरुमुखी यांचे प्लॉट नं. ९५, ९६ चे त्यांनी केलेल्या विक्रीपत्रानुसार हया कार्यालयाचे दिनांक ११.२.२०१० ला फेरफार घेण्याचे आदेश पारित करण्यात आले. त्यानुसार तलाठी बेला साजा क्र. १० यांनी फेरफार क्रमांक ५३९३ व ५३९४ नुसार फेरफार घेऊन प्लॉट नं. ९५ व ९६ चा वेगळा

७/१२ तयार करण्यात आलेला असून तो अर्जदारास पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात अपीलकर्त्यांने मागणी केलेली माहिती हया कार्यालयामार्फत पुरविण्यात आलेली असल्यामुळे सदर प्रकरण नस्तीबध्द करण्याबाबत आदरपुर्वक विनंती करण्यात येत आहे. वरील प्रमाणे माहिती अपीलकर्ता यांना पुरविण्यात आलेली आहे असे म्हटले असले तरी अपीलकर्ता यांना अद्याप पर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही असे आयोगापुढे सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना तलाठी, बेला साजा क्रमांक १० यांनी फेरफार क्रमांक ५३९३ व ५३९४ नुसार फेरफार घेऊन प्लॉट नं. ९५ व ९६ चा वेगळा ७/१२ तयार केलेला अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावा व तशी पोच घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५८/२०१०.

सौ. पंचफुला महादेवराव पिसे,
नेताजी वार्ड क्र. १,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. .....

**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. सलामे,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, हिंगणघाट,
जि. वर्धा.

श्री. कु. राठोड,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्राम पंचायत दोदुडा, पो. शेकापूर (बाई)
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक १८.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती यांचे वतीने श्री. बी. व्ही. बेताल हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ३१.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट यांचेकडे सन १९६२-६३ ते २००९ ऑगष्ट या कालावधीतील तसेच दिनांक १.६.२००९, दिनांक ६.७.२००९ व दिनांक ३.८.२००९ ला लोकशाही दिनामध्ये केलेल्या तक्रारीची कार्यवाहीची माहिती व त्यासंदर्भात माहिती एकूण १० मुद्यांवर मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.९.२००९ रोजी अपीलकर्ती यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २२.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १९.११.२००९ रोजी देण्यात आला असून मुदतीचे आंत माहिती दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते.

३.  अपीलकर्ती यांचे प्रतिनिधी यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना सदरच्या मकानाचे संदर्भामध्ये त्यांची नावे लावून पाहिजे आहे व त्याबद्यलची त्यांनी माहिती मागितली. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ती यांना माहिती योग्य रितीने उपलब्ध करुन दिलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणत्याही प्रकरणात कार्यवाही करुन मिळत नाही. अपीलकर्ती यांनी मुंबई ग्राम पंचायत अधिनियमाप्रमाणे स्वतंत्रपणे अर्ज करुन किंवा गट विकास अधिकारी, हिंगणघाट यांचेकडे अर्ज करुन निर्णय मिळवून घेणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७४/२०१०.

श्री. विनायक महादेवराव हेडाऊ,
द्वारा - श्री. अनील वासुदेव पांडे यांचे घरी,
प्लॉट नं. २८, मिरे-ले-आऊट,
उमरेड रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रदीप बमनोटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, कुही,
जि. नागपूर.

श्री. एस. आर. वानखेडे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
गट ग्राम पंचायत, तितूर,
ता. कुही, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे वतीने श्री. आनंद वानखेडे, वकील हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, गट ग्रामपंचायत, तितूर, ता. कुही यांचेकडे महादेव आप्पाजी हेडाऊ यांच्या घराच्या मागील भागाला महादेवराव राऊत यांनी बांधलेली भिंत नियमानुसार वैध आहे काय ? येथे सुरु केलेल्या अथवा बांधलेल्या बांधकामाची ग्रामपंचायत तितूरची परवानगी घेतलेली आहे काय ? तसेच महादेवराव राऊत यांच्या घराचे व एकूण जागेचे क्षेत्रफळ किती ? असेसमेंटची प्रत व बांधकामाचा नकाशा इत्यादीचे दस्ताऐवज मागितलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्याबद्यलची अपीलकर्ता यांनी माहिती स्विकृत झाल्याची पोस्टाची स्विकृती सुध्दा दाखल केलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही या कारणासाठी दिनांक २२.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरचा प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.११.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता हे गैरहजर होते व अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे माहिती देता आली नाही. तसे खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, कुही व विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कुही व तसेच श्री. एस. आर. वानखेडे, सचिव, ग्राम पंचायत, तितूर यांनी स्वाक्षऱ्या केलेल्या दिसून येतात. परंतु प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना

दिनांक २३.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली याचा उल्लेख दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे वकील श्री. आनंद वानखेडे यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांना त्यांचे पक्षकाराने सुचना दिलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी जी कागदपत्रे दाखल केलेली आहेत ती कागदपत्रे सुध्दा श्री. आनंद वानखेडे, वकील यांना निरिक्षणास दिलेली नाही अशी त्यांची तक्रार आहे. अपीलकर्ता यांना जी माहिती पाठविलेली दिसून येते त्यावर पोस्टाची जी स्विकृती पावती आहे त्यावर पोस्टाचा शिक्का हा व्यवस्थित दिसून येत नाही व जनमाहिती अधिकारी यांनी जावक नोंदवहीचे रजिस्टर सुध्दा दाखल केलेले नाही. अपीलकर्ता यांना दिनांक २३.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली त्याबद्दलचा उल्लेख आहे. प्रथम अपीलाचे नोटशिटमध्ये तसा उल्लेख असावयास पाहिजे होते परंतु ते दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलाची योग्य ती सुनावणी घेऊन ग्राम विकास अधिकारी यांनी माहिती दिली किंवा नाही हे अधिनियमाचे कलम १९(५) प्रमाणे त्यांना विचारणे आवश्यक होते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांना दिलेल्या अधिकाराचा योग्य तो वापर केलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता गैरहजर जरी असले तरी माहिती दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी जनमाहिती अधिकारी यांची असते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २३.६.२००९ रोजी माहिती दिली ही बाब प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये असणे आवश्यक होते परंतु तशी ती दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १३.७.२००९ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी व तशी पोच अपीलकर्ता यांचेकडून घ्यावी. तसे जनमाहिती अधिकारी यांनी न केल्यास त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७/२०१०.

श्री. शुभराज मधुकरराव गजरे,
रा. धाडी, पो. साहूर, ता. आष्टी,
जि. वर्धा - ४४२ २१३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
विशेष प्रकल्प मंडळ, बांधकाम संकुल,
बंगला क्र. ३९/१, सिव्हिल लाईन,
नागपूर.

श्री. आर. एन. होतवाणी,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्रीमती कनोजे, सहाय्यक अधिक्षक अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम, उपविभाग, आष्टी यांचेकडे आष्टी, द्रुगवाडा रोड योजना, आमदार, खासदार निधी, रस्त्यावर डागडुगी, दुरुस्ती व देखभाल करिता झालेला खर्च इत्यादी माहिती एकूण ५ मुद्यांवर मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.५.२००९ रोजी कार्यकारी अभियंता यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी सुध्दा माहिती शाखा अभियंता यांचेकडे मागितलेली दिसून येते व अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक आहेत असे दिसून येते. त्यासंदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक १५.४.२००९ रोजी बोलाविण्यात आले होते. दिनांक १५.९.२००९ ला व दिनांक २३.९.२००९ ला पत्र दिले. दिनांक १८.२.२०१० रोजी बोलाविण्यात आले अशी टिपणी दिसून येते व तसे पत्रही दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.९.२००९ रोजी देण्यात आलेला आहे व अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अद्यापही पुरविण्यात आलेली नाही असा निष्कर्ष काढण्यात आलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी

दिनांक ९.३.२००९ च्या अर्जाची माहिती दिनांक २०.४.२००९ रोजी देण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांना पत्र क्र. ३ नुसार दिनांक १५.१.२०१० पत्र क्र. ४८ नुसार पाठविण्यात आलेली माहिती सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे (माहिती आयोग, नागपूर) माहिती स्विकारु शकत नाही असे दिनांक १८.२.२०१० रोजी कळविलेले दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता हे दारिद्रय रेषे खालील प्रमाणपत्र धारक आहे असे म्हणतात. अपीलकर्ता यांचे संदर्भात चौकशी करुन हे दारिद्रय रेषे खालील प्रमाणपत्र धारक नाही असे गटविकास अधिकारी यांनी त्यांना कळविलेले आहे व त्यामुळे त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्याकरिता सक्षम अधिकाऱ्यांना कळविण्यात आलेले आहे. अर्जदार हे नेहमीच वारंवार माहिती मागत असतात व माहिती घेण्यास सुध्दा येत नाही व कार्यालयात सुध्दा हजर होत नाही व आयोगाकडे मात्र द्वितीय अपीलामध्ये दंड करावा अशी विनंती करतात. त्यावरुन अपीलकर्ता यांचा हेतु स्पष्ट दिसून येतो. अपीलकर्ता यांनी माहिती स्विकारु शकत नाही असे दिलेले आहे त्यामुळे त्यांना माहितीची आवश्यकता नाही असे दिसून येते. अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता असती तर त्यांनी अगोदर माहिती स्विकारली असती व त्यानंतर अपीलकर्ता यांनी आयोगाकडे विलंब झ ााल्याबद्यल दंड करावा याची दखल घेणे आवश्यक झाले असते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७३/२०१०.

श्री. विनायक महादेवराव हेडावू,
द्वारा - श्री. अनील वासुदेव पांडे यांचे घरी,
प्लॉट नं. २८ मिरे ले आऊट,
उमरेड रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बमनोटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, कुही,
जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
गट ग्राम पंचायत, तितूर,
ता. कुही, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.२.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे वतीने श्री. वानखेडे, वकील हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, गट ग्रामपंचायत, तितूर, ता. कुही, जि. नागपूर यांचेकडे १९५४-५५ या कालावधीतील ग्रामपंचायत बिल्ला (घर) क्र. २३५ चे एकूण क्षेत्रफळ व असेसमेंटबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी मला ग्रामपंचायत, तितूर कडून पाहिजे असलेली माहिती परिपूर्ण मिळालेली असल्यामुळे मी केलेली अपील आज दिनांक २४.२.२०१० ला मागे घेत आहे असे लेखी निवेदन राज्य माहिती आयोगास दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७५/२०१०.

श्री. विनायक महादेवराव हेडावू,
द्वारा - श्री. अनील वासुदेव पांडे यांचे घरी,
प्लॉट नं. २८ मिरे ले आऊट,
उमरेड रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बमनोटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, कुही,
जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
गट ग्राम पंचायत, तितूर,
ता. कुही, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.२.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे वतीने श्री. वानखेडे, वकील हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, गट ग्रामपंचायत, तितूर, ता. कुही, जि. नागपूर यांचेकडे गाव तितूर, ता.कुही, जि. नागपूर येथे सूशिला मनोहर शास्त्रकार यांनी केलेल्या बांधकामाबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी मला ग्रामपंचायत, तितूर कडून पाहिजे असलेली माहिती परिपूर्ण मिळालेली असल्यामुळे मी केलेली अपील आज दिनांक २४.२.२०१० ला मागे घेत आहे असे लेखी निवेदन राज्य माहिती आयोगास दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३४/नाग/२०१०

१) श्री मिलींद प्रेमदास मेश्राम,
परसोडी, गोपाल नगर रोड, श्रीधर किराणाच्या मागे, नागपूर
ता.जि. नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. ता.जि. नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(राजस्व विभाग)
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. ता.जि. नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ४.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक ४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे शासन निर्णय क्रमांक जमीन/९८/१५१५/२४/प्र.क्र.७५/९८/ज-१, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १६.४.२००१ व महाराष्ट्र शासन परिपत्रक महसुल वन विभाग, एलएनडी-१०९०/प्र.क्र.११५/ज-१, दिनांक २५.२.१९९१ प्रमाणे आजपर्यंत किती अपंगांनी अर्ज केला व किती अपंगांना २०० स्के.फिट जागा मिळाली, त्या सर्व कागदपत्रांची माहिती पुरविण्यात यावी, अशा स्वरुपाची माहिती मागीतली आहे. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केले आहे. अर्जदार दारिद्रय रेषेखाली असल्याचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.**

**३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ११.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००९ रोजी प्रथम अपील केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १.१२.२००९ रोजी देण्यात आला असून अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून तहसिलदार तसेच उपविभागीय अधिकारी यांचेकडून माहिती संकलीत होताच अपीलार्थीला आवश्यक ते शुल्क आकारुन माहिती पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. व त्यानंतर पुन्हा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु, त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली व ती खोटी उपलब्ध झाली. अपीलकर्ता यांचे पुढे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली त्यामध्ये, नागपूर विभागातून कोणत्याही अर्जदाराने अर्ज केला नाही, अशी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतु, त्यांनी स्वतः दिनांक १.२.२००३ व दिनांक ४.१२.२००३ रोजी दोन अर्ज केले होते. व त्या अर्जाची पुर्तता सुध्दा त्यांनी आतापर्यंत केलेली आहे. त्याबद्दल त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगीतले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली, ती संपूर्ण जिल्हयातील माहिती असल्यामुळे ती व्यापक प्रमाणावर अशी माहिती होते. व ती संपूर्ण जिल्हयामधून संकलीत करुन उपलब्ध करुन द्यावयाची होती. त्याकरीता संपूर्ण जिल्हयातील उपविभागीय अधिकारी यांना दिनांक ३०.९.२००९ रोजी पत्र पाठविण्यात आले होते व त्याप्रमाणे माहिती संकलीत झाल्यानंतर अपीलकर्ता यांना ती उपलब्ध करुन देण्यात आली. त्यामुळे विलंब झाला ही बाब त्यांनी मान्य केली. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी अर्ज केला आहे त्याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती ही दिलेली नाही. व त्यांच्या अर्जाच्या संदर्भात सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरची माहिती खोटी आहे असे त्यांनी सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी त्यांच्या अर्जाबद्दल माहिती विचारली असती तर ती माहिती त्यांच्या अर्जाचा शोध घेवून उपलब्ध करुन देता आली असती. तसेच त्यांचा अर्ज जूना असल्यामुळे व त्याबाबतचा कालावधी दिलेला नसल्यामुळे त्यांच्या अर्जाचा शोध घेता आला नाही असे दिसून येते. प्रथम अपीलात सुध्दा त्याबद्दलची कोणतीही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणलेली दिसून येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांच्या दिनांक १.१२.२००३ व ४.१२.२००३ रोजी दिलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अशंतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत, त्यांनी दिनांक १.२.२००३ व ४.१२.२००३ रोजी केलेल्या अर्जानुसार २०० स्के.फुट जमीन व्यवसायाकरीता मिळण्याकरीता नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात जो अर्ज दाखल केला होता त्या अर्जावरील झालेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३२/नाग/२०१०

१) श्री सुधाकर पांडूरंग महालकर
गुरुकुल नगर, एस.टी.स्टँडजवळ, रिंग रोड,पोस्ट के के नगर,
रामटेक, ता.रामटेक, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक)
नागपूर वनवृत्त, नागपूर, शासकिय मुद्रणालयाजवळ,
सिव्हील लाईन्स, नागपूर. जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी(नियोजन)
नागपूर वनवृत्त, नागपूर, शासकिय मुद्रणालयाजवळ,
सिव्हील लाईन्स, नागपूर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ४.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक ४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी(नियोजन,) मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालयात माहिती मागण्याचा अर्ज केलेला दिसून येतो. त्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात अपील क्रमांक ११७०/२००९ दाखल केले होते. व सदरच्या अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.१.२०१० रोजी दिला असल्यामुळे पुन्हा त्याच अर्जाच्या संदर्भात निर्णय देणे योग्य होणार नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

**३. परंतु, अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपील मेमोमध्ये नवीन माहिती मागितलेली आहे व ती खालीलप्रमाणे आहे.**

**"देय वेतन श्रेणीतील पुढील ३ वेतन वाढी रोखण्यात येत आहे व शासनाची रक्कम रुपये १८७४२५/- एवढी रक्कम ३६ हप्त्यात वसूल करण्यात यावी. हा आपण दिनांक ७.१०.२००२ ला पारीत केलेला आदेश लागू होण्यास आवश्यक लेखी पाठपुराव्याचे दस्ताऐवजाचे, शिल्लक सेवा कार्यकाळासंबंधीचे दस्ताऐवजाचे व वरील रक्कम वसूल करणे संबंधीचे दस्ताऐवजाचे झेरॉक्स प्रती."**

**४. त्यामुळे, सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना, जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या द्वितीय अपील मेमोमधील मुद्या क्रमांक ३ मधील पोट मुद्या क्रमांक (ii) ची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३३/नाग/२०१०

१) श्रीचंद झाडू लिलहारे,
पुरुषोत्तम धोटे महाविद्यालयाचे मागे, शिक्षक कॅालनी,
नरसाळा रोड, नरसाळा, नागपूर. ता.जि. नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
उमरेड विभाग, उमरेड, ता. उमरेड,जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन कुही, ता.कुही, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ४.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक ४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"१. अर्जदाराने दिनांक २२.६.०९ रोजी श्री ज्ञानेश्वर कानफाडे विरुध्द दिलेली तक्रार अदखलपात्र कां करण्यात आली. २. सदर अर्जाच्या अनुषंगाने ज्ञानेश्वर कानफाडे यांचे बयाण नोंदविण्यात आले असल्यास त्याची प्रत कायदेशीररित्या देण्यात यावी व ती देण्यास आपण असमर्थ असल्यास त्याचे कारण स्पष्ट करण्यात यावे. ३. श्री ज्ञानेश्वर कानफाडे विरुध्द कार्यवाही कां करण्यात आली नाही त्याचा तपशिल व फौजदारी कार्यवाही कां होऊ शकत नाही त्याबाबत स्पष्टीकरणात्मक माहिती देण्यात यावी."**

**३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.१२.२००९ (२.१२.२००९ रोजी प्राप्त) रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु, उपलब्ध माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना बयाणानी माहिती दिनांक ८.१.२०१० रोजी उपलब्ध करुन देण्यात आली. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**४. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली होती. परंतु, प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यात आली कारण अदखलपात्र गुन्हा असल्यामुळे बयाण घेण्यात आले नव्हते. मात्र, अपीलकर्ता यांनी वरिष्ठ अधिकारी यांचेकडे तक्रार केल्यानंतर व प्रथम अपील दाखल केल्यानंतर बयाण घेण्यात आले. त्यामुळे त्या बयाणाची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली. तसेच प्रकरण हे प्लॅाटचे खरेदीचे आर्थिक देवाण-घेवाणीचे दिवाणी स्वरुपाचे असल्याने अदखलपात्र करण्यात आले नाही, असे अर्जदारास कळविण्यात आलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं.३५/नाग/२०१०

१) श्री मनोज शामराव वाडीभस्मे,
राजगुरु वार्ड, भंडारा. ता.जि. भंडारा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय अर्जूनी मोर, ता. अर्जूनी मोर
जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
तहसिल कार्यालय अर्जूनी मोर, ता.अर्जूनी मोर,
जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ४.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक ४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय अर्जूनी मोर यांचेकडे, प्रकाश तानाजी पराते, खुशाल नारायण नंदनवार, रामनाथ महागू नंदनवार, सुखदेव कवडु नंदनवार, जगन्नाथ सदाशिव निखारे, पुरुषोत्तम रामजी बोकडे, हेमराज सन्तु नंदनवार यांना दिनांक १९.८.१९८८ ला दिलेल्या हलबा जातीचे प्रमाणपत्राची छायाप्रत, मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.१०.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीकडून मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांचे आंत अपीलार्थीला देवून तसे या कार्यालयास कळविण्याचे निर्देश देवून अपील नस्तीबध्द करण्यात आलेले दिसून येते. परंतु, त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी पुर्वी सुध्दा सदरची माहिती मागितली होती व त्यात त्यांना दिनांक १८.३.२००९ व दिनांक २४.४.२००९ रोजी वस्तुस्थिती कळविण्यात आलेली होती. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना प्रकाश तानाजी पराते, खुशाल नारायण नंदनवार, रामनाथ महागू नंदनवार, सुखदेव कवडु नंदनवार, जगन्नाथ सदाशिव निखारे, पुरुषोत्तम रामजी बोकडे, हेमराज नंदनवार सर्व रा. सानगडी यांना दिनांक १९.८.१९८८ ला दिलेल्या हलबा जातीचे प्रमाणपत्राची माहिती अपीलार्थीने मागितलेल्य माहितीच्या संदर्भाने सहाय्यक माहिती अधिकारी यांनी प्रकरणाचा शोध घेतला असता जातीची प्रकरणे उपलब्ध झाली नाही, त्यामुळे अर्जदारास माहिती पुरविता आली नाही. अपीलार्थीस माहिती संदर्भाने महसुल प्रकरणाची नोंद वही नमुना-१० एम.आर.सी.-८१ या रजिस्टरची छायांकित प्रत या अगोदर पुरविण्यात आलेली आहे, असे सांगितले. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी आयोगास पुन्हा सांगीतले की, अपीलकर्ता यांची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता कसून शोध घेण्यात आला. परंतु, कार्यालयामध्ये जातीच्या प्रमाणपत्राची प्रत आढळून आली नाही. सहाय्यक माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय यांना सुध्दा मागितली. मागितलेल्या माहितीच्या प्रकरणांचा अभिलेखागारात तपास केला असता दिनांक १९.८.१९८८ ला दिलेल्या हलबा जातीच्या प्रमाणपत्रांचे एकही प्रकरण आढळून आले नाही, असा अहवाल दिलेला दिसून येतो. ही सर्व प्रमाणपत्रे दिल्याची नोंदवहीत नोंद उपलब्ध आहे. व त्या नोंदवहीतील नोंदीची छायांकित प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.**

**४. असे असले तरी, प्रकरणांचा पुन्हा कसून शोध घेवून जातीच्या प्रमाणपत्राची मुळ प्रकरणे उपलब्ध झाल्यास त्याच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना देणे संयुक्तिक राहील. परंतु, संबंधीत प्रमाणपत्र हे ज्यांची माहिती मागितलेली आहे त्यांच्याशी संबंधीत असल्यामुळे अधिनियमाचे कलम ११ प्रमाणे त्यांची अनुमती मागविणे आवश्यक आहे. व त्याप्रमाणे प्रक्रिया पुर्ण करुन प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास त्याच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत पुन्हा ज्या अभिलेखागारामध्ये सदरची प्रकरणे उपलब्ध असण्याची शक्यता आहे त्या अभिलेखागारामध्ये शोध घेवून प्रकरण उपलब्ध झाल्यास व मुळ प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध असल्यास, अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे संबंधीत व्यक्तींना विचारणा करुन, प्रक्रिया पूर्ण करुन माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा, अपीलकर्ता यांना नोंद वहीची छायांकित प्रत उपलब्ध झालेली असल्यामुळे माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं.१२५७/अम/२००९

१) श्री शेख रशीद शेख लाल
मु.पो. अचलपूर कासदपूरा, ता. अचलपूर,
जिल्हा अमरावती-४४४८०६. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
अचलपूर, ता. अचलपूर, जिल्हा अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
तहसिल कार्यालय, अचलपूर,
ता. अचलपूर, जिल्हा अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ५.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक ५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून तहसिलदार, अन्न व पुरवठा विभाग तहसिल कार्यालय, अचलपूर यांचेकडे दिनांक १२.६.२००८ रोजी केलेल्या अर्जावर (रॅाकेल न मिळण्याबाबत) झालेल्या कार्यवाहीची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.१२.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना पाठविण्यात आलेला दिसून येतो. परंतु, अपीलकर्ता यांना सदरचा अहवाल उपलब्ध झाला नाही या कारणास्तव त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांना दिनांक ८.१२.२००८ रोजी त्यांच्या अर्जाच्या चौकशीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. व चौकशी झाल्यानंतर सुध्दा दिनांक १७.१२.२००८ रोजी अहवाल पुरविण्यात आला आहे. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी स्वतंत्रपणे माहिती मिळाली अशा प्रकारे दिनांक ८.१२.२००८ ला सही दिलेली आहे व त्याबाबतची नोट शिट दाखल केली आहे. त्यानंतर सुध्दा दिनांक २२.१२.२००८ रोजी सुध्दा माहिती मिळाल्याचे अपीलकर्ता यांनी अपीलीय अधिकारी यांचेकडे लेखी दिलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२०१० रोजी आयोगाकडे सुनावणीच्याकरीता खुलासा दाखल केला आहे त्यात, आयोगाच्या नोटीस बध्दल तक्रार केलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना अपीलाच्या सुनावणीच्या कार्यपध्दतीची कोणत्याही प्रकारची माहिती आहे असे दिसून येत नाही. व कोणत्याही प्रकारे तक्रार करायची अशी त्यांची प्रवृत्ती दिसून येते. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे ही बाब मान्य न करता शास्ती लादावी अशी विनंती मात्र त्यांनी केली. परंतु, तहसिल कार्यालयामध्ये दोन वेळा माहिती उपलब्ध करुन दिल्याची सही केलेली आहे ही बाब त्यांनी त्यांच्या खुलाशात लपविलेली आहे. त्याकरीता अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १२५८/अम/२००९

१) श्री मो. युसुफ शे. रहिम,
रा. गवळीपुरा जाम्महोल्ला, अकोला,
ता.जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.१, अकोला,
ता.जिल्हा अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी
समाज कल्याण अधिकारी कार्यालय,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.१, अकोला
ता.जिल्हा अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ५.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक ५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. श्री या.रा. चव्हाण, संशोधन अधिकारी तथा जन माहिती अधिकारी, समाज कल्याण अधिकारी कार्यालय, अकोला हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्रीमती तराळ, विधी अधिकारी हया हजर आहे.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००८ रोजी समाज कल्याण अधिकारी व आयुक्त अकोला विभाग जात पडताळणी समिती,जिल्हा अकोला यांचेकडे, फैजान अहमद अब्दुल, इरफान अन्सारी, रा. बालापूर जि.अकोला प्रमाणपत्र क्रं.२६७९ ३/१०/२००३, २६/६/२००४ नुमान अहमद अन्सारी अब्दुल इरफान रा. बालापूर जि. अकोला सर्व डाकुमेन्डची नक्कल मिळणेबाबत, माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २९.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१.२००९ रोजी समाज कल्याण अधिकारी यांचेकडे पुन्हा अर्ज दाखल केलेला दिसून येतो. त्या अर्जाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची सुनावणी झालेली दिसून येत नाही. त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. द्वितीय अपीलाची नोटीस दिनांक १३.१.२०१० रोजी आयोगाचे नागपूर कार्यालयातून निर्गमित केल्यानंतर दिनांक २९.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे माहिती अधिकाराखाली मागितलेली संपूर्ण माहिती मिळाली, अशी पोच सुध्दा अपीलकर्ता यांनी दिलेली दिसून येते. तसेच त्याच दिवशी प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला दिसून येतो. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जात पडताळणी समिती क्रं.२ यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींची कोणत्याही प्रकारची माहिती आहे असे दिसून येत नाही किंवा ती त्यांची अकार्यक्षमता आहे. प्रथम अपील दाखल झाल्यानंतर ३० दिवसांचे आंत किंवा विशेष परिस्थितीत ४५ दिवसांचे आंत प्रथम अपीलाचा निर्णय देणे आवश्यक असते. परंतु, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी एक वर्षाच्या नंतर आयोगाकडून नोटीस निर्गमित केल्यानंतर निर्णय दिलेला आहे व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही तसेच प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा एक वर्षाच्या नंतर दिलेला असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई विभागीय आयुक्त, अमरावती यांनी करावी अशी शिफारस करण्यात येत आहे.**

**२) सदरच्या निर्णयाची एक प्रत विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. /३८/नाग/२०१०

१) श्री धर्मराज सोमाजी पारधी,
मु.पो. दांडेगांव, ता.जि. गोंदिया. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष,
श्री समर्थ एज्युकेशन सोसायटी, दांडेगांव,
द्वारा-अध्यापक विद्यालय दांडेगांव,
पो. दांडेगांव, ता.जि. गोंदिया. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
अध्यापक विद्यालय, दांडेगांव,
पो. दांडेगांव, ता.जिल्हा गोंदिया. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक ६.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, अध्यापक विद्यालय, दांडेगांव यांचेकडे, शिक्षक व लिपिकवर्गीय कर्मचा-यांचा मा. कक्ष अधिकारी (मागासवर्गीय कक्ष) नागपूर विभाग, नागपूर यांचे कडून मंजूर करण्यात आलेल्या रोस्टरची**

**झेरॉक्स प्रत मिळण्याबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेल दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, ते जी माहिती मागत आहे ती माहिती त्यांना दिली जात नाही व पत्र सुध्दा स्विकारले जात नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.**

**खुलासाः "आपणास सविनय विनंती करण्यात येत आहे की संस्थेच्या कार्यकारीणीची सभा अध्यापक विद्यालय दांडेगांव येथे दूपारी १२.०० सुरु असतांना मध्येच आमच्या संस्थेतील सेवानिवृत्त लिपिक धर्मराज पारधी हे सभेमध्ये दारुच्या नशेत येवून अध्यक्ष व सचिव यांच्याशी वाद घातला आणि मेरे लडके के बारे मे क्या हूवा, मेरे लडको का अपायमेंट करना है या नही, यह बताव नही तो बडा बुरा होगा अशा प्रकारे त्यांनी धमकी देण्याचा प्रयत्न केला असता प्राचार्य रहांगडाले यांनी त्यांना समजविण्याचा प्रयत्न केला असता त्याच्याशी सुध्दा वाद घातला आणि त्यांना म्हणाला तू हमारे बीच मे नही आना तू तो हरामखोर है तू अब कैसी नौकरी करता है मै भी देख लूगा. मेरे गांव मे तू तो नौकरी कर नही सकता, तेरी तो नौकरी अब मै खाकर करुंगा अब कैसे नौकरी करता है मै भी देख लूगा. तसेच बाहेर जाऊन संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांना अश्लील शिवीगाळ दिली त्यावेळी संस्थेचे सर्व लोक शांत राहीले.**

**ही व्यक्ती नेहमीच गुंडागर्दी करत असते, नेहमी दारु पिवून येतो आणि वाईट शब्दांचा प्रयोग करतो ही व्यक्ती दारु पिवून आपल्या मानवतेचा धर्म सोडून देतो आणि वाटेल त्या मार्गाचा अवलंब करतो.**

**आपल्या मुलाला नोकरी लावण्याकरीता गुंडागर्दीचा उपयोग करतो, दबाव तंत्राचा उपयोग करुन नौकरी प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करतो.**

**जर ही व्यक्ती माणुसकीने येवून कोणतेही माहिती सांगितली तर त्यांना अशी कोणतीही माहिती देण्यात तयार आहेत. आमची विद्यालयाला आज ५० वर्षे झालेली आहेत. आजपर्यंत कोणत्याच प्रकारचे वाद नाही पण ही व्यक्ती आमच्या मुलाला नौकरीवर लावण्याकरीता दारु पिऊन शिविगाळ करतो आणि गुंड प्रवृत्तीच्या लोकांना हाताशी धरुन धमकी देत असतो.**

**अपीलार्थीने जी काही माहितीची मागणी केली आहे ती माहिती देण्यास आम्ही तयार आहोत. अपीलार्थीने आमच्या कार्यालयात दारुच्या नशेत येवून माहिती मागितली असता नियमाप्रमाणे कागदपत्राच्या प्रतीची फीस मागितली असता अपीलार्थीने सदरहु फिस देण्यास नकार दिला व फुकटात माहितीच्या कागदपत्रांच्या प्रती पुरविण्याचा तकादा लावला.**

आम्ही अपीलार्थीस या बाबत वारंवार समज देण्याचा प्रयत्न केला असता उलट अपीलार्थीने आम्हाला अश्लील शब्दात शिविगाळ करुन खोटया प्रकरणात फसविण्याची धमकी दिली. अपीलार्थीने कोणतेही कारण नसतांना सदरहु अपील विद्यमान कोर्टात दाखल केलेली आहे. सदरची अपील हेतू पुरस्पर व खोटी असल्यामुळे ती खर्चासह खारीज करण्यात यावी ही विनंती."

**४.** सदरचा खुलासा अपीलकर्ता यांना वाचून दाखविण्यात आला. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती मागविण्याचा व त्यांच्या मुलाला नियुक्ती देण्याचा काहीही संबंध नाही. मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अनेक गैरव्यवहार आहे व त्यामुळे सदरची माहिती मागितली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा असे सांगितले की, अपीलकर्ता रोज दारु पिऊन त्यांच्या कार्यालयात येतात व सगळयांना शिविगाळ करतात. यावरुन अपीलकर्ता हे त्यांच्या मुलाला शिक्षकाची नियुक्ती मिळावी या कारणास्तव ते माहितीच्या अधिकारात अर्ज करुन संस्थेला व प्राचार्यांना त्रास देत आहे अशी आयोगाची खात्री झाली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**५.** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी हया प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी आहे. परंतु, अशा प्रकारे स्वतःच्या व्यक्तीगत हितासाठी गैर वापर करण्याकरीता सदरचा अधिनियम नाही. अपील खारीज करण्यास पात्र आहे.

आदेश

**१)** अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**२)** अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं /३९/नाग/२०१०

१) श्री सुभाष शेषराव जैन,
C/o जैन आय केअर सेंटर, मेन रोड, गांधीचौक,
श्री शिवचरण हिरापूरेचे मकान मु. तिरोडा,
ता. तिरोडा, जि. गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, गोंदिया, ता.जि. गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
शहिद मिश्रा हायस्कुल, तिरोडा, ता.तिरोडा, जि. गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक ६.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शहिद मिश्रा हायस्कुल, तिरोडा यांचेकडे, श्रीमती माधूरी सुभाष जैन, सहा. शिक्षिका, श.मि.विद्यालय, तिरोडा हयांची वेतनवाढ व घरभाडे भत्ता २९.६.२००९ तारखेपासून थांबविण्यात आलेले आहे ते कां, व कोणत्या कारणास्तव व कोणत्या तरतुदीनुसार व त्या तरतूदीनुसार शाळेतील किती कर्मचा-यांची वेतनवाढ व घरभाडे भत्ता थांबविलेला आहे हया सर्व बाबींची सविस्तर माहिती पुरविण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २४.१२.२००९ रोजी देण्यात आला असून श्री सुभाष शेषराव जैन यांना श्रीमती माधुरी जैन सहाय्यक शिक्षिका यांचे वेतनवाढ व घरभाडे भत्ता कां थांबविण्यात आलेले आहे, असे प्रश्न विचारलेले आहे. परंतु, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या प्रती पुरवावयाचे असते. यामुळे प्रकरणी आपल्याकडे उपलब्ध असलेले अभिलेख त्यांना पुरविण्याची व्यवस्था करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्याची व्यवस्था त्वरीत करावी, असे निर्देश देण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झ ाालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक २३.११.२००९ रोजी श्रीमती माधुरी सुभाष जैन, सहाय्यक शिक्षिका आहे, त्यांच्याशी आपला संबंध पत्रात नमुद नाही. माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करणे कायद्याने गुन्हा आहे. आम्ही इन्क्रीमेंट थांबविण्यासंबंधी दिनांक ५.६.२००९ ला पत्र क्रमांक ७१ तसेच HRA संबंधी दिनांक २९.६.२००९ ला पत्र क्रमांक ८४ व इतर आपणास हवी असलेली माहिती वैयक्तिकरित्या श्रीमती माधुरी सुभाष जैन यांच्या received copy वर सहया घेऊन पुरविण्यात आलेली आहे. त्यांचेशी वैयक्तिक संपर्क साधून माहिती मागून घ्यावी, असे कळविलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विना मुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे विरुध्द रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येईल व ती त्यांच्या दरमहिन्याचे वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./४१/नाग/२०१०

१) श्री धनराज किसनाजी झाडे,
मु.पो. महादुला, ता.रामटेक, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
रामटेक, ता. रामटेक, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय(संजय गांधी निराधार विभाग)रामटेक,
ता. रामटेक, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक ६.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे मौजा महादुला ता. रामटेक येथील दोन वर्षातील किती लोकांना संजय गांधी, श्रावण बाळ, राष्ट्रीय सहाय्यता योजना(दहा हजार रुपये) लाभ देण्यात आला त्यांची सविस्तर यादी मिळण्याबाबत. कालावधी मागील दोन वर्षे ते आतापर्यंत असा नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णयाच्या संदर्भात उपविभागीय अधिकारी, रामटेक यांनी प्रथम अपील हे मुदतबाहय असल्यामुळे खारीज करण्यात आलेले दिसून येत. व नवीन अर्ज दाखल करावा व माहिती मागावी असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक १४.१०.२००८ चा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त नाही. परंतु, सदरचा अर्ज रजिस्टर पोस्टाने पाठविला होता असा पुरावा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे सादर केला आहे व त्यात दिनांक १४.१०.२००८ रोजी तहसिल कार्यालयात स्विकृतीची सही दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी किंवा तहसिलदार यांनी सदरच्या सहिची पडताळणी करुन त्यांच्या कार्यालयात सदरच्याअर्जाची नोंद न घेण्यास जे जबाबदार असतील त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे.मात्र, अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे एक वर्षाच्या वर कालावधी झाल्यानंतर दाखल केलेले असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना दिनांक १२.१.२०१० रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, माहिती घेण्यास नकार दिला आहे व आयोगाचे आदेशाप्रमाणे माहिती घेणार आहे, असे आयोगापुढे सांगितले. अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज, प्रथम अपील व द्वितीय अपील हे सर्व मुदतबाहय असल्यामुळे खारीज करण्यास पात्र आहे. परंतु, माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरची माहिती स्विकारणे योग्य राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

म.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२६१/अम/२००९
अपील क्रं./१२६२/अम/२००९
अपील क्रं./१२६३/अम/२००९
अपील क्रं./१२६४/अम/२००९
अपील क्रं./१२६५/अम/२००९

१) श्री विजय दामोदर बुटे,
मु. कुवरदेव पो. जामोद,
ता. जळगांव (जा.), जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

अपील क्रं./१२६१/अम/२००९
२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कार्यालय, बुलढाणा. जि. बुलढाणा. उत्तरवादी

अपील क्रं./१२६२/अम/२००९/अपील क्रं./१२६३/अम/२००९
अपील क्रं./१२६४/अम/२००९/अपील क्रं./१२६५/अम/२००९
२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद, कार्यालय, बुलढाणा. जि. बुलढाणा. उत्तरवादी

अपील क्रं./१२६१/अम/२००९/अपील क्रं./१२६५/अम/२००९
३)जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, जळगांव(जा.),
ता. जळगांव(जा.), जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

अपील क्रं./१२६२/अम/२००९/अपील क्रं./१२६३/अम/२००९
अपील क्रं./१२६४/अम/२००९
३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा,
जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ८.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००९ रोजी दोन द्वितीय अपीले, दिनांक ६.२.२००९ रोजी एक द्वितीय अपील व दिनांक १३.२.२००९ रोजी दोन द्वितीय अपीले असे एकुण पाच द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपीले दाखल केली आहेत.**

**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक ८.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**३.** अपील क्रमांक १२६१/अम/२००९ व अपील क्रमांक १२६२/अम/२००९ **मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, जळगांव(जा.) यांचेकडे, दिनांक २७.७.१९९८ ते १९.११.२००३ पर्यंतचे वेतन मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १२.९.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहेत. प्रथम अपीलाच्या संदर्भात प्रथम अपीलाच्या सुनावणीची नोटीस ही, दिनांक ७.९.२००८, २०.१०.२००८, २५.१०.२००८, १७.१०.२००८, १३.१०.२००८, १३.८.२००८ व ११.९.२००८ रोजीचे सर्व अर्ज, दिनांक २४.१२.२००८ रोजी सुनावणीकरीता अर्जदारास नोटीस पाठविण्यात आली होती. त्याबाबतच्या जावक रजिस्टरची छायांकित प्रत व पोस्टाचा पुराव्याच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहेत असे आयोगापुढे सांगितले. परंतु, अपीलकर्ता सुनावणीस हजर राहीले नाही. अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना योग्य माहिती उपलब्ध झालेली आहे, असा निष्कर्ष काढून सदरची दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.**

**४.** अपील क्रमांक १२६३/अम/२००९ **मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी (प्राथमिक) यांच्या कार्यालयामध्ये श्री विजय दामोदर बुटे हयांनी सादर केलेल्या न्यायालयीन आदेशाविषयी एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.११.२००८ रोजी, आपणच स्वतः न्यायालयात गेले असून आपण या कार्यालयात**

न्यायालयाचे कागदपत्रे सादर केलेली असल्यामुळे सदरची माहिती आपल्या जवळच उपलब्ध असल्यामुळे आपल्याला माहिती देण्याची काहीही आवश्यकता नाही, असे गट विकास अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात नोटीस काढून सुध्दा अपीलकर्ता उपस्थित झाले नाही त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी स्वतःच न्यायालयात याचिका दाखल केली होती. व त्याचा निर्णय त्यांना मिळाला होता. व त्यामुळे तीच माहिती त्यांनी पुन्हा मागणे हे अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर आहे असा युक्तीवाद जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे केला. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविलेले असल्यामुळे व ते योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक १२६४/अम/२००९ व अपील क्रमांक १२६५/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयात, अर्जदाराला नियमानुसार कामावर हजर करुन घेतले नाही, या संदर्भात एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २९.८.२००८ रोजी गट विकास अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीची नोटीस काढूनही अपीलकर्ता हजर झाले नाही, म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

६. अपीलकर्ता यांना मिळालेल्या माहितीचे अवलोकन केले असता दिलेली माहिती योग्य आहे असे दिसून येते व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहेत.

७. अपीलकर्ता यांनी त्यांना संपूर्ण कागदपत्रांची माहिती असताना सुध्दा व त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र हे रद्य झालेले असताना सुध्दा तसेच मा. उच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळली असल्यामुळे व ही माहिती त्यांना असताना सुध्दा गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे तीच ती माहिती अनेक अर्जांच्या माध्यमातून मागणे हे अधिका-यांना हैराण करण्याचा हेतू दिसतो. व अधिनियमाच्या तरतूदींचा गैरवापर आहे, व त्यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जन हित दिसून येत नाही. स्वतःच जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करायचे व त्यातून निष्पन्न झालेल्या परिणामाच्या संदर्भात सार्वजनिक प्राधिकरणाला त्रस्त करायचे यापुढे कोणतेही व्यापक जन हित नसल्यामुळे अपीलकर्ता यांची सर्व अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

आदेश

१) **अपीलकर्ता यांचे** अपील क्रं./१२६१/अम/२००९/अपील क्रं./१२६२/अम/२००९ अपील क्रं./१२६३/अम/२००९/अपील क्रं./१२६४/अम/२००९ व अपील क्रमांक/१२६५/अम/२००९ **हे खारीज करण्यांत येत आहेत.**

२) **अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२६६/अम/२००९

१) श्री मधुकर नामदेव राजूरकर,
मोतीनगर, प्रोफसर कॅलनी, पुसद,
ता. पुसद, जिल्हा यवतमाळ. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय महागांव, ता.महागांव,
जिल्ह यवतमाळ. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
तहसिल कार्यालय महागांव,
ता. महागांव, जिल्हा यवतमाळ. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ९.२.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक ९.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. माहिती अधिकारी गैरहजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालयात, श्री उत्तम धनसिंग झाडे यांचे नांवाने रेशन कार्ड आहे काय, ते यवतमाळ येथून महागांवला बदलून आले आहे, त्यांनी यवतमाळचे रेशन कार्ड जमा केले आहे काय इ. माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती, "माहिती" या सदरात मोडत नसल्यामुळे उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु, त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न**

**झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते उत्तर कोणत्याही प्रकारचा विचार करुन दिलेले दिसून येत नाही. जर माहिती उपलब्ध असेल तर ती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परंतु, प्रश्न विचारले आहे या कारणास्तव माहिती नाकारणे हे माहिती न देण्याचे किंवा टाळाटाळ करण्याचा प्रयत्न आहे असे दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या समोर संबंधीत विभागाचे प्रमुख श्री पी.के. कठाणे, अव्वल कारकून व श्री सी.के कळणे, कनिष्ठ लिपिक यांनी त्यांचेकडे सदर प्रथम अपील दाखल केली नाही वा सदर प्रकरणात अपील झाले याबाबत कोणतीही माहिती त्यांना दिली नाही. त्यामुळे सदर अपील त्यांचे समोर न आल्यामुळे ज्यांना सदर अपील प्राप्त झाली ते सदर प्रकरणात सर्वस्वी जबाबदार आहेत. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय होऊ शकला नाही. असे असल्यास संबंधीत विभागाचे प्रमुख श्री पी.के. कठाणे व श्री सी.के. कळणे, कनिष्ठ लिपिक यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे. अव्वल कारकून तथा सहाय्यक माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली असून व ते आज सुनावणीस हजर राहिले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे.**

**४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, आता ती माहिती उपलब्ध**

**झालेली आहे व ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल व अपीलकर्ता यांनी सुध्दा माहिती घेण्याचे मान्य केले आहे. परंतु, विलंबाच्या संदर्भात निर्णय देणे आवश्यक आहे असे आयोगापुढे सांगितले. त्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व दिशाभूल करणारे उत्तर दिलेले असल्यामुळे संबंधीतावर शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येते. सदरची कारवाई सक्षम अधिकारी यांनी करावयाची असल्यामुळे निर्णयाची एक प्रत स्वंतत्रपणे पोस्टाने तहसिलदार, पुसद यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२६८/अम/२००९

१) श्री मनोहर शिवरामजी सुडके,
आदर्श कॅालेजचे पाठीमागे, जिजामाता नगर, हिंगोली
ता.जिल्हा हिंगोली. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मंगरुळपीर, ता.मंगरुळपीर, जि. वाशिम. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्राम पंचायत कार्यालय शेलुबाजार,
ता. मंगरुळपीर, जिल्हा वाशिम. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ९.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक ९.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत शेलुबाजार यांचेकडे, (१) ले आऊटची प्रमाणित छायांकित प्रत देणे. (२) त्या ले आऊट मधील किती प्लॅाटची ग्राम पंचायत कार्यालयात नोंद झाली व घरबांधकामासाठी किती जनांना परवानगी दिली. (३) ले आऊटमध्ये सार्वजनिक उपयोगासाठी किंवा शासकिय विकास कामासाठी किती भूखंड सोडलेला आहे. तीचे क्षेत्रफळ किती. (४) त्या जागेवर बांधकाम झाले आहे काय, असल्यास त्याची नांवे देण्यात यावी व यावर ग्रामपंचायत कार्यालयाने काय कार्यवाही केली याबाबत माहिती देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीचा कालावधी १९८५ असा आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १४.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने अपीलार्थी गैरहजर होते. सचिव, ग्राम पंचायत शेलुबाजार यांनी दिनांक ६.२.२००९ ला अपीलकर्ता यांना पोस्टाने माहिती पाठवून एक प्रत कक्ष अधिकारी यांचेकडे आणून द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु तरीही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करताना असे सांगितले की, अपीलकर्ता यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.२.२००९ रोजी माहिती पोस्टाद्वारे पाठविली आहे. परंतु, त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना लेआऊटची प्रत मिळाली नाही. परंतु ले आऊटची प्रत कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही असे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. व त्यामुळे मुद्या क्रमांक ३, ४ ची सुध्दा माहिती देता येत नाही.**

**प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा ले आऊट १९८५ चे असल्यामुळे व ते कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे माहिती देता येणार नाही, असे सांगितले. परंतु जर ले आऊटची माहिती तहसिल अभिलेखागारात किंवा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात किंवा अभिलेखागारात उपलब्ध असल्यास त्याचा शोध घेऊन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी मागितलेल्या ले आऊटच्या नकाशाची प्रत संबंधीत तहसिल अभिलेखागारातून किंवा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयातून उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२७०/अम/२००९

१) श्री कैलास ज्ञानदेव इंगळे,
मु.पो. व्याळा, ता.बाळापूर, जिल्हा अकोला. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,
बाळापूर, ता. बाळापूर, जिल्हा अकोला. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय बाळापूर,
ता. बाळापूर, जिल्हा अकोला. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ९.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १२.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक ९.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी यांचेकडे, बारलिंगा खिरपुरी व्याळा शिवारात ०७-०८ मध्ये पाणलोट क्षेत्र विकासाची कोणती कामे पुर्ण झाली याची गटवार यादी व पुर्ण झालेल्या कामाचे फोटो देण्यात यावे, यासह एकुण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००८, २२.१०.२००८ व ३१.१०.२००८ रोजी माहिती घेण्याकरीता आलो होतो, अशा प्रकारे अर्ज व स्मरणपत्र सुध्दा दिले होते. परंतु, माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ४.११.२००८ रोजी प्रथम अपील हे उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाच्या संदर्भात उपविभागीय कृषि अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी हे प्रथम अपीलीय अधिकारी आहे असे कळवून अपील त्यांचेकडे हस्तांतरीत केलेले दिसून येते. दिनांक १६.१०.२००८ रोजी तालुका कृषि अधिकारी यांनी माहिती सादर केली नाही म्हणून टिपणी केलेली दिसून येते. परंतु, तरीही माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु, दिनांक ६.१०.२००८ रोजी मागितलेली माहिती मुद्येनिहाय तयार आहे ती घेवून जावी, असे तालुका कृषि अधिकारी यांनी लेखी कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक २६.१२.२००८ रोजी सुध्दा कळविलेले आहे.त्यावर तालुका कृषि अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात आले. माहिती पाहिली व ती अपूर्ण आहे या कारणास्तव स्विकारली नाही. परंतु, अपीलकर्ता यांनी सदरची माहिती स्विकारणे आवश्यक होते व अपूर्ण असल्यास तशी तक्रार करणे आवश्यक होते. असे असल्यास आता अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य, व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२६९/अम/२००९

१) श्री अशोक आनंदराव नागमोते,
कास्तकार संकुल क्रं.१, संतोष नगर, गुरुकुल नगरी,
अकोला, जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख अमरावती प्रदेश अमरावती.
ता.जिल्हा अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख वरुड, ता.वरुड, जिल्हा अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ९.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक ९.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे, मो.र.क्रं.१७५/०६ सुधारित क प्रतची दुय्यम प्रत मधील चुकीची दुरुस्ती करुन सुधारित क प्रत मिळण्याबाबत व चुकीचा खुलासा होण्याबाबत, माहिती मागितलेली दिसून येते. व त्याकरीता अपीलकर्ता यांनी १२ मुद्यांमध्ये चुक दाखविलेली आहे. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.१०.२००८ रोजी आपणास वरील संदर्भिय पत्र क्रमांक१, २ व ३ नुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती पुरविण्यात आली आहे. तरी यापूढे माहिती बाबत विलंब टाळावा, तरी आपणास माहिती पुरविण्यात येत आहे, असे तालुका निरीक्षक यांनी कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ८.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे उप संचालक, भूमी अभिलेख यांचेकडे दाखल केले आहे. परंतु, अधीक्षक, भूमी अभिलेख हे प्रथम अपीलीय अधिकारी आहे व त्यामुळे अपील अर्ज त्यांचेकडे प्राप्त नसल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नाही, असे त्यांनी सांगितले. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. श्री राजेंद्र पांडे यांनी युक्तीवाद केला. व जी माहिती जशी उपलब्ध आहे तशी उपलब्ध करुन दिली आहे. त्यात कोणत्याही प्रकारच्या चुका असल्यास त्या दुरुस्ती करीता महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ च्या तरतुदी प्रमाणे अधीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे अपील दाखल करणे आवश्यक आहे, असे आयोगापुढे सांगितले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी अधीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे स्वतंत्रपणे चुक दुरुस्ती करीता सक्षम अधिका-यांकडे अपील दाखल करणे संयुक्तिक राहील.**

**४. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**
जावक क्रं. दिनांक

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२६७/अम/२००९

१) श्री उल्हाससिंह मोहनसिंह चव्हाण,
अनुश्री बिल्डींग क्वा.नं.१, कांतानगर, अमरावती,
ता.जिल्हा अमरावती. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक(आस्थापना)
पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालय
शहिद भगत सिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००१. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपसहाय्यक पोलीस महानिरीक्षक(आस्थापना-२)
पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालय
शहिद भगत सिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००१. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ९.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक ९.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे सन २००३-२००८ मध्ये पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती व सेवा जेष्ठता केव्हा, किर्तीना देण्यात आली याची माहिती. सेवा जेष्ठता न देणे व वेतन श्रेणी न लागू करणे याबध्दलची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. सोबत अधिक माहिती करीता अर्ज जोडलेला आहे, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना दोनही मुद्यांचे संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झ ालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ५.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ५.२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे या कारणास्तव प्रथम अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी संपूर्ण कागदपत्राची माहिती मागितली होती व तसे सोबतच्या अर्जात नमुद केले आहे. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या सोबतच्या अर्जाच्या संबंधात त्यांनी तसे मुळ अर्जात म्हटलेले नाही. परंतु, त्यात अर्जाच्या तळभागात टिपमध्ये तसे म्हटलेले दिसून येते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच मुद्या क्रमांक २ च्या संदर्भात जी टिपणी असेल त्या टिपणीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या सोबत दिलेल्या अर्जामधील मागितलेल्या कागदपत्राच्या छायांकित प्रती, तसेच मुद्या क्रमांक २ च्या संदर्भात असलेल्या टिपणीच्या छायांकित प्रती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२८०/अम/२००९

१) श्री शिवदास अंबादास वरठे,
मु.पो. पुनोती खुर्द, ता. बार्शिटाकळी, जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अकोला. जिल्हा अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, अकोला. जिल्हा अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १०.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १०.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"मा.जिल्हाधिकारी, अकोला यांचे पत्र क्रमांक कक्ष-६/स.सा.जा./का.वि./४८९०/०३ दिनांक १५.९.०३ चे संबंधातील मुळ तक्रार अर्जाची प्रमाणित प्रत मिळणेबाबत. (२) मा. वसंत पुरके साहेब,शालेय शिक्षण मंत्री, म.रा. यांनी तारीख १३.५.२००८ रोजी अकोला कँप येथे शिक्षणाधिकारी, अकोला मा.वि. यांनी जि.प. यांना न.का.वि.चे संबंधात दिलेल्या तक्रारी संबंधात प्रत्यक्ष केलेल्या कार्यवाहीचा चौकशी अहवालाची प्रमाणित प्रत मिळणेबाबत." सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.१२.२००८ रोजी दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, आता पर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक २७.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याचे कारण असे की, अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती मागितली होती व अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे ३० दिवसांची मुदत दनांक २०.९.२००८ पर्यंत होते. परंतु अपीलकर्ता माहिती घेण्यास आले नाही. दिनांक २१.९.२००८ ला रविवार होता. व दिनांक २२.९.२००८ रोजी त्यांना रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली. पत्र क्रमांक १९५७/०८, दिनांक २०.९.२००८. व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय त्याप्रमाणे दिलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु, आयोगापुढे अपीलकर्ता यांनी सांगितले की, आतापर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. असे असेल तर अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती मागितली असल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित होऊन त्यांच्या दिनांक २१.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने नस्तीची तपासणी करुन त्यातील मागितलेली माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २१.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती करीता नस्तीचे अवलोकन द्यावे व त्यातून आवश्यक असलेली माहिती विना मुल्य छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२७६/अम/२००९

१) श्री श्रीकृष्ण सदाशिवराव वाढवे,
मंगेश नगर, भोसा रोड, यवतमाळ,
ता.जिल्हा यवतमाळ. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद, यवतमाळ, ता.जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी(शिक्षण विभाग)
नगर परिषद यवतमाळ, ता.जि. यवतमाळ. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १०.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १२.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १०.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी (शिक्षण विभाग,) नगर परिषद यांचेकडे, स्व.सौ. सुनिता श्रीकृष्ण वाढवे यांचे संबंधात एकुण १२ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.१२.२००८ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झ ाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.१.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांना दिनांक २२.१.२००९ पर्यंत माहिती पुरवावी असे आदेश दिलेले दिसून येतात. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना पुन्हा दिनांक १६.३.२००९ रोजी १२ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. द्वितीय अपीलामध्ये पुन्हा अपीलकर्ता यांनी चार विषयाच्या शिक्षकांची नांवे देण्यात आली नाही. नंतर तिचेकडे संपूर्ण विषय कधी दिले ती तारीख दिलेली नाही. दिनांक ७.२.२००७ रोजी बदली अर्ज केला होता त्यावर कोणती कार्यवाही झाली, ती माहिती चुकीची दिलेली आहे. व त्याबाबत झालेल्या कार्यवाहीची व नोटशिटची प्रत देण्यात यावी, अशी मागणी केलेली आहे. मुख्याध्यापिकेच्या विरुध्द केलेल्या कार्यवाहीची प्रत देण्यात यावी. शिक्षण सेवकांची बदली करण्याच्या निकषाची प्रत देण्यात यावी. शासन निर्णयाची आपसी बदली करण्याच्या निकषाची प्रत देण्यातयावी. अहवाल सभागृहास सादर झाला असल्यास त्याची प्रत देण्यात यावी, असे आयोगास सांगितले. वरील माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे हा निर्णय मिळाल्यापासुन १० दिवसांचे आंत संपर्क साधून व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२७९/अम/२००९

१) श्री गजानन मधुकर सातारकर,
काळीपुरा, वार्ड नं.१७, मलकापूर
ता. मलकापूर, जिल्हा बुलढाणा-४४३१०१. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलढाणा. जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी,
समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा.
जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १०.२.२०१० )

<u>नि र्ण य</u>

**अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १०.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, समाज कल्याण विभाग, बुलढाणा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"२६.१२.२००६ रोजी समाज कल्याण अधिकारी यांना दलित वस्तु सुधार योजने अंतर्गत सिमेंट रस्त्याचे सन ०५-०६ कालावधीत पं.स. मलकापूर अंतर्गत झालेल्या कामात संवर्ग विकास अधिकारी यांनी शासनाच्या फसवणुकीबाबत केलेल्या गैर कामाची सखोल चौकशीची तक्रार केली होती. त्यावर समाज कल्याण अधिकारी यांनी कोणत्या प्रकारची चौकशी करुन काय कारवाई केली त्याचा अहवाल देण्यात यावा. दसरखेड, हरसोडा, नरवेल, तोमुळवाडी या गांवात झालेल्या दलीत वस्ती सुधार योजना अंतर्गत सिमेंट किती हप्त्यामध्ये दिली त्याचा दिनांक नक्कल व मागणी केलेल्या पत्रांची झेरॉक्स प्रत व बाकी किती याची सविस्तर माहिती.. वगैरे"**

**माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही टपालाद्वारे घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झाला व दिनांक २७.२.२००९ रोजी टपालाद्वारे माहिती पाठविण्यात आलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना ती माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.११.२००८ च्या अर्जाप्रमाणे विहिती मुदतीत माहिती दिली नाही हे मान्य केले. परंतु, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, नंतर त्यांना दिनांक २७.२.२००९ रोजी माहिती पोस्टाने पाठविली आहे. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी जावक नोंदवहीची छायांकित प्रत दाखल केली आहे व मुळ जावक नोंदवही सुध्दा आयोगाचे निदर्शनास आणली. यावरुन अपीलकर्ता यांना दिनांक २७.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. परंतु, तरी सुध्दा माहिती ही विलंबानेच उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात. व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्तीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यावर त्यांनी माहिती दिली गेली नाही. नजर चुकीने राहीली असा तोंडी खुलासा केला. परंतु, माहितीचा अर्ज आल्यावर ३० दिवसापर्यंत दखल घ्यायची नाही ही प्रवृत्ती कमी करावयाची असेल तर जन माहिती अधिकारी यांना शास्ती करणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत पोस्टाने विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.११.२००८ च्या अर्जाप्रमाणे अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून आले आहे व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५०/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची रक्कम संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे दर महिन्याचे वेतनातून वसुल करुन** "००७०-इतर प्रशासकिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखाशिर्षात जमा करावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२७८/अम/२००९

१) श्री गजानन मधुकर सातारकर,
काळीपुरा वार्ड नं.१७, मलकापूर,
ता. मलकापूर, जिल्हा बुलढाणा-४४३१०१. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा, जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिक्षक,
उपजिल्हा रुग्णालय, मलकापूर, जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १०.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १०.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, मलकापूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"जानेवारी, २००७ ते २००८ या कालावधीत आपल्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये किती व्यक्तींचा स्टाफ आहे.(डॉक्टरांसहित त्यांची यादी). (२) त्यापैकी किती व्यक्ती शासकिय सेवेत परमनंट आहेत, करारपध्दतीने किती आहेत, त्याची यादी, त्यांच्या करारपत्रांची झेरॉक्स प्रत (३) किती व्यक्तींना शासकिय निवासस्थान मिळालेले आहेत त्यापैकी तेथे किती राहातात व न राहणा-या व्यक्तीवर कोणती कारवाई केली, त्याचा अहवाल द्यावा. (४) किती व्यक्तींच्या पगारातून एच.आर.ए. वसुल करण्यांत येतो, त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी."**

**अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ६/१३ डिसेंबर, ०९ रोजी देण्यात आला असून डॅा. विजय चव्हाण, वैद्यकिय अधीक्षक यांना मागितलेल्या माहिती प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही. नियमानुसार आपण होणा-या कार्यवाहीस व दंडास पात्र आहे असे आदेश दिलेले दिसून येते व त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती विलंबाने उपलब्ध करुन देण्यात आली होती. आताही ती माहिती अपूर्ण उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा त्यांना दोषी ठरविण्यात आलेले आहे व त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १.११.२००८ च्या अर्जाप्रमाणे प्रत्येक मुद्यांमध्ये त्यांनी जी यादी मागितली आहे त्या यादीच्या छायांकित प्रती विना मुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.**

**२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १.११.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही उपसंचालक, आरोग्य सेवा, अमरावती यांनी करावयाची आहे. त्याकरीता निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने त्यांचेकडे पाठविण्यात यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२७७/अम/२००९

१) श्री नितीन वसंतराव खोब्रागडे,
साई नगर पंचायत समिती मागे, नेर परसोपंत,
ता. नेर परसोपंत, जिल्हा यवतमाळ. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक,
भूमी अभिलेख कार्यालय अमरावती प्रदेश अमरावती.,
ता. जिल्हा अमरावती. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,
उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय अमरावती प्रदेश अमरावती.,
ता. जिल्हा अमरावती. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १०.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १०.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून उप संचालक, भूमी अभिलेख यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"भूमी अभिलेख कार्यालय अमरावती जिल्हयाच्या दिनांक २८.९.२००८ रोजी घेण्यात आलेल्या परिचर या पदासाठी लेखी परीक्षेचा तपशिल तसेच माझ्या उत्तरपत्रिकेची आणि प्रश्न पत्रिकेची झेरॉक्स प्रत. तसेच मुलाखतीकरीता उमेदवारांची निवड कोणत्या पध्दतीने करण्यात आली याची सविस्तर माहिती. कमीतकमी किती गुण असलेल्या उमेदवारांची निवड मुलाखती करीता करण्यात आली. कृपया याची सविस्तर माहिती मिळावी."**

**सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २.१२.२००८ रोजी आपण मागणी केलेली माहिती सद्यस्थितीत इकडे उपलब्ध नसून भरती प्रक्रिया अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे परीक्षेच्या या टप्यावर सदरची माहिती प्रकट केल्यामुळे त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहचत असल्यामुळे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने सदरची माहिती प्रकट करणे योग्य नसल्याने व सदर माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने पुरविता येत नाही, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्याच वेळेस माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलाच्या संदर्भात प्रथम अपील हे नमुन्यात नसल्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली नाही असा आयोगापुढे खुलासा करण्यात आलेला आहे. परंतु, त्यातही अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे कार्यवाही पूर्ण झालेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. परंतु, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली ती माहिती आता त्यांना दिनांक २८.१.२०१० च्या अर्जाप्रमाणे प्रक्रिया संपूर्ण झालेली असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२८१/अम/२००९
अपील क्रं./१२८२/अम/२००९
अपील क्रं./१२८३/अम/२००९
अपील क्रं./१२८४/अम/२००९

अपील क्रं./१२८१/अम/२००९
श्री जितेश ताराचंद मजेठीया,
जवाहर रोड, मेन रोड, आकोट, जि. आकोट. अपीलकर्ता

अपील क्रं./१२८२/अम/२००९
सौ. उषा सतिष हाडोळे,
यात्रा चौक, आकोट, जि. आकोट. अपीलकर्ता

अपील क्रं./१२८३/अम/२००९
श्री योगेश प्रल्हाद लोणकर,
काळा मारोती मंदिराजवळ, केशवराज वेटाळ,
आकोट, ता.जिल्हा जि. आकोट. अपीलकर्ता

अपील क्रं./१२८४/अम/२००९
श्री विजय रुपराव यवतकार,
नंदी पेठ, आकोट, ता.जिल्हा आकोट. अपीलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद आकोट, ता.जिल्हा आकोट. उत्तरवादी

१) जन माहिती अधिकारी,नगर परिषद आकोट,
ता.जिल्हा आकोट. उत्तरवादी

अपील क्रं./१२८२/अम/२००९
२) जन माहिती अधिकारी तथा आरोग्य निरीक्षक(आरोग्य विभाग),
नगर परिषद आकोट, ता.जिल्हा आकोट. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १०.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ते यांनी दिनांक १७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १०.२.२०१० रोजी घेण्यात आली. उत्तरवादी हजर आहेत.**

२. अपील क्रमांक १२८१/अम/२००९ मध्ये **अपीलकर्ता हजर आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून श्री डी.आर. शिंदे, आकोट, नगर परिषद यांचेकडे, १ एप्रील, २००७ पासून ते अद्याप पावेतो आकोट न.प. अंतर्गत झालेल्या विविध योजने अंतर्गत विविध विकास कामा करीता वापरण्यात आलेल्या गौण लिजा बाबत न.प.च्या कोणकोणत्या कामावर किती रेती, गिटटी, मुरुम, टोळ, बद्री आदी वापरण्यात आली हयाची प्रत्येक काम निहाय तपशिलासह माहिती व सदर बाबत शासनाकडे रायल्टी भरणा करण्यात आलेल्या रकमाचा तपशिल व रॅायल्टी पासेसच्या प्रती, अशी माहिती मागितली असून माहिती रजिस्टर्ड नोंदणीकृत पोच पत्रा द्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १४.१.२००९ स्मरणपत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १७.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे.**

**३. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २८.१.२००९ रोजी देण्यात आला असून श्री संजय अढाऊ सल्लागार अभियंता नगर परिषद यांनी माहिती स्वखर्चाने अपीलार्थी यांना मोफत पुरविण्याची तात्काळ कार्यवाही करावी. अपीलार्थी यांचा दिनांक ८.१२.२००८ रोजी माहिती मिळण्याबाबतचा अर्ज ज्यांच्याकडे संबंधीत माहिती आहे असे श्री संजय अढाऊ सल्लागार अभियंता यांचेकडे दिनांक १०.१२.२००८ रोजी पाठविल्याचे दिसून येते. परंतु श्री संजय अढाऊ यांनी अपीलार्थी यांचे अर्जावर कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही किंवा माहिती पुरविण्याबाबत विलंबाचे कारण सुध्दा कळविल्याचे दिसून येत नाही. वरील बांधकाम विभागामधील श्री संजय अढावू सल्लागार अभियंता न.प.अकोट हयांनी अपीलार्थी यांना माहिती पुरविली नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ यातील कलम ७(६) नुसार अपीलार्थी यांना वरील बांधकाम विभागीतील माहिती निशुल्क प्राप्त करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.**

**४. सदरच्या निर्णयानुसार माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, ते स्वत: नगरसेवक आहे व नगरसेवक म्हणून माहिती मागूनही माहिती मिळत नाही, म्हणून त्यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज केला आहे. श्री संजय अढावू हे जन माहिती अधिकारी नाही. व ते कंत्राटी अभियंता**

किंवा सल्लागार अभियंता आहे व त्यांनी आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देतात परंतु, माहिती देऊ नये असे तोंडी आदेश ते सर्व कर्मचा-यांना देतात, असे आरोप अपीलकर्ता यांनी केले व ते त्यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा नमुद केले आहेत. अपीलकर्ता यांच्या अपील मेमोमध्ये माहिती मागण्यापेक्षा प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचेवर प्रामुख्याने आरोप केल्याचे दिसून येते.

५. वास्तविक, प्रथम अपीलीय अधिकारी हे माहिती अधिकारी नाही व वरिष्ठ अधिकारी असल्यामुळे त्यांनी आदेश दिल्याप्रमाणे सुध्दा माहिती अधिकारी यांनी जर माहिती उपलब्ध करुन दिली नसेल तर अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे जन माहिती अधिकारी हे जबाबदार होतात. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द अशा प्रकारचे आरोप करणे योग्य नव्हे. अधिनियमाच्या तरतुदी ज्याप्रमाणे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना लागू आहेत त्याचप्रमाणे त्या अर्जदारास सुध्दा लागू असतात. जन माहिती अधिकारी आज हजर नाही. त्याबध्दल प्रथम अपीलीय अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, सदरचा अर्ज हा श्री संजय अढावू या कनिष्ठ अभियंत्याकडेच होता व विलंब झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी तो स्विकारला नाही, असे आयोगापुढे सांगितले. वास्तविक, अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे केलेला अर्ज हा जन माहिती अधिकारी यांनीच हाताळावयाचा असते. व त्यावर कार्यवाही करायची असते. जन माहिती अधिकारी यांचेकडे जर अर्ज सादर
झाला नसेल तर त्यासाठी जे अधिकारी, कर्मचारी जबाबदार असतील त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक असते. सदरच्या प्रकरणामध्ये श्री संजय अढावू हे नगर परिषद कर्मचारी नाही व तरीही ते माहितीचा अर्ज हाताळतात ही बाब प्रशासकिय अनियमिततेचा भाग आहे व त्याची सर्वस्वी जबाबदारी सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रशासकिय प्रमुखाची आहे.

६. श्री संजय अढावू यांनी आयोगापूढे असे सांगितले की, प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार अपीलार्थी यांना दिनांक २८.१०.२००९ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती पुरविण्यात आली व ती अपीलार्थी यांना दिनांक ३१.१०.२००९ रोजी प्राप्त झाली. त्याची पोच त्यांनी सादर केली. त्यावर पुन्हा अपीलार्थी यांनी असे सांगितले की, सदरच्या पत्रामध्ये कोरे कागद निघाले व त्यामुळे अपीलकर्ता यांनी सुध्दा सुरुवातील माहिती मिळाली नाही व नंतर स्वतः अभियंता यांनी माहिती दाखविली होती. परंतु कोरे कागद मिळाले असे सांगितले.

७. एकुणच या सर्व प्रकरणामध्ये नगर परिषद जन माहिती अधिकारी हे स्वतः दोषी आढळून येतात. तसेच श्री संजय अढावू हे नगर परिषद कर्मचारी नसून सुध्दा व मानद सल्लागार किंवा कंत्राटी अभियंता असून सुध्दा माहितीच्या अर्जाची हाताळणी करतात व त्यामुळे त्यांना अधिनियमाचे कलम ५(४) व (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येवून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्तीबध्दल त्यांना विचारणा करण्यात आली. परंतु विलंबाने माहिती कां दिली याबध्दल ते समाधानकारक उत्तर देवू शकले नाही. त्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

८. अपील क्रमांक १२८२/अम/२००९ मध्ये अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद, अकोट तसेच जन संपर्क अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केले आहे.

"(१) आकोट शहरामध्ये कचरा कुंडया व त्या शहरातील प्रभागामध्ये वार्डामध्ये कोठे कोठे ठेवण्यात आल्या आहेत त्या सर्व जागांची/स्थळांची नांवे त्याचप्रमाणे न.प. आकोट ने शहरामध्ये कचरा टाकण्याकरीता विहित केलेल्या जागा प्रभागातील स्थळासह व नांवासह माहिती. (२) कच-याचे वर्गीकरण केल्यानंतर ओला कचरा त्याचप्रमाणे सुखा कचरा डब्यामध्ये साठवून ठेवल्यानंतर नगर परिषदेने ठरवून दिलेल्या ओला कचरा टाकण्याच्या त्याचप्रमाणे सुका कचरा टाकण्याच्या शहरातील प्रभाग/वार्डनिहाय स्थळांची माहिती. (३) आकोट नगर परिषदेने गोरगरीब गरजू नागरिंकासाठी शौचालये बांधली आहेत. त्यांची प्रभागनिहाय माहिती व त्या स्थळांची नांवे द्यावीत. तसेच सद्यस्थितीत शौचालयाची स्थिती त्याचप्रमाणे सदर शौचालयापैकी वापरात असल्याबाबतची माहिती द्यावी. त्याचप्रमाणे नगर परिषद सदर शौचालयाची देखभाल, सुविधा, साफसफाई पाण्याची व्यवस्था, सफाई कामगार याबाबत माहिती द्यावी. (४) शहराच्या व्यापार पेठीमध्ये व्यापारी प्रतीष्ठांनी ओला कचरा, सुखा कचरा वेगवेगळया डब्यांमध्ये साठवून ठेवल्यानंतर नगर परिषदेने विहित केलेल्या जागांची ओला कचरा टाकण्याकरीता व सुका कचरा टाकण्याकरीता स्थळांची माहिती द्यावी. (५) वैद्यकिय व्यवसायिकांना बायो मेडीकल वेस्ट (व्यवस्थापन व हाताळणी) नियम १९९८ पालन करुन कारवाई करावी असे नमुद केले आहे. सदर नियमाची प्रत व माहिती द्यावी. (६) नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी ) नियम २००० ची प्रत द्यावी. (७) आकोट नगर परिषद (घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन) उपविधी २००४ ची प्रत द्यावी. (८) प्लॅस्टिक निर्मुलन नियम १९९९ ची प्रत द्यावी (९) जैव वैद्यकिय टाकावू पदार्थ (विल्हेवाट व हाताळणी) नियम १९९८ ची प्रत द्यावी. "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १४.१.२००९ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती दिली नाही म्हणून दिनांक १७.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २८.१.२००९ रोजी देण्यात आला असून श्री गजानन महल्ले, माहिती अधिकारी तथा आरोग्य निरीक्षक हे अपीलार्थी यांना माहिती न पुरविल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ यातील कलम ७(६) नुसार अपीलार्थी यांना वरील आरोग्य विभागातील माहिती निशुल्क प्राप्त करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्यामुळे अपीलार्थीचे म्हणणे ग्राहय मानून श्री गजानन महल्ले, माहिती अधिकारी तथा आरोग्य निरीक्षक यांनी वरील माहिती स्वखर्चाने अपीलार्थी यांना मोफत पुरविण्याची तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १७.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असा खुलासा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केला आहे. सदरची माहिती ही दिनांक २८.१.२००९ रोजी तयार केलेली दिसून येते. परंतु त्यावर अपीलकर्ता यांनी सर्व हक्क आबाधित ठेवून माहिती स्विकारलेली दिसून येते. व त्यातही मागितलेली माहिती व्यापक स्वरुपाची असल्यामुळे उर्वरित माहिती ही उपलब्ध करुन देता येईल असे आयोगाकडे खुलाशात म्हटले आहे. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आदेश सुध्दा दिलेले आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ती हीस माहिती उपलब्ध होईल यादृष्टीने कार्यवाही केलेली दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा कोणत्याही

प्रकारचे पत्र अपीलकर्ता यांना दिलेले नसल्यामुळे त्यांनी ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हे स्पष्ट होते. व तसा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाच्या निर्णयात निष्कर्ष काढल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/-(रुपये पाच हजार फक्त) शास्ती लादणे आवश्यक राहील. शास्तीच्या संदर्भात विचारणा केली असता त्यांनी विलंबाच्या बाबत समाधानकारक उत्तर दिलेले नाही. व त्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

९. अपील क्रमांक १२८३/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद, अकोट यांचेकडे एकुण १५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.८.२००८ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक १६.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ७.१०.२००८ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती अधिकारी श्री एन.जी. यवतकर यांनी अपीलार्थी यांना मुदतीचे आंत माहिती पुरविलेली दिसून येत नाही. व सदरची माहिती निशुल्क उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, अशा प्रकारे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु, अपीलकर्ता यांना दिनांक १२.१.२००९ रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांनी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २३.१.२००९ रोजी स्मरणपत्र दिलेले आहे. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

१०. द्वितीय अपीलाच्या संदर्भात सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे त्यांच्या अपील मेमोचे अवलोकन करुन त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असा निष्कर्ष काढून जन माहिती अधिकारी यांना त्याबाबत विचारणा केली असता अर्जदाराचे अर्जामध्ये मागितलेली माहिती गुंठेवारी संबंधी असल्यामुळे त्याबाबत श्री सखावत अली एहसान अली यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्रमांक ११५/०८, दिनांक १४.७.२००८ अन्वये पाठविण्यात आले होते असा खुलासा केलेला आहे. व त्या पत्राप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून माहिती पुरविता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व सदरच्या पत्राची प्रत आयोगाकडे सादर केली. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी श्री सखावत अली एहसान अली हे जबाबदार दिसून येतात. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तसेच श्री एन.जी. यवतकार, कनिष्ठ अभियंता तथा माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन न देण्यासाठी जबाबदार आहे, असा जो प्रथम अपीलाचा निर्णय आहे, तो योग्य आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी तसेच श्री सखावत अली एहसान अली यांचे सहाय्य अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता घेतलेले असल्यामुळे अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे श्री सखावत अली एहसान अली यांना जन माहिती अधिकारी समजण्यात येते व ते शास्तीस पात्र आहे. व त्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

११. अपील क्रमांक १२८४/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद अकोट यांचेकडे, जानेवारी, २००८ ते सप्टेंबर, २००८ या कालावधीची आपल्या हद्दीत नसलेले अधिकारात नसलेले व प्रकरण न्याय प्रविष्ठ असलेले अतिक्रमण पाडण्यासाठी आपल्या नगर परिषदेला शासनाने वरिष्ठ कार्यालय, न्यायालय किंवा अन्य कोणाकडून आदेश प्राप्त झाले होते त्या सर्व आदेशाच्या सत्यप्रती देण्यात याव्यात, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.१२.२००८ रोजी आपण मागितलेली माहिती ही उक्त अधिनियमात येत नसल्यामुळे देणे आवश्यक नाही. त्यामुळे सदर अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी त्यांच्या स्वतःच्या संदर्भात झालेल्या घटना हया सविस्तर देवून माहितीची अपेक्षा केलेली आहे. परंतु, माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.१.२००९ रोजी देण्यात आला असून त्यात, वरील प्रकरणाची पडताळणी केली असता असे दिसून येते की, अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी श्री नंदकिशोर यवतकार यांनी त्यांचा पत्र दिनांक १०.१२.२००८ अन्वये अपीलार्थीना आपण मागितलेली माहिती ही उक्त अधिनियमात येत नसल्यामुळे देणे आवश्यक नाही व त्यामुळे अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे असे कळविलेले असेल तर अपीलार्थी यांनी आदेशाची प्रत मागणी केलेली असल्यामुळे ती रेकार्डवर उपलब्ध असल्यास अपीलार्थीस माहिती पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक ७.२.२००९ रोजी अपीलार्थी यांना तशा प्रकारचे आदेश रेकार्डवर उपलब्ध नाही असे कळविले आहे असा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी दाखल केला आहे. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

१२. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांचे दुकान नगर परिषद हद्यीचे बाहेर असून सुध्दा अतिक्रमण म्हणून काढून टाकण्यात आले होते. व त्यामुळे त्यांनी अशा प्रकारची माहिती मागितली होती. परंतु अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी मोघम माहिती मागितलेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य जर असेल तर स्पष्ट उत्तर नसल्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपील दाखल करावे लागले असे दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर योग्य ते उत्तर दिले तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, प्रथम अपीलात त्यांनी सर्व वस्तुस्थिती विषद केली आहे. परंतु प्रथम अपील किंवा द्वितीय अपीलात कोणतेही नवीन मुद्ये उपस्थित करता येत नाही. व त्यामुळे माहितीच्या अधिकाराच्या अर्जात स्पष्टपणे माहितीचे वर्णन करणे आवश्यक असते. मोघम माहिती मागीतली तर त्याचे उत्तर मोघम येते व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

१३. अपीलकर्ता सौ. उषा सतिष हाडोळे, श्री योगेश प्रल्हाद लोणकर व श्री विजय रुपराव यवतकार यांनी श्री जितेंद्र ताराचंद मजेठिया यांना सदरच्या अपीलांच्या संदर्भात आयोगापुढे युक्तीवाद करण्यसाठी अधिकार पत्र दिले आहे. परंतु ते स्वतः गैरहजर आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) प्रमाणे माहितीचा अर्ज हा व्यक्त्तीशः अर्जदाराने करावयाचा असल्यामुळे व प्रथम अपील व द्वितीय अपील हे सुध्दा अर्जदाराने सादर करावयाचे असल्यामुळे आयोगापुढे त्यांच्या अपीलाच्या संदर्भात युक्तीवाद करताना ते स्वतः हजर राहाणे आवश्यक आहे. व त्यामुळे अधिकार पत्र दिले असले तरी अपीलकर्ता स्वतः गैरहजर असल्यामुळे श्री जितेंद्र ताराचंद

मजेठिया यांचेकडे अधिकार पत्र दिले असले तरी ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे नाही व ते नामंजूर करण्यात येत आहे.

आदेश

१) अपील क्रमांक १२८१/अम/२००९ हे मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची त्यांची जबाबदारी टाळलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. श्री संजय अढावू, मानद अभियंता किंवा मानद सल्लागार यांनी माहिती अधिकारी नसताना सुध्दा सदरच्या अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करता किंवा माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज न देता माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची रक्कम ही त्यांचे मानधनातून योग्य त्या प्रमाणात मुख्याधिकारी, नगर परिषद, अकोट यांनी वसुन करुन ती "००७०-इतर प्रशासकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". या लेखा शिर्षात जमा करावी.

२) अपील क्रमांक १२८२/अम/२००९ हे मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) शास्ती लादण्यात येत आहे. सदरची रक्कम त्यांचे दर महिन्याचे वेतनातून योग्य त्या प्रमाणात वसुल करुन ती "००७०-इतर प्रशासकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". या लेखाशिर्षात जमा करावी. तसेच अपीलकर्ता यांना उर्वरित माहिती देण्यात यावी.

३) अपील क्रमांक १२८३/अम/२००९ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी म्हणून श्री सखावत अली एहसान अली यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/-(रुपये पाच हजार फक्त) शास्ती लादण्यात येत असून ती श्री सखावत अली एहसान अली यांचे दर महिन्याचे वेतनातून योग्य त्या प्रमाणात वसुल करुन "००७०-इतर प्रशासकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". या लेखाशिर्षात जमा करावी.

४) अपील क्रमांक १२८४/अम/२००९ हे खारीज करण्यात येत आहे.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१२९५/अम/२००९

१) श्री राजेन्द्र विश्वासराव रुपुने,
मु.पो. देवगांव, ता.धामणगांव रेल्वे, जि. अमरावती. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती धामणगांव रेल्वे, ता.धामणगांव रेल्वे,
जिल्हा अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्राम पंचायत देवगांव, ता.धामणगांव रेल्वे,
जिल्हा अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी व त्यांचे वकील श्री राजेंद्र पांडे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री एस.एम. मुद्रे, अधीक्षक हजर आहे.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक निरंक (दिनांक २१.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्याप्रमाणे) रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत देवगांव यांचेकडे एकुण ३ मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"(१) १५ ऑगष्टची तहकुब झालेली आमसभा केव्हा घेतली व त्यामध्ये कोणत्या विषयावर चर्चा होऊन कोणते ठराव मंजूर व नामंजूर करण्यात आले त्याची माहिती मिळणेबाबत. (२) दिनांक २ ऑक्टोंबरच्या आमसभेत घरकुल विषयी वाचविण्यात आलेल्या जी.आर.ची प्रत मिळण्याबाबत. (३) प्रतिक्षा यादीनुसार आतापर्यंत कोणाला घरकुलाचा लाभ मिळाला याची माहिती व आता कोणत्या लाभार्थ्याची निवड केली त्याची माहिती व जागेची अ नमुन्याची झेरॉक्स प्रत मिळणेबाबत." माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे व दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे.**

**३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २६.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २.२.२००९ रोजी देण्यात आला असून, माहिती पुरविली नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे ७ दिवसांचे आंत माहिती द्यावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**४. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी घरकुल मिळण्याकरीताअर्ज दिला होता. परंतु, त्याबद्दल कोणतीही माहिती अपीलकर्ता यांना दिली नाही. व त्यांचा अर्ज सुध्दा कार्यवाहीसाठी घेतलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.१०.२००८ च्या अर्जामध्ये त्यांच्या घरकुल मिळण्याच्या संदर्भात कोणतीही माहिती विचारलेली नाही. त्यात आमसभेची माहिती विचारलेली आहे व ती माहिती त्यांना दिनांक ५.११.२००८ रोजी माहिती तयार आहे. आपण घेवून जावी असे पत्र दिलेले दिसून येते. व तशी पोच अपीलकर्ता यांनी दिलेली आहे. त्यानंतर दिनांक १०.११.२००८ रोजी पोच दिलेली आहे. त्यानंतर मात्र प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विचारात घेतलेली दिसून येत नाही. व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्ता यांना दिनांक २.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व दिनांक ४.२.२००९ रोजी माहिती स्वत: घेवून जावी असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते व त्याकरीता त्यांनी पोस्टाचा पुरावा दाखल केला आहे. दिनांक ९.२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती मिळाली म्हणून त्यांनी पोच दिलेली आहे. व दिनांक १०.२.२००९ रोजी खंड विकास अधिकारी यांनी सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते.**

**४. यावरुन अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली ही बाब सुध्दा अपीलकर्ता यांनी मान्य केली होती. त्यांचा घरकुल मिळण्याबाबतचा अर्ज मात्र विचारात घेण्यात आला नाही अशी त्यांची तक्रार आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दोनही पक्षकारांच्या उपस्थितीत सुनावणी घेतली असती तर अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अर्जात मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हे त्यांचे निदर्शनास आले असते. परंतु, कोणत्याही प्रकारची सुनावणी घ्यावयाची नाही व अपील आल्यावर कोणत्याही प्रकारची चौकशी न करता आदेश पारित करावयाचे अशा सवयीमुळे अपीलकर्ता यांना माहिती दिलेली असून सुध्दा निर्णयामध्ये त्याचा उल्लेख दिसून येत नाही.**

**अपीलकर्ता यांनी आयोगाकडे पुन्हा असे सांगितले की, त्यांच्या अर्जाची पुढे दखल घेतली नसल्यामुळे त्यांनी अपील दाखल केले आहे. परंतु, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्या बाबत कार्यवाही करण्याचे आदेश आयोगास देता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)** **अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२)** **अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१३०५/अम/२००९

१) श्री बबलु रामकुमार अहिर(यादव)
ह.मु. स्वामी विवेकानंद चौक,(पाटणी चौक) वाशिम,
जिल्हा वाशिम. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद वाशिम, ता.जि. वाशिम. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय,
वाशिम. ता.जिल्हा वाशिम. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.२.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १६.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२००८ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद वाशिम यांचे कार्यालयात वाशिम जिल्हा निर्मितीनंतर नगर पालिका वाशिम शहर रस्ते विकास निधी व वाशिम शहराच्या सौंदर्यीकरणाला आलेल्या निधीबाबत एकुण ६ मुद्यांवर माहिती मागितली आहे. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. परंतु, प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी वाशिम शहरामध्ये नगर परिषद होण्यापूर्वी रस्त्याची जी परिस्थिती होती ती नगर परिषद झाल्यानंतर तशीच आहे. व जिल्हा झाल्यानंतर सुध्दा परिस्थिती तशीच असल्यामुळे त्यांनी ही माहिती मागितली होती. लोकशाही दिनात सुध्दा अर्ज दिला होता. परंतु त्यांना माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, श्री विनय देशमुख या नांवाने त्यांना नोटीस आल्यामुळे ते आज हजर झालो. ते बांधकाम अभियंता आहे. परंतु, अर्जदाराने दिनांक ३०.१२.२००८ चा माहितीचा अर्ज हा सर्वसाधारण टपालाने पाठविलेला असल्यामुळे व तो लेखा शाखेकडे प्रलंबित राहिल्यामुळे त्यांना माहिती मिळाली नाही. वास्तविक, सदरची माहिती लेखा विभागाची आहे व ती लेखा विभागाने आतापर्यंत देणे आवश्यक होते. व त्यातील मुद्या क्रं. २ मधील अर्धी माहिती व मुद्या क्रमांक ६ ची माहिती ही बांधकाम विभागाशी संबंधीत आहे. सदरचा अर्ज हा बांधकाम विभागाकडे देण्यात आलेला नाही. किंवा लेखा विभागाने सदरची माहिती अपीलकर्ता यांना पुरवावयाची आहे असे पत्र सुध्दा बांधकाम विभागाला देण्यात आलेले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलामध्ये लेखा शाखेचा उल्लेख केला असता तर सदरच्या अर्जाचे संदर्भात आयोगाकडे योग्य तो खुलासा झाला असता.**

**मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता उपस्थित असलेले बांधकाम अभियंता यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसून येते व त्यामुळे जन माहिती अधिकारी, लेखा शाखा यांनी आतापर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शास्ती लादण्याची आयोगाची खात्री झालेली आहे.**

**तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे व शासनाच्या परिपत्रकाचे सुध्दा उल्लंघन केले आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, जन माहिती अधिकारी, लेखा शाखा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांचेकडील उपलब्ध असलेली माहिती व बांधकाम विभागाकडून पुरवावयाची माहिती एकत्रित करुन अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास ते शास्तीस पात्र राहातील.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी, लेखा विभाग यांनी अपीलकर्ता यांना विहिती मुदतीत म्हणजेच अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे किंवा माहितीच्या अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात, अशी आयोगाची खात्री झाली आहे. व त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही प्रादेशिक संचालक, नगर पालिका प्रशासन, तथा आयुक्त अमरावती विभाग, अमरावती यांनी करावयाची असल्यामुळे निर्णयाची एक प्रत त्यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**३)	तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल घेतलेली नाही व त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे व शासनाच्या परिपत्रकाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करावी.**
**४)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**
नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१३०४/अम/२००९

१) श्री वसंतराव रेशमाजी कदम,
मु.पो.हिंगणी, ता.जि. हिंगाली. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, वाशिम, जिल्हा वाशिम. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
राजेश्वर विद्यालय, वांगी, ता.जिल्हा वाशिम. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.२.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १६.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००८ रोजी शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद वाशिम यांचेकडे राजेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वांगी ता.जि. वाशिम बाबत एकुण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. परंतु, विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २०.२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु, अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, वाशिम यांनी माहिती ही विद्यालयाच्या स्तरावरील असल्यामुळे सदरचा अर्ज हा मुख्याध्यापक यांचेकडे दिनांक ३१.१२.२००८ रोजी पाठविण्यात आला आहे. त्याप्रमाणे दिनांक ४.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. त्याबद्दलची पोच**

**( पान २ वर..)**



**त्याच पत्रावर दिलेली आहे व त्यानंतर पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश केल्याप्रमाणे दिनांक २५.३.२००९ रोजी सुध्दा माहिती पोस्टाने उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना आतापर्यंत दोन वेळा माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं./१३१८/अम/२००९

१) श्री उमेश रमेश अवारे,
मु. खापरवाडी, खु.पो.वरुर,
ता.आकोट, जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रण, जिल्हा परिषद, अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, आकोट. ता. आकोट, जिल्हा अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.२.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १७.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे, सन २००५ ते २००८ या कालावधीतील आकोट पंचायत समिती अंतर्गत किती इंदिरा आवास घरकुल मंजूर झाले याबाबतची संपूर्ण माहिती मागितलेली दिसून येते. तसेच दिनांक २१.१०.२००७ च्या तक्रारी नुसार चौकशी अहवाल मागितलेला दिसून येतो. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले आहे. व विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३१.१२.२००८ रोजी देण्यात आला असून, आतापर्यंत न पुरविलेली माहिती तात्काळ विनामुल्य पुरविण्यात यावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक १.१.२००९ रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली असताना सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. द्वितीय अपील मेमो मध्ये माहिती खोटी व दिशाभूल करणारी दिली असे कारण दिले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दिनांक ११.११.२००८ च्या अर्जातील माहिती ही पंचायत समिती आकोट यांचे कार्यक्षेत्रातील असल्यामुळे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आकोट यांना प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अकोला यांनी माहिती पुरविण्याकरीता आदेश दिलेले होते. त्या आदेशाची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली होती. परंतु सदरच्या आदेशाप्रमाणे गट विकास अधिकारी यांनी माहिती ही बांधकाम विभागाबाबत असल्यामुळे श्री वा.की. तुपसुंदरे, कनिष्ठ अभियंता यांचे सहाय्यक, पंचायत समिती आकोट यांना दिनांक १९.११.२००८ रोजी पत्र देण्यात आले व माहिती ७ दिवसांचे आंत सादर करावी असे कळविण्यात आले. अर्जदाराने मागितलेली माहिती ही जास्त प्रमाणात व जास्ती कालावधीची सन २००५-०८ ची असल्यामुळे व विविध नस्तीमधून एकत्रित करावयाची असल्यामुळे तसेच मागितलेली काही माहिती प्रश्न उत्तरे स्वरुपातील असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झालेला होता, असा खुलासा आयोगाकडे करण्यात आला. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३१७/अम/२००९

१) श्री शिवदास अंबादास वरठे,
मु.पो.पुनोती खुर्द, ता.बार्शिटाकळी, जिल्हा अकोला. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,
अमरावती विभाग, अमरावती. ता.जि. अमरावती. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १७.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक कार्यालय, अमरावती यांचेकडे, मा. शिक्षण उपसंचालक, अमरावती यांचे नांवे असलेले मा. भाऊसाहेब पांडुरंग फुंडकर साहेब, विरोधी पक्ष नेता यांचे पत्र दिनांक ७.९.२००५ चे संदर्भात शिक्षण उपसंचालक यांनी केलेल्या कार्यवाही अहवालाची प्रमाणित प्रत. उपरोक्त पत्रासोबतच्या मुळ तक्रार अर्जाची प्रमाणित प्रत. आयुक्त, नागपूर यांचे आदेश दिनांक ३०.१०.२००७ नुसार शिक्षणाधिकारी, माध्यमिक विभाग, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून वसुल करण्यात आलेल्या दंडासंबंधी तारीख वाईज विवरण अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.१२.२००८ रोजी देण्यात आला असून, माहिती देण्यास विलंब झालेला आहे असे दिसून येते. यापूढे विहित मुदतीत माहिती पुरविण्यात यावी, अशी जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात आलेले दिसून येते. तसेच चौकशी अहवालाची प्रत पुरविण्यात यावी व ती पुरविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. दंडाची माहिती आजच पुरविण्यात यावी. वसुली केली असल्यास वसुलीची प्रत व कार्यवाही बाबत पत्र दिले असल्यास त्याची प्रत. मा. विरोधी पक्ष नेता यांनी पाठविलेल्या तक्रार अर्जाची प्रमाणित प्रत आजच पुरविण्यात यावी, असे आदेश दिले व संपूर्ण कागदपत्र अपीलकर्ता यांना त्याच दिवशी उपलब्ध करुन दिले. त्यात एकुण ४ सहपत्रे आहेत, असे नमूद केलेले आहे. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना आतापर्यंत माहिती मिळाली नाही. परंतु, अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, सुनावणीच्या वेळेस त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्याबद्दलची पोच सध्दा त्यांनी दिलेली आहे. व ती आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना पुन्हा चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना सांगितले. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी अहवालाची प्रत उपलब्ध करुन देताना अपीलकर्ता यांनी आता माहिती नको असे सांगितले व ते जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३१४/अम/२००९
अपील क्रं. १३१५/अम/२००९

१) श्री रामराव दत्तुजी उंबरकार,
बळवंत कॅालनी, अकोला, शुभम करोती मंगल कार्यालयामागे,
पो. गांधीनगर, अकोला. ता.जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी,
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १७.२.२०१० रोजी घेण्यात आली.**

**२. अपील क्रमांक १३१४/अम/२००९ मध्ये दिनांक ७.१०.२००८ रोजी शिक्षण सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे कार्यालयात शिक्षणाधिकारी, अकोला यांनी तपासणी नंतर दिलेला अहवाल ऑगष्ट, २००८ ते डिसेंबर, २००८ या कालावधीतील अहवालावर केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. परंतु त्यातही कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांचा अपील अर्ज, प्रथम अपील व द्वितीय अपील मेमोचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी मोघम माहिती विचारलेली आहे व ती माहिती मा. उपसंचालक यांचे स्तरावरील दिसून येते व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

**४. अपील क्रमांक १३१५/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे, आदर्श विद्यालय, अकोला येथील सेवा जेष्ठता यादीमध्ये तीन ४२० मध्ये नेमणूका केलेल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. मी आपणास त्या तीनही लोकांची माहिती विनंती अर्ज देताना आणि १ ऑक्टोबर, ०८ ला सांगितली होती त्यावर आपण कोणती कार्यवाही केली, त्याची माहिती मला द्यावी. खोटया जेष्ठता यादया सादर केल्या त्यामुळे मुख्याध्यापकावर कार्यवाही करावी, अशी तक्रार केली होती, त्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी १२.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**५. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक १५.११.२००८ रोजी विहित मुदतीत अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.१०.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने सेवा जेष्ठता संदर्भात सुनावणी घेतली आहे. त्याबद्दल आतापर्यंत निर्णय झालेला नाही, अशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली होती. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ५.१.२००९ ला सुनावणी घेण्यात आली होती. सेवा जेष्ठता संदर्भातील निर्णय दिनांक ३.१.२००९ ला मिळाला आहे असे अपीलकर्ता यांनी त्यावेळेस सांगितले होते. तक्रार राहिलेली नाही याबाबत त्यांनी स्वाक्षरी दिली आहे.**

**दूस-या तक्रारीच्या संदर्भात त्यांनी तोंडी तक्रार केलेली दिसून येते व तक्रार अर्जाची तारीख दिलेली नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)** **अपीलकर्ता यांचे अपील  क्रमांक १३१४/अम/२००९ व अपील क्रमांक १३१५/अम/२००९ खारीज करण्यात येत आहे.**

**२)** **अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३१६/अम/२००९

१) श्री रामराव दत्तुजी उंबरकार,
बळवंत कॅालनी, अकोला, शुभव करोती मंगल कार्यालयामागे,
पो. गांधीनगर, अकोला. ता.जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,
अमरावती विभाग, अमरावती. ता.जि. अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
शिक्षण उपसंचालक कार्यालय अमरावती विभाग, अमरावती.
ता.जिल्हा अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १७.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. परंतु, सदरच्या अपीलाचे संदर्भात राज्य माहिती आयोग, खंडपीठ, अमरावती यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २००९ रोजी निर्णय दिलेला असल्यामुळे त्याच प्रकरणात नागपूर खंडपीठाने निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३२२/अम/२००९

१)श्री सुरेंद्र जयराम मुळे,
प्लॅाट क्रं.१५४, शिवाजी सोसायटी, जूना अजीसपूर रोड,
बुलढाणा. ता.जि. बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद, बुलढाणा. ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा.
ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १८.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. सदरच्या अपील प्रकरणात अपीलकर्ता यांनी, त्यांना आवश्यक माहिती प्रत्यक्ष पाहावयास मिळाली असून त्यांचे पूर्ण समाधान झ ााले असल्यामुळे अपील खारीज करण्याबाबत, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.२.२०१० रोजी लेखी निवेदन दिलेले असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३२१/अम/२००९

१) बळीराम नथ्थूजी काळबांधे,
अध्यक्ष, महा.रा.जि.प.आ.से.कर्मचारी संघटना,
वार्ड नं.१९, मुठ्ठे ले आऊट, टी.बी. दवाखानाजवळ, बुलढाणा.
ता.जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
(सामान्य प्रशासन विभाग), जिल्हा परिषद, बुलढाणा.
ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी
(सामान्य प्रशासन विभाग), जिल्हा परिषद, बुलढाणा.
ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १८.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे, आरोग्य विभाग, जिल्हा प्रशिक्षण केंद्रात आरोग्य विषयक विविध प्रशिक्षण कार्यक्रमात २० लाखापेक्षा जास्त शासन रकमेचा अपहारबाबत झालेल्या फेर चौकशीची (संघटनेचे पत्र क्रमांक २२२ दिनांक २४.९.२००८नुसार) अहवालाची प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्वत: कार्यालयात येवून घेवून जाईल असे कळविलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १९.१.२००९ रोजी निर्णय दिलेला असून मागितलेली माहिती. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे (गोपनिय) असल्यामुळे सदर माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येत नाही. माहिती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशानुसार आपणास उपलब्ध करुन देता येईल असे माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले. मुख्याधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाल्यानंतर अपीलकर्त्यांस त्यांच्या अर्जानुसार उपलब्ध असलेली माहिती, माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु सदरच्या आदेशाप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी अमरावती येथे सुनावणीस हजर राहावयाचे असल्यामुळे आज नागपूर येथे सुनावणीस हजर राहू शकत नाही व त्यांना अद्यापही माहिती मिळालेली नसल्यामुळे ते दोषींवर उचित कारवाई करावी अशी विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज हा कार्यालयात अप्राप्त असून अपीलकर्ता यांचा अर्ज श्री पी.आर. जाधव, वरिष्ठ सहाय्यक यांना दिला असून त्यांनी तो डॅा.श्री कसबे, तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे दिला असल्याचा लेखी जबाब जोडण्यात आलेला आहे. व डॅा.श्री कसबे, हे सदरचा अर्ज त्यांची बदली झाली तेव्हा घेवून गेले असा आयोगाकडे उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांचा मुळ अर्ज या कार्यालयात प्राप्त नसल्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.**

**वास्तविक, अपीलकर्ता यांनी जो अर्ज सादर केला आहे तो माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे योग्यरित्या दाखल केलेला दिसून येतो व त्यावर आवक विभाग याची स्वाक्षरी सुध्दा दिसून येते. परंतु, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे आलेला अर्ज हा त्या संबंधीत विषयाचे माहिती अधिकारी यांचेकडे देणे आवश्यक असते. परंतु, वरिष्ठ सहाय्यक श्री जाधव यांनी तो, ज्यांचे विरुध्द तक्रार आहे त्यांचेकडे सादर केला. याचा अर्थ श्री जाधव यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास मुद्दाम विलंब लागावा त्याकरीता अर्जाचे विनाकारण हस्तांतरण केलेले दिसून येते. व त्यामुळे श्री जाधव व डॅा.श्री कसबे, तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सदरची माहिती विलंबाने उपलब्ध व्हावी असा प्रयत्न केलेला दिसून येतो. व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) नुसार रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबत त्यांचे म्हणणे ऐकुन घेणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा त्याबाबत कोणत्याही प्रकारची चौकशी न करता किंवा चौकशी झाली आहे व अहवाल प्राप्त आहे किंवा नाही याबाबत सुध्दा चौकशी न करता लिहून आलेल्या निर्णयावर स्वाक्षरी केलेली दिसून येते. यावरुन जिल्हा परिषद, बुलढाणा**

**येथे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींची काहीही माहिती दिसून येत नाही व याबाबतची सर्व जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे व त्यांचे ते प्रशासकिय अपयश आहे. त्यामुळे याबाबतची संपूर्ण सखोल चौकशी होऊन संबंधीतांवर प्रशासकिय कारवाई करणे सुध्दा आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत विना मुल्य, नोंदणीकृत टपालाद्वारे अहवालाची प्रत पुरविण्यात यावी.**

**२) जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग तसेच वरिष्ठ सहाय्यक श्री पी.आर. जाधव व डॅा.श्री कसबे यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५,०००/-(रुपये पंचवीस हजार फक्त) शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत तिघांनीही करावयाचा आहे. व तसा खुलासा न केल्यास तिघांच्याही विरुध्द शास्ती प्रमाणात कायम होईल याची नोंद घ्यावी.**

**३) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.**

**४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १२९६/अम/२००९

१) सौ.नंदा सतीशराव देशपांडे, क.लि.,
या.द.व.देशमुख कला व वाणित्य महाविद्यालय, तिवसा,
ता. तिवसा, जिल्हा अमरावती. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक(उच्च शिक्षण)
अमरावती विभाग, अमरावती. ता.जिल्हा अमरावती. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
डॅा. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती,
ता.जिल्हा अमरावती. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १८.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डॅा. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय यांचेकडे (१) डॅा.पं.दे.महाविद्यालय अमरावती यांचे कार्यालयातून मा. सहसंचालक उ.शि.अमरावती यांना दिनांक १८.११.९६ रोजी पाठविण्यात आलेल्या (कर्मचा-यांच्या विकल्पाबाबत) पत्राची सत्यप्रत सहिशिक्यानिशी साक्षांकित करुन देण्यात यावी. (२) प्राचार्य, डॅा. पं.दे.विधी महा.अमरावती यांना मा. सहसंचालक उ.शि.अमरावती यांचेकडून प्राप्त झालेले दिनांक ८.१२.१९९८ चे (कर्मचा-यांची पदनिश्चिती बाबत) पत्राची सत्यप्रत सही शिक्यानिशी साक्षांकित करुन देण्यात यावी. माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.८.२००८ रोजी जावक नोंदवहिच्या दिनांक १८.११.९६ च्या पानाची व अ.क्रं.३७७७ च्या जावक नोंदवहीच्या पानाची छायांकित प्रत साक्षांकित करुन पाठविण्यात येत आहे, असे कळविलेले दिसून येते. परंतु, उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १४.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.१०.२००८ रोजी देण्यात आला असून, अपीलकर्ता यांना प्राचार्य तथा माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु, त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी सहसंचालक यांना स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्यावर दिनांक २४.१२.२००८ रोजी अपीलीय अधिकारी तथा सह संचालक यांनी, त्यांना माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.८.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे उलट टपाली कळविलेले दिसून येते.**

**जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे माहिती देताना असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती दिली आहे. परंतु, त्याबाबतची पोच घेण्यात आली नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य हे विधी महाविद्यालयाचे प्राचार्य आहे. व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(५) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी राज्य जन माहिती अधिकारी यांची आहे अशी जी तरतुद आहे ती त्यांना माहिती असणे आवश्यक आहे. व त्यामुळे त्यांनी वैयक्तिकरित्या आयोगाकडे उपस्थित राहून माहिती अधिकारी यांचे कर्तव्य करणे आवश्यक होते. परंतु मुंबईस जात आहो, हे कारण देवून प्रतिनिधी पाठविलेला आहे. यावरुन विधी महाविद्यालयात सुध्दा कशा प्रकारचे कायदयाचे शिक्षण दिले जात असेल हे दिसून येते.**

**अपीलकर्ता यांना माहिती जरी उपलब्ध करुन दिली आहे असे कळविले असले तरी अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००९ रोजी आयोगाकडे ज्याअर्थी माहिती उपलब्ध झाली नाही असे कारण देवून द्वितीय अपील दाखल केले आहे, त्यामुळे त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध**

**झाली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य हे दोषी आढळून येतात. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २१.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती मुद्येनिहाय विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्दलचा खुलासा १० दिवसांचे आंत आयोगाकडे करावा अन्यथा शास्ती लादण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३२५/अम/२००९
अपील क्रं. १३२६/अम/२००९

१) श्री लक्ष्मण मोतीराम राऊत,
मु.पो. आंबेटाकळी, ता.खामगांव, जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकरी,
जिल्हा परिषद बुलढाणा. ता.जि. बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत आंबेटाकळी, ता.खामगांव, जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक १८.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. परंतु, सदरचे दोनही अपीलाची सुनावणी राज्य माहिती आयोग, खंडपीठ, अमरावती येथे झालेली असल्याचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाकडे दिलेले असल्यामुळे व त्याच प्रकरणात पुन्हा नागपूर खंडपीठाने सुनावणी घेणे योग्य नसल्यामुळे सदरचे दोनही अपील खारीज करण्यास पात्र आहेत.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३२५/अम/२००९ व अपील क्रमांक १३२६/अम/२००९ खारीज करण्यात येत आहेत.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

१)अपील क्रं.९२६/२००९
२)अपील क्रं.११२७/२००९
३)अपील क्रं.११३५/२००९

अपील क्रं.९२६/२००९
१) श्री कृष्णा चिरकुटराव भादे,
द्वारा-श्री एन.एम.नाकतोडे, मुंधडा कॅालनी,
नाचनगांव रोड, पुलगांव ता. देवळी, जिल्हा वर्धा. अपीलकर्ता

अपील क्रं.११२७/२००९
२) श्री तुमेन हगरुजी बंसोड, प्राथमिक शिक्षक,
द्वारा-गोपाल गुंगेट्टीवार, इंदीरा वार्ड,एटापल्ली,
ता. एटापल्ली, जिल्हा गडचिरोली. अपीलकर्ता

अपील क्रं.११३५/२००९
३) कु. तय्यबा सरोश मोहम्मद रकीब,
प्लॅाट नं. १२९८, मनोज किराणा स्टोर्स जवळ,
आंबेडकर मार्ग, अशिनगर, नागपूर-४०००१७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सिव्हील लाईन्स, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहा.सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सिव्हील लाईन्स, नागपूर. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक १८.२.२०१०)

नि र्ण य

**अपीलकर्ते यांनी अनुक्रमे दिनांक २२.९.२००९, २१.११.२००९ व दिनांक १७.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून अनुक्रमे दिनांक २२.१०.२००९, दिनांक ९.१२.२००९ व दिनांक २०.११.२००९ रोजी नोटीस काढून अनुक्रमे दिनांक ७.११.२००९, १३.१.२०१० व दिनांक १८.१२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी अनुक्रमे दिनांक ७.१.२००९, १३.१.२०१० व दिनांक १८.१२.२००९ रोजी झालेली आहे. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२.** अपील क्रमांक ९२६/२००९ **मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २९.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर यांचेकडे मार्च, २००९ मध्ये झालेल्या विभागीय शिक्षण मंडळाच्या एस.एस.सी. परीक्षेत आसन क्रमांक J-१५००४ (परीक्षा केंद्र क्रमांक १७३३) चा इंग्रजी विषय (तृतीय भाषा) चे उत्तर पत्रिकेची झेरॅाक्स प्रत मिळणेबाबत (question paper set code 'C') इंग्रजी विषय परीक्षा दिनांक ७.३.२००९, अशा स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.७.२००९ रोजी महाराष्ट्र राज्य माहिती अधिनियम, २००२ मधील नियम ७ (ज) अन्वये राज्य मंडळ, कार्यालय पूणे यांचे पत्र क्रमांक रामं/आस्था/मा.अ./१०१४३, दिनांक ८.१२.२००६ मधील परिच्छेद-पाच चे अनुसार माहितीचा अधिकार अधिनियमा नुसार विद्यार्थ्याची उत्तरपत्रिका ही गोपनिय बाब असून माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम १९६५ खाली तयार करण्यात आलेल्या नियमावलीनुसार तसेच केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ अन्वये, उत्तरपत्रिका अथवा तिची छायाप्रत देता येणार नाही, असे आपणास कळविण्यात येत आहे, असे जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहाय्यक सचिव, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर यांनी कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे.**

**प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आला असून अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३.** अपील क्रमांक ११२७/२००९ **मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १५.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय सचिव, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारात माहिती मिळण्याबाबत (J-१७५१२३) (२) तपासणिक व पडताळणीस संपूर्ण विषयाच्या गुणपत्रिकेच्या झेरॅाक्स प्रती. (३) संपूर्ण विषयाच्या उत्तर पत्रिकेच्या झेरॅाक्स प्रती, अशा स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.**

अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.८.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा विभागीय सहाय्यक सचिव, नागपूर शिक्षण मंडळ, नागपूर यांनी महाराष्ट्र राज्य माहिती अधिनियम, २००२ मधील नियम ७ (ज) अन्वये राज्य मंडळ, कार्यालय पूणे यांचे पत्र क्रमांक रामं/आस्था/मा.अ./१०१४३, दिनांक ८.१२.२००६ मधील भाग क्रमांक-२(५) अन्वये परीक्षक व समिक्षक यांच्या गुणपत्रिकेच्या छायाप्रती व बाब क्रमांक ३(२) अन्वये गुणपडताळणी प्रकरणी सादर टिपण्या व निर्णय प्रक्रियेचा तपशील देता येत नाही. तसेच उपरोक्त राज्य मंडळाच्या पत्रातील परिच्छेद-पाच अनुसार विद्यार्थ्यांची उत्तरपत्रिका ही गोपनिय बाब असून माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम १९६५ खाली तयार करण्यात आलेल्या नियमावलीनुसार तसेच उत्तरपत्रिकाची छायाप्रत देता येत नाही किंवा दाखविता येत नाही अशी मंडळाची धारणा, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचे क्रमांक एसएससी २००४/(१३९/०४)उमाशि-२ मंत्रालय, मुंबईचे पत्रानुसार पक्की केली आहे. व केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी याचिका नंबर ३९२९/२००६ कु. खुशबू विनोद सिंधानिया अर्जदार विरुध्द विभागीय सचिव, अमरावती, प्रकरणी उत्तरपत्रिका दाखविणे बाबतची अर्जदाराची याचिका फेटाळली आहे. सबब तपासनिक व पडताळणीस यांच्या संपूर्ण विषयांच्या गुणपत्रिकेच्या तसेच उत्तरपत्रिकेच्या छायाप्रती मिळणेबाबतचा अर्जदाराचा अर्ज खारीज करण्यात येत आहे, असे माहिती अधिकारी तथा सहाय्यक विभागीय सचिव, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर यांनी कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २१.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ४.१२.२००९ रोजी देण्यात आला असून सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे. व त्यामुळेच त्या निर्णयाच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपील क्रमांक १०३५/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२००९ रोजी विभागीय सचिव तथा माहिती अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर यांचेकडे एस.एस.सी. परीक्षा मार्च, २००९ मधील केंद्र क्रमांक जे-०७९८११, अर्जदाराच्या विज्ञान-२ व इंग्रजी या विषयाच्या उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रती किंवा निरीक्षण करु देणेबाबत, माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.८.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा विभागीय सहाय्यक सचिव यांनी राज्य मंडळ, कार्यालय पूणे यांचे पत्र क्रमांक रामं/आस्था/मा.अ./१०१४३, दिनांक ८.१२.२००६ मधील परिच्छेद-पाच नुसार, विद्यार्थ्यांची उत्तरपत्रिका ही गोपनिय बाब असून माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम १९६५ खाली तयार करण्यात आलेल्या नियमावलीनुसार उत्तरपत्रिकाची छायाप्रत देता येत नाही किंवा दाखविता येत नाही, अशी मंडळाची धारणा, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचे क्रमांक एसएससी २००४/(१३९/०४)उमाशि-२ मंत्रालय, मुंबईचे पत्रानुसार पक्की केली आहे. व केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(छ) नुसार उत्तरपत्रिकाची छायांकित प्रत देता येत नाही. तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी याचिका नंबर ३९२९/२००६ कु. खुशबू विनोद सिंधानिया अर्जदार विरुध्द विभागीय सचिव, अमरावती प्रकरणी उत्तरपत्रिका दाखविणे बाबतची अर्जदाराची याचिका फेटाळली आहे, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक १४.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.१०.२००९ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आला असून प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळेच त्या निर्णयाच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. सदरच्या अपीलांमध्ये अपीलकर्ता यांचे वकील श्री अमोल डी. पाटील यांनी आयोगापुढे युक्तीवाद केला. व युक्तीवाद करताना राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग यांच्या निर्णयाचा दाखला दिला आहे. व त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचेकडून उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती उपलब्ध व्हाव्या असा युक्तीवाद केला.

वरील तीनही अपीलांमध्ये तीनही अर्जदारांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे त्यांच्या पाल्यांच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती मागितलेल्या आहे. त्याबाबत जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा करताना केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(ड)(छ)(त्र) तसेच माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ खाली तयार नियमावली, १९७७ मधील नियम क्रमांक ५७ नुसार अर्जदाराची उत्तरपत्रिका ही अत्यंत महत्वाची व गोपनिय दस्तऐवज असल्याने त्यांचे पुर्नमुल्यांकन करण्याची त्या उघड करण्याची, त्यांची तपासणी करण्याची व मुळ उत्तरपत्रिका किंवा तिच्या छायांकित प्रतीची मागणी कोणत्याही विद्यार्थी अथवा पालक यांना करता येणार नाही किंवा त्यांचा तसा हक्क राहणार नाही. तसेच उत्तरपत्रिकेची छायाप्रत विद्यार्थ्यांस देता येणार नाही. तसेच महाराष्ट्र राज्य माहिती अधिनियम, २००२ मधील नियम ७ (ज) अन्वये राज्य मंडळ, कार्यालय पूणे यांचे पत्र क्रमांक रामं/आस्था/मा.अ./१०१४३, दिनांक ८.१२.२००६ मधील भाग क्रमांक-२(५) अन्वये परीक्षक व समिक्षक यांच्या गुणपत्रिकेच्या छायाप्रती व बाब क्रमांक ३(२) अन्वये गुणपडताळणी प्रकरणी सादर टिपण्या व निर्णय प्रक्रियेचा तपशील देता येत नाही. तसेच उपरोक्त राज्य मंडळाच्या पत्रातील परिच्छेद-पाच अनुसार विद्यार्थ्यांची उत्तरपत्रिका ही गोपनिय बाब असून माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम १९६५ खाली तयार करण्यात आलेल्या नियमावलीनुसार तसेच उत्तरपत्रिकाची छायाप्रत देता येत नाही किंवा दाखविता येत नाही अशी मंडळाची धारणा, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचे क्रमांक एसएससी २००४/(१३९/०४)उमाशि-२, दिनांक ११.८.२००४ मंत्रालय, मुंबईचे पत्रानुसार पक्की केली आहे, अशा प्रकारचा युक्तीवाद व लेखी खुलासा आयोगाकडे केला आहे. तसेच राज्य माहिती आयोग, खंडपीठ, पुणे यांनी दिनांक २२.७.२००९ रोजी दिलेल्या निर्णयास, मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने परीक्षार्थीची न्यायालयापुढील, २००९ ची याचिका क्रमांक ८८६८ मध्ये दिनांक १५.१०.२००९ रोजी अंतरिम निर्णय देवून सदरच्या निर्णयाच्या अंमलबजावणीस, सदर याचिकेचा अंतिम निर्णय होईपर्यंत स्थगिती दिली आहे. तसेच मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांचे पुढील २००९ ची याचिका क्रमांक ४२५६ मध्ये मा. उच्च न्यायालय यांनी दिनांक ६.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाचे आदेशास अंतरिम स्थगिती दिली असून २००७ ची याचिका क्रमांक २८३० बरोबर सुनावणी घ्यावी, असा निर्णय दिलेला आहे, असेही आयोगाचे निदर्शनास आणले.

तसेच उत्तरवादी यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांचे पुढील २००६ ची याचिका क्रमांक ३९२८ मधील २००६ चा पुर्नविलोकन अर्ज क्रमांक ८४३ व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती विभागीय मंडळ यांचे विरुध्द कु. खुशबू विनोद सिंघानिया

यांचे याचिकेमधील मा.खंडपीठाचा निर्णय दिनांक १३.११.२००६ आयोगाचे निदर्शनास आणला. सदरच्या निर्णयाप्रमाणे परिक्षार्थींना उत्तरपत्रिकाचे पुर्नमुल्यांकन तसेच उत्तरपत्रिकेची प्रत किंवा उत्तरपत्रिकेचे निरिक्षणास हक्कदार असणार नाही असा निर्णय दिलेला आहे. व त्यामुळे याचिका क्रमांक ३९२८/२००६ ही खारीज करण्यात आली आहे.

शिक्षण मंडळाने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचे पुढील २००६ ची याचिका क्रमांक ३९२८/२००६ कडे आयोगाचे लक्ष वेधले असल्यामुळे आयोगाने सदरच्या निर्णयाचे अवलोकन केले. सदरची याचिका ही राज्य माहिती आयोगाचे विरुध्द नाही. त्या याचिकेतील याचिकाकर्ती कु. खुशबू विनोद सिंघानिया यांनी शिक्षण मंडळाच्या निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती. यावरुन सदरची याचिका ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द नाही. मा. उच्च न्यायालयाचे संपूर्ण निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कोणत्याही तरतुदीचे विश्लेषण केलेले नाही किंवा निर्णय सुध्दा त्या संदर्भात देण्यात आला नाही. मा. उच्च न्यायालय मुंबईचे खंडपीठाने २००९ ची याचिका क्रमांक ८८६८ मध्ये व ४२५६ खंडपीठ, नागपूर मध्ये जो स्थगिती आदेश दिलेला आहे, तो त्या त्या याचिके पुरता मर्यादित आहे. (तो सर्वंकष असा दिलेला नाही.) व त्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाचे पुढील दाखल झालेल्या अपीलांमध्ये सुनावणी घेवून निर्णय देणे आवश्यक झाले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करताना केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ८ (ड)(छ) व (त्र) तसेच माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ खालील तयार नियमावली १९७७ मधील नियम क्रमांक ५७ अन्वये विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका ही अत्यंत महत्वाचा व गोपनिय दस्तऐवज असल्याने त्याचे पुर्नमुल्यांकन करण्याची त्या उघड करण्याची, त्यांची तपासणी करण्याची व मुळ उत्तरपत्रिका किंवा तिच्या छायांकित प्रतीची मागणी कोणत्याही विद्यार्थी अथवा पालक यांना करता येणार नाही, असे युक्तीवादात सांगितले. व मंडळाची ही धारणा, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचे क्रमांक एसएससी २००४/(१३९/०४)उमाशि-२, दिनांक ११.८.२००४ मंत्रालय, मुंबईचे पत्रानुसार पक्की केली आहे, अशा प्रकारचा युक्तीवाद आयोगाकडे केला आहे. तसेच अपीलकर्ता यांना महाराष्ट्र राज्य माहिती अधिनियम, २००२ मधील नियम ७ (ज) अन्वये राज्य मंडळ, कार्यालय पूणे यांचे पत्र क्रमांक रामं/आस्था/मा.अ./१०१४३, दिनांक ८.१२.२००६ च्या पत्राचा सुध्दा संदर्भ दिला आहे. सदरचा संदर्भ हा स्पष्टपणे महाराष्ट्र राज्य माहिती अधिनियम, २००२ च्या संदर्भात दिसून येतो. महाराष्ट्र माहितीचा अधिनियम,२००२ हा दिनांक ११.१२.२००५ रोजी निरसित करण्यात आलेला आहे. व दिनांक १२.१०.२००५ पासून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी ही संपूर्ण भारतामध्ये सुरु झाली आहे. व त्यामुळे दिनांक १२.१०.२००५ नंतर केंद्रिय अधिनियमाच्या नियम ६ प्रमाणे जरी अर्जदाराने सार्वजनिक प्राधिकरणाचे माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितली तरी त्या अर्जाचे संदर्भात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होतील. व त्यामुळे उत्तरवादी यांनी महाराष्ट्र माहितीचा नियम, २००२ तसेच त्याखालील महाराष्ट्र शासनाने धारणा पक्की केलेले पत्र हे कालबाहय आहे. व त्याची दखल आयोगास घेता येणार नाही.

परंतु, शिक्षण मंडळाने माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ खाली तयार केलेली नियमावली १९७७ मधील नियम ५७ चा संदर्भ दिला आहे. व त्या नियमामध्ये उत्तरपत्रिका ही अत्यंत महत्वाची व गोपनिय दस्तऐवज असल्याने त्यांचे पुर्नमुल्यांकन करण्याची, त्या उघड करण्याची, त्यांची तपासणी करण्याची व मुळ उत्तरपत्रिका किंवा तिच्या छायांकित प्रतीची मागणी कोणत्याही विद्यार्थी अथवा पालक यांना करता येणार नाही किंवा त्यांचा तसा हक्क राहणार नाही. तसेच उत्तरपत्रिकेची छायाप्रत विद्यार्थ्यांस देता येणार नाही, असे म्हटले आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २२ मध्ये सदरच्या अधिनियमाच्या तरतुदींना अधिभावी परिणाम दिलेला आहे, तो खालीलप्रमाणे आहे.

"या अधिनियमाच्या तरतुदी या, शासकिय गुपिते अधिनियम, १९२३ (१९२३ चा १९) यामध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाखेरीज कोणत्याही अन्य कायद्याच्या आधारे अंमलात असणा-या कोणत्याही संलेखामध्ये त्याच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, अंमलात येतील." या तरतुदीप्रमाणे माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ हया कायदयाच्या तरतुदी व त्याखालील केलेले नियम हे जर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीशी विसंगत असेल तर केंद्रिय अधिनियमाच्या तरतुदी प्रभावी ठरते. व त्यामुळे त्या अधिनियमाच्या नियमावलीच्या नियम ५७ मध्ये जर उत्तरपत्रिका ही अत्यंत महत्वाचा गोपनिय दस्तऐवज असल्यामुळे देता येणार नाही, असे नियम जरी असले तरी ते प्रभावी ठरणार नाही. त्याकरीता मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठाने श्रीयुत स्वरुपसिंग ह-या नाईक विरुध्द महाराष्ट्र शासन या २००७ ची याचिका क्रमांक १७५० मध्ये दिनांक २३.३.२००७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या परिच्छेद १७ मध्ये खालीलप्रमाणे विश्लेषण केलेले आहे.

**"१७. The confidentiality required to be maintained of the medical records of a patient including a convict considering the Regulations framed by the Medical Council of India cannot override the provisions of the Right to Information Act. If there be any inconsistency between the Regulations and the Right to Information Act, the provisions of the Act would prevail over the Regulations and the information will have to be made available in terms of the Act. The Act, however, carves out some exceptions, including a release of personal information, the disclosure of which have no relationship to any public activity or interest or which cause unwarranted invasion of the right to privacy. In such case the discretion has been conferred on the concerned Public Information Officer to make available the information, if, satisfied, that the larger public interest justifies the disclosure. This discretion must be exercised bearing in mind the facts of each case and the larger public interest."**

यावरुन जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१) मधील कलम (ड) (छ) व (त्र) चा आधार हा, माहिती प्रकट करण्यास अपवाद म्हणून जो घेतला आहे, त्या बाबत विचार केल्यास कलम ८(१) मधील कलम (छ) (ड) प्रमाणे

**"(ड) जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिका-याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त, एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे तिला उपलब्ध असणारी माहिती;"**

**"(छ) जी प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती:"**

**"(त्र) जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिका-याची, राज्य जन माहिती अधिका-याची किंवा अपील प्राधिका-याची खात्री पटली असेल, ती खेरीजकरुन, जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्त्ीच्या खाजगी बाबीत आगंतूक हस्तक्षेप करील, अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती."**

**खंड (ड) मधील तरतुदीचा विचार केल्यास एखादया व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे दिलेली व उपलब्ध असणारी माहिती याचा अर्थ, युक्तीवाद करताना असा सांगण्यात आला की, परीक्षेच्या उत्तरपत्रीकाची जी तपासणी केलेली असते ती एका विश्वासाने केलेली असते. व उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्यास अपीलकर्ता यांना परीक्षकांचे नांव सुध्दा कळतील. व खंड (छ) प्रमाणे त्यांचे जीवितास सुध्दा धोका उत्पन्न होऊ शकतो व त्यामुळे खंड (त्र) प्रमाणे ती त्याच्या खाजगी बाबतीत आगंतुक हस्तक्षेप करतील असेही सांगितले. व यामध्ये कोणत्याही प्रकारचा सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही. व त्यामुळे विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देणे ही बाब परीक्षकांच्या दृष्टीने योग्य होणार नाही. परंतु, याबाबत मा. उच्च न्यायालय, कोलकत्ता यांचे पुढील २००७ ची याचिका क्रमांक २२१७६ मध्ये दिनांक ८.३.२००८ रोजी दिलेल्या निर्णयामधील परिच्छेद ७२ मध्ये खालीलप्रमाणे विश्लेषण केलेले आहे.**

**"७२. The Act provides a right to receive information and the consequence of the making over of such information is immaterial in the matter of construction of its provisions. As to whether an examinee would use the information received on inspection of his answer script to undo the finality of the process of examination is not an argument that can be considered to curb the operation of the statute. The Act begins with a citizens right to obtain information and ends with the information being made available to his request being justly rejected on the grounds recognized by the Act; what happens before and what may be the consequence of the information being made available or rightfully denied is a matter beyond the operation of Act."**

**"९०. As much as an examining body may owe an obligation to its set of examiners, it owes a greater fiduciary duty to its examinees. The examinees are at the heart of a system to cater to whom is brought the examining body and its examiners. If it is the right of a voter, for the little man to have the curriculum vitae of the candidates who seek his insignificant vote, the right of the examinee is no less to seek inspection of his answer script."**

**"९१. Whether it is on the anvil of the legal holy trinity of justice, equity and good conscience, or on the test of openness and transparency being inherent in human rights, or by the myriad tools of construction, or even by the Wednesbury yardstick of reasonableness, the State Public Information Officers rejection of the writ petitioners request to obtain his answer script cannot be sustained."**

**या विवेचनावरुन उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे ही बाब गोपनियतेमध्ये येऊ शकत नाही. परंतु, उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती हया उपलब्ध करुन देण्यापेक्षा अर्जदार यांना उत्तरपत्रिकांचे निरीक्षण करण्यास परवानगी देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतचा गैरवापर होईल, ही शक्यता राहाणार नाही. त्याकरीता सदरील तीनही अपील मंजूर करण्यास पात्र आहेत.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे** अपील क्रं.९२६/२००९ , अपील क्रं.११२७/२००९ व अपील क्रं.११३५/२००९ **मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या अनुक्रमे दिनांक २९.६.२००९, १५.७.२००९ व १८.८.२००९ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीप्रमाणे उत्तरपत्रिकांचे निरीक्षण कार्यालयीन कर्मचा-यांच्या उपस्थित द्यावे. त्याकरीता अपीलकर्ता यांना कामकाजाच्या दिवशीची निश्चित तारीख व वेळ कळविण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४०/२०१०

१) श्री निलेश केशवराव हेलोंडे,
फेलपुरा, काटोला, ता.काटोल, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष,
शिक्षण प्रसारक मंडळ, काटोल, ता.काटोल, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी
शिक्षण प्रसारक मंडळ, काटोल, ता.काटोल, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २२.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक ६.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, शिक्षण प्रसारक मंडळ,काटोल, जि.नागपूर यांचेकडे, सन १९८५ ते २००९ या सालापासून संस्थेला मिळालेली देणगी, तसेच देणगीदाराचे नांव, पत्ता याबध्दल माहिती मागितली होती. परंतु ती त्यांना उपलब्ध झाली नाही. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.११.०९ रोजी आमच्या माहिती प्रमाणे संस्थेला आपण मागितलेली माहिती पुरविणे बंधनकारक नाही. करीता आम्ही आपणास माहिती पुरविण्याकरीता असमर्थ आहो. या कायदयाचे अनुषंगाने आमच्या संस्थेला माहिती पुरविणे आवश्यक असल्याचा पुरावा आपणाकडे असेल तर तो सादर करावा जेणेकरुन आपण मागितलेली माहिती पुरविणे शक्य होईल, असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस उत्तरवादी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांचे पुढील याचिका क्रमांक ५१३२/२००८, तसेच याचिका क्रमांक ५२९४/२००८ श्री भाष्कर शं. कुलकर्णी विरुध्द स्टेट इन्फार्मेशन कमिश्नर, नागपूर, तसेच नगर युवक शिक्षण संस्था विरुध्द स्टेट इन्फार्मेशन कमिश्नर, नागपूर या दोनही याचिका मधील सार्वजनिक विश्वस्त संस्थेस, विना अनुदानित शिक्षण संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू नाही या निर्णयाचा आधार घेवून सदरचा अधिनियम हा शिक्षण प्रसारक मंडळास लागू होत नाही असा लेखी युक्तीवाद केलेला असल्यामुळे व अपीलकर्ता यांचेकडे कोणत्याही प्रकारे सदरची संस्था ही अनुदानित आहे याचा पुरावा नसल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६/नाग/२०१०

१) श्री मनोहर माधोरावजी हेडाऊ,
टिळक वार्ड, मोहाडी, ता.मोहाडी, जि. भंडारा. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मदाय आयुक्त,
भंडारा. ता.जिल्हा भंडारा. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,
श्री चौडेश्वरी माता मंदीर कमेटी, मोहाडी,
ता. मोहाडी, जिल्हा भंडारा. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २२.२.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १२.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सुनावणी पुढे ढकलण्यात येवून सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक २२.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, अध्यक्ष/सचिव श्री चौडेश्वरी माता मंदीर कमेटी यांचेकडे, सन २००१ ते २००८ पर्यंत मंदीरा समोरील शासकिय जागेवर प्लॅाट पाडून जाहिर लिलावापासून आवक झालेल्या रक्कमेबाबतची वर्ष निहाय माहिती, सहपत्रात तपशिलात नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.११.२००९ रोजी दिलेला असून मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्रमांक ५२९४/२००८ मध्ये दिलेल्या दिनांक २८.४.२००९ या निकालानुसार वरील न्यासाला माहितीचा अधिकार लागू होत नाही व त्यामुळे अपील नामंजूर करण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं १७/नाग/२०१०
अपील क्रं.१८/नाग/२०१०

१) श्री लस्मय्या राजम नागुला,
वन परिक्षेत्र कार्यालय, नागभिड,
मु.पो.ता.नागभिड, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

अपील क्रं १७/नाग/२०१०

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संशोधन अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२, नागपूर विभाग, चंद्रपूर
ता.जि. चंद्रपूर-४४२४०९. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२, नागपूर विभाग, चंद्रपूर
ता.जि. चंद्रपूर-४४२४०९. उत्तरवादी

अपील क्रं १८/नाग/२०१०

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२, नागपूर विभाग, नागपूर
ता.जि. नागपूर-४४२४०९. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी /सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.१, नागपूर विभाग, नागपूर
ता.जि. नागपूर-४४२४०९. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २३.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १२.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सुनावणी पुढे ढकलण्यात येवून सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक २३.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ३.११.२००९ व दिनांक ७.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, विशेष समाज कल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२, व जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.१ यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**" (१) बेस्ती जात ओ.बी.सी. मध्ये समाविष्ठ असल्याने कार्यालयाकडून अर्थात जात पडताळणी समितीकडून पुष्टी करण्यांत आलेले आहे. तेव्हा याबाबतचे शासन निर्णय अधिनियम किंवा नियमावली जे उपलब्ध असेल त्याची सत्यप्रत. (२) महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात असलेल्या सर्व जातीची यादी सर्व जातीची नोंद असलेली (३) एकच जात बेस्ती हे एकाच रक्त नात्यातील कुटूंबातील व्यक्तींना एकाला राखीव प्रवर्गात व एकाला ओ.बी.सी. प्रवर्गात मध्ये प्रकरण निकाली काढता येते याबाबतचे पुष्टी करणारे नियम, अधिनियम, कार्यप्रणाली सत्यप्रत (४) एकच जात बेस्ती दोन प्रकरणात राखीव प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गात समाविष्ठ असल्याबाबतचे उपलब्ध दस्तऐवज सत्यप्रत."**

**सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १७.१२.२००९ रोजी त्यांनी दोन प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १.२.२०१० रोजी देण्यात आलेला असून माहिती ७ दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. आतापर्यंत अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, मुद्या क्रमांक ३ व ४ ची माहिती न दिल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती उपलब्ध झाली. परंतु मुद्या क्रमांक ३ व ४ ची माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, मुद्या क्रमांक २ व ३ च्या संदर्भात अभिमत मागितलेले आहे व समिती किंवा जन माहिती अधिकारी हे कोणत्याही प्रकरणात अभिमत देवू शकत नाही व तसे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित सुध्दा नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.**

आदेश

१) **अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील** अपील क्रं १७/नाग/२०१० व अपील क्रं.१८/नाग/२०१० खारीज करण्यात येत आहे.

२) **अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १५/नाग/२०१०

१) श्री दिलीप डी. दुग्गड,
सिव्हील लाईन, पटेल नगर, एस.टी.डेपो समोर,
चंद्रपूर ता.जि. चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक,
राज्य परिवहन कार्यालय, अमरावती.ता.जि. अमरावती. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी
राज्य परिवहन कार्यालय, अमरावती.ता.जि. अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २३.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १२.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सुनावणी पुढे ढकलण्यात येवून सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक २३.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. अपीलकर्ता यांचे वकील श्रीमती सुनिता कुसराम हजर आहे परंतु त्यांनी वकीलपत्र दाखल केले नाही. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"१. The name of Auditor, with his designation, who has audited it. (२) The date on which it was audied (३) With reference to above Agreement B-१/१५ of ८७-८८ and B-१/०७ of ९१-९२ respectively, of sub work no. III providing ५० mm full grout Divisional Workshop Phase III at Buldhana.**

**(i) Item No.६ laying ५० mm full grount as directed and total quantity ११२४६.५४ sq.meter, executed by the both agencies,**

**(ii) Item No.७ laying ४० mm thick premix as directed And quantity १११७०.६८ square meters. Executed by premier construction, Akola.**

**२) Please supply me the details of total consumption of metals, for above quantity (१) ४० mm (२) २५ mm (३) १२ mm (४) ६ mm and also supply me the information of above total quantity of consumption of Asphalt under item no. ६ & ७ supplied by the department to the both agencies separately. "**

**अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे देण्यात आलेला नाही. व दिनांक ७.११.२००९ रोजी अपीलकर्ता यांना उपलब्ध असलेली माहिती यापुर्वीच पुरविण्यात आलेली आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी आतापर्यंत अपीलकर्ता यांना खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले.**

**"अपीलकर्ता श्री दुग्गड यांना या कार्यालयामार्फत माहिती अधिकार नियम २००५ च्या नियम व शर्ती, अटी कलमा नुसार रा.प. महामंडळाकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती खालील प्रमाणे पुरविण्यात आलेली आहे.**

**१. अपीलकर्तेचा अर्ज दि. १७.१०.२००७ अ.क.९१५ दि. २४.११.२००७**
**कळविण्यात आलेली माहिती पत्र क्रं. क. ९१७ दिनांक २६.११.२००७**
**२. अपीलकर्तेचा अर्ज दि. १७.१०.२००७ अ.क.९१५ दि. २४.११.२००७**
**कळविण्यात आलेली माहिती पत्र क्रं. क. ९१७ दिनांक २६.११.२००७**
**३. अपीलकर्तेचा अर्ज दि. ११.३.२००८ अ.क.३१६ दि. १५.३.२००८**
**कळविण्यात आलेली माहिती पत्र क्रं. क. ३९७ दिनांक ३१.३.२००**
**क २९० दिनांक ३१.३.२००८**
**क. ४०१ दिनांक ४.४.२००८**
**४. अपीलकर्तेचा अर्ज दि. १४.५.२००८ अ.क.५८८ दि. १६.५.२००८**
**कळविण्यात आलेली माहिती पत्र क्रं. क ६६१ दिनांक ३.६.२००८**

क्रं. ७२१ दिनांक १३.६.२००८
क ६८ दिनांक १९.६.२००८
क ४२ दिनांक २७.६.२००८
क ७१ दिनांक २५.६.२००८
क ८११ दिनांक ३०.६.२००८
क ६८ दिनांक २.७.२००८

५. अपीलकर्तेचा अर्ज दि. ३०.६..२००८ अ.क.८१३ दि. ३०.६.२००८
कळविण्यात आलेली माहिती पत्र क्रं. क. ७९ दिनांक २.७.२००८
क ८६ दिनांक ९.७.२००८
क ८३५ दिनांक १०.७.२००८
पावती क ४२२९९१९ दिनांक १०.७.२००८
पावती क्रं.४७२९८९९ दिनांक ५.७.२००८

क ८३७ दिनांक १७.७.२००८
पोच पावती क ८३७ दिनांक २२.७.२००८

६. अपीलकर्तेचा अर्ज दि. ३०.७.२००८ अ.क.९३४ दि. ५.८.२००८
कळविण्यात आलेली माहिती पत्र क्रं. क. ९६२ दिनांक १३.८.२००८
७. अपीलकर्तेचा अर्ज दि. २३.९.२००८ अ.क.१३०९ दि. १३.१०.२००८
कळविण्यात आलेली माहिती पत्र क्रं. पोस्टाची पावती क.४३२ दिनांक १५.१०.२००८
क. १३६० दि. २२.१०.२००८
८. अपीलकर्तेचा अर्ज दि. १९.११.२००८ अ.क.५४२३ दि. २१.११.२००८
कळविण्यात आलेली माहिती पत्र क्रं. क.१७६५ दिनांक २२.१२.२००८
९. अपीलकर्तेचा अर्ज दि. ५.६..२००९ अ.क.३२७ दि. २०.६.२००९
कळविण्यात आलेली माहिती पत्र क्रं.
१०. अपीलकर्तेचा अर्ज दि. १०.७.२००९ अ.क.१५८७ दि. २२.७..२००९
कळविण्यात आलेली माहिती पत्र क्रं. क. १६५९ दिनांक ३१.७.२००९
क. ५७२ दिनांक ३.८.२००९
क. १७०३ दिनांक ७.८.२००९

(२) अपीलकर्ता हे श्री दुग्गड यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी समक्ष सुनावणी करिता खालीलप्रमाणे कार्यालयामार्फत लेखी कळविलेले असतांना देखील अपीलकर्ता समक्ष सुनावणीस हजर राहीलेले नाही. पत्र क्रं. रा.प./प्राव्यअ/वाह/सा./मा.अ./१७०३, दिनांक ७.८.२००९.

अपीलकर्ता श्री दुग्गड यांनी समक्ष सुनावणीकडे दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे अपीलकर्त्यास जे प्रथम अपीलीय अधिका-यांमार्फत कोणताही निर्णय झाला नाही व म्हणून अपीलकर्त्याने प्रत्यक्ष प्रथम अपीलीय अधिका-यांकडून निर्णय न घेता राज्य माहिती अधिका-याकडे सादर केलेला अर्ज हा दप्तरी दाखल करण्यास पात्र आहे. अपीलकर्त्यांचे अपील खारीज करण्याची विनंती करण्यांत येत आहे.
(३) अपीलकर्त्याने प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णयाची प्रत दाखल केलेली नाही. कारण अपीलीय अधिका-यांचे समक्ष दिनांक १८.८.२००९ या रोजी अपीलकर्त्यास लेखी सूचना देवुनही अपीलकर्ता हजर राहीलेले नाही. त्यामुळे आपण बजाविलेली नोटीस करामाआ/नाग/अपील क्रं.१५/नाग/१०/सु.०२/२०१०/२३९ दिनांक १२.१.२०१० पान क्रं. २ शेवटचा परिच्छेद नोटीसी प्रमाणे व त्यातील मुद्यांप्रमाणे हे कार्यालय देवू शकत नाही. जन माहिती अधिका-यांमार्फत सर्व कार्यवाहीचे कागदपत्रे व इतर माहिती सादर करण्यांत येत आहे.

अपीलकर्त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपूर्ण माहिती मिळाल्याबद्दल अपील सादर केलेले आहे. त्याचा मुद्येसुद खुलासा खालील प्रमाणे देण्यात येत आहे.
(१+२) ऑडिटरचे नांव देणे :- २० वे चालु देयक पुजा कन्सल्टन्ट अन्ड इंजिनियर या फर्मचे असून या कंपनीवर काम अपुर्ण अवस्थेत सोडल्यामुळे Risk & cost. Clause (३-c) of the B-१ Tender agreement नुसार कार्यवाही करण्यात आलेली असून नियमाप्रमाणे कार्यवाही मान्य नसल्यास केवळ मात्र अशा बिलाबाबत महामंडळाने घ्यावयाचा रकमेचा दावा हा न्यायालयात सादर करणे आवश्यक बाब असते. व अशा परिस्थितीत देयकास अंतिम रुप देण्यात येत नाही व त्यामुळे बिलाची अंतीम अंकेक्षण नियमाप्रमाणे करता येत नाही. न्यायालय ठरवून देईल ती रक्कम देणे अथवा घेणे हे दोन्ही पार्टीवर बंधनकारक आहे.त्यामुळे सदरचे देयक अंतिम अंकेक्षण करणे शक्य नाही. न्यायालयाच्या आदेशानुसार पुनश्च देयकाचे लेखा परीक्षण करुन अंतीम रक्कम ठरविण्यात येईल. व त्यामुळे मुद्या क्रं. १ व २ लेखा परीक्षकाचे नांव व तारीख न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत समर्थनिय नाही.

**मुद्या क्रं.३ :- अपीलकर्त्यास या कार्यालयास उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती जसे बिल कापी मापे नोंदणी पुस्तके या आधी दिनांक १३.८.२००८ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपीलकर्त्याने कामावर प्रत्यक्ष खर्च झालेल्या खडी, मेटल, मुरुम व डांबर याची माहिती मागितलेली असून प्रत्यक्ष अटमध्ये अॅटम क्रं. ६ व ७ Annalysis मागितलेली आहे. हे माहिती मक्तेदाराच्या मुकदम/प्रतिनिधी यांचेकडे उपलब्ध असते. मापे नोंदणीच्या नियमानुसार अॅटम पुर्ण झाल्यावर त्याची नोंद करुन पुर्ण झालेल्या अॅटमचे पेमेन्ट अदा करण्यात येते.**

**अशा प्रकारची नवीन व नियमबाहय माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होवू शकत नाही. कार्यालयात उपलब्ध सर्व माहितीचे कागदपत्रे पुरविण्यात आलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २०/नाग/२०१०

१) श्री रामचंद्र क्रिष्णाजी मारटकर,
अमराई वार्ड, मु.पो.ता.राजूरा(मा.),
जिल्हा चंद्रपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद चंद्रपूर. ता.जि. चंद्रपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक वर्ग-२,
प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर
ता.जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २२.२.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १२.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येवून सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक २३.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. त्यांचे तर्फे अॅड. इंगोले हजर झाले परंतु त्यांनी वकीलपत्र दाखल केले नाही. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (प्राथमिक) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"बालविद्या शिक्षण प्रसारक मंडळ राजूरा र.नं. २१४६ या संस्थेच्या अध्यक्षांनी मराठी प्राथमिक शाळा राजूरा नगर परिषद क्षेत्रातील प्रा.शाळेकरीता पाठविलेल्या (१) सन १९९४-९५ या शैक्षणिक सत्रात शाळा मिळण्याकरीता(मराठी) पाठविलेल्या प्रस्तावाची प्रमाणित प्रत (२) वरील संस्थेच्या अध्यक्षांनी सन १९९६-९७ या शैक्षणिक सत्रात मराठी प्रा.शाळा करीता पाठविलेल्या शाळा प्रस्तावाची प्रमाणित प्रत (आदर्श म.प्रा.विदया मंदिर) (३) संस्था अध्यक्षांनी २००२-०३ या शैक्षणिक सत्रात (विना अनुदानित प्रा.शाळा) पाठविलेला प्रस्ताव (आशा देवी प्रा.शाळा) वर नमुद केलेले (तिनही) प्रस्ताव मा. शिक्षणाधिकारी कार्यालयाला पाठविले आहे. वरील तीनही प्रस्तावाच्या प्रमाणित झेरॉक्स प्रत देण्यात यावी" अशा स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी आयोगास सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती सन १९९४-९५ पासूनची दिसून येते. व त्यात संस्थेने दाखल केलेल्या प्रस्तावाची माहिती दिसून येते. त्याकरीता व्यापक जन हित काय आहे असे विचारले असता माहिती मागता येते म्हणून मागितली आहे असे उत्तर प्रतिनिधींनी दिले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, श्री रामचंद्र मरडकर हे पुर्वी त्याच संस्थेचे सचिव होते. व अपीलकर्ता हे पुर्वी संस्थेचे सचिव असल्यामुळे त्यांना सर्व माहिती आहे व आता त्यांना सचिव पदावरुन काढून टाकल्यामुळे ते माहिती मागत आहे व त्यांनी आतापर्यंत भरपूर अर्ज करुन माहिती मागण्याचे सत्र सुरु केले आहे. त्याबाबतही अपीलकर्ता यांच्या प्रतिनिधीला यात व्यापक जन हित काय आहे असे विचारले असता त्याबाबत त्यांनी न्यायालयात जायचे आहे असे आयोगास सांगितले. आयोगाकडे आलेल्या प्रत्येक अपीलार्थीला न्यायालयात जावयाचे असते. जन माहिती अधिकारी यांनी आतापर्यंत अपीलकर्ता यांना जी माहिती पुरविली आहे त्या माहितीच्या संदर्भात कागदपत्र दाखल केले आहेत. त्यामध्ये दिनांक ६.९.२००७, २४.१०.२००७, २९.५.२००८, २९.५.२००८, १७.७.२००८, ८.८.२००८, ४.९.२००८, ११.८.२००८, २८.८.२००८, १३.१०.२००८, १२.९.२००८, २५.९.२००८, ४.९.२००८, ४.९.२००८, ४.९.२००८, ४.९.२००८ व १६.७.२००९ एवढे पत्र माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिलेले दिसून येते. याचा अर्थ शिक्षणाधिकारी हे त्यांचे नियमित कर्तव्य सोडून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचेच काम करीत आहे असे दिसून येते. व अपीलकर्ता हे संस्थेचे सचिव होते. व माहिती मागण्यामध्ये कोणत्याही प्रकारचे व्यापक जन हित दिसून येत नाही. व संस्थेच्या आपसातील भंडणाकरीता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींचा वापर करणे हे गैर असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

१)   **अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

२)   **अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६४/नाग/२०१०

१) श्री बी.एस. पाल
जूना फुटाला चौपाटी जवळ, अमरावती रोड,
नागपूर-४४००३३. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, सिव्हील लाईन विभाग,
लिंक रोड, सदर नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, सिव्हील लाईन विभाग,
लिंक रोड, सदर नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २४.२.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक २४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा विद्युत वितरण कंपनी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग(वितरण मुक्त प्रवेश) विनियम २००५ विद्युत अधिनियम २००३ अन्वये चे कलम सात खाली व अधिनियमाचा कलम ५५ खालीचा वापर करुन तयार करण्यात येत असलेला मिटर्स(विशेष उर्जा मिटर्स) प्राधिकाराने निर्देश केलेल्या विशिष्ट तपशीलनुसार कोणत्या प्रकारची असते. त्याचे मानक कोणते कलम ७ अन्वये मिटर्स संबंधित सर्व मानक तपशील परिपत्रक शासन आदेश संबंधीत सर्व कागद पत्राची माहिती म्हणून पुरविण्यात यावी. मुद्या क्रं.२ ग्राहकाकडून मीटर प्रकरण परवानाधारका व्यतिरिक्त इतर मिटर पुरवठादाराकडून मिटर खरेदी करुन लावता येते किंवा नाही. जर खरेदी करता येत नाही तर का खरेदी करता येत नाही त्याचे शासन आदेश किंवा विद्युत नियामक आयोग तर्फे कोणते कारण आहे सर्व संबंधित आदेश व नियमाची छायांकित व साक्षांकित प्रत माहिती म्हणून पुरविण्यात यावी.**

**मुद्या क्रं.३ दिनांक ५.११.२००९ रोजी सिव्हील लाईन येथील कनिष्ठ अभियंता श्री शशी साहेब यांना मिटरची तपासणी बद्दल व मिटर बदली करणे बाबत अर्ज दिला होता. त्यावर कोणतेही जबाब पत्र किंवा कोणतीही कारवाई कां झाली नाही, सविस्तर माहिती द्यावी.**

**मुद्या क्रं.४ दिनांक १६.११.२००९ रोजी मुख्य अभियंता साहेब यांना २०० ग्राहकांची स्वाक्षरी असलेली तक्रार दिली होती. त्यावर कोणती व कशी कारवाई केली, कृपया माहिती दयावी."**

**३. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००९ (दिनांक २३.१२.२००९) रोजी प्रथम अपील दाखल केले. त्याअनुषंगाने दिनांक १.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांना चार मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**४. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांनी मागितलेल्या माहितीचे अनुषंगाने त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही. दिनांक १.१.२०१० रोजी जे उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे उत्तर आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ते उत्तर दिलेले आहे. परंतु आता अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या सदर्भात संपूर्ण कागदपत्रे आणलेली आहेत. याचा अर्थ तीच माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसांमध्ये अपीलकर्ता यांना देता आली असती. परंतु ३० दिवसांच्या आंत माहिती दिलीच नाही व दिनांक १.१.२०१० च्या उत्तरामध्ये मोघम माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करणे आवश्यक आहे.**

**प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाच्या संदर्भात सुनावणी घेतली असती तर त्याचवेळेस सदरची माहिती उपलब्ध करुन देता आली असती. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २७.११.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने कागदपत्राच्या स्वरुपात विनामुल्य, नोंदणीकृत टपालाद्वारे व प्रत्यक्ष तपासून माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही व जी माहिती उपलब्ध करुन दिली ती दिशाभूल करणारी माहिती आहे असे दिसून येत असल्यामुळे शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६५/नाग/२०१०

१) श्री मो.आरिफ मो. शब्बीर,
गुजरी बाजार, कामठी, ता.कामठी, जि. नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, कामठी, ता.कामठी, जि.नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी ,
नगर परिषद कार्यालय, कामठी, ता.कामठी, जि. नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २४.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक २४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहे व त्यांनी कागदपत्रे दाखल केली नाहीत. जन माहिती अधिकारी हजर आहे.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद कामठी यांचेकडे खालीलप्रमाणे एकुण सहा मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.**
**"रुईगंज मैदान सिट क्रं.४ ब्लॅाक नं. जहा पर वर्ष देवी दसेरे के उपलक्ष मे देवी विराजमान रहती है उस मंच की मंजूर प्रस्ताव कॅापी मिलने हेतू (२) रुई गंज मैदान सिट क्रं. ब्लॅाक क्रं. की नझुल भूमी की मंजूरी की प्रस्ताव कॅापी मिलने हेतू (३) रुइगंज मैदान के मंच प्रस्ताव के आक्षेप की नागरिकों की सूचना प्रसिध्दी कॅापी मिलने हेतू (४) मंजूरी दिनांक व आक्षेप के प्रस्ताव की कॅापी मिलने हेतू (५) श्री व्यायाम दान मंदीर को नगर परिषद की ओर से एकुण कितनी भूमी की एन.ओ.सी. दि गई है (६) श्री व्यायाम दान मंदिर को कीस उपयोग हेतू भूमी की एन.ओ.सी. दि गई." माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००९ प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.११.२००९ रोजी देण्यात आला असून १० दिवसांचे आंत श्री एस.आर. कडू, कनिष्ठ लिपिक यांना माहिती पुरविण्याकरीता आदेश देण्यात आलेले दिसून येतात. परंतु, त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितली आहे त्या माहितीच्या संदर्भात चार मुद्यांची माहिती त्यांना आता उपलब्ध झालेली आहे. परंतु दोन मुद्यांची माहिती आतापर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दोन मुद्यांची माहिती नझुल विभागाकडून त्यांना उपलब्ध होऊ शकेल. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, नगर परिषदतर्फे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले असेल तर ती माहिती त्यांच्याकडूनच उपलब्ध होणे आवश्यक आहे. परंतु ती माहिती उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांनी त्याकरीता सदरच्या नस्तीचे अवलोकन करुन जी जी माहिती उपलब्ध असेल ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. तसेच अपीलकर्ता यांनी ज्या बांधकामाचा उल्लेख केलेला आहे त्या बांधकामास नगर परिषदेने जी परवानगी दिलेली आहे त्या परवानगी पत्राची प्रत बांधकाम विभागाकडून किंवा नगर रचना विभागाकडून उपलब्ध करुन अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहील. परंतु, विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी व श्री एस.आर. कडू, कनिष्ठ लिपिक यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाईची शिफारस करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना कळवून त्यादिवशी उपस्थित होऊन नस्तीचे अवलोकन करावे व आवश्यक ती माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी व श्री एस.आर.कडू, कनिष्ठ लिपिक यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची कारवाई ही मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी करावयाची आहे.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ८/नाग/२०१०

१) श्री राजेंद्र मोतीराम बावनकर,
गौतमनगर वार्ड, पवनी C/o राज जनरल स्टोअर्स,
बाजार चौक, ता.पवनी,जिल्हा भंडारा. ४४१९१०. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख, भंडारा. ता.जि. भंडारा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, भंडारा,
ता.जिल्हा भंडारा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २४.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १२.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. परंतु सुनावणी पुढे ढकलण्यात येवून सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक २२.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता दिनांक २२.२.२००९ रोजी उपस्थित नव्हते. उत्तरवादी हजर होते. उत्तरवादी यांचे म्हणणे त्याच दिवशी ऐकुन घेतले. व आज अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकुन घेण्याकरीता तारीख देण्यात आली होती, त्याप्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकुन घेतले.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे मौजा पवनी मधील शेत क्रमांक १६ न.भू.क्रमांक १०९ चे (३९.०७) ६१ चौरस मिटर क्षेत्र दुरुस्ती करण्याबाबत दिनांक २४.१२.२००७ रोजी भूमी अधीक्षक, भंडारा यांना दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते.**

**अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २९.७.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून दिनांक २४.१२.२००७ चा अर्ज हा चौकशी करुन निकाली काढण्यात आलेला आहे असे उत्तर दिले आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १३.१.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी दुरुस्तीसाठी अर्ज दाखल केला आहे. परंतु त्या अर्जाच्या संदर्भात चौकशी करुन दुरुस्ती करुन मिळत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, अपीलकर्ता हे त्या जमीनीचे मालक नाही किंवा त्यांच्या जवळ खरेदी खत नाही. त्यांचेकडे अधिकार पत्र आहे. परंतु कोणत्याही जमीनीच्या क्षेत्रफळाच्या दुरुस्तीच्या संदर्भात जमीनीच्या मालकानी अर्ज करावयाचा असतो. त्रयस्थ माणसाच्या अर्जाप्रमाणे क्षेत्रफळ दुरुस्ती करुन देता येत नाही. तसेच अपीलकर्ता यांना आतापर्यंत दिनांक १७.१२.२००७ रोजी सुध्दा अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी त्याबाबतची माहिती दिली होती. त्यानंतर दिनांक २.५.२००९ रोजी सुध्दा अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी अपीलकर्ता यांना वस्तुस्थिती कळविलेली दिसून येते. परंतु, तरी सुध्दा अपीलकर्ता माहिती मागत आहे व त्यातही क्षेत्रफळ दुरुस्ती करुन मागत आहे, जी बाब माहितीच्या अधिकारात येत नाही. अधीक्षक भूमी अभिलेख यांनी खालीलप्रमाणे खुलासा केला आहे.**

**"अपीलार्थी श्री राजेंद्र मोतीराम बावणकर रा. पवनी यांनी मौजा पवनी येथील शि.नं.१६ न.भू.क्र. ९०१ चे (३९.०७) ६१ चौ.मी.क्षेत्र दुरुस्ती करणेबाबत दिनांक २४.१२.२००७ रोजी अधीक्षक भूमी अभिलेख भंडारा यांना अर्ज दिल्याबाबत केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे देण्यात यावी याबाबत ईकडील कार्यालयात माहितीचे अधिकार २००५ अन्वये दिनांक १६.७.२००९ ला अर्ज प्राप्त झालेनुसार या कार्यालयाचे पत्र क्रमांक सिटिएस/माहितीचा अधिकार/२००५/पवनी/२००९ दिनांक २८.७.२००९ अन्वये केलेल्या कार्यवाहीचे कागदपत्रे प्राप्त करुन घेणेकरीता कळविण्यात आले व ते त्यांनी दोन प्रती प्राप्त झालेबाबत पोच दिली (प्रत संलग्न) तसेच दिनांक ७.११.२००७ चे पत्रानुसार अर्जदारास सुनावणीची नोटीस बजावून व दिनांक १२.१२.२००७ रोजी सुनावणी घेवून दिनांक १७.१२.२००७ अन्वये क्षेत्राची दुरुस्ती करण्यात आली नसल्याबाबत कळविण्यात आले आहे.(प्रत संलग्न).**

**दिनांक २२.८.२००९ रोजी श्री राजेंद्र मोतीराम बावनकर यांनी मा. उपसंचालक भूमी अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर यांचेकडे जोडपत्र 'ब' मध्ये माहितीचा अधिकार कायदा २००५ कलम १९(१) अन्वये अपील अर्ज सादर केला तो संबंधीत कार्यालयास प्राप्त झालेनुसार सदरचा अर्ज ईकडील कार्यालयास त्यांचेकडील पत्र क्रमांक भू-१/माहितीचा अधिकार/अपील/प्रकरण क्रमांक-४५/२००९ दिनांक २९.८.२००९ अन्वये पत्र लिहून ईकडील कार्यालयास पाठविण्यात आले सदरचे पत्र या कार्यालयास दिनांक १.९.२००९ रोजी प्राप्त झालेनुसार संबंधितास नोटीस बजावून १०.९.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी खरेदी खताच्या स्पष्ट नकला तालुका निरीक्षक भूमी अभिलेख पवनी यांना १.९.२००९ अन्वये पुरविण्यात आल्यानुसार सुधारित अहवाल सादर करणेबाबत दिनांक १०.९.२००९ चे पत्रान्वये कळविण्यात आले (प्रत संलग्न). तसेच अपीलार्थी यांनी दिनांक १९.९.२००९ रोजी अधिकारपत्र (करारनामा)ची प्रत सादर**

केली. परंतु ती नोंदणीकृत नसल्यामुळे ग्राहय धरता येत नाही. या कार्यालयाचे पत्र क्रमांक/सिटीएस/माहि/अधि/२००५/०९ दिनांक २८.१०.२००९ अन्वये कळविण्यात आले. तसेच या कार्यालयाचे पत्र क्रमांक/सिटीएस/माहि.अधि.२००५/२००९ दिनांक ८.१२.२००९ अन्वये तसेच दिनांक २८.१०.२००९ चे पत्रान्वये तालुका निरीक्षक भूमी अभिलेख पवनी यांना निकाली उत्तर देवून ईकडील कार्यालयात अंतिम अहवाल सादर करणेकामी कळविण्यात आलेले आहे.(प्रत संलग्न).

अपीलार्थी यांनी पुनःश्च दिनांक २७.११.२००९ रोजी मा. उपसंचालक भूमी अभिलेखनागपूर प्रदेश नागपूर यांचेकडे अपील अर्ज सादर केला. तो अर्ज ईकडील कार्यालयात १४.१२.२००९ रोजी प्राप्त झाला. त्यानुसार अपीलार्थी, मुख्याधिकारी नगर परिषद व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना सुनावणीची नोटीस देवून दिनांक २.१.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली (प्रत संलग्न). सुनावणी वेळी अपीलार्थी हे उपस्थित नव्हते त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र नगर परिषद पवनी यांचे तर्फे श्री डि.पी.पाटील सर्व्हेअर हे हजर झाले व सदरची मिळकत ही नगर परिषदेच्या बाजाराच्या हद्दीतील असून सरकारी मालकीची आहे. अपीलार्थी यांची मागणी चूकीची आहे. त्यांचे अपील फेटाळण्यात यावे याबाबत दिनांक २९.९.२००९ रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख पवनी यांना लेखी जबाब दिलेला आहे. तो कायम ठेवण्यात यावा असे सांगितले.

सदरचे अपील अर्जानुसार या कार्यालयाकडून या कार्यालयाचे दिनांक ३.१.२०१० चे पत्रानुसार अपील अर्जदार यांना लेखी कळविण्यात आले व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख पवनी यांना प्रत दिली(प्रत संलग्न) त्या अनुषंगाने तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख पवनी यांचे कडील पत्र क्रमांक सिटीएस/पवनी/क्षेत्र दुरुस्ती/२०१०, दिनांक ४.१.२०१० अन्वये अपीलार्थी यांना निकाली उत्तर देवून केलेला दुरुस्तीचा अर्ज निकाली करणेत येत असलेबाबत कळविण्यात आले. त्याची प्रत त्यांनी दिनांक ११.१.२०१० ला प्राप्त करुन घेतलेली आहे(प्रत संलग्न). तसेच या कार्यालयाचे पत्र क्रमांक/सिटीएस/माहितीचा अधिकार/२०१०, दिनांक १३.१.२०१० अन्वये यांची क्षेत्र दुरुस्ती अर्ज दुरुस्ती करता येत नसलेबाबत कळवून दुरुस्ती अर्ज निकाली काढणेत येत असलेबाबतसुध्दा नमूद केले आहे. तसेच अपीलार्थी यांनी या कार्यालयाकडे सदरचे बाबत केलेले सर्व अपील अर्जसुध्दा याद्वारे निकाली काढणेत येत असलेबाबत नमूद करुन कळविण्यात आलेले आहे.(प्रत संलग्न). कृपया अवलोकन होणेस विनंती आहे."

सदरच्या खुलाशावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

<u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं.६३/नाग/२०१०

१) श्री ज्ञानेश्वर तुळशीरामजी खुजे,
द्वारा-श्री नामदेवरावजी मोहाडे, मु.पो.वार्ड क्रं.३, खापरखेडा,
ता. सावनेर, जिल्हा नागपूर-४४११०२. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संस्था सचिव,
इंदिरा अध्यापक विद्यालय, खापरखेडा,
कामाक्षी नगर, मिलन चौक, चनकापूर पो.खापरखेडा,
ता. सावनेर, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
इंदिरा अध्यापक विद्यालय, खापरखेडा,
कामाक्षी नगर, मिलन चौक, चनकापूर पो.खापरखेडा,
ता. सावनेर, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २४.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक २४.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी इंदिरा अध्यापक विद्यालय, खापरखेडा यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. परंतु सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.११.२००९ रोजी अपीलकर्ता यांना इंदिरा अध्यापक विद्यालय हे श्रीमती माधुरीताई देशमुख शिक्षण एवंम सामाजिक संस्था, खापरखेडा या संस्थेद्वारा संचलित केल्या जाते शिवाय विद्यालय हे कायम विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाते. संस्था व विद्यालयास केंद्र शासन किंवा राज्य शासनाद्वारे कुठल्याही प्रकारे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे वित्त पुरवठा केल्या जात नाही. त्यामुळे अधिनियमातील नमूद व्याख्येनुसार संस्थेचा व विद्यालयाचा समावेश सार्वजनिक प्राधिकरणात होत नाही. तसेच मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाच्या एकल पीठाने रिट पिटीशन ३१३२/२००८ मध्ये दिनांक २०.८.२००९ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सुध्दा स्पष्ट होते की, संस्था तसेच संस्थेद्वारा संचलित अध्यापक विद्यालयाचा समावेश सार्वजनिक प्राधिकरणात**

**होत नाही. त्यामुळे या निर्णयाच्या अधिनस्त राहून आपण मागितलेली माहिती आपणास कळविणे बंधनकारक नाही, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ७२/नाग/२०१०

१) श्री रमेश रामजी राठोड,
२०, विज्ञान नगर, मानेवाडा, नागपूर-३४. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(आर्थिक)
गुन्हे शाखा कार्यालय, नागपूर. ता.जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
गुन्हे शाखा कार्यालय, नागपूर. ता.जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २५.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक २५.२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२००९, २.९.२००९ व १०.१०.२००९ रोजी, दिनांक २८.५.२००९ रोजी, गुन्हा शाखा विभाग नागपूर आपणाकडे सौ. अश्विनी जाधव व इतर यांचे विरुध्द तक्रार अर्ज केला होता. त्यावर कोणती कार्यवाही झाली त्याबाबत माहिती हवी व कार्यवाहीची प्रत हवी, अशा स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. या संदर्भात अपीलकर्ता यांना, यातील सर्व गैरअर्जदार हे मुक्ताई निवास, नारायण नगर पो.स्टे.मुक्ताईनगर जि. जळगांव येथे राहत असल्याने तसेच अर्जात नमूद तिन्ही महिला असल्याने पिंपळगांव बुद्रुग येथे असल्याने आपण जळगांव पोलीसाकडे दाद मागवावी अशी समज आपणास देण्यात येत आहे, असे कळविलेले दिसून येते.**

**३. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुनावणी मधून अपीलकर्ता निघून गेल्यामुळे अपीलावर सुनावणी होऊ शकली नाही. व त्यानंतरच्या सुनावणीत ते वेळेवर हजर झाले नाही. अपीलकर्ता यांना दिनांक ८.१.२०१० रोजी सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.**

**"अपीलार्थी श्री रमेश रामजी राठोड, रा.विज्ञान नगर मानेवाडा रोड, नागपूर यास अपीलात हजर राहण्याबाबत अपील सुनावणी नोटीसक्रं.१पोउपआ/आर्थिक/माअ/अपील/०८/सुनावणी/ नोटीस /०९-७०४, दि. ६.१२.२००९ अन्वये वपोनि सक्करदरा पो.स्टे. मार्फत पाठविण्यात आली होती. अपीलार्थीस नोटीस दिनांक २२.१२.०९ रोजी प्राप्त झाली. अपीलार्थी नोटीस प्रमाणे अपीलाच्या सुनावणीकामी दि. २२.१२.२००९ रोजी वेळेवर हजर झाले नाहीत. सबब गैरजर होते. त्यामुळे अपीलावर सुनावणी होऊ शकली नाही.**

**(२) अपीलार्थी यास पुन्हा सुनावणीकरीता अपील सुनावणी नोटीस क्रं.२ दि. २३.१२.२००९ रोजी क्रं. पोउपआ/आर्थिक/मा.अ./अपील/०८/सुनावणी नोटीस/०९-७३७ दि. २३.१२.२००९ अन्वये वेपोनि सक्करदरा मार्फत पाठविण्यात आली होती. व नोटीसची प्रत जनमाहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त यांनाही पाठविण्यात आली. व पुढील सुनावणी दिनांक १.१.२०१० रोजी निश्चित करण्यात आली होती. सुनावणीची नोटीस दि. ३१.१२.२००९ रोजी अपीलार्थी यांना वपोनि सक्करदरा यांनी तामील केली व अहवाल जा.क्रं.४०५९/०९ दि. ३१.१२.२००९ अन्वये पोच सह सादर केला. अपीलार्थी सुनावणीकामी सूचनापत्रानुसार हजर झाले. अपीलार्थी यांनी माझ्या नावाचा खोटा बनावट स्टॅम्पपेपरचा वापर केला या तक्रारीच्या चौकशी अहवालाच्या प्रतची मागणी केली आहे, असे जाहिर केले. अपीलार्थी यांनी आपले म्हणणे मांडीत असतांना त्यांचे म्हणणे कायदेशीर व संयुक्तिक नसल्याने ते नाकारण्यात आल्याने अपीलार्थी यांनी सुनावणीत न्याय मिळणार नाही असे म्हणून ते सुनावणी सोडून स्वतः निघून गेले त्यामुळे अपीलावर सुनावणी होऊ शकली नाही. त्यास अपीलार्थी स्वतः जबाबदार आहेत. अपीलार्थी यांना सुनावणीत जे कागदपत्र अभिलेखामध्ये उपलब्ध आहेत तेच कागदपत्र कायदेशीर नियमानुसार पुरविण्यात येतील नवीन माहिती तयार करुन पुरविणे कायदयाने बंधनकारक नाही अशी समज देताच अपीलार्थी निघून गेले व अपीलात मुळ बनावट स्टॅम्पपेपरची मागणी केली जे कागदपत्र अभिलेखामध्ये उपलब्ध नाहीत. त्यामुळे ते पुरविता येत नाही असे अपीलाचे सुनावणीत अपीलार्थी यांना समजावून नैसर्गिक न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात आला असता अपीलार्थी यांनी सुनावणी सुरु असताना निघून गेले व असहकार केला. सुनावणीत सहकार्य केले नाही. त्यामुळे अपीलावर सुनावणी होऊ शकली नाही.**

**(३) अपीलार्थी श्री रमेश रामजी राठोड रा. विज्ञान नगर मानेवाडा रोड नागपूर यास अपीलात हजर राहण्याबाबत अपील सुनावणी नोटीस क्रं.३ पोऊपआ/आर्थिक/माअ/अपील/०८/सुनावणी/ नोटीस/२१०-१०, दि. ४.१.२०१० अन्वये जारी करुन अपीलाची सुनावणी करीता दि.११.१.२०१० ही तारीख निश्चित करुन नोटीस वपोनि सक्करदरा पो.स्टे. मार्फत पाठविण्यात आली होती. अपीलार्थीस नोटीस दि.**

**७.१.२०१० रोजी प्राप्त झाली. अपीलार्थी नोटीस प्रमाणे अपीलाच्या सुनावणीकामी दि. ११.१.२०१० रोजी वेळेवर हजर झाले नाहीत. करीता अपीलावर एक तर्फी निर्णय घेण्यात आला. अपीलार्थी यांना उपलब्ध कागदपत्र जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्रं. जा.क्रं.अपोआ/गुन्हे/माअ/२०, दिनांक ८.१.२०१० रोजी पुरविले आहेत. करीता अपीलार्थी यांचे अपील सुनावणीअंती गुणवत्तेवर फेटाळण्यात आले आहे. अपीलार्थी जर या आदेशा अन्वये व्यथीत झाले असतील तर आपण या निर्णया विरुध्द ९० दिवसांचे आंत राज्य माहिती आयोग नागपूर कडे अपील करु शकता." असे अपीलीय अधिकारी यांनी कळविले आहे.**

**वरील खुलाशावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना आतापर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध**

**(पान ३ वर..)**



**झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, आतापर्यंत अपीलकर्ता यांचे अनेक अर्ज दाखल झालेले आहेत व त्या प्रत्येक अर्जाचे संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दिनांक ८.१.२०१० रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु ती अपीलकर्ता यांना मिळाली नसेल तर पुन्हा माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.**

**४. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती जशी असेल तशी कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध होते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे पोलीसांनी कार्यवाही करावी, अशी अपीलकर्ता यांची आग्रही भूमिका दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक ८.१.२०१० चे पत्राची प्रत पुन्हा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना पुन्हा दिनांक ८.१.२०१० च्या पत्राची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १२०५/२००९

१)श्री मधुकर विठ्ठलराव बोडे,
रा.नवेगांव(मुरखळा) पेट्रोल पंपाजवळ,
पो. मुडझा, ता.जिल्हा गडचिरोली. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक,
अतिशित रेत प्रयोगशाळा, नागपूर,
मोठा हनुमान मंदिराजवळ, तेलंगखेडी, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा प्रक्षेत्र व्यवस्थापक,
वळुमाता प्रक्षेत्र, वडसा(देसाईगंज)
ता.वडसा (देसाईगंज), जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २५.२.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.१.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक २१.१.२०१० रोजी घेण्यात येणार होती. परंतु त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे व त्रयस्थ पक्षांनी अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देवू नये असे जन माहिती अधिकारी यांना कळविलेले असल्यामुळे अधिनियमाचे कलम १९(४) प्रमाणे त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेणे हे आवश्यक असल्यामुळे त्यांना दिनांक २५.२.२०१० रोजी सुनावणीस उपस्थित राहण्यास कळविण्यात आले होते. त्रयस्थ पक्ष श्री रमेश नामदेवराव भूते हे आज २५.२.२०१० रोजी सुनावणीस हजर आहे. अपीलकर्ता हजर आहे.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी, "(अ) श्री रमेश नामदेवराव भूते, वरिष्ठ सहाय्यक यांचे सेवा पुस्तकाचे पहिल्या पानाची सत्यप्रत. (ब) श्री रमेश नामदेवराव भूते, वरिष्ठ सहाय्यक यांचे सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे संदर्भातील नामनिर्देशन पत्राची सत्यप्रत(नामनिर्देशनाचा नमुना नियम ७ अन्वये) (क) श्री रमेश नामदेवराव भूते, वरिष्ठ सहाय्यक यांचे राज्य शासकिय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ खालील लाभासाठी भरुन दिलेले नामनिर्देशनाची (प्रपत्र क्रं.७) सत्यप्रत. (ड) विषयांकित प्रकरणी माहितीच्या सत्यप्रती पुरविण्यापुर्वी श्री भूते,वरिष्ठ सहाय्यक यांची परवानगी घेणे आवश्यक असल्याबाबतच्या नियमांची सत्यप्रत," अशा स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येते.**

**अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी श्री आर.एन. भूते, वरिष्ठ सहाय्यक यांना त्यांची माहिती मागितलेली आहे याबाबत परवानगीची विचारणा केलेली दिसून येते. त्यावर दिनांक ११.९.२००९ रोजी श्री आर.एन. भूते यांनी, सदर माहिती माझी वैयक्तिक माहिती आहे. सदर व्यक्तीचा माझेशी, पत्नी व इतराशी नातेसंबंध नाही. त्यामुळे माझी वैयक्तिक माहिती श्री बोडे यांना देता येणार नाही. माझी वैयक्तिक माहिती श्री बोडे यांना दिल्यास भविष्यात माझे जीवाला व माझ्या कुटूंबास धोका निर्माण होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. सदर व्यक्तीने मागितलेली माहिती दिल्यास मी हयात नसतांना सदरहू कागदपत्राचा गैरवापर करुन माझे कुटूंबियांना भविष्यात संपत्तीस व शारीरिक व मानसिक त्रास देण्याची शक्यता आहे. श्री बोडे यांनी माझ्याबाबत मागीतलेली वैयक्तिक माहिती आहे. त्यामुळे सदर व्यक्तीने मागीतलेली माहिती देऊ नये, असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते. तसेच दिनांक १७.९.२००९ रोजी वैयक्तिक प्रकरणात माहितीची सत्य प्रत पुरविण्यापुर्वी श्री भूते, वरिष्ठ सहाय्यक यांची परवानगी घेणे आवश्यक असलेल्या नियमांची सत्य प्रत मागितलेली दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १०.१०.२००९ रोजी नियमाच्या सत्यप्रतीसाठीचा खर्च रुपये ३५/-चा भरणा करण्यास अपीलकर्ता यांना सांगितलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी त्याप्रमाणे रुपये ३५/-चा भरणा केला व त्यांना त्यावेळेसच दिनांक १५.१०.२००९ रोजी नियमाची सत्यप्रत तसेच प्रथम अपीलीय अधिका-याचा तपशिल इ. माहिती दिलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक ३१.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. त्रयस्थ पक्ष श्री आर.एन. भूते यांनी राज्य माहिती आयोगाकडे असे सांगितले की, त्यांची जी माहिती मागितलेली आहे ती त्यांची वैयक्तिक माहिती आहे. व अपीलकर्ता यांचे जे प्रकरण आहे, त्या प्रकरणाशी त्यांचा काहीही संबंध नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांचा म्हाडाच्या प्लॅाट संबंधी वाद आहे. व त्या वादाच्या संदर्भातच त्यांनी सदरची माहिती मागितलेली आहे.**

**अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकुन घेतल्यावर असे दिसून येते की, त्यांनी मागितलेली माहिती व त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना सांगितलेला वाद याचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. अपीलकर्ता यांनी जे वादाचे स्पष्टीकरण दिलेले आहे त्या संदर्भात त्यांनी**

**म्हाडा या प्राधिकरणाकडे तक्रार अर्ज करुन तो वाद सोडवून घेणे संयुक्तिक राहील. व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**